## तृतीय वर्ष कला

## राज्यशास्त्र पेपर

### अभ्यासपत्रिका क्रमांक - ४

# महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. संजय देशमुख**
**कुलगुरू**
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अंबुजा साळगांवकर**
**प्रभारी संचालक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
**प्रभारी अभ्यास साहित्य**
मुंबई विद्यापीठ, मुंबई

| | |
|---|---|
| **संपादक** | **प्रा. प्रकाश सोनवणे** , सहयोगी प्राध्यापक<br>कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिवळे, मुरबाड. |
| **लेखक :** | **डॉ. कुलकर्णी, जे. बी,** प्राचार्य<br>रॉय महाविद्यालय, चेंबूर<br>**डॉ. एस. जी. गोतपगार**<br>अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई<br>**प्रा. एस. पी बुवा**<br>डॉ. टी.के. टोपे रात्र महाविद्यालय, परेल, मुंबई - १२<br>**प्रा. शंकर वेल्हाळ**<br>गोगटे-वालके महाविद्यालय, बांदा, सिंधुदुर्ग<br>**प्रा. व्ही. डी. महाजन**<br>खरे-ढेरे महाविद्यालय, गुहागर, रत्नागिरी<br>**प्रा. यशोदा अहिरे - खरात**<br>स्वामी विवेकानंद महाविद्यालय, डोंबीवली. |

मार्च, २०१६ - तृतीय वर्ष कला - राज्यशास्त्र पेपर -अभ्यासपत्रिका क्रमांक - ४

**महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया**

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशक** | : | प्राध्यापक नि संचालक<br>दूर व मुक्त अध्ययनसंस्था,<br>मुंबई विद्यापीठ,<br>विद्यानगरी, मुंबई - ४०००९८ |

| | | |
|---|---|---|
| **अक्षरजुळणी** | : | **श्री ग्राफिक सेंटर**<br>२८, मंगल वाडी,<br>मुंबई - ४०० ००४ |

| | | |
|---|---|---|
| **छपाई** | : | |

## अनुक्रमणिका


| क्रमांक | पाठाचे शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | ऐतिहासिक पार्श्वभूमी (१८१८-१९६०) | ०१ |
| २. | प्रादेशिकता / प्रांतवाद (Regionalism) | २६ |
| ३. | जात, वर्ग व राजकारण / जाती समुह व जातीचे राजकारण | ५० |
| ४. | वंशवाद, धर्म आणि राजकारण | ७९ |
| ५अ | बिगर राजकीय प्रक्रिया - १<br>(व्यापारी व कामगार गटांच्या संघटना) | ९५ |
| ५ब | बिगर राजकीय प्रक्रिया - २<br>सहकारी चळवळी आणि शेतकऱ्यांची आंदोलने | १०९ |
| ५क | बिगर राजकीय प्रक्रिया - ३<br>स्वयंसेवी संस्था - स्वयंसहायता गट आणि विकासाची पर्यायी प्रतिमाने | १२० |
| ६. | राजकीय पक्ष आणि निवडणुका | १२५ |

**अभ्यासक्रम : तृतीय वर्ष कला**

**राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्रमांक - ४**

# महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया

**१. ऐतिहासिक पार्श्वभूमी (१८१८-१९६०)**

- महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळ
- ब्राम्हणेत्तर चळवळ
- दलित चळवळ

**२. प्रादेशिकता / प्रांतवाद**

- १९ व्या शतकातील प्रादेशिक अस्मितेच्या जावीणेचा उदय
- संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि तिची वाटचाल.
- उपप्रादेशिक किंवा विभागवाद आणि प्रादेशिक विकासातील असमतोल
- प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधक समिती / दांडेकर समिती

**३. जात, वर्ग व राजकारण जाती /समुह व जातीचे राजकारण**

- महाराष्ट्रातील प्रमुख जाति समूह
- मराठ्यांचे धुरीणत्व व राजकारण
- इतर मागास जातीचे राजकारण व दलित राजकारण

**४. वंशवाद, धर्म आणि राजकारण**

- वांशिकता आणि वंशवाद
- जमातवाद
- जमातवादी राजकारण
- हिंदू जमातवाद
- मुस्लीम जमातवाद
- जमातवाद आणि दशिवादाच्या अधारावर केल्या जाणाऱ्या राजकारणाला अनेकसत्तावादी आणि धर्मनिरपक्षतावाद्यांनी दिलेला प्रतिसाद.

**५. बिगर राजकीय प्रक्रिया**

**अ. व्यापारी व कामगार गटांच्या संघटना**

- दबावगट
- व्यापारी उद्योजक वर्ग आणि राजकारण
- चेंबर ऑफ कॉमर्सचा कार्यभाग
- कामगार संघटना

**ब सहकारी चळवळी आणि शेतकऱ्यांची आंदोलने**

- स्वयंसेवी संघटना

**क स्वयंसेवी संस्था - स्वयंसहायतता गट आणि विकासाची पर्यायी प्रतिमाने**

- श्रमिक संघटना
- नर्मदा आंदोलन - बिगर राजकीय संघटना
- स्वयंस्वायतता गट

## ६. राजकीय पक्ष आणि निवडणुका

- राजकीय पक्ष
- काँग्रेस वर्चस्वाचे युग
- आघाड्यांच्या राजकारणाचा उदय
- मतदार वर्तनाचे बदलते प्रवाह

------------

**नमुना प्रश्न पत्रिका**

**तृतीय वर्ष कला**

**राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्रमांक - ४**

# महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया

## विभाग १

१. महाराष्ट्रातील दलित चळवळीच्या विकासाचा आढावा घ्या.

२. महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीच्या विविध बाजूंची चर्चा करा. या चळवळीच्या राजकीय व सामाजिक प्रभावाचे परीक्षण करा.

३. अ) महाराष्ट्रातील उप-प्रादेशिकता वादाच्या वाढीची कारणे सांगा.

ब) उप-प्रादेशिकतावाद दूर करण्यासाठीचे उपाय सूचवा ?

४. महाराष्ट्रातील प्रभावी जातीसमूह म्हणून कुणबी-मराठा जातीसमूहाची चर्चा करा.

५. खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहाः-

अ) राष्ट्रीय चळवळ

ब) संयुक्त महाराष्ट्र चळवळ

क) महाराष्ट्रातील इतर मागास वर्गाचे (ओबीसी) राजकारण

ड) विदर्भ विभागाच्या समस्या.

## विभाग २

६. 'देशीवाद' ही संकल्पना स्पष्ट करुन महाराष्ट्रातील भूमीपूत्र सिध्दांतावर आधारित राजकारणाच्या प्रभावाची चर्चा करा.

७. अ) जमातवाद ही संकल्पना स्पष्ट करा.

ब) महाराष्ट्रातील राजकारण हिंदू-जमातवादाची भूमिका व स्वरुप यांचे चिकित्सक विश्लेषण करा.

८. महाराष्ट्रातील कामगार संघटनांच्या राजकारणावरील प्रभावांचे परीक्षण करा.

९. महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेसचे प्रभुत्व अद्यापही टिकून आहे. कारणे सांगा.

१०. खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.

अ) उद्योग समुह

ब) सहकार क्षेत्र

क) पर्यायी विकासाच्या चळवळी

ड) मतदार वर्तनाचे बदलते प्रवाह

❖ ❖ ❖

# १

# ऐतिहासिक पार्श्वभूमी (१८१८-१९६०)

१.० पाठाचे उद्देश
१.१ प्रस्तावना
१.२ महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळ
१.३ सामाजिक सुधारणेची चळवळ
१.४ ब्राम्हणेत्तर चळवळ
१.५ दलित चळवळ

## १.० पाठाचे उद्देश

राज्यशास्त्र पदवी परीक्षेकरीता तृतीय वर्षाच्या (टी.वाय.बी.ए.) विद्यार्थ्यांना पेपर नं.४ महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया या विषयासाठी सुधारीत अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. यात महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात घडलेल्या घटनांचा, त्यामागील प्रेरणांचा इत्यादीविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती करणे हा या विषयाचा उद्देश आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. अनेक भाषा, पेहराव, श्रद्धा, धर्म आणि सांस्कृतिक भिन्नता असणारा देश आहे. असे असून अलीकडील काळात प्रादेशिक अस्मितेतून प्रादेशिकवादाचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. परंतु प्रादेशीक घटकापेक्षा राष्ट्रहित, राष्ट्रऐक्य या बाबींची जाणीव होण आवश्यक आहे एकूण राष्ट्रनिर्मितीतील व राष्ट्रबांधणीतील प्रादेशीक भाषा, संस्कृती, आणि विविध प्रदेशातील लोकांचा त्याग, त्याचे योगदान यांची माहिती असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील राष्ट्रीय आणि सामाजिक सुधारणेची ऐतिहासिक पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना समजावून देणे हा या प्रकरणाचा उद्देश आहे.

## १.१ प्रस्तावना

भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे. भारताच्या राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्राने केले आहे. महाराष्ट्रातील अनेक प्रखर राष्ट्रवादी विचारवंत व नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला आहे. महाराष्ट्राने जसा भारताच्या राजकीय जीवनावर प्रभाव टाकला तसाच भारताच्या सामाजिक जीवनावरही प्रभाव टाकलेला आहे. महाराष्ट्राला थोर संतांची आणि समाजसुधारकांची दीर्घ परंपरा लाभलेली आहे. म्हणून आज महाराष्ट्राचा पुरोगामी राज्य म्हणून उल्लेख केला जातो. 'महाराष्ट्रातील राष्ट्रीय आणि सामाजिक सुधारणेची चळवळ' या भागात त्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

## १.२ महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळ

इ.स. १८५७चे बंड दडपून टाकल्यानंतर इ.स. १८५८ मधील राणीच्या जाहिरनाम्यामुळे जवळजवळ संपूर्ण हिंदुस्थानवर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. अर्थात या बंडांमागे स्वातंत्र्याची प्रेरणा होतीच असे नाही. परंतु भारतीय जनतेच्या मनात राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यात या बंडांचे योगदान आहे यात शंका नाही. ब्रिटिश राजवटीत प्रशासन, कायदा व सुव्यवस्था, न्यायव्यवस्था, शिक्षणाचा प्रसार यामुळे भारताच्या सामाजिक सुधारणांना चालना

मिळाली. त्यामुळे काही सुधारकांनी ब्रिटिश सत्तेचे स्वागत केले तर काहींनी ब्रिटिशांच्या अप्रत्यक्ष धार्मिक क्षेत्रातील हस्तक्षेप, ख्रिश्चन धर्माचा प्रसार, आर्थिक साम्राज्यवाद व पिळवणूक, भारतीयांना अधिकाराच्या जागा देण्यास नकार, दारिद्र्य, हिंदुस्थानी जनतेचा द्वेष, ब्रिटिश अधिकाऱ्यांचे दडपशाहीचे धोरण इ. कारणामुळे त्यांना विरोध केला. भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिश सत्तेविरूद्ध असंतोष निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. त्याच वेळी प्राच्यविद्या, वेदविद्या, उपनिषद इत्यादी वाङमयातील भारतातील उदात्त विचार व तत्त्वज्ञान यांचा काही ब्रिटिश व भारतीय तत्त्वज्ञांनी अभ्यास करून त्यांच्या श्रेष्ठ परंपरांची भारतीयांना जाणीव करून दिली. त्यातून बुद्धीवंत, समाजसुधारक व विचारवंतांमध्ये राष्ट्राबद्दल, संस्कृतीबद्दल अभिमान वाढू लागला आणि राष्ट्रवादी चळवळीचा उदय झाला.

### १.२.१ बुद्धिवाद्यांचे राष्ट्रीय चळवळीसंबंधी प्रयत्न :

महाराष्ट्रात राष्ट्रवादी चळवळीला प्रथम बुद्धीजीवी मध्यम वर्गाच्या माध्यमातून सुरूवात केली. लोकांमध्ये राष्ट्रीय चळवळीची प्रेरणा निर्माण करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. इंग्रजी सत्ता शाप आहे. असे मानणाऱ्यापैकी भास्कर पांडुरंग तर्खडकर, प्रखर राष्ट्रवादी विष्णुशास्त्री चिपळूणकर, सुधारणावादी विचारांचे लोकहितवादी, इत्यादी महाराष्ट्रातील बुद्धीवंत नेत्यांनी जनजागृतीचे कार्य केले. ब्रिटिश राजवटीत काही महत्त्वाच्या सुधारणांना चालना मिळाली याबद्दल ब्रिटिशांना वाजवी श्रेय्य देतानांच आर्थिक शोषणाविषयी लोकांना जागृत करणे, स्वधर्म, स्वभाषा, स्वदेश याविषयी लोकांमध्ये अभिमान व स्वाभिमान चेतविणे, ब्रिटिशांकडून भरतीयांना मिळणारी हीन वागणूक, ब्रिटिश संसदेमध्ये हिंदी लोकांना प्रतिनिधीत्व मिळण्याची आवश्यकता इत्यादी संदर्भात लोकांना जागरूक करण्याचा प्रयत्न केला. 'निबंधमाला', 'शतपत्रे', टिळक-आगरकरांचे 'केशरी', 'सुधारक' इ. वृत्तपत्र व मासिकाच्या माध्यमातून लोकांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्याचे कार्य बुद्धीजिवी वर्गाने केले. त्याचा परिणाम म्हणजे किमान वसाहतीचे स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी लोकांना संघटित होण्याची प्रेरणा मिळाली व सार्वजनिक क्षेत्रात विविध संघटना निर्माण होऊन संघटित संघर्षाला सुरूवात झाली.

### १.२.२ राष्ट्रीय चळवळीसाठी संघटनात्मक प्रयत्न :

लोकांना संघटित करून जनतेच्या मागण्या सरकारसमोर मांडणे, त्या मान्य करून घेण्यासाठी सरकारवर दबाव टाकणे, यासाठी कोलकत्त्यात स्थापन झालेल्या 'ब्रिटिश इंडियन आसोसिएशन'च्या धर्तीवर महाराष्ट्रातही काही संघटना निर्माण झाल्या. १९५२ मध्ये सरकदार रास्ते तसेच इतर सरदार व इनामदारांनी 'डेक्कन असोसिएशन'ची स्थापना केली. २६ ऑगस्ट १९५२ रोजी नाना शंकर शेठ, भाऊ दाजी लाड यांनी मुंबई येथे 'बॉम्बे असोसिएशन'ची स्थापना केली. न्यायप्रिय ब्रिटिश सरकारला भारतीय जनतेच्या समस्यांनी जाणीव करून देणे व त्या सोडविण्यासाठी सरकारला सहकार्य करणे, हिंदी लोकांना ब्रिटिश संसदेमध्ये प्रतिनिधित्व मिळवून देणे यावर या संघटनेने भर दिला होता. १८७५ मध्ये बॉम्बे असोसिएशनमधून बाहेर पडून फिरोजशहा मेहता, दिनशा वच्छा, दादाभाई नौरोजी यांनी 'बॉम्बे प्रेसिडेंसी' ही संस्था स्थापना केली. तर सरकारने लादलेल्या अवाजवीकरांच्या विरोधात संघर्ष करून लोकांना संघटित करण्यासाठी गोविंद बाबाजी वसईवर (जोशी) यांनी 'वसई असोसिएशन' (१८६२) आणि 'ठाणे असोसिएशन' (१८६८) या संघटना स्थापना केल्या. या सर्व संघटनांने ब्रिटिशांना विरोध करण्याऐवजी ब्रिटिश सरकारला अर्ज, विनंती करून भारतीय जनतेच्या समस्या सोडविणे व प्रसंगी सरकारवर दबाव निर्माण करणे असा मार्ग स्वीकारला होता. त्याच बरोबर राष्ट्राच्या

आर्थिक शोषणाविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे, त्यांच्यात राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करणे व त्यासाठी लोकांना संघटित करणे अशा कार्यात या संघटनांचे मोलाचे योगदान आहे. या सर्व संघटनांमध्ये राष्ट्रीय चळवळ सर्वोच्य शिखरावर नेण्याचे कार्य सार्वजनिक सभा आणि राष्ट्रीय सभेने केले. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे -

### १.२.३ सार्वजनिक सभा :

पुणे येथील पार्वती संस्थानातील भ्रष्टाचार, पंचमंडळींची अरेरावी व आर्थिक गोंधळ यावर कायदेशीर उपाय सुचविण्यासाठी औंधचे राजे श्रीमंत श्रीनिवास पंतप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक सभेची पुणे येथे स्थापना करण्यात आली. या सभेच्या स्थापनेत वासूदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करणे या मर्यादित उद्देशाने स्थापन झालेल्या या संघटनेचे राजकीय संघटनेत रूपांतर होऊन तिने लोकजागृतीचे महत्त्वाचे कार्य केले.

सरकारने केलेल्या लोकभावना दुखावणाऱ्या कायद्याच्या विरोधातील लोकांची गाऱ्हाणी शासनापुढे मांडणे, शेतकऱ्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करणे, १८७६-७७ या काळात महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळातील दुष्काळग्रस्तांना मदत, दुष्काळ फंड या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधणे, कायद्याचे मसुदे मराठीत तयार करावेत व भारतीयांना हायकोर्टात जज म्हणून नेमावे, इंग्लंड पार्लमेंटमध्ये हिंदी जनतेचे प्रतिनिधी असावेत अशी पार्लमेंटकडे मागणी केले. न्या. रानडे यांच्या सामाजिक, आर्थिक सुधारणाविषयक दृष्टीकोणाने सनदशीर राजकीय चळवळ करणारी संघटना म्हणून सार्वजनिक सभेला ओळखले जाऊ लागले. १८८० नंतर सीताराम हरी चिपळूणकर, शिवराम हरी साठे, गोपाळ कृष्ण गोखले यांनी सार्वजनिक सभेचा कारभार पाहिला. १८९६ मध्ये लोकमान्य टिळकांनी ही सभा काबीज केली. भारतीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करून राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची कल्पना याच सभेने मांडली.

### १.२.४ राष्ट्रीय सभा (भारतीय राष्ट्रीय सभा) :

आपली गाऱ्हाणी सुसंघटित अशा संघटनेद्वारा सरकारसमोर मांडावी या उद्देशाने 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन', 'मद्रास नेटीव असोसिएशन', 'पुणे सार्वजनिक सभा' इ. संस्था व संघटना स्थापन झाल्या. या संघटनांचे कार्य राष्ट्रीय पातळीवरून करण्यासाठी १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. ब्रिटिश सरकारवरील लोकांचा रोष कमी व्हावा व भारतीयांचे प्रश्न सनदशीर मार्गाने सुटावेत या उद्देशाने या सभेच्या स्थापनेत ॲलन ऑक्टेव्हिएन ह्यूम यांनी पुढाकार घेतला होता. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात या संघटनेचे महत्त्वाचे योगदान आहे. ब्रिटिश इंडियाच्या सर्व भागात कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीयसभेच्या कार्यकाळात अनेक चढउतार आले. तिच्या चळवळीच्या कार्याचे तीन कालखंडात विभाजन करून आढावा घेता येईल.

#### १) १८८५-१९०५ :

राष्ट्रीय सभेच्या पहिल्या कालखंडातील कार्यपद्धतीवर नेमस्तांवर प्रभाव होता. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, उमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दिनशा वच्छा इ. नेत्यांचे या काळातील काँग्रेसवर वर्चस्व होते. हे सर्व नेते वैचारिक स्वातंत्र्य व उदारीकरणावर पूर्ण विश्वास ठेवणारे होते. त्यांची चळवळ व कार्य सनदशीर, घटनात्मक मार्गाने चालत होते. ब्रिटिश मुळात न्यायप्रिय

आहेत, परंतु हिंदुस्थानातील वास्तव त्यांना माहित नसल्यामुळे हिंदुस्थानातील त्यांचा कारभार योग्य रितीने चालत नाही. तद्वत लोकमत जागृत करून लोकांच्या विविध मागण्या अर्ज, विनंत्या, ठराव, सभा, मेळावे इ. लोकशाही व शांततापूर्ण मार्गाने ब्रिटिश सरकारसमोर ठेवणे आवश्यक आहे. या मागण्यांचा विचार करून हळूहळू त्यांना मान्यता मिळेल असा नेमस्त नेत्यांना विश्वास वाटत होता. व याच दृष्टीने त्यांचे कार्य सुरू होते. या काळात त्यांनी घटनात्मक सुधारणा, आर्थिक सुधारणा, प्रशासकीय, न्यायविषयक, शस्त्रबंदी, लोककल्याणकारी कार्यक्रम, शेतीसुधारणा इ. बाबतीत महत्त्वपूर्ण कार्य केले.

### २) १९०५-१९२० :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेने हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य सुरूवात झाली असली, तरी नेमस्तांच्या कार्यपद्धतीमुळे ही चळवळ अत्यंत धीम्या गतीने चालली होती. त्यातून भरीव असे काहीच होण्याची शक्यता नव्हती. दरम्यानच्या काळात ब्रिटिशांचे धोरण, आंतरराष्ट्रीय स्तरावर बदललेली परिस्थिती यामुळे भारतीय लोकांमध्ये ब्रिटिशांविरूद्ध असंतोष निर्माण होत होता. ब्रिटिशांच्या जूलमी राजवटीची जाणीव, हिंदी लोकांच्या मागण्यांची असमाधानकारक पूर्तता, रशिया, इजिप्त, तुर्कस्तान, पर्शिया, चीन येथील राष्ट्रवादी आंदोलने, स्वतंत्र जपानची प्रगती, भारतीयांमध्ये निर्माण झालेला आत्मसन्मान व आत्मविश्वास, कर्झनची प्रतिगामी धोरणे, परदेशातील हिंदी लोकांना मिळणारी वाईट वागणूक, शिक्षणाचा प्रसार आणि नेमस्त नेत्यांना आलेले अपयश आणि हिंदी राष्ट्रवादी तरुणांमध्ये ब्रिटिश सत्तेविषयी निर्माण झालेली चीड यातूनच जहालवादी विचारांचा व चळवळीचा उदय झाला. महाराष्ट्रातील विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक यांनी जहालवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. या विचारसरणीची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

१) परकीय राजवटीचा कमालीचा द्वेष २) आपली मुक्ती आपणच केली पाहिजे, ३) स्वराज्य हे राष्ट्रीय चळवळीचे ध्येय, ४) प्रत्यक्ष कृती, ५) परकीय सत्तेला आव्हान देण्याच्या जनतेच्या सामर्थ्यावर विश्वास, ६) वैयक्तिक त्यागासाठी प्रत्येक राष्ट्रवाद्याची तयारी इत्यादी.

बंगालच्या फाळणीच्या निमित्ताने जहालवाद्यांना मोठी चालना मिळाली. त्याचा दुसरा परिणाम म्हणजे बंगालच्या फाळणीच्या प्रश्नावरून नेमस्त आणि जहालवादी एकत्र आले. जहालवाद्यांनी स्वदेशी आणि बहिष्कार, असहकार या माध्यमातून प्रखर क्रांतीकारक व राष्ट्रभक्त तयार केले. ब्रिटिशांनी शस्त्राच्या धाकाने चालविलेल्या कारभारास शस्त्रानेच उत्तर दिले पाहिजे असे त्यांना वाटत होते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव, शिवजयंती यांना सार्वजनिक स्वरूप देऊन लोकांना संघटित करण्याचे व सांस्कृतिक राष्ट्रवादातून राष्ट्रीय चळवळीला उत्तेजन देण्याचे कार्य केले.

### ३) १९२०-१९४७ गांधी युग :

दक्षिण आफ्रिकेतील हिंदी व आशियायी लोकांवरील अन्याय दूर करण्यासाठी सविनय कायदेभंग आणि सनदशीर मार्गाचा अवलंब करून ब्रिटिशांकडून होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. त्यामुळे भारतात येण्यापूर्वीच गांधींजीच्या नावाला एक वलय निर्माण झाले होते. दक्षिण आफ्रिकेतील आपले कार्य संपवून १९१५ मध्ये भारतात येताच गांधीजींनी स्वराज्याच्या चळवळीला हात घातला. यावेळी जहालमतवादी लोकमान्य टिळकांचे या चळवळीवर वर्चस्व होते. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचे निधन झाले आणि या चळवळीवर महात्मा गांधीजींचा पूर्ण प्रभाव निर्माण

झाला. नेमस्त विचारांचे ना. गो. कृ. गोखले यांना महात्मा गांधीजी आपले गुरू मानत असत. त्यामुळे पुन्हा एकदा स्वातंत्र्याची चळवळ नेमस्तांच्या हातात गेली. म. गांधीजींनी स्वातंत्र्याच्या लढ्याचे स्वीकारलेले तंत्र 'सत्याग्रह' म्हणून ओळखले जात असे. हे तंत्र सत्य, अहिंसा, सविनय कायदेभंग असे होते. स्वराज्याच्या चळवळीवर म. गांधीजींचा प्रभाव निर्माण झाला असला तरी महाराष्ट्रात टिळकांच्या विचारसरणीचा प्रभाव असणारे नेते काँग्रेसमध्ये होते. त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशीक कमिटीमध्ये दोन गट निर्माण झाले होते.

म. गांधीजींचा इंग्रजाच्या न्यायप्रियतेवर विश्वास होता. इंग्रजांशी सहकार करून त्यांनी दिलेल्या सुधारणा राबवून देशाची प्रगती करता येईल. असे त्यांचे मत होते. परंतु अन्यायकारक रौलेट ॲक्ट, जालियनवाला बाग हत्याकांड, खिलापत चळवळ, हंटर कमिशनचा अहवाल इ. कारणांवरून म. गांधीजींनी असहकार चळवळ सुरू केली. परंतु ५ फेब्रुवारी १९२२ रोजी चौरीचौरा (उत्तरप्रदेश) येथील हिंसक दंगलीमुळे ही चळवळ स्थगित करण्यात आली. दरम्यान माँट-फर्ड सुधारणांनुसार निवडणुकीद्वारे हिंदी प्रतिनिधींना कौन्सिलमध्ये प्रवेश देण्यात येणार होता. या निवडणुकांमध्ये सहभाग घेण्याच्या प्रश्नांवरून काँग्रेसमध्ये 'फेरवादी' आणि 'नाफेरवादी' असे दोन गट निर्माण झाले. १९२३ मध्ये फेरवादी काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी स्वराज्य पक्षाची स्थापना केली. परंतु कौन्सिलमध्ये सरकारशी सहकार्य करावे, की अडवणूकीचे धोरण स्वीकारावे यावरून स्वराज्य पक्षात फूट पडली. न. चि. केळकर, डॉ. मुंजे, बॅ. जयकर, लोकनायक मा. श्री. अणे, मदनमोहन मालविय इ. नेते सरकारला सहकार्य करण्याच्या मताचे होते. त्यांनी स्वराज्य पक्षातून बाहेर पडून 'प्रतियोगिता सहकार पक्ष' स्थापन केला. अशा फुटीमुळे स्वराज्य पक्षाची शक्ती व प्रभाव कमी झाला. पुढे मुस्लिम लीगचे धोरण, काँग्रेसचे मुस्लिम समाजबद्दलचे धोरण यामुळे हिंदुंच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी हिंदू महासभेची स्थापना झाली. १९३७ ते १९४२ या काळात स्वातंत्र्यवीर सावरकर हे या सभेचे अध्यक्ष होते.

१९१९ च्या सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी १९२७ मध्ये भारतात सायमन कमिशन आले. त्यात कोणीही हिंदी प्रतिनिधी नसल्याने काँग्रेसने या कमिशनवर बहिष्कार टाकला. त्यावेळी तत्कालीन बर्कनहेड या भारत मंत्र्याने सर्वमान्य राज्यघटना तयार करण्याचे आवाहन काँग्रेसला केले. त्या संदर्भात १९२८ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी एक अहवाल सादर केला. त्यात बॅ. जीना यांनी विरोध केला. ब्रिटिश सरकारनेही नेहरू अहवालामध्ये दुर्लक्ष केले. त्यामुळे डिसेंबर १९२९ मध्ये लाहोर येथे भरलेल्या अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याची मागणी करण्यात आली. २६ जाने. १९३० हा 'पूर्ण स्वराज्य दिन' म्हणून देशभर साजरा करण्यात आला. १२ मार्च १९३० पासून सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यात आली. मीठाचा कायदा मोडण्याच्या कार्यक्रमाने सविनय कायदेभंगाच्या चळवळीस सुरूवात झाली. मीठाचा कायदा मोडण्यासाठी गांधीजींनी आपल्या आश्रमातील ७९ अनुयायांची तुकडी सत्याग्रहासाठी निवडली. त्यात पंडित खरे, गणपतराव गोडसे गोविंद हरकारे, विनायक आपटे, केशव चित्रे, हरिभाऊ मोहनी इ.१३ मराठी भाषिक होते. महाराष्ट्रात अनेक क्षेत्रात विविध सत्याग्रह करून उदा. सरकारी कार्यालय व इमारतींवर तिरंगा झेंडा लावण्याचा सत्याग्रह, स्वातंत्र्याचे प्रतिक असलेली गांधी टोपी डोक्यावर घालणे, शिरोड सत्याग्रह, वडाळ्याच्या मिठागरावरील धाड, जंगल सत्याग्रह, जप्त वागङ्मयाचे जाहिर वाचन इ. सत्याग्रह करून सविनय कायदेभंगाच्या चळवळीला महाराष्ट्रात जोर निर्माण झाला. सोलापूरमध्ये विविध ठिकाणी झालेल्या सत्याग्रहात काही हिंसक घटना घडल्यामुळे तेथे लष्करी कायदा लागू करण्यात आला. त्यात मल्लप्पा

धनशेट्टी, शिंदे, सारडा आणि अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. मीठाच्या सत्याग्रहासाठी पुणे जिल्ह्यात खेड्यापाड्यात प्रचाराचे कार्य वि. रा. शिंदे, हरिभाऊ तुळपुळे, वासूकाका जोशी, धर्मानंद कोसंबी आणि केशवराव जेधे यांनी केले. तर एस्.एम्.जोशी, ना. ग. गोरे, र. के. खाडिलकर, त्र्य. र. देवगिरीकर यांनी पुणे जिल्ह्याबाहेर जाऊन कुलाबा, ठाणे इ. जिल्ह्यात प्रचार प्रभा घेतल्या. १२ डिसेंबर १९३० रोजी या सत्याग्रहात बाबू गेणू हुतात्मा झाला. ब्रिटिशांना ही चळवळ दहशतीने दडपून टाकणे शक्य झाले नाही, तेव्हा आयर्विनच्या पुढाकाराने काँग्रेस नेत्यांना तुरुंगातून मुक्त केले व गांधीजींना चर्चेसाठी बोलाविण्यात आले. गांधी आयर्विन यांच्यात करार होऊन ५ मार्च १९३१ ला या कायदेभंगाच्या चळवळीला स्थगिती देण्यात आली.

सायमन कमिशनच्या अहवालातील शिफारशींवर चर्चा करण्यासाठी गोलमेज परिषद भरविण्यात आली होती. बहिष्काराच्या धोरणामुळे पहिल्या गोलमेज परिषदेत काँग्रेसने भाग घेतला नाही. गांधी-आयर्विन करारानंतर दुसऱ्या गोलमेज परिषदेला काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी म्हणून म. गांधीजी उपस्थिती राहिले. अस्पृश्यांच्या राखीव जागांवरून या परिषदेत मोठाच गदारोळ झाला. गांधीजींनी हिंदुंपेक्षा अस्पृश्यांचे वेगळे अस्तित्व मान्य करण्यास व त्यांना कोणत्याही प्रकारचे खास अधिकार देण्यास स्पष्ट नकार दिला. गोलमेज परिषदेचे अस्पृश्यांचे प्रतिनिधी, संस्थानिक, अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधीं आणि महात्मा गांधीजी यांच्यात बहुतेक प्रश्नांवर एकमत न झाल्याने ही परिषद कोणत्याही ठोस निर्णयाशिवाय समाप्त झाली.

१६ ऑगस्ट १९३२ रोजी ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहिर केला. त्यात अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले होते. त्या विरोधात गांधीजींनी पुणे येथे येरवडा जेलमध्ये असताना आमरण उपोषण केले. पुणे कराराने उपोषण समाप्त करण्यात आले. परंतु या प्रसंगाने गांधीजींचा राष्ट्रीय चळवळीतील उत्साह कमी झाला. त्यांनी 'हरिजन सेवक संघाची' स्थापना करून अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला वाहून घेतले. तरीही संपूर्ण भारतभर व्यक्तिगत स्तरावर सत्याग्रहाचे कार्यक्रम चालू होते. १९३५ मध्ये ब्रिटिश सरकारने प्रांतिक स्वायत्ता देणारा 'हिंद्युस्थानचा स्वातंत्र्याचा कायदा - १९३५ तयार केला. त्यानुसार जाने १९३७ मध्ये निवडणुका जाहिर केल्या. काँग्रेसने यात भाग घेतला. यात बंगाल, सिंध व पंजाब हे प्रांत सोडून सर्व प्रांतात काँग्रेसला मोठे यश मिळाले. संयुक्त प्रांत, ओरीसा, बिहार, मद्रास आणि मुंबई या प्रांतात काँग्रेसची मंत्रीमंडळे स्थापन झाली. त्यांनी अनेक प्रकारची लोककल्याणकारी कार्ये केली.'

१९३७च्या निवडणूकीने आठ प्रांतात काँग्रेसची मंत्रीमंडळे स्थापन झाली असली तरी १ डिसेंबर १९३९ रोजी सुरू झालेल्या दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांनी हिंदी नेत्यांना न विचारताच भारताला त्यात गोवले. त्याचा काँग्रेसने तीव्र निषेध केला. याच काळात काँग्रेसमधील समाजवादी व जहाल प्रागतिक गटांचा प्रभाव वाढू लागला. युद्ध काळातील 'ब्रिटिशांची अडचण हीच आपली संधी' आहे व या संधीचा फायदा स्वातंत्र्य मिळविले पाहिजे, असा विचार जहाल प्रागतिक गटाने जाहिर केला. तो म. गांधीजींना मान्य नव्हता. ८ ते १५ सप्टेंबर १९३९ या काळात काँग्रेस वर्कींग कमिटीच्या 'बैठकीत हिंदुस्थानच्या शांततेचा वा युद्धाचा प्रश्न हिंदी जनतेच्या मताने ठरविला पाहिजे.' असा प्रस्ताव मांडण्यात आला. त्या प्रस्तावाला ब्रिटिश सरकारने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे काँग्रेसच्या सर्व प्रांतीक मंत्रीमंडळांनी राजनामे दिले. लिनलिथगो यांच्या

मध्यास्थीने काही तडजोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तो असफल झाला. व्यक्तिगत पातळीवर सत्याग्रहाचा जोर वाढविण्यात आला. सुभाषचंद्र बोस यांनी जपानमध्ये आझाद हिंद फौजेचे नेतृत्व स्वीकारून जपानच्या बाजूने ब्रिटिशांविरूद्ध युद्ध पुकारले. दरम्यान क्रिप्स योजना जाहिर करण्यात आली. ती फेटाळण्यात आली. देशात सर्वत्र वैफल्याची भावना निर्माण झाली. आणि ८ ऑगस्ट १९४२ला मुंबई येथे संपूर्ण स्वराज्याच्या मागणीसाठी 'चलेजाव' आंदोलन सुरू केले. या आंदोलनातील हिंसा पाहून गांधीजींनी ९ फेब्रुवारी १९४३ रोजी २१ दिवसांचे उपोषण करून ही चळवळ स्थगीत केली. परंतु याच चळवळीमुळे ब्रिटिशांना ताबडतोब हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा विचार करावा लागला. ब्रिटिशांनी स्वातंत्र्यसंबंधीच्या अनेक योजना मांडल्या. शेवटी मुस्लिम लीगचा आडमुठेपणा, ब्रिटिशांचे कपट, हिंदु-मुस्लिम दंगे, हिंदुंचा अहंकार, जनतेतील सदृढता व सामर्थ्याचा अभाव इत्यादी कारणांमुळे फाळणीचा पर्याय स्वीकारून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत व पाकिस्तान या दोन सार्वभौम राज्यांची निर्मिती झाली.

## १.३ सामाजिक सुधारणेची चळवळ

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वधर्म आणि स्वराष्ट्राच्या रक्षणासाठी उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचा १८१८ मध्ये पेशवाईच्या अंताने शेवट झाला. वास्तविक पेशवाई नष्ट झाल्याचे दु:ख सनातनी उच्चवर्णीय व स्वार्थी सरदार यांच्या व्यतिरिक्त कोणासही झाले नाही. कारण पेशवाईचा उत्तरार्ध महाराष्ट्रातील जनतेला नरकयातना देणारा होता. त्या काळात समस्त स्त्री आणि बहुजन व अस्पृश्य वर्गाचा साधे माणुसकीचे हक्कही नाकारले होते. त्यांना अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक, आर्थिक लैंगिक, मानसिक शोषण करणाऱ्या रूढी, कर्मकांड यात त्यांना अडकवून टाकले होते. त्याच्या सर्व प्रकारच्या विकासाचे मार्ग बंद झाले होते. याच काळात पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावाने जागृत झालेल्या समाज सुधारकांचा वर्ग सर्व जातीधर्मातून उदयास आला. त्यांनी महाराष्ट्रात समाजसुधारणेच्या चळवळीला सुरूवात केली. त्याचा थोडक्यात आढवा पुढीलप्रमाणे -

### १.३.१. वर्णव्यवस्था व जातिसंस्था :-

जन्मधिष्ठीत वर्णव्यवस्था आणि जातिसंस्था यामुळे हिंदू समाजात अनेक जाती, व प्रत्येक जातीत अनेक उपजाती निर्माण झाल्या. त्यामुळे हिंदू समाज अनेक तुकड्यात विभागला जाऊन तो आपली संघटित शक्ती हरवून बसला आहे. कनिष्ठ जाती व स्त्रियांवर जातिव्यवस्थेने अनेक निर्बंध लादल्यामुळे सामाजिक, धार्मिक, राजकीय इ. क्षेत्रांत त्यांच्या विकासाचे सर्व मार्ग बंद झाले असून त्यांची जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्यांची अधोगती झाली आहे. त्यातच वर्णजातिसंस्थांना धर्माचा आधार असल्याने ही समस्या अधिकच जटील बनलेली होती. म. फुले यांनी या समस्येच्या मुळावर घाव घातला. त्यांनी ऋग्वेदातील वर्णव्यवस्थेच्या उगमाच्या सिद्धान्ताचे थोतांड सप्रमाण उघड केले. शूद्रातिशूद्र हे परस्परांचे बंधू असून जातीभेद हे कृत्रिम आहेत अशा वैचारिक प्रबोधनाच्या मार्गाने व प्रत्यक्ष कृतीने सामाजिक समतेचा पुरस्कार केला. १८४४ मध्ये दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी मानवधर्म सभेची स्थापना करून या सभेच्या माध्यमातून जातिसंस्थेला विरोध केला. सर्वांची जात एक आहे या तत्त्वाला प्रसार या सभेमार्फत केला जात असे. राजर्षी छ. शाहू महाराज यांनी वेदोक्त प्रकरणानंतर वर्णजातिसंस्थेला विरोध करण्यास सुरूवात केली. त्यांनी कनिष्ठ जातींच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीसाठी आपल्या हातातील राजकीय सत्तेचा वापर केला. जाती निर्मूलनासाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय विवाहाचा पुरस्कार केला. त्यांच्या संस्थानात त्यांनी आंतरजातीय विवाहास कायद्याने मान्यता दिली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी

आपले संपूर्ण आयुष्यच जातिभेद आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी अर्पण केले होते. याशिवाय महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, लोकहितवादी, संत गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जातिभेद नष्ट करण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले.

### १.३.२ अस्पृश्यता निर्मूलन :

मानवाने मानवाला स्पर्श न करण्याची ही अस्पृश्यतेची ही अस्पृश्यतेची रूढी अमानवी स्वरूपाची होती. १९ व्या शतकाच्या सुरूवातील म्हणजेच पेशवाईच्या उत्तरकाळात ती अधिक तीव्र स्वरूपाची होती. स्वच्छ रहाणे, शुद्ध बोलणे, सवर्णांच्या नजरेला नजर देणे, चांगले व सकस अन्न खाणे हा अस्पृश्यांचा अपराध मानला जात होता. सवर्णांची बरोबरी होईल अशी कोणतीही कृती किंवा वर्तन निषिद्ध मानले जात असे. व त्या अपराधासाठी त्यांना मृत्युदंडापर्यंतची शिक्षा दिली जात असे. अशा घृणास्पद रूढीमुळे अस्पृश्य समाजाच्या सर्वांगीण विकासाचे सर्व मार्ग बंद केले होते. शिक्षण, व्यवसाय करण्यावर बंदी असल्याने अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, गुलामगिरीची भावना अशा अनेक समस्यांमध्ये हा समाज पूर्ण अडकला होता. मुक्तीचा कोणताही मार्ग दिसत नव्हता. जात आणि अस्पृश्यता यांचा अतुट संबंध असल्याने समाजसुधारकांनी जातिभेद आणि अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याला महत्त्व दिले. म. जोतिबा फुले यांनी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांकरीता खुला करून अस्पृश्यता निवारणाच्या कृतिशील पाया घातला. त्यांच्यासाठी शाळा काढून अज्ञान अंधश्रद्धा दूर करण्यास प्राधान्य दिले. दादोबा पांडुरंग यांनी परमहंस सभेच्या माध्यमातून सहभोजनाचे कार्यक्रम घडवून आणले होते. छ. शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी शाळा, वसतिगृहे, शीष्यवृत्ती, संस्थानात राखीव जागा, व्यवसाय करण्यास प्रोत्साहन, त्यांचा मानसन्मान वाढविण्यासाठी विविध पुरस्कार देणे इत्यादी मार्गाने अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला गती दिली होती. अस्पृश्यता निवारणाचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना मदत करीत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी या कार्यात अनेक प्रकारे मदत केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभा, समाज समता संघ, स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, पिपल्स एज्युकेशन सोसायटी इ. सामाजिक, राजकीय व शैक्षणिक संघटनांच्या मार्गाने अस्पृश्यांना त्यांचे सामाजिक, राजकीय हक्क मिळवून देण्याचा व त्यांचा शैक्षणिक विकास करण्याचा तसेच त्यांना समाजात समानतेचा दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. महर्षी वि. रा. शिंदे यांचे संपूर्ण कुटुंबच अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात सहभागी झाले होते. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या माध्यमातून त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाला चालना दिली. याशिवाय स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, श्री. म. माटे, पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या कार्यात मोलाची कामगिरी केली आहे.

### १.३.३ स्त्रीविषयक समस्या :

पुरूषप्रधान भारतीय संस्कृतीने धर्माच्या, जातीच्या नावाने स्त्रियांना नेहमीच कनिष्ठ व दुय्यम दर्जा दिला आहे. तिच्यावर अनेक क्रूर बंधने लादून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात तिला विकासाची संधी नाकारली आहे. सक्तीचे वैधव्य, केशवपन, बालविवाह, लैंगिक शोषण इ. तिच्या समस्या होत्या. ब्रिटिश राजवटीत काही समाजसुधारकांनी संस्थात्मक, कायेदशीर तर काहींनी व्यक्तिगत पातळीवर स्त्री उद्धाराच्या कार्याला हातभार लावला.

### १ स्त्री शिक्षण :

शिक्षणाशिवाय आत्मभान, स्वाभिमान आणि स्वतःच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याची, अन्यायाला प्रतिकार करण्याची वृत्ती निर्माण होत नाही. स्त्री शिक्षणाने केवळ तिच्या कुटुंबाचाच उद्धार होत

नाही तर समाजाचाही उद्धार होतो. म्हणूनच समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षणाला महत्त्व दिले. शिक्षणाने स्त्रिया व्यभिचारी बनतील, स्त्रीने शिक्षण घेतले तर तिच्या नवऱ्याचे आयुष्य कमी होईल किंवा त्याचं अकाली निधन होईल यासारख्या अफवा पसरवून तत्कालीन सनातन्यांनी स्त्रीशिक्षणाचा विरोध केला. त्या काळात १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा उघडून महाराष्ट्रात स्त्रीशिक्षणाचा पाया म. फुले यांनी घातला. यानंतरच्या काळात जगन्नाथ शंकरशेठ यांनी मुंबईत मुलींसाठी शाळा सुरू केली. या शिवाय बाळशास्त्री जांभेकर, डॉ. भाऊ दाजी लाड या सुधारकांनी प्रबोधनाच्या पातळीवर स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराला चालना दिली. छ. शाहू महाराजांनी मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणालाही महत्त्व दिले. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलींना फी माफी दिली जात असे. रखमाबाई केळवकर या महिलेला डॉक्टर करून तिची संस्थानात शिक्षणाधिकारी म्हणून त्यांची नेमणूक केली. पंडिता रमाबाई यांनी शारदा सदनची स्थापना करून स्त्रीशिक्षणाला चालना दिली. महर्षी कर्वे यांनी तर स्त्रीशिक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्यच वाहिले. त्यांनी १९०७ मध्ये हिंगणे येथे महिला विद्यालयाची तर १९१६ मध्ये एस्.एन्.डी.टी. महिला विद्यापीठाची स्थापना केली. याशिवाय कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, व इतर अनेक सुधारकांनी स्त्रीशिक्षणाला चालना देऊन स्त्रियांना अज्ञान, अंधश्रद्धा यातून बाहेर काढून स्वउद्धाराची नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न केला.

### २. विधवा पुनर्विवाह व इतर समस्या :

पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीला दुसरा विवाह करण्याचा अधिकार नव्हता. उर्वरित आयुष्य तिने केवळ विधवा म्हणूनच जगावे अशी प्रथा होती. अर्थात तेही तिला तिच्या मर्जीप्रमाणे जगता येत नव्हते. केशवपन, करणे, रंगीत वस्त्रे परिधान न करणे, मंगल, शुभ कार्यात प्रवेश न करणे इ. अनेक निर्बंध तिच्यावर लादले होते. असा काळात म. फुले यांनी १८६४ मध्ये पुण्यात गोखले यांच्या बागेत एक विधवा विवाह घडवून आणून कृतीनेच विधवा विवाहाचा पुरस्कार केला. स्त्रियांच्या केशवपनाला नाभिकांचा एक दिवसाचा संप घडवून विरोध केला. भाऊ दाजी लाड यांनी देवकुवर या विधवा स्त्रीचा विवाह घडवून आणला. विष्णूशास्त्री पंडित यांनी पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर कुसुमबाई या महिलेशी विवाह केला. पंडिता रमाबाई यांनी परियक्त्या, पतिता व विधवा स्त्रियांसाठी आर्य महिला समाजाची स्थापना करून कार्य केले. त्यांच्या शारदा सदन मधील गोदूबाई या महिलेशी विवाह करून महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी कृतीनेच विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात विधवा पुनर्विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. या सुधारकांच्या प्रयत्नानेच महिलांच्या या समस्या कमी होण्यास मदत झाली.

### ३ भ्रूणहत्या :

विधवा स्त्रियांना सक्तीचे वैधव्य, पुनर्विवाहास प्रतिबंध यामुळे महिला पुरूषांच्या लैंगिक शोषणाला बळी पडत असत. अशा अत्याचारातून जन्माला येणाऱ्या बालकांची हत्या किंवा त्या स्त्रीची आत्महत्या हाच पर्याय त्यांच्यापुढे होता. त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी म. फुले यांनी त्याचे सुखरूप व गुप्त पद्धतीने बाळंतपण करण्यासाठी, त्यांच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची सोय आपल्या घरीच केली. अशा अडचणीत असणाऱ्या स्त्रियांना येथे येण्याचे आवाहन केले व सर्व बाबतीत गुप्ता व सुरक्षितता बाळगण्याचे त्यांनी अश्वासन दिले. म. फुले यांनी भ्रूणहत्या प्रतिबंधक गृहांच्या स्थापनेने अनेक स्त्रियांना व नवजात बालकांना जीवनदान दिले.

### ४. बहुपत्नीकत्व व बालविवाह :

पुरूषप्रधान संस्कृतीने पुरूषांना कितीही विवाह करण्याची मुभा दिली होती. त्यामुळे स्त्रियांच्या समस्येत वाढच झाली होती. याच पद्धतीचा परिणाम म्हणजे बालविवाह होय. अत्यंत लहान वयात विवाह करण्याची पद्धती त्या काळात होती. त्यातूनच बालविधवाची समस्या निर्माण झाली होती. म्हणूनच या दोन्ही पद्धती नष्ट व्हाव्यात म्हणून सुधारकांनी प्रयत्न केले. त्याच्या प्रयत्नांमुळेच १८७२ मध्ये बहुपत्नीत्व व बालविवाहास बंदी करणारा कायदा करण्यात आला. तर १९३० मध्ये विवाहाचे वय १४ ते १८ करण्यात आले. म. फुले यांना मूल नसल्याने त्यांच्या आईवडिलांनी व स्वतः सावित्रीबाई यांनी दुसऱ्या विवाहाचा आग्रह केल्यानंतरही त्यांनी स्पष्ट नकार दिला व बहुपत्नीत्वाच्या पद्धतीला विरोध केला. याशिवाय न्या. रानडे, लोकहितवादी इ. सुधारकांनी या प्रथेला विरोध करण्यासाठी प्रबोधनाच्या माध्यमातून मोलाचे कार्य केले.

### ५. देवदासी व मुरळी प्रथा :

देवदासी म्हणजे आजन्म अविवाहित राहून गणिका (वेश्या) वृत्तीने देवदेवतांची सेवा करणारी अथवा नवस फेडण्यासाठी देव देवतांना अर्पण केलेली स्त्री होय. देवदासी ही प्रथा भारतीय समाजात प्राचीन काळापासून आहे. देवदेवतांसंबंधीच्या थोतांड कल्पना व अंधश्रद्धा यातून या प्रथेचा जन्म झाला. त्याला भोदवादी पुरूषप्रधान समाजाने मान्यता देऊन प्रोत्साहन दिले. ही समस्या बहुजन समाजाशी विशेषतः कनिष्ठ जातींशी निगडित असली तरी या प्रथेने हिंदू समाजाची नैतिक अधोगती कोणत्या पातळीपर्यंत झालेली होती हे स्पष्ट होते. मुलींच्या केसात जट धरणे, वेगवेगळे आजार होणे, आकस्मीत मृत्यू होणे, मूल न होणे इत्यादी कारणांमुळे मुली यल्लमा देवीला अर्पण करणे अशी ही प्रथा होती. अशाच कारणांमुळे खंडोबा देवाला अर्पण केलेल्या मुलीला मुरळी असे म्हणतात. मुली अर्पण करणे म्हणजे त्या मुलीचे त्या देवाबरोबर लग्न लावणे होय. त्यानंतर तिला इतर कोणत्याही पुरूषाशी विवाह करता येत नाही. त्यामुळेच बायको देवाची आणि रेखल गावाची अशी ही प्रथा होती. या प्रथेमुळे वेश्या व्यवसायाला चालना मिळत असे. या प्रथेला प्रथम दक्षिण भारतात पेरियार रामस्वामी नायकर यांनी विरोध केला. महाराष्ट्रात १९०५ मध्ये डॉ. रामकृष्ण भांडारकर यांनी या प्रथेवर बंदी घालण्याची मागणी सरकारकडे केली होती. म. फुलेच्या सत्यशोधक चळवळीत वाढलेल्या शीवराम जानबा कांबळे यांनी सोमवंशीमित्र या साप्ताहिकातून या प्रथेविरूद्ध जनमत तयार करण्यावर भर दिला. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने परिषदा भरवून, साप्ताहिकातून या प्रथेविरूद्ध जनमत तयार करण्यावर भर दिला. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने परिषदा भरवून, सभा घेऊन, गावोगावी फिरून देवाला मुली सोडू नये म्हणून जनजागृती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देवदासींच्या परिषदा भरवून त्यांना या प्रथेपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. माधवराव सोलंकी, अण्णासाहेब लठ्ठे, सीताराम शिवतरकर या नेत्यांनीही या प्रथेविरूद्ध आवाज उठवला. त्यामुळे १९३४ मध्ये ही प्रथा बंद करण्याचा कायदा केला. तरी अज्ञान, अंधश्रद्धा, प्रबोधनाचा अभाव व त्या देवांसंबंधीची भीती यामुळे ही प्रथा पूर्ण नष्ट झाली नाही.

### १.३.४ सार्वत्रिक शिक्षण :

ब्रिटिशपूर्व काळात शिक्षण ही केवळ उच्च वर्णीयांची मक्तेदारी होती. त्या काळात दिले जाणारे शिक्षणही केवळ धार्मिक स्वरूपाचे होते. ब्रिटिशांच्या काळात शिक्षणाचे स्वरूप बदलले. इतिहास, गणित, विज्ञान यांचे शिक्षण सुरू केले. तसेच इस्ट इंडिया कंपनी, ख्रिश्चन मिशनरी यांच्या प्रयत्नाने शिक्षण सार्वत्रिक झाले. तरीही जातीभेद, धार्मिक समजूती, अस्पृश्यता यामुळे बहुजन

समाजाला शिक्षणाची संधी मिळत नसे. म्हणून म. फुले यांनी हंटर कमिशनला दिलेल्या निवेदनात शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाला प्राधान्यक्रम द्यावा, प्राथमिक शिक्षण मोफत द्यावे, शिक्षणाने शूद्रातिशूद्र स्वावलंबी होतील असे उच्च शिक्षण द्यावे अशी विनंती केली. तसेच स्वतः शाळा काढून बहुजनांच्या शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. डॉ. भाऊ दाजी लाड यांनी ज्ञान प्रसारक सभा स्थापन करून शिक्षण प्रसाराचे कार्य केले. राजर्षी शाहू महाराजांनी विद्यालये, महाविद्यालये, वसतिगृहे स्थापन करून, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन बहुजनांच्या शिक्षण प्रसाराला चालना दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पिपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली, महर्षी वि. रा. शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना केली व त्यांनी बहुजनांमध्ये शिक्षणाच्या प्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य केले. खऱ्या अर्थाने त्यांनी शिक्षणाचे सार्वत्रिककरण केले. त्यांच्यात स्वाभिमान, स्वावलंबन व स्वहक्कांसाठी लढण्याची ऊर्मी निर्माण केली.

### १.३.५ विविध संस्था व संघटनांच्या माध्यमातून सामाजिक व धार्मिक सुधारणाः

तत्कालीन समाजातील जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, बहुजनांच्या शोषणाच्या प्रथा इ. समस्या सोडवून शोषणमुक्त व समतेवर आधारलेल्या समाजाची निर्मिती करण्यासाठी संघटनात्मक प्रयत्न करण्यासाठी सुधारकांनी विविध संस्था, संघटनांची स्थापना केली. दादोबा पांडुरंग यांची परमहंस सभा, आत्माराम पांडुरंग याचा प्रार्थना सभा, आर्य समाज, आर्य महिला समाज, अनाथ बालकाश्रम, म. फुले यांचा सत्यशोधक समाज, महर्षी शिंदे याचा डिप्रेस्ड क्लासेस मिशन, पंडिता रमाबाई यांचा शारदा सदन, मुक्ती सदन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बहिष्कृत हितकारिणी सभा, समाज समता संघ, राष्ट्रीय सामाजिक परिषद इ. संघटनांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांना चालना दिली.

### १.३.५. वृत्तपत्रांच्या माध्यमातून प्रबोधन :

समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, स्त्रिया व शूद्रतिशूद्रांच्या समस्या सोडविण्यासाठी केवळ कायदे करून पुरेसे होणार नाही; तर लोकांच्या मनात परिवर्तन होणे आवश्यक होते. त्यासाठी लोकांना त्या समस्यांची, त्याच्या धार्मिक समजुतींतील वास्तवपणा याचे खरे ज्ञान करून देणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी सुधारकांनी वृत्तपत्रे, साप्ताहिके, ग्रंथ यांचा आधार घेतला. उदा. कृष्णराव भालेकर यांचे दीनबंधू, निराश्रीत हिंदू, मराठा दीनबंधू, म. फुले यांचे सत्सार, गुलामगिरी व इतर ग्रंथ, नारायण लोखंडे यांचे शेतकऱ्यांचा कैवारी, मुकुंदराव पाटील याचे दीनमित्र, वा. रा. कोठारी याचे जागरूक, अण्णासाहेब लठ्ठे यांचे डेक्कन रयत, दत्तात्रय कुरणे यांचे भगवा झेंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत, आगरकर यांचे सुधारक, लोकहितवादींची शतपत्रे, म. गांधी यांचे हरिजन, बाळशास्त्री जांभेकर यांचे दर्पण, केशवराव ठाकरे यांचे प्रबोधन इ. या माध्यमातून समाजसुधारकांनी समाज व धर्मसुधारणेची चळवळ सुरू करून ती रुजविण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेच्या चळवळीने महाराष्ट्रात सामाजिक समता प्रस्तापित करणे, धर्मासंबंधीच्या कालबाह्य रूढी, कर्मकांड इ. अंधश्रद्धा, अज्ञान यातून बाहेर काढण्यासाठी भरीव कार्य केले. त्यामुळेच आज महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते.

## १.४ ब्राम्हणेत्तर चळवळ :

जन्मधिष्ठित वर्णव्यवस्था व जातिसंस्थेतील ब्राह्मणांचे सर्वोच्च स्थान, त्यांना असलेले विशेषाधिकार याउलट ब्राह्मणेतरांना सर्वसाधारण हक्कही नाकारण्यात आले होते. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा भेद अलीकडचा नसून तो हिंदू समाजव्यवस्थेतच अंतर्भूत असल्याचे दिसते. ब्राह्मणेतर समाजाला शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांच्यात अज्ञान, अंधश्रद्धा, अनारोग्य, दारिद्र्य, गुलामगिरीची मानसिकता इ. समस्या निर्माण झालेल्या होत्या. पेशवाईच्या काळात ब्राह्मणांवर सवलतींची खैरात उधळली जात होती. गंभीर अपराधासाठीही ब्राह्मणांना कमीत कमी शिक्षा दिली जात असे. तर ब्रह्मणेतरांना सामान्य अपराधासाठीही अत्यंत कठोर शिक्षा दिली जात असे. शिक्षणाच्याच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात केवळ ब्राह्मणाचेच वर्चस्व होते. ब्रिटिश राजवटीत इंग्रजी शिक्षणाचा प्रथम फायदा याच वर्गाला मिळाला. ब्रिटिश प्रशासनात ब्राह्मणांचेच वर्चस्व निर्माण झाले. सत्ता ब्रिटिशांची असली तरी प्रशासकीय सत्तेवर ब्राह्मणांचीच पकड होती. प्रशासनातील ब्राह्मण अधिकारी समाजातील आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी ब्रिटिश सत्तेच्या फायद्यापासून ब्राह्मणेतरांना जाणीवपूर्वक दूर ठेवीत असत. तर दुसऱ्या बाजूला सामाजिक क्षेत्रातील वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी वर्णजातिसंस्था, धर्मसंस्था, धार्मिक कर्मकांड, सामाजिक रूढी यांना जाणीवपूर्वक महत्त्व दिले जात असे. तसेच धार्मिक कर्मकांडाच्या माध्यमातून ब्राह्मणेतरांचे आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण केले जात असे. अशा प्रकारे हिंदू समाज व्यवस्थेअंतर्गत शेकडो वर्षांपासून ब्राह्मण-ब्राह्मणेतर भेद अस्तित्वात आहे. ब्रिटिश राजवटीत शिक्षण सार्वत्रिक झाले. अत्यंत धिम्या गतीने का होईना ब्राह्मणेतरात शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. म. फुलेंसारख्या समाजसुधारकांनी ब्राह्मणेतरांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देण्यास सुरूवात केली. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर भेदाचे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात रूपांतर झाले. ब्राह्मण-ब्राह्मणेतरांमध्ये वाद किंवा संघर्ष निर्माण करणे हे म. फुले यांच्या चळवळीचे ध्येय नव्हते, तर ब्राह्मणेतरांवरील अन्याय दूर करून त्यांना त्याचे हक्क प्रदान करणे हा त्यांचा उद्देश होता. त्यासाठी त्यांनी ब्राह्मणी वर्चस्वाला आव्हान दिले आणि ब्राह्मणेतर चळवळीला सुरूवात झाली. अर्थात म. फुलेची चळवळ आणि ब्राह्मणेतर चळवळ यात मूलभूत फरक आहे. म. फुले यांची चळवळ ही सत्यशोधक चळवळ होती.

### १.४.१. सत्यशोधक चळवळीची विचारप्रणाली :

समताधिष्ठित समाजरचना प्रस्थापित करणे, ही म. फुले यांच्या चळवळीची मुख्य प्रेरणा असून देव आणि धर्माच्या नावाने समाजात बोकाळलेली अंधश्रद्धा, अज्ञान आणि स्त्रीशूद्रातिशूद्रांचे शोषण नष्ट करणे, समाजातील सर्व लोक शांती आणि सुखसमाधानाने आणि बंधुभावाने राहतील अशी नवीन व्यवस्था निर्माण करणे ही सत्यशोधक चळवळीची मुख्य विचार प्रणाली होती. सत्यशोधक चळवळीची तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) देव आणि भक्त यातील मध्यस्थाला नकार.
२) स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या शोषणास जबाबदार असणाऱ्या धार्मिक, सामाजिक रूढींना नकार व पुरोहितशाहीच्या गुलामगिरीतून त्यांची सुटका करणे.
३) जमीनदार व सावकरांच्या मगरमिठीतून शेतकऱ्यांची सुटका करणे.
४) शिक्षण सर्वांना सहज सुलभ व्हावे व सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न करणे.

थोडक्यात, शेटजी आणि भटजींच्या गुलामगिरीतून स्त्रीशूद्रातिशूद्रांची मुक्तता करून ब्राह्मण

आणि ब्राह्मणेतरांना सर्व प्रकारच्या सुखाचा लाभ होईल अशी समाजव्यवस्था निर्माण करणे हे सत्यशोधक चळवळीचे ध्येय होते.

### १.४.२ सत्यशोधक चळवळीची कार्ये :

शोषणमुक्त, समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्यासाठी सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून जे प्रयत्न करण्यात आले त्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे -

### १ सामाजिक सुधारणा :

तत्कालीन समाजात असलेल्या धार्मिक श्रद्धा, अंधश्रद्धा व समजूती यामुळे समाजात अनेक दोष निर्माण झाले होते. जातीभेदामुळे समाज अनेक तुकड्यात विभागलेला होता. जातीजातीत रोटी-बेटी व्यवहार होत नसे. एक जात दुसऱ्या जातीचा द्वेष करीत असे. अस्पृश्यतेसारख्या रूढीने समाजातील काही जातींना साधे माणुसकीचे अधिकार नाकारले होते. ब्राह्मणेतर समाज जातीच्या स्वरूपात शेकडो तुकड्यात विभागला होता. त्यांच्यातील संघटनात्मक शक्तीचा अभाव, व्यसनाधिनता, धार्मिक कर्मकांडासाठी कर्जबाजारीपणा, शिक्षणाचा अभाव व सावकार, जमीनदार, पुरोहितांकडून होणारे शोषण इत्यादी सामाजिक, आर्थिक समस्यांमध्ये ब्राह्मणेतर समाज गुरफटून गेला होता. या समस्यांतून त्यांना बाहेर काढण्यासाठी म. फुले यांनी जातीभेद निर्मूलन, अस्पृश्यता निर्मूलन करण्यासाठी प्रबोधनात्मक व कृतीच्या माध्यमातून प्रयत्न केले. 'तृतीय रत्न' या नाट्यकृतीच्या माध्यमातून शिक्षणाच्या अभावामुळे पुरोहित वर्ग शूद्रातिशूद्रांना धार्मिक कर्मकांडात कसे अडकवून टाकतो, याचे चित्रण करून लोकांना धार्मिक अंधश्रद्धेतून बाहेर काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ब्राह्मणेतर स्पृश्यअस्पृश्य जातींना शिक्षण देण्यासाठी शाळा उघडल्या. त्यांच्यातील अज्ञान, अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. समाजातील हे दोष दूर करून सर्वांना समाजात योग्य मानसन्मान मिळेल यासाठी त्यानी जीवनभर संघर्ष केला.

### २. स्त्रीशिक्षण व स्त्रीउद्धारः

हिंदू समाजव्यवस्थेवर सर्वच जातीतील स्त्रियांना अत्यंत दुय्यम व कनिष्ठ स्थान दिले होते. ब्राह्मण समाजातील स्त्रियांच्या समस्यांपेक्षा अधिक गंभीर स्वरूपाच्या होत्या. बालविवाह, विधवाविवाह, प्रतिबंध, केशवपन, लैंगिक अत्याचार, शिक्षण घेण्यास बंदी इ. समस्यांना यांना सामोरे जावे लागत असे. स्त्री केवळ पुरूषाची उपभोगाची वस्तू मानले जात असे. तिला स्वतःचे असे कोणतेही मत किंवा व्यक्तिमत्त्व नव्हते. एकूण लोकसंख्येच्या अर्धी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांना गुलाम बनवून त्यांच्या विकासाचे सर्व मार्ग बंद केले होते. म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांसाठी शाळा सुरू करून त्यांच्यासाठी ज्ञानाची दारे खुली केली. विधवाविवाहास प्रोत्साहन दिले. बालविवाहास कडाडून विरोध केला. नाभीकांचा संप घडवून स्त्रियांच्या केशवपनाला विरोध केला. लैंगिक अत्याचारातून जन्मास येणाऱ्या बालकांची हत्या थांबविण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची आपल्याच घरी सोय केली. अशा प्रकारे सत्यशोधक चळवळीने स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ सुरू करून स्त्रियांना माणुसकीने जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.

### ३. इतिहासाची पुनर्मांडणी - शूद्रातिशूद्रांच्या ऐक्याचा पुरस्कार :

समाजातील चालीरिती, रूढी परंपरा, दैवते यांना ऐतिहासिक संदर्भ असतात. त्यांच्यावर लोकांची श्रद्धा असते. त्यामुळेच लोक बालबाह्य रूढी बदलायला तयार नसतात. अस्पृश्यतेसारखी रूढी अतार्किक असूनही केवळ परंपरेने चालत आली आहे म्हणून तिचे पालन केले जाते. म्हणून म.

फुले यांनी ऐतिहासिक संदर्भाला नवा अर्थ देण्याचा व धार्मिक रूढी परंपरावरील ब्राह्मणेतरांचा विश्वास कमी करण्याचा प्रयत्न केला. धर्मग्रंथातील देव - असुरांचा संघर्ष हा आर्य - अनार्य यांच्यातील संघर्ष आहे. आर्य विदेशी आहेत तर अनार्य हे मूलनिवासी आहेत. अनार्यांचा राजा बळी याचे राज्य दहा खंडात पसरले होते. बळीच्या राज्यात लोक आनंदाने, सुखाने, समतेने राहात होते. आर्यांनी अनार्यांवर आक्रमण करूनन व कपटनितीचा वापर करून बळीचे राज्य नष्ट केले. पराभूत अनार्यांना शूद्र केले. जे सहज शरण आले नाहीत व आर्यांवर ज्यांनी वारंवार आक्रमण केले त्यांना आर्यांनी पराभव करून अतिशूद्र (अस्पृश्य) केले. असा त्यांनी अन्वयार्थ लावला. आर्यांच्या व अनार्यांच्या चालीरितीतील फरक, आर्य अनार्यांची वेगवेगळी दैवते यांच्या आधारे त्यांनी आपण लावलेला अन्वयार्थ योग्य असल्याचे सिद्ध केले. ऐतिहासिक घटनांना असा नवा अर्थ देऊन शूद्रातिशूद्रांच्या ऐक्याचा दाखलाच त्यांनी ब्राह्मणेतरांसमोर ठेवला. शूद्रातिशूद्रांतील जातीभेद, अस्पृश्यता ही आर्यांची कपटनिती आहे. समाजातील धार्मिक रूढी, कर्मकांड हे शूद्रातिशूद्रांच्या गुलामीचे कायदे आहेत. ते ब्राह्मणेतरांनी झुगारून दिले पाहिजे. दिवाळी, होळी यासारखे सण आर्यांच्या अनार्यांवरील आक्रमणातील विजयी उत्सवाचे प्रतीक असून ते अनार्यांच्या दु:खाचे प्रसंग आहेत. म्हणून अनार्यांनी हे सण साजरे करू नयेत असा इशारा अनार्यांना दिला आहे. म. फुले यांनी आर्यअनार्यांच्या संघर्षाचा अन्वयार्थ लावून १) आर्यांच्या आक्रमणापूर्वी अनार्य येथील राज्यकर्ते होते व ब्राह्मणेतर स्पृश्य - अस्पृश्य हे एक होते. २) आर्यांनी त्यांच्यात जातीभेद, अस्पृश्यता निर्माण केली. ३) धार्मिक रूढी परंपरा हे अनार्यांच्या गुलामीचे कायदे आहेत, त्यांना विरोध केला पाहिजे. ४) ब्राह्मणेतरांनी आपापसातील मतभेद विसरून समतेने राहिले पाहिजे, हे सिद्ध करण्याचा व त्यांना गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला.

### ४. धर्मग्रंथांवरील हल्ला :

स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या अवनतीचे व गुलामीचे मूळ कारण धर्मग्रंथात व धर्मग्रंथावरील श्रद्धेत असल्याचे म. फुले यांचे ठाम मत होते. धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित आहेत, ते पवित्र आहेत व म्हणून त्यांची आज्ञा पाळली पाहिजे अशी लोकांची श्रद्धा होती. धर्माज्ञा म्हणूनच लोक रूढी परंपरांचे पालन करतात. म. फुले यांनी ही श्रद्धा नष्ट करण्यासाठी धर्मग्रंथावर टीकेची झोड उठवली. धर्मग्रंथ हे ईश्वर निर्मित नसून ते धूर्त आर्य भटांनी लिहिले आहेत व त्यातील नियम हे अनार्यांच्या गुलामीचे कायदे आहेत असे स्पष्ट केले. रामायणातील रावणाची दहा तोंडे, वानर दल, कुंभकर्ण, मारुतीचे सीतेशी झालेले संभाषण, ऋग्वेदातील वर्णव्यवस्थेच्या निर्मितीची उत्पत्ती यावर त्यांनी प्रश्नचिह्न निर्माण केले. कृष्णाच्या कृष्णलीला, विष्णुच्या अवताराच्या कथा यांचे वास्तविक स्वरूप करून या घटनांमध्ये नीतीचा लवलेशही नसल्याचे दाखवून दिले. म. फुले यांनी या सर्वच धर्मग्रंथांचा निषेध करून शूद्रातिशूद्रांना धर्मग्रंथानी निर्माण केलेल्या रूढी - परंपरांतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला.

### ५. सत्यशोधक समाजाची स्थापना :

सामाजिक विषमता निर्मूलन व समाजसुधारणेचे कार्य एका व्यक्तीचे नसून ते संघटित लोकांच्या सहकार्यातूनच होऊ शकते. याची म. फुले यांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी विविध ठिकाणी व विविध पातळीवर समाजजागृतीचे कार्य करण्यासाठी १८७३ मध्ये त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा उद्देश करतात म. फुले यांनी असे म्हटले आहे की, ''ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इ. लोकांच्या दास्यत्वातून शूद्र लोकांना मुक्त करण्यासाठी व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांच्या दास्यत्वातून

शूद्र लोकांना मुक्त करण्यासाठी व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता हा समाज आहे,'' स्वातंत्र्य, समता, बंधुभाव हे विचार रुजविण्यासाठी या समाजाची स्थापना करण्यात आली होती. ''सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती।'' हे या समाजाचे ब्रीद वाक्य होते. या समाजाची तत्वे मान्य असणाऱ्या कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तीला या समाजाचे सभासद होता येत असे. या समाजाच्या माध्यमातून म. फुले यांनी शूद्रातिशूद्र लोकांच्या प्रबोधनाचे कार्य केले.

### ६. सार्वजनिक सत्यधर्म :

म. फुले यांनी हिंदू धर्म आणि धर्मग्रंथांवर कडाडून हल्ला केला असला तरी त्यांनी धर्म ही संकल्पना नाकारली नाही किंवा देवाचे अस्तित्वही नाकारले नाही. परंतु रूढ अर्थाने देव, देवाचे अवतार, त्यांचा शाप उःशाप, नवस, ब्रांह्मणांकडून देवदेवतांची पूजा इ. संकल्पना नाकारल्या. त्यांनी ईश्वराला ''निर्मिक'' या विश्वाचा निर्माता असे फुले यांनी सर्व मानव व प्राणिमात्रांच्या कल्याणाचा मार्ग सांगणाऱ्या ''सार्वजनिक सत्यधर्म'' या धर्माची स्थापना केली. सार्वजनिक सत्यधर्माचा उद्देश स्पष्ट करताना म. फुले म्हणतात, ''सर्व सृष्टीचा निर्माता व म्हणून सर्व माणसांचा एक निर्माता आहे. ह्या निर्मिकाने प्रत्येक मानवी व्यक्तीला काही मानवी अधिकार देऊन निर्माण केले आहे. या मानवी अधिकारांचा उपभोग घेण्यात व्यक्तीचे सुख असते. तेव्हा ज्या रीतीने वागले असता प्रत्येक व्यक्तीला तिच्या मानवी अधिकारांचा निर्वेधपणे उपभोग घेता येणे शक्य होईल अशा रितीने वागले म्हणजे सत्यधर्माने वागणे; आणि प्रत्येक व्यक्तीने ह्या सत्यधर्माला अनुसरून वागले पाहिजे. हा सत्यधर्म प्रत्येक व्यक्तीला विहित आहे. अशा रीतीने वागण्याचा आदेश सत्यधर्म प्रत्येक व्यक्तीला करतो.'' अशा प्रकारे सर्व मानवजातीच्या सुख-शांतीच्या, कल्याणाचा, समतेचा मार्ग सार्वजनिक सत्यधर्माच्या माध्यमातून सांगितलेला आहे.

### ७. पुरोहित हद्दपार :

धर्माच्या नावावर अनेक प्रकारची कर्मकांडे निर्माण करून, त्यांच्यात विविध प्रकारच्या अंधश्रद्धा पसरवून शूद्रतिशूद्रांना लुबाडण्याचे काम पुरोहित वर्गाने केले. कर्मकांडासाठी लागणारे द्रव्य, विविध प्रकारचे साहित्य, भटाची दक्षिणा यासाठी प्रचंड खर्च करावा लागतो. अशी कर्मकांडे केली नाहीत तर देवदेवतांचा कोप होऊन शेतातील पीक नष्ट होईल. मूल आजारी पडेल किंवा मरेल इ. संकटे येतील अशी भीती घातली जाते. त्यामुळे सावकाराकडून कर्ज घेऊन अशी धार्मिक कर्मकांडे करण्यास भाग पाडले जाते. मनुष्य जन्माला आल्यापासून मृत्युपर्यंत व मृत्यू नंतरही (श्राद्ध) अनेक कर्मकांडे वर्षातील बाराही महिने करावी लागतात. पुरोहित वर्ग त्यांची या कर्मकांडांच्या माध्यमातून लूट करीत असतो. म्हणून म. फुले यांनी अशा अंधश्रद्धांवर आधारलेल्या कर्मकांडांना विरोध केला. अशा कर्मकांडातील भटांची भटनीती उघड करून त्यातून शूद्रतिशूद्रांना मुक्त करण्याचा प्रयत्न केला व अनावश्यक धार्मिक कर्मकांडे न करण्याचा तसेच कोणतेही धार्मिक कार्य पुरोहितांच्या हातून न करण्याचा सल्ला त्यांना दिला. लग्न, मरण यांसारख्या प्रसंगी कोणत्याही सामान्य माणसाकडून धार्मिक विधी पार पाडावेत अशी मुभा त्यांनी दिली. अर्थात त्यासाठी म. फुले यांनी सत्यशोधक विधींची निर्मीती केली. अशा प्रकारे म. फुले यांनी सत्यशोधक समाज व सार्वजनिक सत्यधर्म यांच्या माध्यमातून शूद्रातिशूद्रांची पुरोहितशाहीतून सुटका करण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे म. फुले यांची सत्यशोधक चळवळ ही सर्व स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या मुक्ततेची चळवळ होती. ती केवळ ब्राह्मणेतरांच्याच कल्याणाचा विचार करणारी नव्हती, तर ब्राह्मणांच्या कल्याणासाठीही होती. ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांच्या शोषणाचा मार्ग सोडून समता व बंधुभावाने त्यांच्याशी वागावे अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणून ब्राह्मणेतर चळवळ ही ब्राह्मणांसहित समाजातील सर्वच वर्गाच्या कल्याणाचा विचार करणारी चळवळ होती.

### १.४.३ ब्राह्मणेतर चळवळीचा उदय आणि वाटचाल :

म. फुले यांची सत्यशोधक चळवळ ही सर्वसमावशक असली तरी ब्राह्मण, पुरोहित वर्गाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक शोषणातून ब्राह्मणेतरांची मुक्तता करण्यावर त्यांचा मुख्य भर होता. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीचा उगम सत्यशोधक चळवळीत होता असे दिसून येते. तरीही ब्राह्मणेतर चळवळीला वेगळे स्वरूप प्राप्त झाले ते छ. शाहू महाराजांच्या काळात म. फुले यांच्या निधनानंतर काही काळ सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक चळवळीचा प्रसार जोमाने केला. त्यांच्या निधनानंतर अल्पकाळातच ही चळवळ थंडावली. परंतु या चळवळीला १९१० मध्ये छ. शाहू महाराजांचा राजाश्रय मिळाला आणि तिच्यात नवचैतन्य निर्माण झाले. त्याच्याच प्रेरणेने भास्करराव जाधव, अण्णासाहेब लट्ठे आणि महादेवराव डोंगरे यांनी सत्यशोधक समाजाचा कोल्हापूर संस्थानातील खेड्यापाड्यात जोमाने प्रसार सुरू केला. छ. शाहू महाराजांच्या काळात सुरू झालेल्या सत्यशोधक चळवळीचा उदय आणि वाटचाल पुढीलप्रमाणे -

### १. वेदोक्त प्रकरण

१८९४ मध्ये शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला आणि अवघ्या पाच वर्षांत १८९९ मध्ये वेदोक्त प्रकरण घडले. छत्रपतींच्या पंचगंगेतील कार्तिकी स्नानाच्या वेळी वेदोक्त मंत्र म्हणण्याची प्रथा होती. परंतु १८९९ मध्ये शाहू महाराजांच्या कार्तिकी स्नानाच्या वेळी वेदोक्त मंत्र म्हणण्यास नारायण भटजी यांनी ''छत्रपती हे शूद्र असून त्यांना वेदोक्त मंत्राचा अधिकार नाही.'' असे स्पष्ट करून वैदिक मंत्र म्हणण्यास नकार दिला. छत्रपतीस यःत्किश्चित भटजीने शूद्र म्हणून हिणवणे ही कल्पनाही सहन करण्यापलीकडे होती. पण ती वस्तुस्थीती होती. या प्रकरणाने शाहू महाराज अंतर्मूख बनले. राजाची ही स्थिती तर सामान्य बहूजनांची स्थिती कशी असेल ? या प्रश्नांच्या उत्तरासाठी त्यांनी ब्राह्मणेतर स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या उद्धाराच्या कार्याला, चळवळीला सुरूवात केली.

### २. सत्यशोधक चळवळ आणि शाहू महाराजांचे कार्य

ब्राह्मण पुरोहितांचे वर्चस्व नष्ट करणे आणि स्त्रीशूद्रातिशूद्रांचा उद्धार करून त्यांना त्यांचे अधिकार मिळवून देणे हे सत्यशोधक चळवळीचे तत्त्व होते. शाहू महाराजांनी या तत्त्वाला अनुसरून आपल्या संस्थानात आपल्या हाती असलेल्या राजकीय सत्तेचा वापर करून अनेक कार्ये केली. संस्थानांतर्गत त्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला चालना दिली. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी त्यांना शाळांमध्ये प्रवेश देणे, त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती, संस्थानात नोकरी, व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देणे इ. कार्ये त्यांनी हाती घेतली. भटक्या गुन्हेगारी जाती - जमाती, मराठा, कुणबी इत्यादींचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी प्रयत्न केले. ब्राह्मणेतरांसाठी संस्थानातील ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. स्त्रीशिक्षण विधवा विवाहास मान्यता देणारा कायदा करून विधवा विवाहास प्रोत्साहन, बालविवाहास विरोध, शेतकी सुधारणांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक इ. शाहू महाराजांनी केलेली कार्ये म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीशी आपले संबंध जोडणारी आहेत.

### ३. ब्रिटिशधार्जिणेपणा व ब्राह्मण विरोध :

ब्रिटिश राजवटीत ब्राह्मणेतर स्त्रीशूद्रातिशूद्रांचा उद्धार होऊ शकतो, या सत्यशोधक तत्वाशी छ. शाहू महाराज सहमत होते. त्यामुळेच त्यांनी ब्रिटिश सत्तेला विरोध न करता ब्राह्मणेतरांच्या उद्धाराच्या कार्यासाठी आवश्यक तेथे त्यांची मदत घेतली.

समाजातील सर्व स्तरातील ब्राह्मणांच्या वर्चस्वाला सत्यशोधक चळवळीचा विरोध होता. वेदोक्त प्रकरणापासून छ. शाहू महाराज हे ब्राह्मणांचे कट्टर विरोधक बनले. त्यामुळे ब्राह्मणांचे वर्चस्व मोडीत काढण्यासाठी त्यांनी जीवापाड प्रयत्न केले. शंकराचार्य कुर्तकोटी यांनी ब्राह्मणांसंबंधीची भूमिका व छ. शाहू महाराजांच्या विरोधातील त्यांच्या कारवाया यामुळे डॉ. कुर्तकोटींना जगद्‌गुरू पीठाचे शंकराचार्य पद सोडावे लागले. खेड्यातील कुलकर्णी हे सामान्य, अज्ञानी लोकांची दिशाभूल करतात, ब्रिटिशांविरूद्ध त्यांना भडकवतात, गावगाड्यातील त्यांच्या स्थानांचा व अधिकारांचा वापर करून लोकांची लुबाडणूक व शोषण करतात. म्हणून महाराजांनी कुलकर्णी वतन नष्ट केले. सामाजिक सुधारणांना विरोध करणाऱ्या व ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाचा पुरस्कार करणाऱ्या लोकमान्य टिळकांना पुण्यात मानपत्र देण्यास ब्राह्मणेतरांनी जोरदार विरोध केला. अनेक ठिकाणी टिळकांच्या सभेत नासकी अंडी, भजी, फेकून सभा उधळून लावल्या. धार्मिक क्षेत्रातील ब्राह्मणांचे वर्चस्व कमी करण्यासाठी छत्रपतींनी मराठा जातीतील पुरोहित तयार करण्यासाठी ''श्री शिवाजी वैदिक विद्यालय'' स्थापन केले. १२ नोव्हेंबर १९२० रोजी मौनीबाबा मठाचे मठाधिपती म्हणून सदाशिवराव पाटील यांना मराठा व्यक्तीला जगद्‌गुरू म्हणून नेमले. या आणि अशा अनेक प्रसंगी त्यांनी ब्राह्मणांच्या वर्चस्वाला आव्हान दिले.

### ४. ब्राह्मणेतर वृत्तपत्रे :

महाराष्ट्रात ब्राह्मण वर्गाच्या हातात त्यांची भूमिका मांडण्यासाठी अनेक वृत्तपत्रे होती. या वृत्तपत्रांमध्ये सामाजिक सुधारणांच्या कार्यासाठी पुरेसे स्थान दिले जात नसे. ब्राह्मणेतरांची बाजू मांडण्यासाठी वृत्तपत्रे असावीत असे शाहू महाराजांना वाटत होते. त्या काळात दीनबंधु, दीनमित्र, विश्वबंधू, गरिबांचा कैवारी, भगवा झेंडा, तरुण मराठा, छत्रपती, प्रगती, जिन विजय, डेक्कन रयत, जागरूक, विजयी मराठा, जागृती यासारखी काही ब्राह्मणेतर वृत्तपत्रे सामाजिक सुधारणेचे कार्य करीत होते. परंतु ब्राह्मणेतरातील अशिक्षितपणा व त्याची आर्थिक स्थिती यामुहे ती बंद पडण्याच्या स्थितीत होती. या वृत्तपत्रांचे ब्राह्मणेतर चळवळीतील महत्त्व ओळखून शाहू महाराज त्यांना भरीव प्रकारची आर्थिक मदत करीत असत. जातीभेद, अस्पृश्यता, ब्राह्मणी व्यवस्थेत ब्राह्मणेतरांचे होणारे शोषण, विज्ञान इ. विषयांवर लेखन प्रसिद्ध करून ब्राह्मणेतरांत जाणीव जागृती करण्याचे कार्य या वृत्तपत्रांनी केले.

### ५. सत्यशोधकी जलसा :

शाहू महाराजांच्या ब्राह्मणविरोधी चळवळीचा प्रभाव ब्राह्मणी वर्चस्वाचा अनुभव आलेल्या मराठा-मराठेतर अनेक सुधारकांवर पडलेला होता. त्यातूनच ब्राह्मणेतरांमध्ये जागृती करण्यासाठी व त्यांना संघटीत करण्यासाठी भाऊराव पाटीलांसारख्या मराठा तरुणांनी सत्यशोधकी जलसे स्थापन केले. मनोरंजनाच्या माध्यमातून लोक जागृतीचे कार्य केले जात असे. शेकडो लोक हे कार्यक्रम पाहण्यासाठी एकत्र येत असत. ब्राह्मणेतराचे ब्राह्मणांकडून चाललेल्या शोषणाविषयी मार्गदर्शन केले जात असेच परंतु ब्राह्मणांच्या व्यक्तीगत जीवनावरही टीका केली जात असे. त्यातून ब्राह्मणेतर समाजात ब्राह्मणांविषयी द्वेष पसरत असे. परिणामतः ब्राह्मणांची उभी पीके

लुटणे, जाळणे, त्यांना धमकावणे, ब्राह्मण स्त्रियांची विटंबना करणे इ. प्रकार घडत असत. थोडक्यात सत्यशोधक जलशांच्या उद्देश ब्राह्मणेतरांमध्ये आपल्यावरील अन्याविरूद्ध जागृती करणे असा असला तरी त्यातून ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांविरूद्ध जोरदार आघाडी उघडल्याचे दिसते.

### ६. मराठा - मराठेतर वाद :

वेदोक्त प्रकरणाने ब्राह्मणेतर चळवळीला गती मिळाली असली तरी या प्रकरणात छत्रपतींचे क्षत्रियत्व आणि क्षत्रियांचा वेदाचा अधिकार यावरच अधिक भर देण्यात आला होता. त्यामुळे मराठा (क्षत्रिय) आणि मराठेतर अशा नवीन वादाचा जन्म झाला. पुढे मराठ्यांसाठी राजकीय क्षेत्रात राखीव जागांची मागणी, क्षात्रजगद्‌गुरूच्या पदावर मराठा जातीचा हक्क, १९२० मधील मुंबई कायदेमंडळाच्या निवडणूकीच्या वेळी मराठा उमेदवारास दिलेले प्राधान्य, ''मराठा म्हणजे ९६ कूळी मराठा जातीत जन्माला आलेला'' असा घेण्यात आलेला अर्थ, यामुळे माळी, भंडारी, आगरी, शिंपी यांना मराठा संकल्पनेतून वगळण्यात आले. शाहू महाराजांच्या निधनानंतर म. फुले याच्या सत्यशोधक विचारांची काहीही माहिती नसलेल्या लोकांचाही ब्राह्मणेतर चळवळी प्रवेश झाला. त्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला उघड विरोध करण्यास सुरूवात केली. तसेच मराठ्याचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास महत्त्व दिले. मॉटेग्यू सुधारणेप्रमाणे मराठा व तत्सम जातींना मुंबई विधिमंडळात सात जागा राखीव ठेवण्यात आल्या. त्या सातही जागांवर मराठा उमेदवार उभे केले. लिंगायत, शिपी, जैन या जातीच्या उमेदवाराचा विचार केला नाही. त्यामुळे मराठेतरातील आनंदराव सुर्वे यांनी १९२८ रोजी पुण्यात मराठेतर ब्राह्मणेतर परिषद भरवली. या काळात ब्राह्मणेतर चळवळ सत्यशोधक विचारांपासून दूर जाऊ लागली. ब्राह्मणी वर्चस्वाविरूद्ध संघटित संघर्ष करणाऱ्या ब्राह्मणेतरांतच मराठा - मराठेतर अशी फूट पडली.

### ७. ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना :

नोव्हे. १९२० मध्ये झालेल्या मुंबई कायदेमंडळाच्या निवडणूकीवर कॉंग्रेसने बहिष्कार घातल्याने ब्राह्मणेतर चळवळीतील अनेक उमेदवार निवडून आले. या निवडणूकीच्या निमित्ताने ब्राह्मणेतर चळवळीने प्रत्यक्ष राजकारणात प्रवेश केला. या निवडणूकीच्या निमित्ताने ब्राह्मणेतर लोकांशी आलेला संबंध व अनुभव यामुळे कायदेमंडळात व कायदेमंडळाबाहेर ब्राह्मणेतर चळवळीचे कार्य पद्धतशीरपणे करण्याची गरज भासू लागली. त्यातूनच १२ डिसेंबर १९२० रोजी पुण्यात ब्राह्मणेतर लीग स्थापन करण्यात आली. आणि ब्राह्मणेतर चळवळीचे ब्राह्मणेतर पक्षात झाले. राजकारणापासून अलिप्त राहण्याचे सत्यशोधक चळवळीचे तत्त्व ब्राह्मणेतर चळवळीने बाजूला ठेवले.

### ८. ब्राह्मणेतर चळवळीत फूट आणि कॉंग्रेसमध्ये प्रवेश :

राजकारणात प्रवेश करून ब्राह्मणेतर चळवळ सत्यशोधक तत्त्वापासून बाजूला जात होती. त्यातच मराठा मराठेतर वादाने ती अधिकच खिळखिळीत होत होती. ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ असावे का ? सायमन कमिशनशी सहकार्य करावे का ? इ. विषयावरून ब्राह्मणेतर पक्षांत दोन तट पडले. याच काळात म. गांधीजींच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस ब्राह्मणी वर्चस्वातून मुक्त होऊन तिच्यात सर्वांना प्रवेश मिळू लागला. ती बहुजनाचे नेतृत्व करू लागली. त्यामुळे ब्राह्मणेतर पक्षातील अनेक नेते कॉंग्रेसमध्ये जाऊ लागले. कर्मवीर शिंदे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, भाऊराव पाटील यांच्यासारखे ब्राह्मणेतर पक्षातील लढावू नेते कॉंग्रेसमध्ये दाखल झाले. पुढे कॉंग्रेसमध्ये दाखल झालेल्या ब्रह्मणेतर नेत्यांमध्ये संपूर्ण स्वराज्य की वसाहतीचे स्वराज्य यावरून पुन्हा वाद सुरू झाला. अशा प्रकारे ब्राह्मणेतर पक्षाचे विघटन होऊन ब्राह्मणेतर पक्षाचे अस्तित्व

संपुष्टात आले. त्याच बरोबर स्वातंत्र्याच्या चळवळीच्या धामधुमीत सामाजिक सुधारणेच्या उद्दिष्टांपासून ब्राह्मणेतर चळवळीचे नेतेही दूर गेले.

**९. काँग्रेस पक्षांतर्गत ब्राह्मण-ब्रह्मणेतर वाद :**

ब्राह्मणेतर पक्षातील नेत्यांनी म. गांधीजींच्या सर्वसमावेशक नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षात प्रवेश केला असला तरी त्यांच्या मनातील ब्राह्मण द्वेष नष्ट झालेला नव्हता. ब्राह्मण आणि मराठा यांच्यात श्रेष्ठत्वासाठी संघर्ष सुरूच होता. १९३७ च्या मुंबई प्रांताच्या पंतप्रधानपदी नेमल्याने ब्राह्मणेतरांत असंतोष निर्माण झाला होता. पुढे केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्मणेतर नेते बाहेर पडले व त्यांनी १९४८ शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. पुढील काळात द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्रिपद यशवंतराव चव्हाण या काँग्रेसमधील मराठा नेत्यांकडे गेले. त्यानंतर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीची पकड निर्माण झाली. आजही महाराष्ट्राच्या नेतृत्वात मराठा जातीचा प्रभाव आहे. आज महाराष्ट्रात मराठेतर मुख्यमंत्री आपला कार्यकाळ पूर्ण करू शकत नाही हे ब्राह्मणेतर चळवळीचे गमक आहे असे स्पष्ट होते.

अशा प्रकारे म. फुले यांनी स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या उद्धारासाठी, त्यांच्या समानतेच्या हक्कासाठी, धार्मिक रूढी परंपरा, अंधश्रद्धा यांच्या दास्यत्वातून मुक्तता करण्यासाठी चालविलेल्या चळवळीचे ब्राह्मणेतर चळवळीत व नंतर ब्रह्मणेतर पक्षात रूपांतर होऊन तिचे अस्तित्व जवळपास संपले. तरीही मुकुंदराव पाटील यांच्यासारख्या सत्यशोधकांनी ती जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. आजही या चळवळीचे अनेक समर्थक आहेत. परंतु त्यांना जनतेचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे तिचे अस्तित्व नगण्य आहे.

आज ब्राह्मणेतर चळवळ संघटित नसली तरी ब्राम्हण - ब्राम्हणेतर वाद आजही सुप्त अवस्थेत जनतेच्या मनात आहे. आजही महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांचे पडसाद उमटताना दिसतात.

## १.५ दलित चळवळ :

वर्णव्यवस्थेच्या बाहेर असलेल्या व सामाजिक स्तरीकरणात सर्वांत खालच्या अंतिम स्थानावर असलेल्या जातिसमूहाला अस्पृश्य अथवा दलित या नावाने संबोधले जाते. सामाजिक सुधारणेच्या चळवळीत सुधारकांनी 'अस्पृश्य' या शब्दाऐवजी इतर शब्दांनी संबोधले आहे. उदा. श्री. म. माटे यांनी 'अस्पृष्ट', डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'नॉनकास्ट हिंदू', 'प्रोटेस्टंट हिंदू', 'बहिष्कृ समाज', म. गांधीजींनी 'हरिजन', स्टार्ट कमिटीने 'डिप्रेस्ड क्लास' इ. नावाने संबोधले होते. १९३५ च्या कायद्यानुसार या जातिसमूहाला विशिष्ट सूचीमध्ये समाविष्ट केल्याने त्यास 'अनुसूचीत जाती' असे म्हटले जाऊ लागले. थोडक्यात, सामाजिक स्तरीकरणात अंतिम स्थानावर असलेल्या, अस्पृश्य मानलेल्या व समाजव्यवस्थेच्या पराकोटीच्या शोषणाला बळी पडलेल्या जातींचा समूह म्हणजे दलित समाज होय. अशी दलित समाजाची व्याख्या करता येईल. तसेच दलितांच्या उद्धारासाठी दलित वर्गातील सुधारकांनी चालविलेल्या चळवळीला दलित चळवळ असे म्हणतात.

दलित चळवळीचे प्रामुख्याने तीन टप्पे सांगता येतील. १) आंबेडकरपूर्व चळवळ (१८४८-१९२०) २) आंबेडकरी चळवळ (१९२०-१९५६) ३) आंबेडकरोत्तर चळवळ (१९५६ नंतर)

### १.५.१ आंबेडकरपूर्व दलित चळवळ :

म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीशी संपर्क येऊन अस्पृश्य समाजातील अनेक तरुण कार्यकर्त्यांनी स्वउद्धारासाठी चळवळ सुरू केली. त्यात गोपाळबुवा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, विठोबा रावजी मून, कालीचरण नंदागवळी, किसन फागोजी बंदसोड, नानासाहेब गवई, जयराम शेट, गायकवाड, येकू सखाराम सावकार, फागुजी शेंडे, पांडुरंग भटकर, जानोजी खंडारे, रेवाराम कवाडे इ.चा समावेश होतो. त्यांनी केलेल्या कार्याचा सारांश असा स्पष्ट करता येईल.

१) अस्पृश्यांना त्यांच्या सामाजिक व आर्थिक शोषणाची जाणीव करून देणे व त्या शोषणाविरूद्ध लढण्यासाठी त्यांच्या मनाची तयारी करणे.
२) अस्पृश्य जातींनी आपापसातील जातीभेद, पोटजातीभेद नष्ट करावेत.
३) अस्पृश्यांवर लादलेल्या घृणास्पद रूढी परंपरांचे पालन करणे बंद करावे.
४) अस्पृश्य जातीत शिक्षणाचा प्रसार करणे.
५) सवर्णांमध्ये जाणीव जागृती निर्माण करून अस्पृश्यांना समानतेची वागणूक देण्यास प्रवृत्त करणे.
६) निरनिराळ्या मार्गांनी ब्रिटिश सरकारची मनधरणी करून, प्रसंगी दबाव तंत्राचा वापर करून अस्पृश्यता निवारणाच्या उपाययोजना व कायदे करवून घेणे. त्याच्या विकासासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न करणे.

थोडक्यात, प्राप्त परिस्थितीत आपल्या क्षमतेप्रमाणे त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी प्रयत्न केले.

### १.५.२ आंबेडकरी चळवळ :

अस्पृश्यता निवारणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चळवळीला आंबेडकरी चळवळ असे म्हणतात. अस्पृश्य व अस्पृश्येतर समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी कधी कृतिशील, तर कधी प्रबोधनाच्या माध्यमातून प्रयत्न केले. परंतु हे सुधारक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या प्रश्नाकडे पहाण्याच्या दृष्टिकोनात मूलभूत फरक होता. इतर सुधारक ही एक सामाजिक व इतर समास्यांहून स्वतंत्र समस्या आहे असे मानत असत. तर बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेच्या समस्येचा संबंध जातिभेद, धर्म, धर्मग्रंथ प्रामाण्य, राजकीय हक्क, राजकीय सत्ता इत्यादींशी असल्याचे स्पष्ट करतात. त्यामुळेच त्यांच्या अस्पृश्यता निवारण चळवळीची व्याप्ती इतरांच्या चळवळीपेक्षा अधिक होती. आंबेडकरी चळवळीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे -

#### १. वृत्तपत्रांच्या माध्यमातून प्रबोधन :

अस्पृश्यतेच्या प्रश्नाबरोबर त्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक तसेच राजकीय हक्काच्या मागण्या जनता व सरकारपर्यंत पोहचविणे, अस्पृश्य जातींना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून देणे, आपल्यावरील अन्यायाविरूद्ध संघर्ष करण्यास त्यांना तयार करणे आवश्यक होते. त्यासाठी प्रभावी प्रसार माध्यमांची गरज होती. त्या काळात वृत्तपत्र हेच प्रभावी माध्यम होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबृद्ध भारत यासारख्या साप्ताहिके व पाक्षिके सुरू केली. चळवळीच्या सुरूवातीच्या काळात मूकनायक व बहिष्कृत भारत यांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नांसंबंधी जनजागृती व लोकसंग्रहाचे महत्त्वपूर्ण कार्य केले. अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीत या वृत्तपत्रांचे मोलाचे योगदान आहे.

### २. सामाजिक संघटना :

कोणत्याही चळवळीचे यश तिच्या संघटनशक्तीवर अवलंबून असते. अस्पृश्य जातींना आपल्यावरील अन्यायाविरूद्ध संघर्ष करण्यासाठी संघटित करणे आवश्यक होते. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. बहिष्कृत वर्गाला त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे, त्यांच्या उन्नतीकरिता सरकारकडून सवलती घेणे, शिक्षणाचा प्रसार करणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देणे, सभा, अधिवेशने भरवून लोकांना अस्पृश्यतेच्या प्रश्नावर संघटित करणे. आपल्या मागण्यासाठी सत्याग्रह करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कार्ये या संघटनेने केली. जात, वर्ण, पंथ, स्त्री-पुरूष इ. भेदभाव नष्ट करून सर्वांना सर्व प्रकारचे अधिकार समानतेने प्रदान करण्यासाठी त्यांनी १९२७ मध्ये समाज समता संघ स्थापन केला. समताधिष्ठीत समाजाची स्थापना करण्यासाठी या संघटनांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

### ३. सत्याग्रह :

ज्यावेळी म. गांधीजी राजकीय गुलामगिरीतून भारतीयांना मुक्त करण्यासाठी ब्रिटिश सत्तेविरूद्ध सत्याग्रहाच्या साधनाचा वापर करीत होते. त्याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वधर्मीयांच्या व स्वदेशीयांच्या गुलामगिरीतून अस्पृश्यांची मुक्तता करण्यासाठी स्वदेशीविरूद्ध सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करीत होते. त्यांचा लढाही अहिंसेच्या मार्गाने सुरू होता. अस्पृश्य हे हिंदू आहेत म्हणून इतर हिंदूंना जे अधिकार आहेत ते सर्व अधिकार, मानसन्मान अस्पृश्यांनाही मिळाला पाहिजे. अस्पृश्यांना सार्वजनिक स्थळांचा वापर करण्याचा अधिकार आहे. महाडचे चवदार तळे हे सार्वजनिक असून त्याचे पाणी पिण्याचा अस्पृश्यांनाही हक्क आहे हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी महाड येथे सत्याग्रह घडवून आणला. हिंदू म्हणून स्वधर्माच्या मंदिरात जाऊन देवदर्शन घेण्याचा अस्पृश्यांचा अधिकार सिद्ध करण्यासाठी त्यांनी काळाराम मंदिर (नाशिक), पर्वती (पुणे), अंबादेवी मंदिर (अमरावती) इत्यादी ठिकाणी सत्याग्रह घडवून आणले. अपेक्षेप्रमाणे स्पृश्य हिंदूंनी सत्याग्रहाच्या वेळी प्रचंड विरोध केला. लाठ्या - काठ्यांनी मारहाण केली. संपूर्ण महाराष्ट्रात गावागावात अस्पृश्यांवर बहिष्कार टाकले, अस्पृश्य वस्त्यांना आग लावण्यात आली असे अत्याचाराचे सत्र सुरू झाले. तळ्याचे पाणी पीणे किंवा देवदर्शन करणे यासाठी हे सत्याग्रह नव्हते तर अस्पृश्यतेचा प्रश्न ऐतणीवर आणणे, अस्पृश्यांना या प्रश्नावर संघटित करणे, तर स्पृश्य समाजाला या प्रश्नांवर अंतर्मुख करणे, ब्रिटिश सरकारचे लक्ष या प्रश्नाकडे वेधणे, हा सत्याग्रहामागील उद्देश होता. सत्याग्रहामुळे संपूर्ण समाज ढवळून निघाला. सत्याग्रहाचा उद्देश सफल झाला.

### ४. शिक्षणाचा प्रसार :

सर्वप्रकारच्या अज्ञानाचे व अधोगतीचे मूळ शिक्षणाच्या अभावात (अविद्येत) आहे. हे म. जोतिबांचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पूर्ण मान्य होते. म्हणूनच स्वतः उच्च विद्याविभूषीत होऊन अस्पृश्य समाजात सर्वप्रकारचे शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले. शिक्षणामुळे अस्पृश्य लोकांतील अज्ञान, अंधश्रद्धा, देववाद, ईश्वरवाद, कर्मवाद यावरील विश्वास कमी होईल, अस्पृश्यता ईश्वरनिर्मित नसून ती मानव निर्मित आहे याची जाणीव होईल, विषमतेविरूद्ध, अन्यायाविरूद्ध, ते बंड करून उठतील, आपल्यावर लादलेल्या रूढी, परंपरा, गलिच्छ, व्यवसाय सोडून देतील, राहणीमानात सुधारणा करतील आणि शासनाच्या मोक्याच्या जागा मिळवतील, त्याचा अस्पृश्यता निवारण्याच्या कार्याला मोठा हातभार लागेल या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी

अस्पृश्याच्या शिक्षणावर भर दिला. त्यासाठी त्यांनी पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली या संस्थेमार्फत विद्यालये, महाविद्यालये, मुलामुलींसाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती इ.ची सोय करून प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या शिक्षणास प्रोत्साहन दिले. त्यामुळे अस्पृश्य समाजातील शिक्षित लोकांचे प्रमाण वाढले, त्याचा अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला मोठा फायदा झाला.

**५. हिंदू ग्रंथ व ग्रंथप्रामाण्याला विरोध :**

धर्मग्रंथ हे ईश्वरनिर्मित असून धर्म वचने ही प्रत्यक्ष ईश्वराचे आदेश आहेत म्हणून त्याचे पालन करणे अनिवार्य आहे ही सर्वच हिंदू धर्मियांनी श्रद्धा आहे. अस्पृश्यता, वर्ण व्यवस्था, जातीसंस्था यांना धर्माचा आधार असून धर्माज्ञा म्हणून त्याचे पालन केले पाहिजे अशी त्यांची श्रद्धा होती. ही श्रद्धा अस्पृश्यता निवारणाच्या कार्यातील मोठा अडथळा होती.म्हणून म. फूलेंप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही रामायण, महाभारत, गीता हिंदू, धर्मग्रंथांवर टिकेची झोड उठवली. स्त्री शुद्रातिशूद्रांच्या गुलामगिरीचा पुरस्कार करणाऱ्या मनुस्मृतीचे तर त्यांनी महाड परिषदेत दहन केले. त्यामुळे किमान अस्पृश्य जातींचा हिंदू धर्मग्रंथांवरील व हिंदू देवदेवतांवरील विश्वास कमी होऊ लागला. धर्माधिष्ठित रूढी, परंपरांना विरोध करण्याचे सामर्थ त्यांच्यात निर्माण होऊ लागले.

**६. राजकीय हक्क :**

ज्याच्या हातात राजकीय सत्ता असते त्यांचे समाजातील सर्व घटकांवर वर्चस्व प्रस्थापित होते. धर्मसत्तेला सुद्धा राजाश्रयाची गरज असते. समाजातील सामाजिक विषमता, अस्पृश्यांचे शोषण राजकीय सत्ता केवळ उच्चवर्णीयांच्या हातात असल्यानेच होत आहे याची जाणीव बाबासाहेब आंबेडकरांना झाली होती. राजकीय सत्ता म्हणजे कायदे करण्याची सत्ता आपली स्थिती सुधारावयाची असेल व कायद्याने आपल्या हक्कांचे संरक्षण करावयाचे असेल तर अस्पृश्य समाजाने राजकीय सत्तेत सहभागी झाले पाहिजे, कायदे करण्याची सत्ता आपल्या हातात घेतली पाहिजे. असे बाबासाहेबांचे ठाम मत झाले होते. म्हणूनच १९१९ मध्ये साऊथ बरो कमिटीसमोर दिलेल्या साक्षीत अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. नंतर संयुक्त मतदार संघात राखीव जागा मागितल्या. दुसऱ्या गोलमेज परिषदेत म. गांधीजींनी अस्पृश्यांना कोणत्याही प्रकारचे विशेष हक्क देणाऱ्यास विरोध केल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुन्हा अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. जातीय निवाड्याने ती मान्य केली. परंतु त्याविरूद्ध म. गांधीजींनी आमरण उपोषण केले. शेवटी पुणे करार होऊन अस्पृश्यांना संयुक्त मरदारसंघात राखीव जागा देण्यात आल्या. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेतही त्याचा समावेश करण्यात आला.

म. गांधीजी आणि काँग्रेसशी संघर्ष करून राजकीय क्षेत्रात राखीव जागा मिळविल्या परंतु संयुक्त मतदार संघामुळे निवडून येण्यासाठी संख्येने अधिक असलेल्या स्पृश्य हिंदूंच्या मताची गरज होती. त्यासाठी स्पृश्य - अस्पृश्य समाजातील शोषित - पीडित लोकांना संघटीत करण्याची आवश्यकता होती. म्हणून त्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या लढ्याला आर्थिक लढ्याचे स्वरूप देऊन स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. या पक्षाने १९३७ ची निवडणूक लढविली परंतु परंतु अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर अस्पृश्यांचे संघटन करून ब्रिटिश सरकारवर दबाव टाकून आपल्या हक्कांची व स्वतंत्र अस्तित्वाची दखल घेण्यास भाग पाडण्यासाठी १९४२ मध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. या पक्षाच्या माध्यमातून १९४६च्या निवडणुक लढविण्यात आली. त्यातही त्यांना दारूण पराभव स्वीकारावा लागला. स्वतंत्र भारताच्या

पहिल्या लोकसभा निवडणूकीत (१९५२) या पक्षाला देशाच्या विविध भागातून केवळ ३५ जागा जिंकता आल्या. राखीव मतदारसंघातील बहुसंख्य जागा काँग्रसनेच जिंकल्या. संयुक्त मतदारसंघात स्पृश्य हिंदू मतदारांनी शे. का. फे.च्या उमेदवारांना मते दिली नाहीत.

राजकीय क्षेत्रात सत्ता हस्तगत करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपयश आले असले तरी अस्पृश्यांमध्ये राजकीय जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

### ७. घटनात्मक तरतुदी :

सत्याग्रह आंदोलने, राजकीय संघटन, काँग्रेसशी विशेषतः म. गांधीजींबरोबर संघर्ष करून राजकीय हक्क प्राप्त करून घेतले परंतु त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. दरम्यान ब्रिटिश सरकारने भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. स्वातंत्र्याच्या चर्चेच्या वेळी अस्पृश्यांची स्वतंत्र घटक म्हणून दखल घेण्यात यावी ही बाबासाहेबांची मागणी विचारात घेतली नाही. त्यामुळे स्वतंत्र भारताची घटना तयार करण्यासाठी स्थापन होणाऱ्या घटना परिषदेत सामिल होणे, घटनेत अस्पृश्यांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल यांनी मुंबई प्रांतातून घटना परिषदेवर निवडून आणले. या संधीचा योग्य उपयोग करून स्त्रीशूद्रातिशूद्राच्या कल्याणाच्या अनेक तरतूदी करून घेतल्या. कलम १५ ते १७ व्या कलमाने सर्व भारतीय स्त्री पुरूषांना समतेचा अधिकार बहाल करण्यात आला. तसेच १७व्या कलमाने अस्पृश्यता नष्ट करण्यात आली. ३३०, ३३२, ३३५ अन्वये लोकसभा व विधान सभेत अनुसूचित जाती जमातींना राखीव ठेवण्यात आल्या. तसेच त्याच्यासाठी शासकीय सेवेत राखीव जागा ठेवण्यात आल्या. ३३८ व ३४० अन्वये दलितांना दिलेल्या हक्कांच्या अमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी व सल्ला देण्यासाठी आयोग स्थापन करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देण्यात आला आहे. असा प्रकारे देशाचा मूलभूत कायदा असलेल्या राज्यघटनेत अस्पृश्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. हक्कांच्या संरक्षणाची तरतूद करून अस्पृश्यता निवारणाच्या कायदेशीर जबाबदारी सरकारवर टाकली आहे.

### ८. धर्मांतर :

अस्पृश्य अस्पृश्य लोकांचा धर्म एक असूनही त्यांच्यात कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार होत नव्हता. स्पृश्य लोक तर धर्मियांइतकेच अस्पृश्यांना परके समजत होते. किंबहूना परधर्मियांना ते समानतेने वागवित होते. याउलट स्पृश्यांना गुलामहून हीन वागणूक देत होते. त्याचे मुख्य कारण ती केवळ रूढी आहे म्हणून तर तसे करणे हा धर्माचा भाग आहे अशी स्पृश्य हिंदूंची समजूत होती. म्हणून जोपर्यंत अस्पृश्य हिंदू धर्मात आहेत तोपर्यंत शिवाशीव, पाण्याकरीता, रोटी-बेटी व्यवहाराकरीता, मंदिर प्रवेशाकरीता स्पृश्य हिंदूंशी संघर्ष करावा लागेल. आणि त्यासाठी अस्पृश्यांना त्यांच्या अत्याचाराला बळी पडावे लागेल. हा अनुभव विविध सत्याग्रहाच्या वेळी आलाच होता. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्पृश्य हिंदूंबरोबर असलेला धार्मिक संबंध तोडने म्हणजेच धर्मांतर हा एकच मार्ग शिल्लक होता. अर्थात १९३५ मध्य येवला येथे मी हिंदू धर्मात जन्माला आलो असलो तरी हिंदू धर्मात मरणार नाही अशी धर्मांतराची घोषणा केली होती. तरीही २० वर्षांत हिंदू धर्मात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याला स्पृश्य हिंदूंनी प्रतिसाद दिला नाही. त्यांनी हिंदू स्त्रियांना पुरूषांप्रमाणे वारसा, दत्तक इ. हक्क देणारे हिंदू कोड बिल संसदेत मांडले. त्यालाही विरोध झाला. यामुळे हिंदू धर्म सुधारणेबद्दलचा त्याचा आशावादही मावळला. धर्मांतराचा निर्णय पक्का झाला. धर्मांतरासाठी त्यांच्यापुढे अनेक धर्मांचा पर्याय होता. परंतु धर्मांतराने अस्पृश्य समाज भारतीय संस्कृतीच्या परीघाबाहेर जाणार नाही आणि पुन्हा ईश्वरवाद, दैववाद, कर्मवाद, पुनर्जन्म, आत्मा, अवतार, ग्रंथप्रामाण्य या दुष्ट चक्रात अडकणार

नाही याची काळजी घेणे आवश्यक होते. अनेक धर्मांचा अभ्यास करून शेवटी स्वातंत्र्य, समता, बंधूभाव व प्रज्ञा शील, करुणेला महत्त्व देणाऱ्या भारतभर पसरलेल्या बौद्ध धर्माचा आपल्या लाखो अनुयायसह स्वीकार केला.

अर्थात बाबासाहेबांनी धर्मांतर हे ध्येय्य मानले नसून समताधिष्ठित समाज रचना निर्माण करण्याचे ते एक साधन मानले होते. बाबासाहेबांनी धर्मांतराचा मार्ग स्वीकारला असला तरी धर्मांतराच्या मुद्यावरून महारेतर जाती अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीपासून दूर गेल्या. काही अपवाद वगळता केवळ महार या जातीनेच धर्मांतराचा मार्ग स्वीकारला. त्यांनी आपली वेगळी सांस्कृतिक जडणघडण करण्याचा केला आहे.

### १.५.३. आंबेडकरोत्तर दलित चळवळ :

धर्मांतरानंतर अवघ्या दोन महिन्यांच्या आत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यामुळे आंबेडकरी चळवळीतील नेते भांबावून गेले, दिशाहिन झाले. राज्यघटनेतील दलितांच्या हक्कांची तरतूद आणि धर्मांतर या बाबासाहेबांच्या अंतिम काळातील दोन महत्त्वाच्या घटना आहेत. धर्मांतराने सामाजिक, मानसिक गुलामगिरी नष्ट करण्याचे साधन दिले. तर घटनात्मक तरतूदीने राजकीय सत्तेत व धोरण निर्मितीत सहभागी होण्याचे साधन दिले. परंतु बाबासाहेबांच्या निधनानंतर दलित नेत्यांनी केवळ राजकीय सत्तेलाच महत्त्व दिले. बाबासाहेबांनी त्यांच्या अंतिम काळात सामाजिक सुधारणेला पाठिंबा असणाऱ्या काँग्रेसतर पक्षातील नेत्यांना एकत्र करून एका प्रबळ विरोधी पक्षाची स्थापना करण्याचा संकल्प सोडला होता. त्यासंबंधी आचार्य अत्रे व इतर नेत्यांशी पत्रव्यवहारही केला होता. यासंदर्भात त्यांनी रिपब्लिकन पक्षाची संकल्पना मांडली होती. परंतु त्यांच्या निधनाने ती अपूर्णच राहिली. ३ ऑक्टो. १९५७ रोजी त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. रावबहादूर एन. शिवतरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पक्षाच्या पहिल्या अधिवेशनात १) बौद्धांच्या सवलती २) बौद्ध व अस्पृश्य याच्यावर होणारे अत्याचार ३) बौद्ध व अस्पृश्य यांना पडीत जमीनीचे वाटप यासारखे महत्त्वाचे ठराव पास केले. याशिवाय चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी शांताबाई दाणी यांच्या अध्यक्षतेखाली महिला परिषद भरविण्यात आली. यावरून आंबेडकरोत्तर चळवळीची दिशा स्पष्ट होते. वरील ठरावाप्रमाणे कार्य करण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीचा वारसा असलेल्या नेत्यांबरोबर सहकार्य करण्याचे धोरण स्वीकारले. त्याचाच परिणाम म्हणजे भाषिक आधारावर राज्याच्या निर्मितीच्या विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत पक्षाने सहभाग घेतला. संयुक्त महाराष्ट्र समितीत सहभागी होऊन १९५७ची निवडणूक लढविली. त्यात काँग्रेसचा दारूण पराभव झाला.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर काँग्रेसच्या विशेषतः यशवंतराव चव्हाण यांच्या बेरजेच्या राजकारणाने समितीत फूट पाडली. नवबौद्धांना सवलती देऊन त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याच्या नावाखाली काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न केला गेला. पुढे कम्युनिस्टांशी सहकार्य करण्याच्या मुद्यावरून रिपब्लिकन पक्षाचे दुरूस्त (ॲड. बी.सी.कांबळे) आणि नादुरूस्त (दादासाहेब गायकवाड) अशा दोन गटात विभाजन झाले.

दरम्यान काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाला प्राधान्य देऊन 'कसेल त्याची जमीन' या न्यायासाठी कुळकायद्याची निर्मिती केली. त्यावर दादासाहेब गायकवाड यांनी 'कसेल त्याची जमीन तर नसेल त्याचे काय ?' असा प्रश्न विचारून त्यांनी महाराष्ट्रातील दलितांबरोबर मराठा इ. शेतकरी

जातीतील भूमिहिनांचा ऐतिहासिक लढा उभारला. हे आंदोलन इतके मोठे होते की देशातील तुरुंग कमी पडले. अशा प्रकारे दादासाहेब गायकवाडांनी दलित चळवळीला आर्थिक लढ्याचे स्वरूप दिले. या माध्यमातून स्पृश्य - अस्पृश्यांतील शोषित पिडित लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. परंतु १९६० ते १९७० या काळात नादुरूस्त गटाने रस्त्यावरचे आंदोलन केले नाही. याउलट दुरूस्त गटाने राखीव जागा, बौद्धांच्या मागण्या व सवलती यांनाच महत्त्व दिले. त्यामुळे हा पक्ष केवळ एका जातीपुरताच मर्यादित झाला. पुढे अनेकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मा. आर. डी. भंडारे यांना काँग्रेसमध्ये प्रवेश देऊन त्यांची बिहारचे राज्यपाल म्हणून नेमणूक केली. 'प्रबुद्ध भारत'चे संपादक दादासाहेब रूपवते यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव दादासाहेब गायकवाडांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या नेत्यांना काँग्रेसमध्ये सत्तास्थाने मिळाल्याने ते दलितांवरील अत्याचार, त्यांच्या मागण्या, समस्या याबाबतीत ते निष्क्रीय झाले.

दलित नेत्यांच्या निष्क्रीयतेमुळे दलितांतील तरुण पिढीमध्ये असंतोष निर्माण होऊ लागला. आणि दलितांवर होणाऱ्या अत्याचाराला रोखठोक उत्तर देण्यासाठी दलित पँथरची स्थापना झाली. निवडणुकीचे राजकारण व कम्युनिस्टांना पाठिंबा देण्याच्या प्रश्नावरून नामदेव ढसाळ व राजा ढाले या दोन गटात पँ भाजन झाले. दलित ऐक्याच्या नावाखाली विविध संघटनांसह दलित पँथरही बरखास्त करण्यात आले. रिपब्लिकन पक्षाचे पुनर्जीवन करण्यात आले. परंतु निवडणुकीच्या राजकारणात काँग्रेसशी सहकार्य करण्यावरून रामदास आठवले गट (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया) व प्रकाश आंबेडकर (भारतीय रिपब्लिकन पक्ष) गट असे दोन गटात पक्षाचे विभाजन झाले. याशिवाय अनेक गट निर्माण झाले.

बाबासाहेबांनी समताधिष्ठित समाज या व्यापक उद्दिष्टांसाठी जीवनभर संघर्ष करून उभारलेली दलित मुक्तीची चळवळ आज नेतृत्वहीन व दिशाहीन होऊन नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

---

**प्रश्न :**

---

१) ब्रिटिश राजवटीतील राष्ट्रीय चळवळीतील महाराष्ट्राचे योगदान स्पष्ट करा.
२) महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळीचा आढावा घ्या.
३) महाराष्ट्रातील राष्ट्रीय चळवळीवर टीप लिहा.
४) महाराष्ट्रातील सामाजिक समस्या सांगून त्यांच्या निर्मूलनासाठी झालेल्या प्रयत्नांची चर्चा करा.
५) महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा आढावा घ्या.
६) सत्यशोधक चळवळीची विचार प्रणाली व तिच्या कार्यभागाची चर्चा करा.
७) ब्राह्मणेतर चळवळीचा उदय आणि विकासाचा आढावा घ्या.
८) महाराष्ट्रातील दलित चळवळीचा आढावा घ्या.
९) आंबेडकरी चळवळीची थोडक्यात माहिती लिहा.

-----------

# २

# प्रादेशिकता / प्रांतवाद (Regionalism)

२.० उध्दिष्टे
२.० प्रास्ताविक
२.१ १९ व्या शतकातील प्रादेशिक अस्मितेच्या जाणीवेचा उदय
  २.१.१ आंध्रप्रदेशाची निर्मिती
  २.१.२ राज्य पुनर्रचना आयोग (१९५३-५६)
२.२ संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि तिची वाटचाल
  २.२.१ संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना
  २.२.२ संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेतील अडथळे
  २.२.३ दार कमिशन १९४७
  २.२.४ अकोला करार - ८ ऑगस्ट १९४७
  २.२.५ जे.व्ही.पी. समितीच्या शिफारशी
  २.२.६ नागपूर करार २८ सप्टेंबर १९५३
  २.२.७ संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा कार्यभाग
  २.२.८ संयुक्त महाराष्ट्र समितीचा कार्यभाग (१९५६ ते १९६०)
  २.२.९ १९५७ च्या निवडणुकांचा कौलः
  २.२.१० संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती
२.३ उपप्रादेशिक किंवा विभागवाद आणि प्रादेशिक विकासातील असमतोल
  २.३.१ महाराष्ट्र राज्याची विभागवार रचना (Regional Setup)
  २.३.२ महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाची कारणे :
  २.३.३ महाराष्ट्रातील प्रादेशिक विभागांची वैशिष्ट्ये
  २.३.४ पश्चिम महाराष्ट्राची वैशिष्ट्ये :
  २.३.५ कोकण विभागाची वैशिष्ट्ये :
  २.३.६ मुंबई शहर विभागातील वैशिष्ट्ये
  २.३.७ मराठवाडा विभागाची वैशिष्ट्ये :
  २.३.८ विदर्भ विभाग :-
  २.३.९ प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधक समिती / दांडेकर समिती

## २.० उध्दिष्टे

१) १९व्या शतकात उदयाला आलेल्या प्रादेशिक अस्मितेची कारणे, स्वरूप व परिणामांची जाणीव करून घेणे.

२) संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि मराठी भाषकांचे राज्य निर्माण व्हावे यासाठी सुंयक्त महाराष्ट्र चळवळीने दिलेल्या योगदानाचा अभ्यास करता यावा.

३) भाषावार प्रांतरचने नंतर उदभवलेल्या विभागवाद व विकासातील असमतोल यांचा अभ्यास करता यावा.

## २.० प्रास्ताविक:

ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी भारताची ५-६ प्रांतात विभागणी केली होती. या विभागांना त्यांनी नॉर्थ प्रॉव्हिन्स, सेंट्रल प्रॉव्हिन्स, बॉम्बे प्रॉव्हिन्स अशी नावे दिली होती. इतर प्रांतांच्या उल्लेख उत्तर प्रांत, मध्य प्रांत असा केला जात असे. या प्रांतांना मराठीत इलाखा असे म्हटले जाई. या इलाख्यांना कोणतीही तर्कसंगती नव्हती. मुंबई इलाखा तर उत्तरेला सिंध प्रांतापासून सुरू होऊन दक्षिणेला धारवाडपर्यंत पसरलेला होता. पुन्हा या सगळ्या प्रदेशातील संस्थाने स्वतंत्र होती. हे अवाढव्य प्रदेश वेगळे करून छोटे राज्ये निर्माण करणे आवश्यक होते. पण यात ब्रिटिशांना फारसा रस नव्हता.

या पार्श्वभूमीवर १९१२च्या काँग्रेस अधिवेशानात मुंबई इलाख्यातून सिंधी भाषिकांचा प्रदेश वेगळा काढून त्यांचे एक स्वतंत्र राज्य बनवावे अशी सूचना मांडली गेली. त्याचबरोबर मुंबई प्रांतातून तेलगू भाषिकांना वेगळे काढून त्यांचे एक तेलगू भाषिक राज्य बनवावे असे हे सुचविले होते. या सूचनांवर चर्चा झाली. परंतु निर्णय मात्र झाला नाही. यानंतर १९२० मध्ये नागपुरात भरलेल्या राष्ट्रीय सभेत पुन्हा भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा चर्चेला आला. तसेच देशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेचे तत्व स्वीकारून त्यानुसार भाषानिहाय प्रांताची नव्याने रचना केली जावी असे नागपूर अधिवेशनात राष्ट्रीय सभेने मान्य केले. त्यामुळे १९२० पासून भाषावार प्रांतरचनेची चर्चा उघडपणे आणि वेगाने सुरू झाली

.

भाषावार प्रांतरचनेची ही कल्पना अचानक आलेली नव्हती. तिला युरोपमधील राजकीय घडामोडींची पार्श्वभूमी होती युरोपात १७व्या शतकात 'आधुनिक राष्ट्रवाद' जन्माला आला.पूर्वी राष्ट्रे बनण्यासाठी किमान भूभाग आवश्यक आहे असे मानले जात असे आज भाषा आणि वंश नव्या राष्ट्रवादाचे प्रमुख घटक बनले आहेत. इ.स. १८८० ते १९१४ या काळात युरोपातील ऑस्ट्रिया, हंगेरी व मध्य आशियातील तुर्कस्थान या साम्राज्यात निरनिराळ्या भागात राष्ट्रीयत्वाचे प्रश्न धूमसू लागले. आर्मेनिया, लुथिआनिया, अल्बेनिया युगोस्लाव्हिया, या देशातही राष्ट्रवादी चळवळी जोर धरू लागल्या या सर्वांचा भर भाषिक व वांशिक ऐक्यावर होता. जर्मनीतही आर्यवंशाची चळवळ सुरू होती. काँग्रेसचे बहुतेक नेते उच्चशिक्षित व युरोपात शिकलेले असल्यामुळे त्यांच्यावर या युरोपातील घडामोडींचा निश्चितच प्रभाव होता. या घडामोडींचा प्रभाव काँग्रेस नेत्यांवर पडल्यामुळे तेलगू भाषीकांचे व सिंधीभाषीकांचे राज्य वेगळे करण्याची मागणी होऊ लागली हे नक्की.

## २.१ १९ व्या शतकातील प्रादेशिक अस्मितेच्या जाणीवेचा उदय

भारताच्या घटनानिर्मात्यांनी सांस्कृतिक एकतेची घटकराज्ये निर्माण करण्याची जबाबदारी स्वीकारलीच नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पूर्वीच्या ब्रिटिश राजवटीतील प्रांतांचे स्वरूप कायम ठेऊन देशी संस्थांनांचे विलीनीकरण करून काही राज्ये तशीच राहु दिलीत तर काहींचे संघ प्रस्थापित केलेत तसेच भारतीय घटनेने संघराज्यांची निर्मिती करून केंद्र व घटकराज्यामध्ये अधिकारांचे विभाजन केले. परंतु स्वायत्त अधिकारांच्या आधारे स्थायी स्वरूपात राज्य निर्मिती घटनाकारांनी केली नाही.

ब्रिटिशांच्या राजवटीतील राज्ये ही सामाजिक सांस्कृतिक निकषांवर निर्माण करण्यात आली नव्हती तर त्यांनी राज्यांची निर्मिती प्रशासनाच्या सोयीनुसार केली होती. त्यांना कोणताही वैज्ञानिक आधार नव्हता. भाषावार प्रांतरचना करण्याची बांधिलकी काँग्रेस पक्षाची होती. स्वातंत्र्य आंदोलनात त्यासंबंधी मागणी करण्यात आली होती. १९३५च्या कायद्यावर टीका करताना काँग्रेसने असे मत मांडले होते की, प्रांताना मर्यादित स्वरूपात प्रांतिक स्वायतता देण्यात आली होती. परंतु आपला राजकीय व सांस्कृतिक विकास करण्यास आवश्यक भाषावार प्रांत निर्माण केले नाहीत. १९२० पासून भाषावार प्रांतरचनेची काँग्रेसची मागणी होती. १९२८ मोतीलाल नेहरू समितीने भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावार प्रांतरचनेसाठी झालेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत. १९४८ मध्ये घटना समितीला सल्ला देण्यासाठी 'दार समिती' नियुक्त करण्यात आली होती. या समितीने भाषिक प्रांतरचनेला विरोध करताना म्हटले आहे की, ''भाषावार प्रांतरचना ही संकुचित राष्ट्रवादाला प्रोत्साहन देणारी ठरेल आणि त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोक निर्माण होईल, तसेच भाषिक राज्यात अन्य अल्पसंख्यकांचा प्रश्न निर्माण होईल.'' प्रशासकीय सोयी, इतिहास, भौगोलिक स्थिती सांस्कृतिक अस्मिता व आर्थिक आधारावर पुनर्रचना करण्यावर भर दिला.

दार कमिशनप्रमाणेच पं. गोविंद वल्लभ पंत (जेव्हीपी आयोग) यांनी केवळ भाषिक आधारावर प्रांतरचनेला विरोध केला. सी. राजगोपालचारी भाषिक प्रांतरचनेचे विरोधक होते. पं. नेहरू, सरदार पटेल हे सुद्धा भाषिक प्रांतरचनेचे विरोधकच होते. सरदार पटेलांनी तर भाषिक प्रांतरचनेला ''राष्ट्रवादाचा खून'' अशा शब्दात भावना व्यक्त केली होती. डॉ. आंबेडकरांनी भाषावार प्रांतरचनेला विरोध करताना असे मत व्यक्त केले की, भाषावार प्रांतरचनेमुळे भारताच्या अंतर्गत अनेक राष्ट्रे निर्माण होतील. व राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येईल. राष्ट्रीय नेत्यांचा वरील सावध दृष्टिकोन भाषावार प्रांतरचनेला समर्थकांना मंजूर नव्हता त्यांचे म्हणणे असे होते की, काँग्रेसने जनतेला भाषावर प्रांतरचनेच्या अभिवचन दिले होते ते पूर्ण करावे अन्यथा जनतेत कटुता व नैराश्य निर्माण होईल. दुसरे असे की, भाषावार प्रांतरचनेसारखी मूलभूत गोष्ट केल्याशिवाय घटनेतील तरतुदींची कार्यवाही करणे अशक्य होईल. तसेच ब्रिटिशांनी निर्माण केलेले प्रांत आकाराने अवाढव्य आहेत, जनताभिमुख प्रशासनासाठी एकभाषिक लोकांना एकत्र आणणे योग्य ठरेल.

### २.१.१ आंध्रप्रदेशाची निर्मिती :

मद्रास प्रांतातील तेलगु भाषा बोलणाऱ्या लोकांनी स्वतंत्र आंध्रप्रदेशाच्या मागणीकरीता तीव्र आंदोलन सुरू केले. त्यामध्ये आमरण उपोषण करणाऱ्या 'श्री रामलु' या वरीष्ठ काँग्रेस नेत्याचा मृत्यू झाला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन यावर विचार करण्यासाठी न्या. वांचू यांची नियुक्ती करण्यात आली. भाषावार प्रांतरचनेच्या मागणीच्या आंदोलनाला अधिकच बळ मिळाले व सरकारवरील दडपण वाढले. शेवटी परिस्थितीचे गांभिर्य ओळखून १९ डिसेंबर १९५२ मध्ये भाषेवर आधारित प्रथम राज्य म्हणून आंध्रप्रदेशाची स्थापना करावी लागली.

### २.२.२ राज्य पुनर्रचना आयोग (१९५३-५६)

आंध्रप्रदेशाच्या निर्मितीनंतर भाषावार प्रांतरचनेच्या मागणीच्या आंदोलनाला देशाच्या अन्य भागातूनही अधिक बळ मिळाले व सरकारवरील दडपण वाढले. म्हणूनच २२ डिसेंबर १९५३ रोजी नेहरूनी

भाषावार प्रांत रचनेचा विचार करण्यासाठी संसदेत निवेदन करून 'राज्य पुनर्रचना' आयोगाची स्थापना करण्याची घोषणा केली त्यानुसार २९ डिसेंबर १९५३ रोजी एक त्रिसदस्यीय आयोग नेमला त्याचे अध्यक्ष न्यायमूर्ती फजल अली होते. व अन्य दोन सदस्य म्हणून पं. हृदयनाथ कंझरू व सरदार के. एम. पाणिक्कर, यांची नियुक्ती करण्यात आली. या आयोगाने ३० सप्टेंबर १९५५ रोजी आपला अहवाल भारत सरकारला सादर केला.

या आयोगाने राष्ट्रीय हितसंबंध आणि प्रादेशिक भावना यात उचित समन्वय प्रस्तापित करण्यावर भर देतांना 'एका भाषेचे एक राज्य असावे' हा सिद्धांत अमान्य केला असला तरी प्रशासनाच्या सोयीसाठी व कार्यक्षमतेसाठी 'भाषिक सलग्नतेच्या तत्वाला' मान्यता दिली. त्यानुसारच राष्ट्रीय एकता, प्रशासकीय सोयी, आर्थिक स्थिती, वित्तीय व्यवहार्यता, आर्थिक विकास व अल्पसंख्यांकांचे संरक्षण यांना आधारभूत मानुन राज्यरचना करण्याची शिफारस केली या तत्वानुसार तत्कालीन २८ राज्याऐवजी १६ राज्यांची व्यवस्था करण्यात आली. आणि दिल्ली, मणिपूर व अंदमान - निकोबार याची केंद्रशासित प्रदेश म्हणून शिफारस केली. संसदेत या आयोगाच्या शिफारशींवर चर्चा होऊन संसदेने ११ ऑगस्ट १९५६ रोजी राज्य पुनर्रनचा विधेयकाला मंजुरी मिळाली ३१ ऑगस्ट १९५६ रोजी राष्ट्रपतीची संमती मिळाली व १ नोव्हेंबर १९५६ रोजी संसदेने राज्यांची भाषांवार पुनर्रचना करून १४ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आले.

## राज्य पुनर्रचनेनंतरची राज्ये व केंद्रशासित प्रदेश :

| राज्ये | | केंद्रशासित प्रदेश |
|---|---|---|
| १) आंध्रप्रदेश | ८) मद्रास | १) दिल्ली |
| २) आसाम | ९) म्हैसूर | २) हिमाचल प्रदेश |
| ३) बिहार | १०) ओरिसा | ३) मणिपूर |
| ४) मुंबई | ११) पंजाब | ४) त्रिपुरा |
| ५) जम्मु-काश्मिर | १२) राज्यस्थान | ५) अंदमान-निकोबार, दिवा |
| ६) केरळ | १३) उत्तर प्रदेश | ६) लक्षद्वीप मिनिकॉय |
| ७) मध्यप्रदेश | १४) पश्चिम बंगाल | |

## २.२ संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि तिची वाटचाल

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. भाषावर प्रांतरचनेच्या दृष्टीने विचार केला असता आपल्याला ब्रिटिश काळाचा विचार करावा लागेल. ब्रिटिशानी निर्माण केलेले प्रांत प्रशासकीय सोयीसाठी केलेले होते. त्यामुळे बऱ्याच प्रांतात विविध भाषा बोलणारे लोक होते. मुंबई प्रांताचा विचार करता त्यामध्ये मराठी, गुजराती व कानडी भाषा बोलणारी जनता होती. मराठी भाषिक मुंबई, हैद्राबाद, कर्नाटक व मध्य प्रांतात विभागलेले होते. तात्पर्य ब्रिटिशांची प्रांतरचना लष्करी विजय, राजकीय व प्रशासकीय गरज व साम्राज्याहित लक्षात घेऊन केलेली होती. १९०५ साली काँग्रेसने बंगालच्या फाळणीस विरोध करून अप्रत्यक्षपणे भाषेवर आधारित प्रांतरचनेला पाठिंबा दिला होता. सन १९२६ च्या नेहरू अहवालातही भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व कोणते यासंबंधी 'लोकेच्छा व भाषिक ऐक्य' यावर भर देण्यात आला होता. १९३७ साली कलकत्ता काँग्रेसमध्ये मुंबई व मद्रास प्रांतामध्ये कर्नाटक व आंध्रप्रांत निर्माण करण्यासंबंधी चर्चा झाली व भाषावार प्रांतरचनेबाबत अनुकूल धोरणाचा काँग्रेसश्रेष्ठींनी पुन्हा उच्चार केला. सन १९३८

मध्ये काँग्रेस वर्कींग कमिटीने आपण सत्तेवर आल्यास भाषावार प्रांतरचना करू असे आश्वासन दिले. सन १९४५-४६च्या काँग्रेस निवडणूक जाहिरनाम्यात पुन्हा याचा उच्चार करण्यात आला.

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसने आपली भूमिका बदलली व भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न वासनात गुंडाळला. महाराष्ट्रात काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात आले तेव्हा काँग्रेस नेतृत्व जागे झाले व राज्य पुनर्रचना समितीची स्थापना केली.

### २.२.१ संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना

२८ जुलै १९४६ रोजी श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली या परिषदेत ''संयुक्त महाराष्ट्रपरिषदे''ची स्थापना करण्यात आली. या एकीकरण परिषदेने पुढील ठराव पास केले.

१) सर्व सलग मराठी भाषिक प्रदेशाचा एक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापन करावा.
२) सर्व मराठी प्रदेशांचे तुटक भाग पडले आहेत. त्याचा विचार करावा
   अ) ब्रिटिश मुंबई प्रांतातील मुंबई शहरासह मराठी भाषी भाग
   ब) ब्रिटिश वऱ्हाड : मध्य प्रांतातील मराठी भाषिक भाग
   क) हैद्राबाद वगैरे मधील मराठी भाषिक भाग
   ड) पोर्तुगीज अंमलाखालील गोमंतक यांचा समावेश करावा.

१४ एप्रिल १९४६ रोजी जळगावला झालेल्या परिषदेत या समितीच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली त्यानुसार अध्यक्ष श्री. शंकरराव देव उपाध्यक्ष बियाणी, पुनमचंद राका, जेथे पोदनाद, दिगंबर बिंदू, मुख्य कार्यवाह ग. त्र्य. माडखोलकर सहकार्यवाह - नवरे डॉ. अंमोलीकर, वसंतराव नाईक व सौ. प्रमिला ओक, कोषाध्यक्ष दा. वि. गोखले व कार्यकारी मंडळाचे सदस्य अशी निवड झाली.

### २.२.२ संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेतील अडथळे

**१. मराठी जनतेतील एकीचा अभाव :**

महाराष्ट्रात मराठी जनतेत एकी नव्हती. स्वतंत्र विदर्भाच्या निर्मितीसाठी विदर्भातील नेतृत्व प्रयत्नशील होते. मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीत गुजराथी समाजाचे वर्चस्व असल्याने त्यांचा मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करण्याला विरोध होता. त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र समितीमधील विविध घटक पक्षांत तात्विक मतभेद होते. या मतभेदांचा फायदा काँग्रेसच्या केंद्रिय नेतृत्वाने घेतला आणि महाराष्ट्र राज्य निर्मितीचा प्रश्न लांबणीवर टाकला.

**२. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाचा दृष्टिकोन :**

महाराष्ट्रातील काँग्रेस नेतृत्व हे स्वातंत्र्यापूर्वी टिळकांचे अनुयायी मानले जात होते. त्यामुळे गांधीवादी असलेले केंद्रातील नेतृत्व व राज्यांतील काँग्रेस नेतृत्व यात एकप्रकारचा मानसिक दुरावा होता. त्यामुळे राज्यात त्यांनी 'फोडा आणि झोडा' हे धोरण अवलंबिले. त्यांनी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा घाट घातला. तसेच त्यांनी गुजराती व मराठी प्रदेशाचे

एकत्रिकरण करून द्विभाषिक राज्य निर्माण केले. त्यामुळे मराठी जनतेचा गैरसमज वाढला. केंद्रीय नेतृत्व त्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष करत होते.

**३. मुंबईचे स्थान :**

मुंबईचा अंतर्भाव, महाराष्ट्रात करू नये असा गुजराती धनिक व त्यांचे काँग्रेस पक्षातील पाठीराखे यांचा आग्रह होता. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमधील हा सर्वांत मोठा अडथळा होता. मुंबईसहित महाराष्ट्राच्या मागणीला पंडित नेहरूसह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचा व मुंबईतील धनिकांचा विरोध होता. महाराष्ट्रातील कारखानदारी गुजराती, सिंधी, पंजाबी व दाक्षिणात्य अशा अमराठी लोकांच्या हाती होती. या सर्वांना मराठी भाषिक राज्याची भीती वाटत होती. आपल्या हितसंबंधांना हे मराठी भाषिक राज्य पोषक ठरणार नाही असे त्यांना वाटत होते. नेहरू, स. कां. पाटील व सरदार पटेल यांना मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी असावी असे वाटत होते. मुंबईचे 'नगर राज्य' किंवा 'केंद्रशासित प्रदेश' करावा असा या नेत्यांचा दृष्टिकोन होता. मुंबई हे महाराष्ट्राचे हृदय आहे असा दृष्टिकोन असणाऱ्या संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनी याबाबत कोणतीही तडजोड स्वीकारण्यास ठाम नकार दिला.

**४. महाराष्ट्रातील जातीयवाद :**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मराठी बांधवाने केंद्रावर दबाव आणण्याऐवजी संयुक्त महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य होणार की मराठ्यांचे अशी कुजबूज सुरू केली. ना. रा. शिंदे या अस्पृश्य लेखकाने अस्पृश्य जातींना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले जाईल काय ? त्यांना सामाजिक आर्थिक, राजकीय सवलती दिल्या जातील काय ? असे प्रश्न उपस्थित केले डॉ. आंबेडकरांना संयुक्त महाराष्ट्रानंतर उच्च जातीच्या हातात सत्ता जाईल याची भिती वाटत होती. मराठा वर्चस्वाची भीती ब्राह्मणवर्गालाही वाटत होती. तात्पर्य संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत संपूर्ण मराठी भाषिक समाज एकत्र आला नाही याचा फायदा केंद्रीय नेतृत्वाने घेतला.

**५. स्वातंत्र विदर्भ प्रांताची मागणी :**

विदर्भ प्रांत जे पूर्वी सी. पी. बेरारमध्ये समाविष्ट होता. तो महाराष्ट्रात समाविष्ट होण्याऐवजी स्वतंत्र नाग-विदर्भाचे राज्य अस्तित्वात यावे यासाठी जास्त उत्सूक होता. विदर्भातील नेत्यांनी मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिकांचे प्रदेश एकत्र करून विदर्भ या स्वतंत्र प्रांताची निर्मिती करावी अशी मागणी केली. त्यांच्यामते विदर्भ व महाराष्ट अशी दोन मराठी राज्य निर्माण करण्यात यावीत. नागपूर काँग्रेस कमिटीचे चिटणीस मा. सा. कन्नमवार यांचाही संयुक्त महाराष्ट्र स्थापनेला विरोध होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या समर्थकांच्या मते स्वतंत्र विदर्भाच्या निर्मितीमुळे मराठी जनतेच्या ऐक्याला तडा जाणार होता. नाग-विदर्भाचे आंदोलन हे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमधला मोठा अडथळा होता.

### २.२.३ दार कमिशन १९४७

देशाच्या घटना समितीमध्ये भाषिक राज्यांचा प्रश्न पुढे आणावा असा आदेश मुंबई अधिवेशनात वऱ्हाड, मध्यप्रदेश व मुंबई प्रांताच्या मराठी सदस्यांना देण्यात आला होता. डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी अशाच प्रकारची मागणी घटना समितीकडे केली. तसेच घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना भाषावार प्रांतरचनेबद्दल सहानुभूती वाटत असल्याने भाषिक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी 'दार कमिशनची' स्थापना करण्यात आली. भाषावार प्रांतरचना करावी की नाही व केल्यास प्रांत कसे असावेत याची चौकशी करून अहवाल सादर करावा अशी दार कमिशनची अधिकारकक्षा ठरविण्यात आली. दार कमिशनच्या कामाला सुरूवात झाल्यानंतर या कमिशनपुढे महाराष्ट्रातील मतभेद चव्हाट्यावर येऊ नयेत म्हणून 'अकोला करार' घडवून आणण्यात महाराष्ट्रातील नेत्यांना यश आले.

## २.२.४ अकोला करार - ८ ऑगस्ट १९४७

दार कमिशनपुढे महाराष्ट्राची एकजूट दिसावी व संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी एकमुखाने मांडता यावी याचा विचार करण्यासाठी अकोला येथे निवडक कार्यकर्त्यांची बैठक बोलविण्यात आली वऱ्हाड व नागपूरकरांच्या मनात कोणतीही शंका राहू नये व त्यांनी महाराष्ट्राच्या मागणीस मान्यता द्यावी म्हणून ८ ऑगस्ट १९४७ रोजी एक करार करण्यात आला. या करारावर शंकरराव देव, द. वां. पोतदार, बापूजी अणे, ब्रिजलाल बियाणी, शेषराव वानखेडे, मा. सा. कन्नमवार, पुनमचंद राका, रामराव देशमुख, पंढरीनाथ पाटील, पंजाबराव देशमुख, दा. वि. गोखले, धनंजयराव गाडगीळ, माडखोलकर व गोपाळराव खेडकर इ.नी सह्या केल्या. अकोला कराराची कलमे पुढीलप्रमाणे होती.

१) संयुक्त महाराष्ट्र म्हणून एक प्रांत राहून त्यामध्ये मध्यप्रांत वऱ्हाडमधील मराठी भाषा बोलणाऱ्या प्रदेशाचा व महाराष्ट्राचा असे उपप्रांत ठेवावेत.
२) या उपप्रांतांना अलग कायदे मंडळ व मंत्रिमंडळ ठेऊन काही विशिष्ट खाती त्यांच्याकडे सोपवावित.
३) संपूर्ण प्रांतासाठी एक गव्हर्नर व एक डेप्युटी गव्हर्नर असावा व त्यांची नेमणूक संपूर्ण प्रांतातर्फे व्हावी.
४) कायदेमंडळात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी असावेत.
५) उपप्रांताच्या निवडणूका अलग अलग व्हाव्यात.
६) उपप्रांताचा हायकोर्टे अलग असावीत.
७) विशिष्ट बाबीसाठी संपूर्ण प्रांतासाठी खास ट्रॅब्युनल असावे.
८) संबंध प्रांतासाठी एक पब्लिक सर्व्हिस कमिशन असावे.

या कराराप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करणे अशक्य असेल तर 'महाविदर्भ' स्वतंत्र प्रांत निर्माण करण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येतील. असा दुसरा ठराव पास करण्यात आला.

३० ऑगस्ट १९४७ रोजी म. गांधीनी भाषावार प्रांतरचनेला पाठिंबा दिला. परंतु मुंबईसाठी सर्वमान्य योजना तयार करावी अशी कल्पना मांडली. अर्थात अशी स्वतंत्र योजना संयुक्त महाराष्ट्र समितीला मान्य नव्हती. दरम्यान दार कमिशनच्या कामकाजाला सुरूवात झाली. दार कमिशनसमोर संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा असणाऱ्या व नसणाऱ्याही अनेक समित्यांनी व राजकीय पक्षांच्या समित्यांनी आपली निवेदने सादर केली, या सर्व निवेदनांचा आढावा दार कमिशनच्या सदस्यांनी विस्तृतपणे घेतला. यावरून दार कमिशन अशा निष्कर्षापर्यंत आले की, प्रांतांच्या निर्मितीचा एकमेव आधार भाषा हा घटक असता कामा नये. अशी प्रांतरचना देशाच्या

एकतेला व राष्ट्रीय हितसंबंधांना बाधा ठरू शकते. या निष्कर्षानुसार त्यांनी आपला अहवाल सादर केला. या अहवालात दार कमिशनने मुंबईबद्दल अशी शिफारस केली होती की ''मुंबईवर महाराष्ट्राचा काहीही हक्क नाही. मुंबई संपूर्ण भारताची आहे त्यामुळे कोणत्याच एका प्रांतात मुंबईचा समावेश होऊ शकणार नाही.''

## २.२.५ जे.व्ही.पी. समितीच्या शिफारशी

'दार कमिशन' मराठी जनता स्वीकारणार नाही असे दिसल्यानंतर जयपूर काँग्रेसमध्ये याविषयी चर्चा झाली. जयपूर अधिवेशनात (२९ डिसें. १९४८) काँग्रेसने असे मत व्यक्त केले की, ''भाषावार प्रांत बनविण्याच्या काँग्रेसच्या धोरणाशी दार कमिशनच्या शिफारशी सर्वस्वी विसंगत आहेत.'' म्हणून पुन्हा एकंदर परिस्थितीची पाहणी करून व सद्यःस्थितीच विचार करून नवीन कमिशन नेमावे. नव्या समस्या लक्षात घेऊन शिफारशी करण्यासाठी जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभिसितारामय्या यांची समिती नेमण्यात आली. ही समिती. 'जे.व्ही.पी.' समिती म्हणून ओळखली जाते. ही समिती नेमल्यानंतर मुंबईचे काय होणार यासंबंधी मराठी माणसाला चिंता वाटु लागली. नेहरूंची भूमिका महाराष्ट्राला प्रतिकूल होती. वल्लभभाई ताठ तर पट्टाभिसितारामय्या यांना आंध्राचे आश्वासन मिळल्याने त्यांना या समितीत कितपत रस असेल हा प्रश्नच होता. जे.व्ही.पी. समितीने तीन महिने अभ्यास करून ५ एप्रिल १९४९ मध्ये आपला अहवाल प्रसिद्ध केला.

जे.व्ही.पी. समितीने भाषावार प्रांतरचनेला अनुकूलता दर्शविली परंतु मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करण्यास विरोध दर्शविला. या समितीने आंध्र, कर्नाटक व केरळ यांना भाषावार प्रांत निर्माण करण्याचे आश्वासन देण्यात आले. 'मराठी जनतेला महाराष्ट्र प्रांत पाहिजे असल्यास ते ताबडतोब देण्यात येईल मात्र मुंबईचा त्यात समावेश होणार नाही आणि एकटच्या वऱ्हाडचा निराळा प्रांत होणार नाही.'

वरील शिफारशींमुळे महाराष्ट्राचा प्रश्न किचकट बनला. भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कर्त्यांनी वरील दोन्ही अहवालांना कडाडून विरोध केला.

जे.व्ही.पी. समितीचा निराशाजनक अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. १५ मे १९४९ रोजी संपूर्ण ठाणे जिल्ह्याचा समावेश संयुक्त महाराष्ट्रात करावा अशी मागणी श्री भाऊसाहेब हिरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. १ जुलै १९४९ नंतर सेनापती बापट यांनी प्रभात फेऱ्या सुरू केल्या व जनजागृतीला सुरूवात केली. वऱ्हाडमधील नेत्यांनी आपली स्वतंत्र विदर्भाची मागणी सोडून दिली व महाराष्ट्रात सामिल होण्यास तयार झाले.

जे.व्ही.पी.च्या निर्णयानुसार तेलंगणविरहित आंध्रप्रदेश निर्मितीचा निर्णय काँग्रेस वर्किंग कमिटीने घेतला. कर्नाटक काँग्रेस व महाराष्ट्र काँग्रेसला (मुंबई सोडून) आपसातील सीमावाद सोडवून नव्या राज्यांना तयार आहात काय? अशी विचारणा केली कर्नाटक - महाराष्ट्र सीमेवर बेळगावसहित जी वादग्रस्त १६ गावे होती त्याबाबत तडजोड होऊ शकली नाही कर्नाटकने त्याबाबत अधिक आग्रही भूमिका घेतली.

२८ नोव्हेंबर १९४९ रोजी मुंबई महापालिकेचा ठराव झाला. आचार्य अत्रे व श्री. आर. डी. भंडारी यांनी 'मुंबईसह महाराष्ट्राचा' ठराव मांडला. तो ५० विरूद्ध ३५ मतानी संमत झाला. दिवसेंदिवस वातावरण तापत चालले. १९ डिसेंबर १९५२ रोजी आंध्र प्रांताची मागणी मंजूर झाली. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याची आशा निर्माण झाली. २७ सप्टेंबर १९५३ रोजी संयुक्त महाराष्ट्रासंबंधी एकमुखी ठराव विधीमंडळात मांडण्यात आला. या ठरावाला मोरारजी देसाईनी अडथळा आणला. त्यामुळे हा ठराव बारगळला.

### २.२.६ नागपूर करार २८ सप्टेंबर १९५३

जे.व्ही.पी. अहवालानंतर स्वतंत्र वऱ्हाड प्रांत निर्माण होणार नाही हे स्पष्ट झाल्यानंतर अकोला करार रद्द करून त्याच्याऐवजी संयुक्त महाराष्ट्रात येऊ पाहणाऱ्या विभागांना समान दर्जा देणारा एक 'नागपूर करार' अस्तित्वात आला. या कराराची व्याप्ती वाढविण्यासाठी मराठवाड्यालाही यात सामिल करून घ्यावे असे ठरले. यानुसार विदर्भ संयुक्त महाराष्ट्र आली मराठवाडा या तीनही भागातील प्रमुख नेतेमंडळी नागपूर येथे जमा झाली व नागपूर करार अस्तित्वात आला. २८ सप्टेंबर १९५३ या करारात पुढील कलमे समाविष्ट करण्यात आला.

१) मराठी भाषिकांचे एक राज्य निर्माण करता यावे म्हणून आम्ही सर्व विभागांचे प्रतिनिधी पुढील निर्णय मान्य करीत आहोत.
२) मुंबई, मध्यप्रदेश आणि हैद्राबाद प्रांतातील मराठी भाषिकांचे प्रदेश एकत्र करून महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य स्थापन केले जावे. मुंबई ही या राज्याची राजधानी असेल.
३) प्रशासकीय सेवेसाठी या राज्याचे महाविदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र असे तीन विभाग करण्यात यावेत.
४) सर्व राज्यांमध्ये विकासासाठी केलेल्या आर्थिक तरतूदी प्रत्येक विभागाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असाव्यात. परंतु मराठवाड्याचा मागासलेपणा लक्षात घेऊन त्या विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले जावेत.
५) राज्याच्या कायदेमंडळातील जनतेचे प्रतिनिधित्व हे लोकसंख्येच्या प्रमाणात असावेत.
६) राज्याच्या उच्च न्यायालयाचे केंद्र मुंबई येथे असावे. त्याचबरोबर नागपूर येथे न्यायालयाचे एक उपकेंद्र (खंडपीठ) असावे.
७) शासकीय आणि निमशासकीय सेवांमध्ये उमेद्वारांची भरती करतांना लोकसंख्येच्या प्रमाणात असावी.
८) नागपूरला उपराजधानीचा दर्जा दिला जाईल. कार्यक्षम शासनाचे फायदे नागपूरला देण्याचे प्रयत्न राहतील. त्यासाठी सरकारी कचेऱ्या काही निश्चित काळासाठी नागपूरला हलविण्यात येतील. राज्य विधिमंडळाचे किमान एक अधिवेशन दरवर्षी नागपूरला भरविण्यात येईल.

नागपूर करारावर महाविदर्भाच्या वतीने रामराव देशमुख, गोपाळराव खडेकर, शेषराव वानखेडे, रा. कृ. पाटील यांनी सह्या केल्या. प. महाराष्ट्राच्या वतीने भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नानाकुंटे व देवकीनंदन नारायण यानी तर मराठवाड्याच्या वतीने देवीसिंग चव्हाण, लक्ष्मणराव भाटकर व सौ. प्रभावतीदेवी जकातदार यांनी सह्या केल्या.

## २.२.७ संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा कार्यभाग

विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील नेत्यांनी २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर करारावर स्वाक्षऱ्या करून संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याचा आपला निर्धार स्पष्ट केला. नागपूर काँग्रेसचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध असला तरी वऱ्हाडच्या नेतृत्वाचा पाठिंबा होता. मुंबई प्रदेश काँग्रेसचा विरोध असला तरी डॉ. नरवणे यांच्या नेतृत्वाखाली जनकाँग्रेस व मुंबईतील मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा होता. या सर्वांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेमार्फत एक संयुक्त निवेदन २४ ऑक्टोबर १९५४ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाला सादर करण्यात आले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन करणारे निवेदन काकासाहेब गाडगीळ यांनी तयार केले.

राज्य पुनर्रचना आयोगाने संयुक्त महाराष्ट्राची मागणी फेटाळून लावली. समतोल द्विभाषिक मुंबई राज्य व महाविदर्भ अशा दोन मराठी भाषिक राज्यांची शिफारस आयोगाने केली. या शिफारशीवर महाराष्ट्रात असंतोषाची लाट निर्माण झाली. आयोगाच्या अन्यायकारक शिफारशींमुळे संपूर्ण महाराष्ट्रात विरोध झाला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने आयोगाच्या शिफारशी दुर्देवी असल्याचे मत व्यक्त केले. आणि त्या एकमताने फेटाळून लावल्या. पक्षसिस्तीचा निर्बंध व पक्षाच्या कोणत्याही नेत्यांने आंदोलनात सहभागी होऊ नये असा पक्षश्रेष्ठींचा आदेश यामुळे आंदोलनाच्या नेतृत्वाची जबाबदारी परिषदेने पार पाडली पाहिजे. हे अपेक्षित होते. परंतु परिषदेने याबाबत कोणातच ठोस कार्यक्रम न आखल्याने आंदोलनाचे नेतृत्व काँग्रेस पक्षाकडे गेले. आंदोलनाची तीव्रता कमी करण्यासाठी ९ नोव्हेंबर १९५५ रोजी काँग्रेस कार्यकारणीने 'त्रीराज्य सूत्र' सुचविले. यात सर्व मराठी भाषिकांचा समावेश असलेले महाराष्ट्र सर्व गुजराथी भाषिक भागांचा समावेश असलेले गुजरात आणि संमिश्र भाषिक मुंबई महानगर अशी तीन राज्ये स्थापन करण्याचा प्रस्ताव होता.

महाराष्ट्र काँग्रेसने ही योजना तात्काळ फेटाळली. मराठी भाषिकांवर जाणीवपूर्वक अन्याय होत आहे अशी भावना सर्वत्र निर्माण झाली. सर्व काँग्रेसेत्तर पक्षांनी या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबई शहरात पूर्ण हरताळ यशस्वीपणे आयोजित केला. २२ डिसेंबर १९५५ रोजी मुंबई महानगरपालिकेत मुंबई शहर महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात यावे ही काँग्रेसेत्तर पक्षांचा ठराव बहुमताने संमत झाला. काँग्रेस पक्षाच्या मराठी भाषिक सदस्यांनी या ठरावाच्या बाजूने मतदान केले. २७ मराठी भाषिक काँग्रेस सदस्यांनी राजीनामा देऊन जनकाँग्रेसची स्थापना केली. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जनमत संघटीत करण्याची कामगिरी काँग्रेसेत्तर पक्षांनी पार पाडली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने त्रिराज्य योजना फेटाळल्याने मुंबई राज्याचा पुनर्रचनेचा प्रश्न गुंतागुंतीचा बनला १६ जाने. १९५६ रोजी मुंबई महानगर केंद्रशासित करण्याचा निर्णय प. नेहरूनी घोषित केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात याविरूद्ध प्रतिक्रीया उमटल्या मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात दंगे झाले. तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले. पोलिसी गोळीबारात १०५ निरापराध व्यक्ती मृत्यू पावल्या. याचा उल्लेख 'संयुक्त महाराष्ट्राचे हुतात्मे' असा करण्यात येतो. पोलिसांच्या अत्याचाराचा निषेध म्हणून भारताचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी राजीनामा दिला. भाऊसाहेब हिरे व नानासाहेब फुटे यांनी ही राजीनामे देऊ केले. १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्राचा लढा निर्णायक अवस्थेत आला.

## २.२.८ संयुक्त महाराष्ट्र समितीचा कार्यभाग (१९५६ ते १९६०)

संयुक्त महाराष्ट्र परिषदेची जागा संयुक्त महाराष्ट्र समितीने घेतल्यानंतर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा निर्णायक अवस्थेत पोहोचला. या प्रश्नावर मराठी भाषिकांची एकजूट झाली. जाती, पंत, भेद विसरून शहरी आणि ग्रामीण भागातील जनतेने अपार हालअपेष्टा झाली पोलिसांचा अत्याचार सहन करून राज्यकर्त्यांना आपला निर्णय बदलणे भाग पाडले. संघर्षाच्या या पर्वात जनतेचे नेतृत्व बिगर काँग्रेस नेतृत्वाने समर्थपणे केले होते.

८ फेब्रुवारी १९५६ रोजी डाव्या पक्षांच्या पुढाकाराने संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली. साम्यवादी, प्रजासमाजवादी, समाजवादी व शेतकरी कामगार पक्ष, लाल निशान गट, मोहिते खाडिलकरांचा मजदूर किसान पक्ष आंबेडकरांच्या अनुयायांचा शेड्युल कास्टस् फेडरेशन, हिंदु महासभा, भारतीय जनसंघ आणि. मुंबई शहरातील बंडखोर काँग्रेसवाल्यांचा जनकाँग्रेस हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे प्रमुख घटक पक्ष होते. ११ बिगर काँग्रेस पक्ष व गट आणि अपक्षांची संयुक्त आघाडी असे संयुक्त महाराष्ट्र समितीचे स्वरूप होते. अर्थात संयुक्त महाराष्ट्र समिती ही एक राजकीय पक्ष नसून लोकआंदोलन किंवा प्रादेशिक अस्मितेचा पुरस्कार करणारा एक दबावगट होती. राजकीय पक्षांची ही एकजूट प. महाराष्ट्र, कोकण आणि मुंबई शहरापुरती मर्यादित होती. मराठवाड्याच्या जनतेचा संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला एकमुखी पाठिंबा असला तरी त्या भागात काँग्रेसेत्तर पक्षांची एकजूट होऊ शकली नाही. विदर्भातील प्रजासमाजवाद्याचा द्विभाषिक मुंबई राज्यास पाठिंबा तर उर्वरित महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन अशी परस्परविरोधी अवस्था होती. समितीचा घटकपक्ष असूनही जनसंघाने इतर घटकपक्षांच्या उमेद्वारांचा १९५७ च्या निवडणुकीत प्रचार केला नाही. समाजवादी पक्षाने आपले उमेदवार स्वतंत्रपणे उभे केले. समितीच्या घटकपक्षात परस्पर हेवेदावे व अविश्वास होता. तरीही लोकमताच्या दबावाखाली त्यांना एकत्र यावे लागले.

बिगर काँग्रेसी पक्षांच्या संयुक्त आघाडीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साम्यवादी नेते श्रीपाद अमृत डांगे, उपाध्यक्षपदी डॉ. त्र.वा. नरवणे, सरचिटणीसपदी प्रजासमाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते एस.एम. जोशी यांची एकमताने निवड करण्यात आली. पक्षाच्या संसदिय मंडळावर घटकपक्षांच्या इतर ज्येष्ठ नेत्यांना सामावून घेण्यात आले. प्र. के. अत्रे समितीचे मुख्य प्रवक्ते त्यासाठी त्यांनी 'मराठा' या वृत्तपत्राची स्थापना केली. 'प्रभात कार' वालचंद कोठारी 'केसरी कार' जयवंतराव टिळक, 'सकाळकार' डॉ. ना. भी. परूळेकर, 'प्रबोधनकार' ठाकरे सेनापती बापट, भाई बागळ इ. नी समितीच्या कार्यात सक्रीय सहकार्य केले. उद्धवराव पाटील, नाना पाटील, दत्ता देशमुख, यशवंतराव मोहिते, रघुनाथराव खडिलकर इ. डाव्या विचारांच्या नेत्यांनी प्रचाराची बाजू समर्थपणे मांडली. संयुक्त महाराष्ट्र समिती मराठी अस्मितेचे प्रतिनिधीत्व करत होती. त्यास मराठी भाषिक जनतेने अभूतपूर्व प्रतिसाद दिला होता.

मुंबईतील अमानुषी गोळीबारानंतर संयुक्त महाराष्ट्र समितीने मुंबईस संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर राज्यव्यापी आंदोलन उभारले. यात ग्रामीण भागातील जनता मोठ्या प्रमाणात सहभागी झाली. मराठी जनतेच्या या अभूतपूर्व एकजुटीने मुंबई केंद्रशासित करण्याचा विचार मागे पडला. दरम्यान सी.डी. देशमुखांचा राजीनामा पक्षश्रेष्ठींनी स्वीकारला. त्यामुळे सर्व मराठी व गुजराथी भाषिक भागांचे द्विभाषिक राज्य स्थापन करण्याच्या विचारास अनुकूलता दर्शविली. मुंबई महाराष्ट्रापासून

हटवली जाणार नाही या रास्त कारणास्तव महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांनी पक्षश्रेष्ठींचा निर्णय मान्य केला. २४ जुलै १९५६ रोजी संसदेने मुंबईसह सर्व मराठी भाषिक आणि गुजराती भाषिक प्रदेशाचा समावेश असलेल्या विशाल मुंबई स्थापनेचा प्रस्ताव संमत केला. महाराष्ट्र काँग्रेसमध्ये चव्हाण गट त्यास विरोध करण्याच्या मनस्थितीत होता. द्विभाषिक मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून मोरारजी देसाई व्हावेत असे पक्षश्रेष्ठींना वाटत होते. भाऊसाहेब हिरेही नेतृत्वासाठी उत्सुक होते. एकमताने निवड होत नाही हे स्पष्ट झाल्यावर मोरारजी देसाई यांनी यशवंतराव चव्हाणांना पाठिंबा दिला. १६ ऑक्टो. १९५६व्या विधीमंडळ पक्षाच्या निवडणुकीस चव्हाणांना ३३३ मते, तर हिरे यांना १११ मते मिळाली व द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांची निवड झाली.

मुंबईसह सर्व मराठी आणि गुजराती भाषिक प्रदेशांचा समावेश असलेल्या विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्याच्या प्रस्तावाला संसदेने २४ जुलै १९५६ रोजी मान्यता दिली. त्यानंतर १ नोव्हें. १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्य संयुक्त महाराष्ट्र समितीचे मात्र समाधान झाले नाही. म्हणून समितीच्या नेत्यांनी आंदोलन अधिक प्रखर करण्याचा निर्णय घेतला. चव्हाणांच्या संयमी व सौम्य कार्यपद्धतीचा प्रभाव जनमानसांवर पडला. परंतु संयुक्त महाराष्ट्राबाबत लोकमत तसुभरही कमी झाले नाही.

### २.२.९ १९५७ च्या निवडणुकांचा कौलः

जनमानसातील तीव्र असंतोष, १०५ हुतात्मांचे हौतात्म्य, डांगे, एस.एम. जोशी, प्र. के. अत्रेंची यांची रणधुमाळी या पार्श्वभूमीवर १९५७च्या सार्वजनिक निवडणुका झाल्या. समितीचा घटकपक्षात जागावाटप समझोता मुंबईशहर, कोकण, प. महाराष्ट्र यापुरता मर्यादितच होता. मराठवाडा व विदर्भात एकमत होऊ शकलेले नाही. अनेक गावात काँग्रेसला गावबंदीला तोंड द्यावे लागले. लोकमत काँग्रेसविरूद्ध होते. परंतु यशवंतरावांनी पक्षाची प्रचारमोहिम यशस्वीपणे राबविली. लोकसभेच्या ४४ पैकी २१ आणि विधानसभेच्या २६४ पैकी १३५ जागा काँग्रेसने जिंकल्या. संयुक्त महाराष्ट्र समितीने लोकसभेच्या २३ व विधानसभेच्या १२९ जागा जिंकल्या व महाराष्ट्र कोकण आणि मुंबईत काँग्रेसचे पानीपत झाले. मराठवाडा व विदर्भात काँग्रेसला साथ मिळाली. १९५७च्या लोकसभा निवडणुकीनंतर मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही काँग्रेस पक्षाला संयुक्त महाराष्ट्र समितीने पराभूत केले. स्था. स्व. संस्थांच्या निवडणुकीत व विधानसभेच्या पोटनिवडणुकीतही काँग्रेसपक्षाला पराभव स्वीकारावा लागला याचा अर्थ मराठी जनमानसाने द्विभाषिक मुंबई राज्य मान्य नसल्याचे स्पष्ट केले.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांनी संधी मिळेल तेव्हा संयुक्त महाराष्ट्राची मागणी रेटून धरली. ३ नोव्हें. १९५७ रोजी पंडित नेहरू प्रतापगडावर शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याकरीता आले असता त्यांच्या मार्गावर मराठी जनतेने प्रचंड निदर्शने केली. मराठी लोकांच्या तीव्र भावनेची दखल घेणे नेहरूना भाग पडले यातूनच द्विभाषिक मुंबई राज्याच्या भवितव्याची फेरविचार करण्याची प्रक्रीया सुरू झाली.

### २.२.१० संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जनआंदोलन अधिकाधिक व्यापक होत असतानाच संयुक्त महाराष्ट्र समितीच्या घटकपक्षातील मतभेद उत्तरोत्तर वाढत गेले. परंतु काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी महाराष्ट्रातील लोकमताची दखल घेतल्याने द्विभाषिक मुंबई राज्याच्या भवितव्याचा फेरविचार पक्षपातळीवर सुरू झाली. यशवंतराव चव्हाणांनी पक्षहिताच्या दृष्टिने संयुक्त महाराष्ट्र स्थापन करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. विनोबा भावे, जयप्रकाश नारायण डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी पं. नेहरूवर नैतिक दबाव आणला. याबाबत श्रीमती इंदिरा गांधी यांनी विधायक

भूमिका घेतल्याने मुंबई राज्याचे विभाजन होण्याची शक्यता निर्माण झाली स. का. पाटील व अणे यांनी विरोध दर्शविला. परंतु नेहरूनी त्यांचे दावे फेटाळले व महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला संमत्ती दर्शविली. काँग्रेसने मुंबईसह महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीस हिरवा कंदिल दाखविल्यानंतर संसदेत मुंबई राज्य पुनर्रचना विधेयक १९६० मध्ये संमत करण्यात आले. १ मे १९६० संयुक्त महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली. पंडित नेहरूनी नव्या राज्याचे उद्घाटन केले व शुभेच्छा दिल्या यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राची मंगल-कलश आणण्याची कामगिरी पार पाडली. परंतु संयुक्त महाराष्ट्राचे खरे मानकरी मराठी भाषिक जनता आणि त्यांची मराठी भाषिक राज्याची तीव्र आकांक्षा होय.

अशा रितीने १९४६ साली सुरू झालेला संयुक्त महाराष्ट्र राज्याचा लढा १९६० साली महाराष्ट्र राज्य निर्मितीने यशस्वी झाला.

### २.२.११ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे परिणाम

संयुक्त महाराष्ट्र समितीने संयुक्त महाराष्ट्र मिळविण्यात सिंहाचा वाटा उचलला पण स्वतंत्र महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर या समितीची एकसंघता नष्ट झाली. जनसंघ, समाजवादी पक्ष हे समितीतून बाहेर पडले. काही काळानंतर प्रजासमाजवादी पक्षानेही समितीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला या सर्वामुळे समितीच्या कार्यावर मर्यादा पडू लागल्या. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते त्यांनी समितीला फारसे पुढे येऊ दिले नाही.
एस. एम. जोशी यांनी समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. दाजिबा देसाई हे त्यानंतर समितीचे अध्यक्ष झाले त्यांचे नेतृत्व फारसे प्रभावी नसल्याने समिती दुबळी होऊ लागली. हळूहळू समितीतील सर्व कर्तबगार नेते समितीतून बाहेर पडले त्यामुळे समिती क्षीण झाली. संयुक्त महाराष्ट्राचा लढा ज्या ध्येय धोरणासाठी लढला गेला की धोरणे काही प्रमाणात साध्य झाली त्यामध्ये

१) जिल्हा परिषदांमुळे कारभाराचे विकेंद्रीकरण होऊन तो सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचला.
२) गरिबांना शैक्षणिक सवलती मिळाल्या.
३) कलाकार, साहित्यिक, संशोधक, विचारवंत यांच्या गुणांची कदर होऊ लागली.
४) शेतकरी व कष्टकरी समाजाच्या समस्या सुटण्यास मदत झाली.
५) सहकारी क्षेत्रात प्रगती झाली. कृषी उद्योग सुरू झाले.

ज्या ध्येयाने प्रेरित होऊन संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली त्या ध्येयांना ओहोटी लागली आहे. मराठी माणसाची, मराठी संस्कृतीची आणि मराठी नेतृत्वाची पीछेहाट झालेली दिसते. सत्तारूढ काँग्रेस पक्षात अनानोंदी कारभार सुरू झाला असून सुरूवातीच्या काळातील एकसंघ असणारा काँग्रेस पक्ष विस्कळीत झाला आहे. सत्ता स्पर्धा, नेतृत्ववाद यामुळे त्यांच्यात फूट पडत आहे. स्वार्थ व आर्थिक फायदा व सत्तेसाठी अनेक जणांनी पक्ष सोडला. दिल्लीतही महाराष्ट्राचे अवमूल्यन होत आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर विदर्भ व मराठवाडा महाराष्ट्रात सामिल झाला पण तो भाग पूर्वीपासूनच मागासलेला केला आहे. मुंबईचे औद्योगिक केंद्रीकरण झाल्याने पश्चिम महाराष्ट्राचा झपाट्याने विकास झाला. पण विदर्भ मराठवाडा हा भाग अविकासितच राहिला.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचे वर विशद केलेले तात्कालीन व अन्य दीर्घकालीन परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

**१) राज्य मराठीचे की मराठ्यांचे :**

मराठी भाषिक प्रदेशात मराठा, कुणबी जातीसमुहाची संख्या ४०% असल्याने त्यांचे प्रभुत्व प्रस्तापित होणे अपरिहार्य आहे. लोकशाहीत संख्याबळ हा प्रभुत्व निर्माण करणारा घटक असतो. डॉ. आंबेडकरांनी मराठाप्रभुत्वाच्या मुद्यावरून संयुक्त महाराष्ट्राला विरोध केला होता. १९६० पूर्वीच्या कालखंडात महाराष्ट्रातील बहुजन समाजाला डावलण्यात आले होते.

**२) अपूर्ण महाराष्ट्र :**

१९६० साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली तरी महाराष्ट्र अद्याप अपूर्णच आहे. बेळगाव - कारवार विभागातील मराठी भाषिक प्रदेशाचा कानडी भाषेत करण्यात आलेला समावेश अन्यायकारक आहे व लोकमताच्या विरूद्ध आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेद्वार कर्नाटक विधानसभेवर व लोकसभेवर सातत्याने निवडून येतात. या प्रश्नाचे अद्याप निराकारण झालेले नाही. तसेच डांग, उंबरगाव हे मराठी भाषिक प्रदेश गुजरात राज्यात समाविष्ट करण्यात आले आहेत. महाराष्ट्राच्या सीमेशी भिडणारा मराठी प्रदेश महाराष्ट्रात नाही ही खंत मराठी माणसाला अद्याप आहे.

**३) संयुक्त महाराष्ट्र समितीचे विघटन :**

संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्याने समितीचा उद्देश पूर्ण झाल्याने घटकपक्षानी समितीचे विसर्जन करा अशी मागणी केली. परंतु बेळगाव, कारवार डांग व उंबरगावचा प्रश्न अजून अपूर्ण आहे तेव्हा समिती विसर्जित करू नये अशी भूमिका डाव्या पक्षांनी घेतली. त्यामुळे जनसंघ प्रजासमाजवादी पक्ष व जन काँग्रेस पक्ष या गटांनी समिती सोडली. चीनच्या युद्धानंतरचे मतभेदामुळे डाव्या पक्षांनी १९६४ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीचे विसर्जन केले.

**४) प्रादेशिक असमतोल :**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी अकोला आणि नागपूर कराराद्वारे विदर्भ आणि मराठवाडा या महाराष्ट्राच्या बाहेर असलेल्या मराठी भाषिक प्रदेशांना काही ठोस अश्वासने देण्यात आली होती. मराठवाडा व विदर्भाकडे दुर्लक्ष झाले. या विभागातील विकासाचा अनुशेष भरून काढण्याकरीता प्रादेशिक विकास मंडळे स्थापण्याकरीता वैधानिक विकास करण्याबाबत चाल ढकल करण्यात आली. त्यामुळे नागविदर्भाच्या मागणीला चालना मिळत आहे.

**५) मराठी भाषिकांची पीछेहाट आणि भूमिपूत्रांचा उदय :**

मुंबई शहरावर आज अमराठी भाषिकांचे वर्चस्व आहे. या शहरातील कारखाने व्यापार, धंदे आणि रोजगाराची निर्मिती यामध्ये अमराठी भाषिकांचे वर्चस्व आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांचाच वर्चस्व आहे मुंबई शहराचे व्यवहार इंग्रजी व अमराठी भाषेतच चालतात. शिक्षणात ही अमराठी भाषिकांचाच प्रभाव आहे. मराठी भाषिकांना रोजगाराच्या संधीही मर्यादित आहेत. त्यातूनच भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांकरीता १९६६ साली शिवसेना ही मराठी भाषिकांच्या हक्कासांठी लढणारी संघटना अस्तित्वात आली. त्यातूनच सरकारी नोकरीत मराठी भाषिक व

कायम वास्तव्याची अट घालण्यात आली. आज राज ठाकरेचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष याच मुद्यावर राजकारण करीत आहे.

## २.३ उपप्रादेशिक किंवा विभागवाद आणि प्रादेशिक विकासातील असमतोल (Sub-regionalism) :

भारत हा खंडप्राय देश आहे. भारतातील बहुसंख्य राज्यात प्रादेशिक अस्मितेची समस्या उद्भवते. गुजरातमधील सौराष्ट्र व कच्छ विभागातील लोक असमाधानी दिसतात, आंध्रप्रदेशात तेलंगणाच्या प्रश्नांवरून सतत कुरबुरी चालूच असतात. जम्मु-काश्मीरमध्ये बौद्ध धर्मीयांना 'लडाख' हा स्वतंत्र प्रांत हवा आहे; महाराष्ट्रात यापेक्षा वेगळी स्थिती नाही. विदर्भ, मराठवाडा आणि कोकण कमी विकसित आहेत मराठवाडा आणि कोकण आपल्या विकासाच्या मागण्या रेखाटण्याचा प्रयत्न करतात. विदर्भातील नागपूर उपविभागातील नेतृत्व महाविदर्भाची मागणी करीत आहे.

महाराष्ट्र राज्यातील विकासाचा असमतोल या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरीता १९८४ साली केलेल्या सत्यशोधक समितीने आपल्या अहवालात विकासाच्या अनुशेषाचे वितरण केले होते. व तो अनुशेष भरून काढावा अशी शिफारस केली होती. मराठवाडा विदर्भासाठी वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली असली तरी त्याबाबत राज्यकर्ते ठोस उपाययोजना करीत नसल्याचे दिसून येते.

### २.३.१ महाराष्ट्र राज्याची विभागवार रचना (Regional Setup)

१ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण झाले द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना होण्यापूर्वी मराठी भाषिक प्रदेश राजकीय दृष्ट्या विभागलेला होता. तरी भाषा, संस्कृती व सामाजिक व्यवस्था या दृष्टीने तो एकसंघ होता. म्हणूनच स्वातंत्र्यानंतर अकोला करार (१९४७) आणि नागपूर करार (१९५३) याद्वारे मराठी जनतेने एकजीन्सी मराठी भाषिक राज्य स्थापनेचा निर्धार केला.

प्रशासनाच्या सोयीकरीता महाराष्ट्र राज्याची विभागणी मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद अशा चार विभागात केली होती. अलीकडाच्या काळात पुणे, नागपूर आणि औरंगाबाद विभागाची विभागणी करून नाशिक, अमरावती आणि लातूर प्रशासकीय विभागांची स्थापना करण्यात आली.

### २.३.२ महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाची कारणे :

**१) काल परिणाम :**

एखाद्या भागाच्या विकासासाठी हातभार लावणारे घटक म्हणजे शिक्षणाचा प्रसार, सामाजिक सुधारणा, औद्योगिकीकरण लोकजागृती आणि राजकीय शिक्षण हे होत. पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबई या भागावर ब्रिटिशांची सत्ता होती. त्यामुळे सर्व सुधारणांची सुरूवात या भागात फार लवकर झाली. त्यामानाने नागपूर व विदर्भ या भागात सुधारणाची सुरूवात उशीरा झाली. त्यामुळे या भागाचा विकास झपाट्याने होऊ शकला नाही. मुंबई व प. महाराष्ट्राचा विकास होत होता

त्यावेळी विदर्भ व मराठवाड्यावर निजामाची राजवट होती. त्यामुळे विदर्भ व मराठवाडा तुलनेने मागासलेला राहिला.

**२) भौगोलिक परिस्थिती :**

काही भागाची भौगोलिक परिस्थिती अनुकूल असते तर काही ठिकाणी प्रतिकूल असते. सुपीक जमीन, नियमित पर्जन्यमान आणि जलसंपत्तीची मुबलक उपलब्धता प. महाराष्ट्रात आहे. विदर्भ, मराठवाडा व कोकणात प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती मागासलेपणास जबाबदार आहे.

**३) भौतिक सुविधा :**

कोकणात बॉक्साईड, खनिजतेल, नैसर्गिक वायू इत्यादी उपलब्ध असल्याने रासायनिक खते, ॲल्युमिनियम, पेट्रोकेमिकल्स इ. उद्योगांचा विकास करणे शक्य आहे. प. महाराष्ट्रात साखर उद्योग तर विदर्भात खाणव्यवसाय करण्यास उपयुक्त वातावरण आहे. मुंबईत भांडवल, उद्योजक, मनुष्यबळ उपलब्ध असल्याने औद्योगिकीकरण झाले. नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करण्यावर विकास अवलंबून आहे. विदर्भ व मराठवाड्यातील खनिजसंपत्तीचा योग्य वापर न केल्याने त्यांचा विकास झालेला नाही.

**४) नेतृत्वाची कुवत :**

प. महाराष्ट्रातील नेतृत्वात आढळणारी धडाडी, कल्पकता आणि उद्योगशिलता कोकणातील नेतृत्वात नाहीत. मराठवाड्यातील मागासलेपणास त्या भागातील नेतृत्वातील हेवेदावे, गटबाजी व संघर्ष कारणीभूत ठरला आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रीपद सर्वाधिक काळ विदर्भाकडे असताना विदर्भाचा विकास झालेला नाही.

**५) जनतेचा सहभाग :**

विकास प्रक्रीयेत जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो. अण्णा हजारे, विजय अण्णा बोराडे, विलासराव साळुंखे, डॉ. द्वारकादास लोहिया इ. लोकनेत्यांनी आपल्या परिसरात जनतेच्या मदतीने विकास केला. कोल्हापूर जिल्ह्याचा विकास सहकार चळवळीने झाला. कोकण व मराठवाड्यात जनतेच्या सहभागाअभावी विकास प्रक्रिया मंदावली आहे.

**६) राजकीय धुरिणत्व :**

विदर्भ, मराठवाडा आणि कोकणाला समेत सहभागी करून घेतले असले तरी संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणाचे धुरीणत्व पश्चिम महाराष्ट्राकडेच राहिले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व शरद पवार हे नेते प. महाराष्ट्राचेच आहेत त्यामुळे त्यांचा राजकीय फायदा पश्चिम महाराष्ट्राला मिळाला.

### २.३.३ महाराष्ट्रातील प्रादेशिक विभागांची वैशिष्ट्ये

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. प्रशासनाच्या सोयीकरता राज्याची प्रादेशिक प्रशासकीय विभागात विभागणी करण्यात आली. प्रशासनाच्या सोयीसाठी राज्याची सहा प्रशासकीय विभागात विभागणी केली आहे. परंतु राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या सोयीसाठी प. महाराष्ट्र, कोकण, मुंबई

शहर, मराठवाडा व विदर्भ असे विभाजन करण्यात आले आहे. या प्रत्येक विभागाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### २.३.४ पश्चिम महाराष्ट्राची वैशिष्ट्ये :

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणाचे धुरिणत्व पश्चिम महाराष्ट्राकडे आहे. इतर भागाच्या तुलनेने प. महाराष्ट्र विकसित भाग आहे. प. महाराष्ट्राची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये अनेक आहेत.

**१) ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

प. महाराष्ट्राला ऐतिहासिक परंपरा आहे. छ. शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याची स्थापना प. महाराष्ट्रातच झाली. स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळात प. महाराष्ट्रात संस्थानिक राजे होते. वतनदार मराठ्यांचा प. महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घकाळ प्रभाव होता. १८१८ साली मराठी साम्राज्य लयाला गेल्यानंतर मराठी भाषिक प्रदेश ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली होता. या भागात पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार इतर भागापेक्षा व लवकर झाला. त्यामुळे या भागात जनजागृती झाली. १९ व २०व्या शतकातील सुधारकांचे कार्य, स्थानिक स्वराज्य संस्था व स्वातंत्र्य लढ्यातील कार्य यामुळे जनसामान्यांमध्ये राजकीय जाणीव जागृती झाली.

**२) भौगोलिक स्थिती :**

राज्यातील एकूण भूप्रदेशातील ४०% क्षेत्र आणि एकूण लोकसंख्येपैकी ४०% लोकसमुदाय प. महाराष्ट्रात वास्तव्य करतो. यापैकी कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहमदनगर हे जिल्हे प. महाराष्ट्र व नाशिक जळगाव, धुळे हे जिल्हे द. महाराष्ट्र म्हणून ओळखले जातात. सुपिक जमीन व तापी, नर्मदा, गोदावरी, कृष्णा, भीमा इ. प्रमुख नद्या यामुळे प. महाराष्ट्र भौगोलिक दृष्ट्या संपन्न बनला आहे.

**३) वाहतुक व दळणवळण साधने :**

भौगोलिक परिस्थितीची अनुकूलता व मुंबई शहराचा जवळचा संबंध यामुळे प. महाराष्ट्रात वाहतुकीच्या साधनांची उपलब्धता अधिक आहे. या भागातून बहुसंख्य राष्ट्रीय महामार्ग जातात बहुसंख्य भागास रेल्वेची सोय उपलब्ध आहे. याशिवाय राज्यात जिल्हा संपर्क रस्ते निर्माण केलेले आहेत.

**४) शिक्षण :**

शिक्षण क्षेत्रात प. महाराष्ट्र आघाडीवर आहे. मुंबई प्रांताचा भाग असलेल्या या भागाला शिक्षणाची उच्च परंपरा आहे. या भागात आधुनिक शिक्षणाची सुरूवात १८व्या शतकात झाली. १८२१ मध्ये सरकारने पुण्यात संस्कृत कॉलेजची स्थापना केली. १८४८ मध्ये म. फुलेंनी मुलींची शाळा काढली. १८५६ मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली १८५१ अस्पृश्यांसाठी शाळा काढण्यात आली. त्यानंतर प. महाराष्ट्रात सुधारकांनी शिक्षण प्रसार, समाज सुधारणा घडवून आणल्या. या क्षेत्रात पुणे, विद्यापीठ शिवाजी विद्यापीठ, टिळक विद्यापीठ, उ. महाराष्ट्र विद्यापीठ, म. फुले कृषी विद्यापीठ इ. विद्यापिठांमुळे शिक्षणप्रसाराचे कार्य सुरू आहे.

**५) सामाजिक रचना :**

प. महाराष्ट्र मराठी धुरिणत्वाचा बालेकिल्ला समजला जातो. मराठा - कुणबी समाजाची संख्या

४१% नवबौद्ध ९% अनुसूचित जमाती ३% इतर जाती ४% आहेत. प. महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा कुणबी जातींच्या लोकांचा प्रभाव आहे.

**६) राजकीय प्रक्रियेतील स्थान :**

महाराष्ट्राच्या राजकारणावर यशवंतराव चव्हाणांनी प्रभाव निर्माण केला. मुख्यमंत्री राज्याच्या इतर भागातून निवडला गेला असला तरी राज्याच्या नेतृत्वावर प. महाराष्ट्राचाच प्रभाव दीर्घकाळ राहिला आहे. शुगर लॉबी मराठा नेतृत्वाच्या मागे उभी राहते. त्यामुळे प. महाराष्ट्रातील नेत्यांशी इतरांना जुळवून घ्यावे लागते.

## २.३.५ कोकण विभागाची वैशिष्ट्ये :

प. महाराष्ट्राप्रमाणेच कोकण विभाग महाराष्ट्राचा मुख्य घटक आहे. या भागाचा मुंबई प्रशासकीय विभागातील समावेश होतो. हा विभाग मुंबई शहर व प. महाराष्ट्राच्या तुलनेत अविकसित आहे. नोकरी व उदर निर्वाहाकरीता या भागातील लोक मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत झाल्याचे आढळून येते. कोकण विभागाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) भौगोलिक वैशिष्ट्ये :**

या विभागात प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे आर्थिक विकासाचा अभाव आहे. सह्याद्री पर्वत रांगा व अरबी समुद्र यांच्या दरम्यान असलेल्या चिंचोळ्या किनारपट्टीचा भूप्रदेश डोंगराळ व खडकाळ आहे. या विभागात या भागात पर्जन्यमान ३००० मि.मि. असेल तरी उताराच्या भूपृष्टामुळे पावसाचे पाणी समुद्रात वाहून जाते. वैतरणा, दमनगंगा, उल्हास, सावित्री या कोकणातील प्रमुख नद्या आहेत.

**२) आर्थिक विकास :**

या विभागात लागवडीखालील जमिनीचे प्रमाण इतर विभागाच्या तुलनेने कमी आहे. या भागातील जमीन रेताड व हलकी असल्यामुळे केवळ या भागात भातशेतीची लागवड केली जाते. इथले डोंगराळ क्षेत्र फळलागवडीसाठी योग्य आहे. येथील शेतकऱ्यांना बारमाही काम मिळत नाही. त्यामुळे ते रोजगाराच्या शोधात अन्य ठिकाणी स्थलांतर करतात. कोकण किनारपट्टीवर खनिज द्रव्य, नैसर्गिक वायू उपलब्ध आहे. यामुळे काही ठिकाणी रासायनिक कारखाने उभारले जात आहेत. अरबी समुद्रालगत असलेल्या कोकण विभागात मत्स्य व्यवसायाला वाव आहे. या भागातील बहुतेक मच्छीमार पारंपारिक पद्धतीनेच हा व्यवसाय करीत आहेत.

**३) वाहतुक आणि दळणवळणाची साधने :**

वाहतुक आणि दळणवळणाच्या साधनांच्या बाबतीत कोकण महाराष्ट्रातील सर्वात मागास भाग आहे. कोकण रेल्वेमुळे सद्या परिस्थिती बदलली आहे. मुंबई-गोवा हा राष्ट्रीय महामार्ग कोकणातून जातो. जलवाहतुक हे कोकणातील पारंपारिक वाहतुक साधन आहे. या भागात सहा ते आठ महिने जलवाहतुक उपलब्ध असते.

**४) परावलंबी अर्थव्यवस्था :**

कोकणाच्या अर्थव्यवस्थेचे वर्णन मनिऑर्डर इकॉनॉमी असे केले जाते. कोकणातील धडधाकट, कर्तबगार पुरूष व्यवसायानिमित्त मुंबई व अन्य भागात स्थलांतरीत झाला आहे. त्याचे कुटुंब

कोकणातच राहतात. स्थलांतरीत कामगार पगारातील पैसे मनिऑर्डरने गावी पाठवितो. यातूनच कोकणात गरिबी व परावलंबित्व जीवन दिसून येते.

### ५) सामाजिक रचना :

कोकणातील समाजजीवन प. महाराष्ट्राप्रमाणेच आहे. कुणबी जातीच्या लोकांची संख्या कोकणात अधिक आहे. इतर मागास जातीत भंडारी, सागरी व कोळी जातीच्या लोकांची संख्या अधिक आहे. अनुसूचीत जाती-जमातीच्या लोकांची संख्या ही कोकणात बऱ्यापैकी आहे. ठाणे जिल्ह्यात अनुसूचीत जाती-जमाती करीता लोकसभेची एक जागा व विधानसभेच्या पाच जागा राखीव आहेत.

### ६) शिक्षण:

ब्रिटिशांच्या अखत्यारित मुंबई प्रांताचा हा भाग असल्याने मुंबई शहर व प. महाराष्ट्राप्रमाणेच कोकणातील शिक्षणप्रसारास १९व्या शतकाच्या पुर्वाधित सुरूवात झाली. राज्यातील इतर विभागाप्रमाणे कोकण विभागाचे स्वतःचे विद्यापीठ नाही. कोकणातील महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी सलग्न आहेत. १९७२ मध्ये दापोली येथे कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. रायगड जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. सिंधुदूर्ग जिल्हा महाराष्ट्रातील १०० टक्के साक्षर जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे.

### ७) राजकीय प्रक्रीयेतील स्थान :

कोकणाचे नेते बाळासाहेब सावंत हे मारुतीराव कन्नमवार यांच्यानंतर १३ दिवस हंगामी मुख्यमंत्री होते. १९८१-८२ नंतरच्या काळात बॅरीस्टर अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. काही दिवस नारायण राणे मुख्यमंत्री होते. या विभागातील दोन तीन मंत्र्यांचा समावेश मंत्रिमंडळात असतो. महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेवर कोकणाचा प्रभाव नाही. या भागातील नेतृत्व राजकीय व राष्ट्रीय पातळीवर नाहीत.

## २.३.६ मुंबई शहर विभागातील वैशिष्ट्ये

महाराष्ट्राची राजधानी असलेले मुंबई शहर महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकारणातील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण घटक आहे. मुंबई शहरात मराठी भाषिक अल्पसंख्य आहेत. या शहराच्या अर्थकारण व राजकारणावर अमराठी भाषिकांचेच वर्चस्व आहे. महाराष्ट्राच्या अन्य विभागात मराठा-मराठेत्तर, सवर्ण दलित असे राजकारण असले तरी मुंबई शहरात मराठी - अमराठी असे भाषिक व आर्थिक राजकारण आहे. मुंबई शहराची वैशिष्ट्ये :

### १) ऐतिहासिक पार्श्वभूमी :

मुंबईत प्रारंभी मच्छीमारी करणाऱ्या कोळी जमातीचे वास्तव्य होते. अरबी समुद्रात असलेले काही द्विवसमुह १६८२ साली इंग्लंडचा राजपुत्र चार्लस दुसरा याच्या विवाहप्रसंगी पोर्तुगालच्या राजाने इंग्लंडच्या राजाला विवाहात भेट म्हणून दिले होते. राजाने त्या द्विपसमुहाचा विकास करण्याचे अधिकार ईस्ट इंडिया कंपनीला नाममात्र भाडेतत्वावर दिला. १९व्या शतकात मुंबई शहराच्या औद्योगिकरणाची प्रक्रीया सुरू झाली. त्याचे धुरिणत्व सुरवातीपासूनच अमराठी भाषिकांकडेच राहिले. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही मुंबई शहराच्या राजकारणाची सूत्रे अमराठी

भाषिकांकडेच होती. मुंबई शहराचे ज्येष्ठ मराठी नेते बाळासाहेब खेर १९३७ ते १९४६ साली अमराठी भाषिकांच्या पाठिंब्यानेच पंतप्रधान झाले होते. मुंबई केंद्रशासित प्रदेश असावा अशी त्यांची मागणी होती. संयुक्त महाराष्ट्रात मुंबईच्या समावेशाला त्यांचा विरोध होता. मुंबईला ऐतिहासिक परंपरा आहे.

**२) भौगोलिक आणि आर्थिक वैशिष्ट्ये :**

मुंबई शहर आणि मुंबई उपनगरे यांचा संयुक्तपणे मुंबई उपविभाग बनतो. मुंबई देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर आहे. हे शहर एकेकाळी द्विपसमुह होता. काळाच्या ओघात समुद्रात भर टाकून, रस्ते आणि पुल बांधून त्याचे क्षेत्र एकसंघ करण्यात आले. मुंबई शहरातून अनेक राष्ट्रीय महामार्गाचा प्रारंभ होतो. हे शहर रेल्वेमार्गांनी अनेक शहरांना जोडले आहे. मुंबई बंदरातून सर्व देशांशी आयात - निर्यात व्यापार या बंदारातून ५०% होत असतो. देशाच्या प्रमुख शहराशी विमानसेवेने मुंबई शहर जोडले आहे. मुंबई शहरात महाराष्ट्र शासनाची व केंद्र सरकारच्या विविध विभागांची कार्यालये आहेत. मुंबई शहर संपूर्ण देशाच्या आयात निर्यात आणि देशांतर्गत व्यापाराचे मुख्य केंद्र आहे. राज्याच्या इतर कोणत्याही भागापेक्षा मुंबई शहरात सहकारी, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील रोजगाराची उपलब्धता आहे. त्यामुळे मुंबईत लोकांचे स्थलांतर सर्वाधिक आहे.

**३. आर्थिकदृष्ट्या सर्वात प्रगत विभाग :**

मुंबई आर्थिकदृष्ट्या प्रगत भाग आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात वस्त्रोद्योग हा मुंबईचा प्रमुख व्यवसाय होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक व्यवसाय व कारखाने मुंबई शहरात विकसित झाले. या शहरात औद्योगिक क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू मुंबई आहे.

**४. राज्याच्या राजकारणावर वर्चस्व :**

महाराष्ट्राच्या राजकारणावर मुंबई शहराचे वर्चस्व अर्थकारणामुळे निर्माण झाले आहे. या शहरातील आर्थिक सत्ता अमराठी लोकांकडे आहे. म्हणूनच अप्रत्यक्षरित्या अमराठी लोकांचेच वर्चस्व येथील राजकारणावर आहे. मुंबई शहरातील बऱ्याच मत्र्यांचा समावेश महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात असतो.

**५. सामाजिक रचना :**

मुंबई शहरातील सामाजिक रचना बहुढंगी, बहुरंगी वैशिष्ट्यपूर्ण व महानगरीय आहे. सर्व जाती, धर्म व भाषांच्या लोकसमुदायाचे वास्तव मुंबई शहरात आहे. मराठी भाषिकांच्या खालोखाल गुजराती, हिंदी व दाक्षिणात्य भाषिक समाज मुंबई शहरात आहे. शहराच्या विशिष्ट भागात विशिष्ट भाषिक गट विशेषरूपाने आढळून येतात.

### २.३.७ मराठवाडा विभागाची वैशिष्ट्ये :

मराठवाडा महाराष्ट्र राज्याचा सर्वात अप्रगत विभाग आहे. आर्थिक विकासाच्या परिभाषेत हा विभाग कोकण विभागा इतकाच मागास आहे. प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती आणि निजामी राजवटीची परंपरा या भागाच्या मागासलेपणाची प्रमुख कारणे आहेत. या विभागाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

देवगिरीच्या यादवांचा १३१२ मध्ये पाडाव झाल्यानंतर आदिलशाही, निजामशाही आणि कुतुबशाही या मुस्लिम राजवटीखाली सद्याचा मराठवाडा विभाग आला. निजामाचे प्रशासन मध्ययुगीन सरंजामशाही धर्तीचे होते त्यामुळे इतर विभागाच्या तुलनेने हा भाग अविकसित राहिला. हैद्राबाद संस्थानाच्या मराठवाडा भागात मराठी भाषिक बहुसंख्य असले तरी १९४८ पर्यंत त्यांच्यात 'मराठी अस्मितेची' जाणीव नव्हती संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या वेळी मराठवाड्यातील मराठी भाषिक नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पाठिंबा दिला. १९५६ मध्ये हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिक द्विभाषिक मुंबई राज्यात सामील करण्यात आला.

**२) भौगोलिक वैशिष्ट्ये :**

हैद्राबाद संस्थानाचा भाग असलेल्या मराठवाड्यात मराठी भाषिकांची वस्ती असली तरी इतर मराठी भाषिक विभागांशी त्यांचे संबंध नव्हते. मराठवाड्यातील काही भाग हा आवर्षणग्रस्त आहे. या भागातील जमीन काळी व सुपिक आहे. परंतु जलसिंचनाच्या अभावी कृषी व्यवसाय पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

**३) आर्थिक विकास :**

निजामी राजवटीत या भागाच्या आर्थिक विकासाकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. निजामी राजवटीत या भागाचा शेती हा एकमेव व्यवसाय होता. मराठवाड्याचे वर्णन 'धान्याचे कोठार' असे करण्यात येते. येथील सुपिक जमीनीत ज्वारी, कापूस व कडधान्ये मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात येते. मराठवाड्याची अर्थव्यवस्था कृषीप्रधान असल्याने याभागात औद्योगिकरण अत्यल्प आहे. मात्र अलिकडच्या काळात कृषी मालावर प्रक्रिया करणारे काही प्रकल्प उभारण्यात आले आहेत.

**४) वाहतुक आणि दळणवळणांची साधने :**

आर्थिक विकासाच्या संरचनेत वाहतुक व दळणवळणाच्या साधनांना महत्त्व आहे. कोकणाप्रमाणेच मराठवाड्यात वाहतुकीचा व दळणवळणांच्या साधनांची कमतरता आहे. मराठवाड्याच्या बहुसंख्य भागात रेल्वेसेवा उपलब्ध नाही. महाराष्ट्र परिवहन मंडळाची बस वाहतुक हेच वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. एकमेव औरंगाबाद शहरातच हवाईवाहतूकीची सोय आहे.

**५) शिक्षण :**

१९४८ पर्यंत मराठवाड्यात उच्च शिक्षणाची सोय नव्हती. द्विभाषिक मुंबई राज्याच्या स्थापनेनंतर या भागात उच्च शिक्षणाचा प्रसार झाला. १९६० नंतर मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. १९७३ साली परभणी येथे मराठवाडा कृषी विद्यापीठाची स्थापना झाली. मराठवाड्यात स्वातंत्र्यपूर्व काळात आधुनिक उदारमतवादी शिक्षण उपलब्ध नव्हते. स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकरांच्या पिपल्स एज्यूकेशन सोसायटी व मराठा शिक्षण प्रसारक मंडळ यांनी या भागात शिक्षण प्रसाराचे कार्य मोठ्या प्रमाणात हाती घेतले.

**६) समाज रचना :**

राज्याच्या प. महाराष्ट्र व कोकण विभागाप्रमाणेच या विभागात कुणबी - मराठा जातीसमुहाचे प्राबल्य आहे. जमीनदारी आणि सरंजाम मूल्यांचा पगडा असलेले वतनदार मराठ्यांचे मराठा

कुणबी समाजावर वर्चस्व आहे. इतर मागास जातीचे प्रमाण या भागात अधिक आहे. अनुसूचित जाती, मुसलमान, ब्राह्मण आणि लिंगायत जातीसमुह या भागात आहेत.

**७) राजकीय सत्तेचा वाटा :**

महाराष्ट्राच्या राजकारणात मराठवाड्याचे स्थान उच्च आहे. नागपूर कराराच्या तरतुदीनुसार १९७५ साली शंकरराव चव्हाणांना मुख्यमंत्रीपद मिळाले. १९८६ मध्ये त्यांना पुन्हा मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली होती. परंतु प्रस्तापित मराठा नेतृत्वावर त्यांना विरोध होता त्यामुळे त्यांना परत केंद्रात जावे लागले. दरम्यान शंकरराव चव्हाणांचे प्रतिस्पर्धी शिवाजीराव निलंगेकर पाटील यांना एक वर्षाकरीता मुख्यमंत्रीपद लाभले. एकंदरीत मराठवाड्याचा राजकीयदृष्ट्या प्रभाव कमी आहे कारण संपूर्ण विभागाचे नेतृत्व करू शकेल असा समतोल नेता या भागात नाही.

## २.३.८ विदर्भ विभाग :

महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी २८% लोकसंख्या आणि एकूण क्षेत्रापैकी ३०% क्षेत्र विदर्भातील जिल्ह्यांनी व्यापले आहे. ज्या मराठी भाषिक विभागाचा आपण विदर्भ म्हणून उल्लेख करतो तो विभाग ऐतिहासिक दृष्ट्या वऱ्हाड आणि नागपूर क्षेत्रात विभागला आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आणि संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होईपर्यंत नागपूर आणि वऱ्हाड अशा दोन प्रांतिक कॉंग्रेससमित्या अस्तित्वात होत्या. वऱ्हाड आणि नागपूर क्षेत्राची अस्मिता वेगळी आहे. यामुळे नागपूर आणि अमरावती अशी प्रशासकीय विभागणी केली आहे. विदर्भ विभागाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) भौगोलिक वैशिष्ट्ये :**

महाराष्ट्र राज्याच्या उत्तर - पूर्वेस सातपुडा पर्वतरांगेच्या पठारावर असलेल्या नाग - विदर्भ क्षेत्रातील जमीन अत्यंत सुपिक व कापसाच्या लागवडीस उपयुक्त आहे या विभागाचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान २५ ते ४० मि.मि. असते या विभागात गोदावरी, दक्षिणपूर्व, वर्धा, वैनगंगा या नद्यांच्या खोऱ्यातील जमीन सुपिक आहे. याव्यतिरिक्त विदर्भात कोळसा, कच्चे लोखंड, मॅगनिज, बॉक्साईड, चुनखडी इ. खनिजसंपत्ती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.

**२) आर्थिक विकास :**

विदर्भातील भौगोलिक परिस्थिती अनुकूल असल्याने आणि खनिजसंपत्तीची विपुलता असल्याने या भागात कृषी व औद्योगिक विकासास वाव आहे. या भागात कापूस हे प्रमुख पीक आहे या व्यतिरिक्त ज्वारी, तेळबिया, कडधान्य आणि भात ही पिके घेतली जातात. तसेच संत्री, केळी, कलिंगडे यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. अकोला, नागपूर, खामगाव या ठिकाणी कापडगिरण्या आहेत. नागपूर येथे काच कारखाना आहे. या भागात खाणकाम उद्योगास प्रोत्साहन देण्यात आले आहे. नागपूर येथे केंद्र सरकारने पश्चिम विभागाचे कोळसा क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

**३) वाहतुक आणि दळणवळणाची साधने :**

विदर्भात वाहतुक आणि दळणवळणांच्या साधनांची उपलब्धता प. महाराष्ट्राच्या खालोखाल आहे. विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये रेल्वेमार्ग उपलब्ध आहेत. हवाई वाहतूक केवळ नागपूर शहरातच आहे.

**४) शिक्षणप्रसार व राजकीय जागृती :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात नागपूर आणि वऱ्हाड विभाग ब्रिटिश साम्राज्याच्या सी.पी. अँड वेरार प्रांतात होते त्यामुळे इतर प्रांताप्रमाणे या प्रांतात शिक्षणप्रसार झाला. शिक्षण प्रसाराची सुरूवात मुंबई प्रांतात प्रथम झाल्याने विदर्भापेक्षा तो भाग पुढारलेला आहे. चंद्रपूर गडचिरोली या भागात साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि राजकीय संस्थांची मुंबई प्रांताच्या बरोबरीने झाली असली तरी वऱ्हाड विभागातील लेक मागास आहेत. नागपूर कराराप्रमाणे नागपूरला महाराष्ट्राच्या उपराजधानीचा दर्जा, बहाल करण्यात आला आहे तसेच राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात भरते.

**४) सामाजिक रचना :**

विदर्भाची सामाजिक रचना राज्याचा इतर भागापेक्षा वेगळी आहे. महाराष्ट्रातील प्रभावी जातीसमुह असलेल्या मराठा कुणबीची संख्या विदर्भाच्या एकूण लोकसंख्येच्या २६ टक्के आहे. दलित आणि आदिवासींची लोकसंख्या ३४ टक्के आहे इतर मागासजातींचे प्रमाण ३० टक्के आहे. म्हणूनच मागास जातीजमाती व इतर मागास जातींची एकजूट झाली तर विदर्भाच्या राजकारणावर त्यांचे प्रभुत्व प्रस्थापित होऊ शकते.

**५) राजकीय प्रभाव :**

१९६०च्या मंत्रिमंडळात प. महाराष्ट्रापेक्षाही अधिक प्रतिनिधित्व विदर्भास देण्यात आले होते. महाराष्ट्र, मराठवाडा वऱ्हाड आणि नागपूर प्रदेश काँग्रेस समित्यांचे विलिनीकरण केल्यानंतर स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्षपद विदर्भातील ज्येष्ठ नेते डॉ. गोपाळराव खडेकर यांना देण्यात आले होते. १९७२ मध्ये चव्हाण नंतर मारोतराव कन्नमवार आणि. वसंतराव नाईक या विदर्भीय नेत्यांकडे १२ वर्षे राज्याचे मुख्यमंत्रीपद होते अलिकडच्या काळात शरद पवार नंतर विदर्भीय नेते सुधाकरराव नाईक यांच्याकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद होते. गेल्या ३२ वर्षात प. महाराष्ट्राच्या बरोबरीने आणि काही वेळा अधिक मंत्रिपदे विदर्भीय नेत्यांना देण्यात आलेली आहेत.

वरीलप्रमाणे महाराष्ट्रातील पाच विभागांची वैशिष्ट्ये आढळून येतात.

### २.३.९ प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधक समिती / दांडेकर समिती

राज्यातील विकासाला प्रादेशिक असमतोल किती आहे. तो नेमका कसा मोजावा व तो दूर करण्याचे उपाय कोणते हे जाणून घेण्यासाठी शासनाने विख्यात अर्थतज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांच्या नेतृत्वाखाली ऑगस्ट १९८३ मध्ये सत्यशोधन समिती नेमली. १९८४ मध्ये समितीने शासनास आपला अहवाल सादर केला.

विदर्भ आणि मराठवाडा हे विभाग मागास राहू नयेत. म्हणून १९५३ मध्ये नागपूर करार करण्यात आला. प्रत्यक्षात या कराराचे पालन करण्यात आले नाही. विदर्भ, मराठवाडा, कोकण हे भाग अल्प विकसित राहिले विभागांच्या विकासाचा वार्षिक अहवाल विधानसभेत सादर केला नाही व त्याबद्दल आजपर्यंत कोणी आग्रही दिसत नाहीत. विदर्भ व मराठवाड्याच्या विकासाचा आग्रह धरता वसंतराव नाईक यांनी जिल्हा व विकासाचा घटक मानावा असे धोरणात्मक प्रतिपादन करून नागपूर करार वासनात गुंडाळला त्यावर विदर्भ व मराठवाड्यातील लोकांनी कोणतीही प्रतिक्रिया नोंदवली नाही.

दांडेकर समितीने जिल्हा हा विकासाचा प्रमुख घटक मानून त्यात रस्ते, जलसिंचन, ग्रामीण विद्युतीकरण, शिक्षकांची संख्या, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, आरोग्याची सोय, पाणीपुरवठा पशुसंवर्धन अशा गोष्टींचा विचार करून विकासाचा आलेख मांडला आहे. यानुसार कोणत्या

जिल्ह्यांचा विकास झाला व कोणत्या जिल्हा विकासात मागास आहे हे समितीने दाखवून दिले. मागासलेल्या जिल्ह्यांसाठी खर्चाचे प्रमाण किती असावे हे समितीने दाखविले.

विविध जिल्ह्यांच्या विकासातील प्रादेशिक असमतोल दूर करून समतोल प्रस्तापित करण्यासाठी राज्यात एकूण रू. ३१६७ कोटी रूपयांचा विकासखर्च अपेक्षित आहे असे समितीने नमुद केले, त्यामध्ये कोकण २१६ कोटी, प. महाराष्ट्र ८८४ कोटी, मराठवाडा ७५१ कोटी, विदर्भ १२४६ कोटी व मुंबई १० कोटी असे अनुशेष आहेत.

अनुशेष भरून काढण्यासाठी वार्षिक योजनांच्या सुमारे ४०% रक्कम राखून ठेवली जावी असे समितीने मत मांडले. परंतु १९८५-८५च्या वार्षिक योजनेत १२% च रक्कम ठेवली. सातव्या योजनेतील १४% तरतुद फक्त प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी खर्च करण्यात आली. आठव्या योजनेत प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी २५०० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली.

दांडेकर समितीच्या अहवालावर अनुकूल व प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. समितीने काळबद्ध कार्यक्रम दिला असला तरी प. महाराष्ट्र अविकसित आहे असे सांगून दिशाभूल केली अशी टीका होते. प. महाराष्ट्र आणि मराठवाडा यांना एकच समान निकष लावणे चुकीचे आहे. असा युक्तीवाद पुढे आला. कसेही असले तरी दांडेकर समितीच्या अहवालाने राज्यातील विकासाचे परीक्षण करण्याचे नवे परिणाम उपलब्ध झाले.

**प्रश्न**

१. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत संयुक्त महाराष्ट्र परिषदेचा कार्यभाग सांगा.
२. प्रादेशिक म्हणजे काय ते सांगून महाराष्ट्रतील प्रादेशिकवादाची कारणे सांगा.
३. उप-प्रादेशिक म्हणजे काय ? मुंबई, विदर्भ, मराठवाडा, प. महाराष्ट्राचा संदर्भ देऊन महाराष्ट्रातील उपप्रादेशिकवादाची चर्चा करा.
४. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेमागील विविध अडथळ्यांती चर्चा करा.
५. प्रादेशिक असमतोल म्हणजे काय ? संयुक्त महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी कोणते उपाय सुचविले आहेत ते सांगा ?
६. टीपा लिहा.
   १) संयुक्त महाराष्ट्र समितीची भूमिका.
   २) महाराष्ट्रातील वैधानिक विकास महामंडळ.
   ३) विदर्भ विभागाच्या समस्या.
   ४) नागपूर करार.
   ५) दांडेकर समिती.

**संदर्भ**


१. परिवर्तनाचा वाटसुरु अंक २ रा - १६ ते ३१ मे २०११.
२. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण - डॉ. अशोक जैन
३. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास - वसंत जाधव, विद्या प्रकाशन नागपूर.
४. भारतातील राज्यांचे राजकारण - चंद्रशेखर दिवाण - विद्या प्रकाशन नागपूर.

# ३

# जात, वर्ग व राजकारण / जाती समुह व जातीचे राजकारण

**घटक रचना**

३.१ प्रस्ताविक
३.२ वर्ण
३.३ महाराष्ट्रातील प्रमुख जातिसमूह / जातिसमूहाचे
३.४ महाराष्ट्राच्या राजकीय / राजकारणातील जातिचे श्रेष्ठत्वाची प्रक्रिया
३.५ मराठ्याचे धुरीणात्व
३.६ श्रेष्ठत्व / प्रभुत्व जाति समूह :
३.७ मराठा कुणबी जातिसमूह
३.८ मराठा / मराठ्याच्या धुरणीत्वाचे विश्लेषण :
३.९ मराठ्यांच्या धुरीतत्वाची मर्यादा
३.१० इतर मागास जातिचे राजकारण (इ.मा.जा.)
३.११ कनिष्ठ जातीचे राजकारण :
३.१२ मंडल आयोगाचा वाद :
३.१३ मंडल आयोगाच्या शिफारशी व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावरील परिणाम
३.१४ भाजपा / इतर जाती :
३.१५ शिवसेना / इतर मागास जाती :
३.१६ काँग्रेस/इतर मागासवर्ग :
३.१७ दलित राजकारण /दलित पक्षाची राजकिय धोरणात्मक प्रक्रिया
३.१८ स्वातंत्र्योत्तर कालखंड :
३.१९ सारांश / समालोचन / निर्णयकत्व :
३.२० सामाजिक न्याय विवरण पद्धती
३.२१ निर्णय :

## ३.१ प्रास्ताविक

महाराष्ट्रातील अभिमीत समाजाची अभिसरण राजकिय प्रक्रिया भारतीय समाजात १९४७ पूर्वापासून राजकीय दृष्ट्या अनेकांगी, विविधांगी प्रक्रियांनी कार्यस्तरीय, कार्यरत आहे. त्यातील समाजातील भारतातील धर्म, जात, अर्थ यांची कारके आवर्तित सापेक्ष परीणामकारकरीत्या कार्यरत आहे. वर्तमानस्थितीत त्यात सामाजिक व राजकिय सहिष्णु व असहिष्णुतेसाठी भारतीय समाज राजकियरीत्या जातीच्या समस्यातून सुटला नाही आजपर्यंत जातीनिष्ठ कार्यरत आहे.

डॉ. डी. एल. सेठ यांच्या मतान्वियें स्पर्धात्मक राजकीय शक्तीमध्ये राजकिय व्यक्ती जाती, जातीसमुहाच्या आधार घेत आहेत सामाजिक स्थरीकरण व सामाजिक राजकिय अभिसरण प्रक्रियेत जात ही राजकीय शक्ती वैषिण्यात्मक आत्मप्रेरक धारण केले आहे, राजकिय संघर्षात्मक

भूमिका, संघर्ष, जातीचे राजकारण समाजाची मुख्य उद्दिष्ट्ये सोडवतात किंवा समाजाची मुख्यत्वे करून मुलभूत तत्त्वे राजकीयरित्या सोडविली जातात. हा चर्चेचा विषय आहे ही दिशाभूल आहे. मुख्यत्वे करून ह्यामधील अर्त:प्रवाह हा राजकीय समाज मजूबूतीकरणासाठी आहे की सामाजिक जातीच्या अभिसरणासाठी आहे ह्या दोहोतील भाव, आभास, विचारही आहे. जात वा राजकारण ही द्विदिशात्मक राजकिय करणाची प्रक्रिया अथवा जातीचे राजकिय संस्थात्मक संर्घशीत करण्याची विविधांगी प्रक्रिया वर्तमानस्थितीत राजकिय दृष्ट्या कार्यरत आहे. राजकीय, सामाजिक स्थरीकरणाची, अभिस्तरणाची प्रक्रिया समाजाच्या विशिष्ट गरजानुसार होत असते. भारतीय सामाजिक स्थरीकरण, अभिकरण पारंपारिक पद्धतीनुसार जातिनिष्ठत्व स्वरुपाची आहे. वैदिक काळात समाजाची धार्मिक अभिसरात चौकट, कार्यकरण, कार्यात्मक स्वरूप रूपरेषा चार वर्णात्मक चौकोटीत विभागण्यात आणि त्यामध्ये कार्यात्मक, कार्यकरण कार्यकारक रूपरेषा त्यांच्या चार वर्णात्मक ओळखीनुसार कार्यबद्ध स्थितिबद्ध कार्यात्मकरीत्या सामाजिक स्थरीकरणात अभिप्रेतरीत्या कार्यात्मक झाली त्यामध्ये कार्यात्मक रूपरेषाचे श्रेष्ठ स्थान १) ब्राह्मण २) क्षत्रिय ३) वैश्य आणि ४) शुद्र वर्तमान काळातील दलित असे चार वर्ग व चार वर्ण झाले आणि राजकियकरण राजनितीज्ञानी प्रशस्तक्रिया धुरीणांनी धर्मात्मक दृष्ट्या ४) शुद्राचे दलित व आवर्तीय दलित असे राजकिय अभिसरण प्रक्रियेनुसार मताचे, बेरजेचे राजकारण कार्यरत केले. कनिष्ठ जाति दलितात अनेक राजकिय व घटनात्मक वैधात्मिक फायदे घेण्यासाठी पूर्वानुभावीच्या हिंदु महारात अनेक पोट जाती / जमाती प्रशाासकिय दृष्ट्या निर्माण करण्यात आल्या. त्यामुळे सामाजिक स्थरीकरणात श्रेष्ठत्व टिकविण्यासाठी जाती जातित अनेक अस्थरीय जाती निर्माण झाल्या. त्या उपजातीत विभागीय झाली त्यामुळे जातीसमूहाचे अस्तित्व टिकविण्यासाठी समूहाचे अस्मित्ववेधानिकरीत्या सिद्ध करण्यासाठी भारतीय राजकारणाची चौकट बदलली ही भारतीय राजकारणाची सामाजिक वस्तुस्थिती आहे. पारंपारिक वर्ण व्यवस्थेच्या परिभाषेत महाराष्ट्र स्थितीत उच्च श्रेष्ठीजन जाती ब्राह्मणवर्णाच्या आहेत. मराठा जाती स्वत:तील श्रेष्ठत्व क्षत्रियरूपी मानतो समाज कनिष्ठ जातीसमूह वैश्य आणि क्षुद्र या वर्णात समाविष्ठ केल्या जातात. तर अतिक्रिविशीष्ठ अनुसूचित जाती (अ.५४%) अनुसुचित जमाती, भटक्या विमूक्त जाती या धोरणात्मक वैधात्मिक विभाग २४ आहेत. या जाती अतिशुद्र, समजल्या जातात. त्याचे हे घटनात्मक, वैधानिकरित्या विकसित स्वरूप आहे. त्यामध्ये पोटजाती सवर्ण व अस्पृश्य अशीही विभागणी करण्यात आली. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांत्तर प्रश्नावरून संपूर्ण महाराष्ट्राची प्रतिमा राजकीयरीत्या सवर्ण व दलित व दलितेत्तर समाज अशा प्रकारे विभागणी करण्यात आली.

## ३.२ वर्ण :

प्राध्यापक वंसत मन्जुनाथ सिरशीकराचे विचार व संज्ञा वैचारीकरित्या अनुशेय, अभिप्रेत आहे. शहरी विद्वत वृंद व ग्रामीण स्थरातील विद्वत विकसनशील समाजात मध्यमरीत्या कष्ट करणारा समाजातील जाती वर्ण आहे. त्यांनी शहरातील पांढरपेषा वर्गाला निम्नस्थर समजले त्यामध्ये पांढरपेशा वर्ग उच्च जातीश्रेष्ठीजन. अन्य अभ्यासकाच्या मते राजकीय स्वायत्ततेतील स्थानिक नेते आणि राजकिय विघटनशील नेते त्याच्यातील स्वायत्त समुह हा जातीय स्वायत्त समुह ह्या पंचायाती राज्य स्थरापासूनचे सहभागी सद्य:स्थितीत मराठा जातीचे राजकिय व समाजातील श्रेष्ठत्व आहे. यालाच जातीचे (मराठा) राजकीयकरण संबोधले जाते. जातीच्या शुद्र दलित उतरडिंत, शृंखलेत विविध जातीचे स्थान, प्रतिष्ठा महत्त्व उतरत्या क्रमाने

(Inclined/Declined) निर्धारीत केले जात असे समाजात उच्च वर्णिय जाती सर्वात श्रेष्ठ व अस्पृश्य सर्वात निम्न कनिष्ठ आणि दलित जातीतील समाज धुरणानी या अन्यायकारक समाज व्यवस्थेविरूद्ध संघर्ष केल्याने जातीय राजकारण विकसित होत गेले असे असले तरी ही विविध जाती समुहात तात्पुरते किंवा कायमचे समझोते होत असतात. ''महाराष्ट्र धर्म'' या अनुसुचित ब्राह्मण आणि मराठा (क्षत्रिय) जातीचे धुरीणात्म आणि इतर जातीचे पौषत्व संबोधले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांना ''गोब्राह्मण प्रतिपालक'' म्हणून त्याचे उदात्तिकरण उच्चवर्णियांकडून वर्णियाकडून केले जाते महाराष्ट्र धर्माचे आधुनिक समर्थक महाराष्ट्राच्या इतिहासात ब्राह्म व मराठ्यात व्यतिरिक्त इतर कोणत्याही जातीचे योगदान नाही असे मत त्यांच्या भारतात-प्रचलित राजकारणाच्या संदर्भात ब्राम्हण-मराठा संघर्ष वरकरणी दिसत असला तरी सत्ताधिश वर्गाचे ब्राह्मण मराठा हे प्रमुख घटक आहेत. मुख्यत्वेकरून उच्च वर्णीय नेतृत्वाची जागा मराठी नेतृत्वाने घेतली असली तरीही प्रशासन उद्योग व्यवस्था आणि शिक्षण क्षेत्रावर (ब्राह्मण) उच्च वर्णियांचे व  व श्रेष्ठत्व आहे. सत्तेच्या या भागीदारास महाराष्ट्राच्या राजकारणाचे अभ्यासक ब्राह्मण मराठा युती समजतात. राज्यस्तरातील राजकारण सत्ता संपादनासाठी जातीच्या बेरजेचे राजकारण, स्पर्धात्मक राजकारण अन्य घटक जातीमध्ये स्पर्धात्मक राजकिय सत्ता हस्तगत करण्यात करतात हे उघड सत्य आहे. डोनाल्ड स्मीत यांच्यामध्ये ''मंत्रीमंडळातील सर्वश्रेष्ठ मंत्रिपद प्राप्तीसाठी उच्च वर्णिय जाती अत्यंत महत्त्वाचा घटक आहे हे सिद्ध साध्य आहे. इक्बाल नारायण यांनी जाती - जातीतील अंत-श्रेय यावर जास्त भर दिला आहे. त्यामध्ये राजकीय पक्षातील जाती सूचक समूह हा सत्ताकेंद्री सत्तास्थानी श्रेष्ठपदासाठी सूचक राजकिय प्रक्रिया महाराष्ट्राच्या राजकारणातील सम्मीलीत, समीश्र प्रक्रियात्मकली आहे संमीश्र सूचक प्रक्रियेत मराठा हा सर्वश्रेष्ठ जाती घटक मानला आहे. मराठा घटक सत्ता श्रेष्ठ स्थानी असला तरी अनेक जाती समूहाचा सर्व श्रेष्ठ समिश्र घटक आहे यामध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी सध्या बेरजेच राजकारण श्रेष्ठ मानले आहे. अशी राजकिय व्यामिश्र घटना होय. व्यामिश्र राजकीय घटना प्रक्रियेतून बहुजन समाज उदयास आला आहे. १९५६ पर्यंत बहुजन समाजाला अधिक महत्त्व प्राप्त स्थानी नव्हते १९५६ पासून महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा बदलली आणि मराठा / अन्य मराठा असे संमिश्र स्वरुप महाराष्ट्राच्या राजकारणात प्राप्त झाले त्यातून महाराष्ट्राच्या राजकारणातील स्वरुप उच्च वर्गाला ग्रामीण राजकीयकरणाधिष्ठीत राजकिय प्रक्रियाला सामोरे जावे लागत आहे त्यातच महाराष्ट्राच्या राजकारणात जात हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जात आहे यातून जाती संघर्ष उदयाला आहे.''

लोकशाही शासन व्यवस्थेत संख्या सामर्थ्य राजकीय प्रभावीकरणाचा निकष मानला आहे. महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या ७५% असलेल्या 'दलितांना' सत्ता वाटपातून आपण राजकीय दृष्ट्या सत्तास्थानातून दुर्लक्षित राहिले आहोत असे वाटते १९६० साली पहिले सत्ता संक्रमण होऊन 'मराठेशाही' प्रस्थापित झाली आणि दुसरे संयुक्त राजकीयरीत्या झाले तर मध्य स्थरातील जातीचे प्रभुत्व संपुष्ठात येऊन कनिष्ठ इतर मागास वर्गाचे आणि दलित समाजातील जातीचे युतीचे प्रभुत्व संपुष्ठात यूेऊन दलित जातीच्या युतीचे प्रभुत्व प्रस्थापित होऊन सैद्धान्तीक शक्यता आहे. अशा प्रकारे विविध जाती समूहातील सत्ता स्पर्धेची परिमिती समिकरणे जातीयवादी राजकारणात होत आहेत. हा प्रश्न इष्ठ किंवा अनिष्ठ संशोधनाचा विषय आहे. जातीय राजकारण महाराष्ट्राच्या राजकारणाची वास्तविकता आहे.

## ३.३ महाराष्ट्रातील प्रमुख जातिसमूह / जातिसमूहाचे

संख्या सामर्थ्य (तक्ता क्रमांक ३.३)

| जाति समूह | टक्केवारी |
|---|---|
| उच्चवर्णी | ४% |
| मराठा कुणबी | ४१% |
| कनिष्ठ जाती | १९% |
| अनुसूचित जाती (अ.ज.) | ०७% |
| नवबौद्ध | ०६% |
| अनुसूचित जमाती (अ.ज.) | ०९% |
| मुस्लिम | ०९% |
| इतर अल्पसंख्य | ३% (२२%) |
| इतर जमाती (इ.ज.) | ८२% |

जातीच्या राजकारणाचा संख्यात्मक तौलनिक अभ्यास वर दर्शविलेल्या तक्त्यात स्पष्ट दिसतो. महाराष्ट्रात असंख्य जाति / उपजाती आहेत. त्याचा वर्गीकरणात अभ्यास खालील प्रमाणे आहे. प्रभाव प्रभुत्व गट महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी प्रभुत्व गटाची राजकीय / सामाजिक प्रक्रिया -

१) **उच्च वर्णीय :** ब्राह्मण, गौड, सारस्वत, चांद्रसेनिय, कायस्थ, पाठारे (सी.के.पी.), प्रभु इत्यादी जाती उच्च वर्णीयात समावेश करण्यात येतो.

२) **मध्यस्थरीय :** मराठा कुणबी जाती समूहाचा मध्यस्थरीय जातीत समावेश या व्यतिरिक्त राजपूत, लेवा पाटील जातीचा समूहाचा समावेश केला जातो.

३) **कनिष्ठ जाती :** (इ.मा.जा.) इतर मागास जातिची संख्या दोनशे (२००)हून अधिक आहे. कुणबी मराठा जातिसमूहाचा समावेश (इ.मा.जा.) करण्यात आला आहे.

४) **दलित ५९ (अ.जा.)** अनुसूचित जाती आणि नवबौद्धचा समावेश आहे. त्यातच पूर्वाश्रमीच्या (महार जाती) दलित सदरीय समावेश करण्यात येतो योजनात्मकरित्या वियूक्त जाती आणि भटक्या जमाती त्यातच समावेश केल्या आहेत.

५) **अनुसुचित जमाती :** ४७ आदिवाशी किंवा आदिम जमाती अति दुर्गम भागात वास्तव करणारे मान्यता प्राप्त अनुसूचित जमाती आहेत.

६) **अल्पसंख्य :** अल्प संख्य सदरात मुस्लिम, जैन, बौद्ध, पारशी, ख्रिस्तीया धार्मिक अल्पसंख्य गटाचा समावेश आहे.

७) **इतर जाती जमाती :** या गटात इतर अमराठी गटाचा समावेश आहे. उदा. उत्तर भारतीय, तेलगू मल्याळी, तामिळी इत्यादीचा समावेश आहे.

१९३१च्या जनगणनेत खानेसुमारित जाती जातीतील देण्यात आलेली आकडेवारी सर्वसामान्य स्वरूपाची आहे मात्र अनुसूचित जाति, नवबौद्ध, अनुसूचित जमाती, धार्मिक अल्पसंख्य यासंबंधीचे आकडेवारी १९९१च्या जनगणणेच्या आधारे आहे.

## ३.४ महाराष्ट्राच्या राजकीय / राजकारणातील जातिचे श्रेष्ठत्वाची प्रक्रिया

महाराष्ट्राच्या राजकारणातील जातिचा सलोखा यामध्ये परिस्थिजन्य स्थितीत बराच बदल होत आहे. वेळेस अनुसरून राजकिय समिणीकरण सलोखा बदलल्या परिस्थितीत बदलत आहे. महाराष्ट्राच्या निर्मिती संख्या जास्तीत जास्त भारत मराठ्याची ब्राह्मवृंद वरती होती. त्यामुळे त्याचे राजकिय थोडेसे दु:खावले गेले त्यातच अब्राह्मण, बहुजन समाज उदयास आला. त्यातूनच त्यालाच - 'बहुजन समाज' संबोधले गेले. शहरी भागातील ब्राह्मणांनी काँग्रेस प्रणित संघटना मजबूत करून ताब्यात घेतली. महाराष्ट्र १ मे १९६० ला स्थापन झाला. तेव्हा त्या आधी बाळासाहेब गोविंद खेर पाहिले प्रंतप्रधान / मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात आणि विशिष्ट पदावर राजकिय प्रशासकिय दृष्ट्या आरूढ होते. त्यानंतर स्वातंत्रपूर्व कारर्कीदीत १९४६-१९५२ ह्या कारकिर्दीत केंद्रातील श्रेष्ठाच्या निर्णय झाले. मोरारजी देसाई गुजराथी ब्राह्मण कार्यरत होते. ही राजकारणात बहुजन समाजाच्या मनात सातत्याने बोचत राहिले आणि त्यानंतर १९४८ पासून बहुजन समाजाच्या राहिली आणि त्यानंतर १९४८ पासून बहुजन समाजाच्या मनात रूढीनात्मक प्रवृत्ती बळावली व मराठा नेतृत्वाला प्राधान्य लाभले. बहुजन समाजात अनेक दु:साहस असले तरी त्यांच्यात एकजूट मत नसल्याने महाराष्ट्रात ज्याचा संघ एकजूट झाला व महाराष्ट्रात मराठा समाजाचे सरकार स्थापन झाले. बहुजन समाज व मराठा संघ यात आरक्षणाच्या मुद्यासाठी अनेक राजकीय प्रशासकीय प्रश्न धास्तावू लागले व मराठ्यात (ओबीसी) अन्य मागास मराठा वर्ग समाविष्ट करण्यात आला. मराठा महासंघाने बहुजन समाजातील इतर आरक्षणाला विरोधास जात या व प्रशासकीय दृष्ट्या दर्शविला पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. यामध्ये मराठा समाजात शिवसेना याचा उदय झाला. शिवसेनेचा उदय म्हणजे काँग्रेस संघटीत प्रवृत्तीतील गाळण प्रक्रियानुसार अनुभवी काँग्रेस प्रणित नेते शिवसेनेत प्रवेशिला गेले. काळानुसार शिवसेना महाराष्ट्राच्या राजकारणात भक्कम झाली. पूर्वी शिवसेना एक राजकिय विविधता होती. परराष्ट्रीय कालांतराने त्या पक्षाला राजकिय मलियात मिळून तो महाराष्ट्राच्या राजकारणात शक्ती झाली. पक्ष उदयाला आला कालांतराने बहुजन समाज व ब्राह्मण, मराठा यातच संघर्ष राजकिय दृष्ट्या होऊन बहुजन समाजाचे हित जोपासण्यासाठी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करून त्याला राज्यव्यापी आंदोलन करून त्याला प्रशासकीय मंजूरी मिळाल्यावर डॉ. बी. आर. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामकरण झाले.

व्होरा व पळशीकराच्या मते जातिजातीतील संघर्ष यांचे वर्ग संघर्षात परिवर्तन झाले. त्याचेच प्रत्यंतर मराठा आणि अन्य आणि कनिष्ठ जाती त्यामध्ये हिंदू धर्मात समाविष्ट असलेल्या दलित जाती. दलितातील विविध जातीची ओळख राजक्रीय दृष्ट्या स्पष्ट झाली आणि त्यातूनच महाराष्ट्राचे राजकीय प्रक्रिया अधिक दृढवत्तर करण्यासाठी ब्राह्मण-मराठा संख्या निर्माण झाले. व त्या श्रेष्ठ जातीचा वर्ग महाराष्ट्राच्या राजकारणात प्रशासकीय, राजकीय दृष्ट्या बेरजेच्या राजकीय समीकरणानुसारअधिकार रूढ झाला. १९६० पूर्वी ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर हा वाद होता त्यात राजकीय पांघरूण मराठा समाजाने घातला व ब्राह्मण रूढ वर्ग महाराष्ट्राच्या प्रशासकीय भूमिकेत अति विशिष्ठ पदावर आरूढ झाला. महाराष्ट्रात राजकीय मक्तेदारी साखर कारखाने हे मराठ्याच्या हाती राहिली. उद्योजक म्हणून गुजराथी, मारवाडी, पारशी समाज पुढे आला. काही तुरळक उद्योग ब्राह्मणाच्या हाती आली. लघू उद्योग व मध्यम उद्योग ब्राह्मणवर्गाच्या हाती आल्यावर परत राजकिय वाद त्याकाळी आणि त्यामध्ये इतर जाती (ओ.बी.सी) आपले राजकीय लाभ घेण्यास प्रारंभ केला. त्यातच शिक्षण व्यवस्था हा एक उद्योग बनला आणि राजकीय नेत्यांनी

आपले राजकिय उखळ पांढरे करून घेण्यास प्रारंभ केला ही शिक्षणाची नांदी तेवढ्यापूरतीच मर्यादित न राहता यात धार्मिक अल्पसंख्याक, भाषिक अल्पसंख्याक ही सामील झाले व शिक्षण संस्थेची विभागणी चार स्तरात उद्योगात्मक झाली. १) बहुसंख्य शिक्षण संस्था (Major Maratha) २) अल्प जातीतील (Brahamin)

शिक्षण संस्था (कनिष्ठ) ३) धर्म विषयक शिक्षण संस्था (Religious) अशाप्रकारे उद्योगाची विभागणी झाली तरी त्याच्यातील वर्गवाद वर्णवाद जातिवाद धर्मवाद संपुष्ठात येण्याऐवजी अधिक उफाळून येत आहे ही सद्यःस्थिती आहे. मराठा जातीने समाजाने त्याच्यातील अंडर बेकारवर्ग भरतीला आव्हान केले आणि त्यातून मराठा श्रेष्ठजन यशस्वी झालेही राजकीय व सामाजिक प्रशासकिय राजकिय दृष्ट्या स्थरीकरण अभिसरण प्रक्रिया आहे विविध कार्यालयात मराठा जातीचा समाजाचे प्रभूत्व आहे.

## ३.५ मराठ्याचे धुरीणात्व

१ मे १९६० महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी ग. त्र्य. माडखोलकरांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर राज्य मराठ्याचे आहे. मराठ्याचे प्रभुत्व व किंवा मराठा धुरीणात्वाची चर्चा करण्यापूर्वी सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास याची श्रेष्ठत्व असलेल्या प्रभुत्व जाती जातिसमूहाची संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे.

## ३.६ श्रेष्ठत्व / प्रभुत्व जाति समूह :

एम. एन. श्रीनिवास यांनी 'कास्ट इन मॉडर्न इंडिया ॲन्ड अदर' असेस या ग्रंथात जातिनिष्ठ भारतीय राजकारणाचे विश्लेषण करताना श्रेष्ठत्व किंवा वर्चस्व असलेल्या जाति समुहाची संकल्पना विशद केली आहे. त्याच्या मते स्वातंत्रोत्तर कालखंडात लोकशाही आणि सार्वत्रिक प्रौढ मताधिकारास स्वीकार करण्यात आल्याने जातिसमूहाच्या संख्या सामर्थ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. संख्या सामर्थ्य आणि राजकारणावरील यांचा प्रभाव यातील संबंध विशद करताना एम. एन. श्रीनिवास यांनी (Dominent cast) 'डोमिनष्ट कास्ट' या संकल्पनेची रचना केली आहे. श्रीनिवास यांच्या संकल्पनेचे 'योगेंद्रसिंग यांनी विस्तार करतांना जाती समूहाच्या उतरंडीत धार्मिक व कार्तिक क्रियाशील कर्माच्या आधारे असलेले पारंपारिक स्थान संख्या सामार्थ्य, शैक्षणिक प्रगती, आर्थिक समृद्धी,सुबत्ता या सर्व अथवा काही निष्कर्षाच्या आधारे इतर जाती समुहापेक्षा अधिक प्रभावी असलेला 'जातीसमूह' अशी व्याख्या केलेली आहे. प्रभुत्व असलेल्या जातीसमुहाच्या चालीरितीचे अनुकरण त्यापेक्षा कनिष्ठ जातीसमूहाद्वारे करण्यात येते. अशा अनुकरणाद्वारे जातिसमूह आपल कनिष्ठ समाजिक दर्जा कनिष्ठ जातिसमूह आणि प्रतिष्ठा समाजात वाढविण्याचा प्रयत्न करतो. या सामाजिक स्थरीकरणाच्या प्रक्रियेला श्रीनिवास 'संस्कृतिकरण' संबोधतात. महाराष्ट्राच्या संदर्भात मराठा कुणबी जाति समुहाला प्रभावी असे म्हणता येईल. कनिष्ठ मराठे (कुणबी) 'खानदानी मराठे (वतनदार)' मराठ्यांचे अनुकरण भारतात आणि त्या प्रवृत्तिचा प्रसार कनिष्ठ जातिसमूहात झाला आहे. मराठी अभिजनाच्या ताब्यात साखर कारखाने सहकारी तत्त्वावर असल्याने इतर मागासवर्गीय अभिजनांनी देखील आपले सहकारी साखर कारखाने स्थापन केले आहेत.

## ३.७ मराठा कुणबी जातिसमूह

योगेन्द्रसिंह आणि श्रीनिवासन यांनी धुरीणत्वाच्या संकल्पनेचे विश्लेषण केल्यानंतर ज्या मराठा कुणबी जातिसमूहाचे धुरीणत्व किंवा प्रभुत्व आहे असे म्हटले जाते. त्याची रचना समजावून घेणे आवश्यक आहे. मराठा कुणबी, जाति समूहाची रचना, प्रकार, अस्मिता, विचार प्रणाली कशी अस्तित्वात आली घडली हे विश्लेषणात्मक दृष्टिने पाहताना कुणबी मराठा शब्द प्रयोग विविधांगी अर्थ राजकारणात धारण करतात शेतीवर राबवणाऱ्या माणुस विशिष्ठ जातीचा नसेल तर त्याला कुणबी मानले जाते. थोडक्यात बंदिस्थ जाती व्यवस्थेच्या चौकटीपेक्षा कुणबी गट हा खुला मोकळा होता. मासेमारी करण्यास कोळी हा शेती करू लागला की तो कुणबी होतो. 'मराठा' हा शब्द अनेकांगी गुंतागुंतीचा आहे. अनेकार्थी आहे. यामध्ये व्यक्ति व्यवस्थेच्या जातिची उतरंड आहे. एकिकडे सर्व मराठी बोलतो ते मराठा तर दुसरीकडे फक्त शहाण्णवकुळामध्ये जन्म घेणारे ते मराठी अशी दोन टोके होत. मराठा राजवटीत त्याकाळात सर्व मराठी बोलणारे, मग ते ब्राह्मण, भट, भिक्षुक असो मंत्री, सैनिक, शेतकरी, कारागीर व्यापारी असोत सर्वांनाच मराठी संबोधले आहे. म्हणूनच सुरवातीच्या युरोपियात अभ्यास करताना 'मराठा' हा शब्द विशिष्ट जातिवाचक आहे हे जाणवले नव्हते. यामध्ये 'एन्थायेन' ह्या पश्चिम भाई तिचा समाजाचे जवळून निरीक्षण, परीक्षण वातावरणात्मक रित्या अभ्यासकाचे मत जाणून घेणे आवश्यक आहे. त्याच्या मते आर्थिक दृष्ट्या संपन्न कुणबी हे मराठा मानला जाई. असे मत मांडले जाते. 'कुणबी' भागला मराठा झाला. ब्राह्मणांनी मराठ्यांना शुद्ध क्षत्रिय संबोधले आहे. यामध्ये मराठा जातिच्या जातीमय अभ्यासाची लवचिकता स्पष्ट होते. फक्त सधन वर्गातील मराठी कुणब्याला मराठा संबोधण्यापूरता आहे.

छत्रपति शिवाजीच्या काळात मराठी हा शब्द क्षत्रिय / सैनिकी कौशल्य असे संबोधले आहे तेव्हा तो जातिवाचक नसे. परंतु हिच राजसहिंता मराठा कुटुंबाचे वर्णन करताना जातीच्या संदर्भात येते. शिवकालात ह्या शब्दाला जी सरलता वास्तविकता होती ती १९व्या शतकात गेली. पुढे मराठा या शब्दाला महाराष्ट्राच्या परंपरेने / परंपरेचे केन्द्र स्थानिय चिह्न असा अर्थ प्राप्त झाला. तेव्हा ब्राह्मणेत्तर व अब्राह्मणेत्तर या जातीचे समावेशी करण झाले. ईष्ट इंडिया कंपनीने प्रतापसिंह भोसले यांना सातारच्या गादीवर बसवले. त्यांची प्रणिती यातून दिसली. प्रतापसिंहांना आपण राजपूत आहोत. खरे क्षत्रिय आहोत म्हणून शिवाजी राजाप्रमाणे छत्रपती व्हायचे होते. मराठा घराण्यासाठी स्वतःच क्षत्रिय म्हणवून घ्यायचे कितीही हा वाद त्यातून निर्माण झाला. ह्यातून राजकीय सत्ता आणि अधिकाराबाबत ब्राह्मण - मराठ्यामध्ये चाललेला संघर्ष लक्षात येतो. ह्या वादामुळे महाराष्ट्राचे परंपरा त्यात मराठ्यांनी केलेले योगदान यावर भर पडून नवीन रूपांचा इतिहासात सुरू झाला.

मराठा घराण्याशी मुसलमानाशी संगनमत केल्याने त्याच्यातील शुद्धता, पावित्र्य नष्ट झाल्याने त्यांना क्षत्रियत्व देण्यात येणार नाही असा ब्राह्मणाचा निर्वाळा झाला. मराठा आणि चित्पावनातला नततला वाद धार्मिक सरकारचा वापर इतरांना सारखा झाला. याच काळात अनेक शेतकरी कुटुंबाला मराठा म्हणून घेण्यात उत्तेजन मिळाले. मराठा या शब्दात वेगळी झळाळी, अस्मिता, स्वातंत्र्यरीत्या प्राप्त झाली. त्याची शुद्र यौद्धा अशी प्रतिमा झाली. याचे पारदर्शक प्रतिबिंब १९०१ च्या जन गणना अहवालात दिसते. कुणबी गटापेक्षा मराठा म्हणवून घेणाऱ्यांची संख्या ह्या अहवालामध्ये कितीतरी जास्त आहे. मराठाशान प्रसारक वृत्तपत्रात १८६५ साली आलेल्या

एका लेखात शुद्ध मराठा घराणी इतर जातींना आपल्यात समावून अध:पतीत होतात असा सूर आहे. तुकाराम तात्या पडवळ. या फुल्याच्या सहकाऱ्याचे मते काळाच्या ओघात कोणाचा वर्ग / वर्ण शुद्ध राहू शकत नाही तेव्हा कुणबी जाती गटाच्या क्षत्रिय होण्याचा जानवे यशोपवित घालण्याचा अट्टाहास पडवळांना चुकीचा वाटतो. राजपूत, मराठी / मराठा, प्रभु, पाचकळशी, वाडवल (वडार), सुतार (पांचाळ) खत्री अशा विविध जातींना क्षत्रिय असल्याचा साक्षात्कार होत होता. पडवळांनी ब्राह्मण मराठा जातीतील संघर्षामागचे राजकारणही स्पष्ट केले आहे. जेव्हा मराठा जात दुर्बल होते, तेंव्हा, तेंव्हा, त्यांना ब्राह्मण क्षत्रियत्त्व नाकारतात. त्यामुळे ब्राह्मणेत्तर वादांची परंपरा लक्षात घेऊन ब्राह्मणेत्तरांनी एकत्र आले पाहिजे असा तर्क आहे. १९३१च्या जनगणनेनुसार मराठी भाषिक प्रदेशात मराठी/मराठा कुणबी जाती समुहाची संख्या एकूण लोकसंख्येच्या ४०% हून अधिक होती. पश्चिम महाराष्ट्रात आणि कोकणात / तळ कोकणात त्याची टक्केवारी ४१% मराठवाड्यात ३७% आणि विदर्भात २७% आहे. यापैकी ९६ कुळी वतनदार मराठे स्वत:ला क्षत्रिय समजतात तर इतर 'मराठे' कुणबी या सदरात (ओ.बी.सी.) या गटात मोडतात. वतनदार 'मराठे' कुणबी पाटील म्हणजेच देशमुख/पाटील यांच्यातील वैमनस्य सर्वश्रृत प्रस्थ महाराष्ट्रात आहे कोकणात मराठ्यापेक्षा कुणबी जातीचे प्राबल्य जास्त आहे. विशेष बाब महाराष्ट्राच्या इ.मतदानाच्या सूचीत 'कुणबी' जातीचा समावेश करण्यात आला आहे. सामाजिक आणि आर्थिक स्थरीकरण स्थरावर जरी मराठा/कुणबी जातिसमूह वेगळे असले तरी राजकारणात सत्ता प्राप्तीच्या प्रक्रियेत त्यांची युती असल्याने, त्या जाती समूहांना मराठा/कुणबी एकत्रीकरण अशा प्रकारे ओळखले जाते.

## ३.८ मराठा / मराठ्याच्या धुरणीत्वाचे विश्लेषण :

महाराष्ट्रीय / राष्ट्रक या महाराष्ट्रातील काँग्रेसत्तर पक्षाच्या / काँग्रेसमधील बहुसंख्य मराठी मंडळींनी दर्शविलेल्या सहानुभूतीच्या बळावर झालेल्या प्रखर आंदोलनातून १९६० साली १ मे रोजी महाराष्ट्रराज्याचा उदय झाला. त्या काळात प्रस्थापित झालेले काँग्रेसचे वर्चस्व १९३५च्या सुमारास मराठा जातीच्या अभिजनांनी सुरू केलेल्या काँग्रेसचा (कब्जा)सत्ता घेण्याच्या प्रक्रियेसी प्रेरीत परिणती होती. १९६० ते १९७० हा काँग्रेसच्या संपूर्ण वर्चस्वाचा काळ होता. ४०% लोकसंख्या असलेली बहुतांश जमीन मालकाची जात इतर शेतकरी जातीच्या मानाने चांगल्या सुपिक जमीनीची किमंत अधिक झाल्याने मालमत्ता, इतिहास काळापासून प्रत्यक्षात असलेले आर्थिक आणि सामाजिक वर्चस्व त्याची जाणीव व त्याच्या संरक्षणासाठी एकत्र येण्याची तयारी इत्यादी या वर्चस्वाची गुण विशेष म्हणून सांगितले गेले इतक्या मोठ्या संख्येने महाराष्ट्रात मराठा एकसंघ जात एकत्र येण्याची मराठा ही एकसंघ जात आहे.

इतके असूनही मराठा जातीत अभिजन आणि जन असले तरीही मराठा कुणबी जातिसमूह एकसंघ वरकरणी दिसत असला तरी मराठ्यात त्यांच्या अर्तंमुख/आर्तभिन्मुखरीत्या उच्च युक्त मराठे / वतनदार मराठे व इतर सर्व सामान्य मराठे असा भेद झाला असला तरी वर्गसंघर्ष झाला नाही. महाराष्ट्राच्या राजकारणातील नामवंत अभ्यासक जयंत लेले यांनी त्यांच्या '**इलिटष्युरॉलिझम ॲन्ड क्लास रूल**' या ग्रंथात केले आहे. लेलेच्या मते मराठा जातीत वर्गकालह झाला नाही. त्याचे कारणे / पुरावे पुढीलप्रमाणे उदृत केले आहेत.

१) जातीच्या लवचिक मर्यादा

२) जातीच्या गाभ्याशी असलेली स्थिती प्राधाण्यप्रत (Patriarcle) कुटुंब व्यवस्था

३) इतर जातीच्या संबंधात पूर्वापार चालत आलेली श्रेष्ठत्व / यजमान परंपरा आणि

४) या तीन गुणधर्माचा हवा तेव्हा वर्चस्वाच्या (Dominent) समर्थनासाठी केला जाणारा जातीचा राजकिय प्रक्रियात्मक उपयोग.

मराठेशाहीला केवळ वर्चस्वाची परंपरा आहे असे विश्लेषण अपुरे आहे. या वर्चस्वाला धुरीणात्वाची जोड आहे म्हणूनच हे वर्चस्व शेकडो वर्ष टिकू शकले. मराठा जातीच्या अभिजनामध्ये आर्थिक राजकिय वर्चस्वाची जाणीव आहे. त्याबरोबर सामाजिक, सांस्कृतिक संबंध निर्बंधांनी सिमित केले आहे. ह्या वर्चस्वाला मराठी ग्रामीण जनमानसात हे वर्चस्व न्यायनिष्ठ मान्यताही आहे. धुरीणत्वाची ही धोरणांगे एकमेकात समिलीत झाली आहेत.

मराठा अभिजनांच्या संस्कृती व अर्थव्यवस्थेने जोपासलेल्या ह्या परंपरांगत शासक प्रवृत्तीचा वारसा महाराष्ट्रात काँग्रेसेला मिळाला ब्रिटिश साम्राज्य काळात पेरलेल्या आणि स्वातंत्र्यानंतर जोमाने वाढीस लागलेल्या भारतीय भांडवल शाहीच्या संदर्भात या अभिजन मराठा धुरीणीत्वाचा एक नवा आविष्कार झाला. हे धुरिणत्व नव्या लोकशाही राजवटीत पद्धतशीरपणे जोपासले गेले त्याचे श्रेय यशवंतराव चव्हाणांना जाते. भांडवल शाहीत सर्व निर्मिती मालाचे बाजारीकरण होत असते. त्याचप्रमाणे सामाजिक संबंधाचे बाजारीकरण होणार हे अपेक्षित होणे हे काळाच्या राजकिय प्रक्रियेचे घोतक होय. चव्हाणाच्या नेतृत्वाखाली वाढलेल्या काँग्रेस व्यवस्थेत या प्रवृत्तीचे कालखंड १९६० ते १९७० हा होय. या कालखंडात ग्रामीण भागात प्रभाव वाढणार नाही याची दक्षता घेण्यात आली. स्वातंत्रोत्तर कालखंडात अभिजन मराठ्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मराठा जात एकसंघ होण्याचे कारण म्हणजे १९३७ पासून आणि विशेषतः १९४६ नंतर शेटजी, भटजीच्या राजकारणात शेतकऱ्याचे (बहुजन समाजाचे) हित दडपले जाईल अशी भीती त्यांच्या मनात निर्माण झाली. या दडपशाहीचे प्रत्यंतर त्यांना १९३७ ते १९४६ साली मुंबई प्रांताच्या काँग्रेसच्या राजकारणात असते. केशवराव जेधे याच्या म्हणण्यानुसार बहुजन समाजाचे हित जोपासण्यासाठी (शे.का.प.) शेतकरी कामगार पक्ष जन्माला आला. परंतु शे.का.पक्षाच्या बेत जास्त ग्रामीण भागात त्यामुळे काँग्रेसमध्येच राहून काँग्रेस काबीज करण्याची व्यूहरचना मराठा नेतृत्वाने आखली. संयुक्त महाराष्ट्राचा स्थापनेनंतर मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा याच्या प्रणालीची प्रक्रिया उदयास आली आणि १९६० नंतर चव्हाणाच्या नेतृत्वाखाली मराठा नेतृत्व एकसंघ बनले. ग्रामीण भागात भांडवल शाहीचा प्रभाव रोखण्यासाठी चव्हाणांनी सहकारी तत्वावर कृषी उद्योग उभारण्यासाठी प्रोत्साहन दिले. चव्हाणांच्या या व्यूहरचनेमुळे भांडवरशाहीच्या आक्रमतेची भीती कमी झाली. त्यामुळे शंहरात वाढणारी कारखानदारी अगदी ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाच्या सहकारी संस्था यांच्यात टिकाऊ समझोता निर्माण झाला. १९६२ साली पंचायत राज संस्थांची स्थापना करण्यात आली. सहकारी संस्था व पंचायत राज यंत्रणाद्वारे ग्रामीण जनतेच्या समस्यांचे निवारण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मराठा अभिजनांकडून करण्यात आले. त्यामुळे यशवंतराव चव्हाणाच्या नेतृत्वावर १९६० ते १९७० या दशकात मराठ्यांचे धुरिणत्व प्रस्थापित झाले व तेव्हा पासून राजकिय पक्षाची समीकरणे बदलली, राष्ट्रपतीच्या निवडणूकीच्या वेळी महाराष्ट्र काँग्रेसने पक्षाच्या अधिकृत उमेदवाराला पाठिंबा दिल्याने चव्हाण व इंदिरा यांच्यातील विसंवाद / वितुष्ठवादास सुरूवात झाली. देशातील अन्य भागातील श्रीमंत व मध्यम शेतकरी वर्गाच्या नेतृत्वाप्रमाणे महाराष्ट्रातील

मराठा जातीचे नेतृत्व आपल्या व्यक्तिगत नेतृत्वापेक्षा / नेतृत्वापेक्षा आणि भांडवलशाही विकासाच्या कामात अडथळा होणार हे लक्षात आल्यानंतर इंदिरा गांधींनी (१९७१) साली सत्ता संपादन केल्यानंतर राज्य पातळीवरील नेतृत्वाचे खच्चीकरण करण्यास प्रारंभ केला. राज्य पातळीवरील प्रबळ मुख्यमंत्री बदलातून तदर्थ परिस्थितीत राज्य पातळीवरील ज्याचे नेतृत्व व राजकिय बळ कमकुवत आहे आणि जे आपल्या हुकमतीखाली राहतील असे मुख्यमंत्री नेमण्याची व त्यांना वारंवार बदल करण्याची पद्धत सुरू करण्यात आली. त्या व्यूहरचनेनुसार मराठा अभिजनांना शह देण्यासाठी शंकरराव चव्हाण यांची १९७५ साली महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री नेमणूक करण्यात आली. इंदिरा गांधीच्या परिघातून हीच यंत्रणा राजकिय प्रक्रिया आली. लवचिक राहण्यासाठी राजीव गांधीने १९८८ पर्यंत राबविली. तेरा वर्षाच्या कालखंडात सात मुख्यमंत्री बदलले. पक्षातंर्गत गटबाजीला उधाण / प्रोत्साहन देण्यात आले. आणि मराठा मराठेत्तर असा वाद सुरू करण्यात आला. मराठेत्तर नेतृत्व आपल्या पाठीशी उभे करण्याचा पक्ष श्रेष्ठींनी प्रयत्न केला. कृषी उद्योगाच्या व्यवस्थाच्या समझोत्यातून होणारे फायदे ज्याच्या पदरी फारसे पडले नाही, असे अनेक घटक शहरी व ग्रामीण भागात होते. त्या सर्वांचा उपयोग करून प्रस्थापित मराठा नेतृत्वाशी सामना देणे शक्य होते. त्याकरीता या घटकांच्या जागतिकतेला त्याच्या निर्दलीय राजक्रिय घटकाला त्याच्या धार्मिक / सांस्कृतिक स्थितीशी आकांक्षाशी, वंश, वर्ण, जातीशी, निगडीत असलेल्या अस्मितेशी जोडून देणाऱ्या लोकातूनच लोकरंजन वादितील प्रसंगाचा कूशलतापूर्वक वापर करण्यात आला. इंदिरा गांधीने ह्या मागाने, दलित, मुसलमान, शहरामध्ये असंघटित कामगार, बेकार व बेकारीच्या उंबऱ्यावर येऊन ठेपलेले, सुशिक्षित तरुण-तरुणी ह्यांना गरीबी हटाव नाऱ्यांनी आणि इतर / बेकार भत्ता या प्रलोभांनानी स्थकित राजकिय दृष्ट्या करण्यास सुरूवात केली.

महाराष्ट्राच्या राजक्रिय प्रक्रियेत जुनी सत्तास्थाने मराठा अभिजनाच्या हातातच राहिली ह्या नव्या शक्तीस्थाने याचे स्थानिक नेतृत्व करू पाहणाऱ्या नव्याने नेतृत्वासाठी काही सोयी करणे आवश्यक आहे. या कामात तत्कालीन अमराठी मराठेत्तर नेतृत्वाचे मुख्यमंत्री बॅरिस्टर अब्दूल रहमान अंतुले यांनी फार मोठे योगदान दिले; संजय गांधी निराधार योजनेसारख्या अनेक कुठल्या कुल्प्त्या शोधून काढल्या. शहरी कंत्राटदाराच्या निधीतून त्यांनी नव्या नेतृत्वातल्या खुप लोकांची सोय केली तरी देखील शेवटी अंतुले व त्यानंतर बाबासाहेब भोसल्याची जी परवड झाली यावरून हे स्पष्ट होते की त्याचा अर्थ महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मराठा नेतृत्व रूजलेले आहे. त्या नेतृत्वात असंख्य त्रुटी आहेत असे असले तरीही मराठा जातिसमुहाचे ग्रामीण भागावरील वर्चस्व प्रभूत्त्व महाराष्ट्राच्या राजकारणाचा गाभा बनून राहिला आहे. मराठ्याचे धुरीणत्व आबाधित राहण्याकरिता पवारांनी १९८६ साली आपला समाजवादी काँग्रेस पक्ष इंदिरा काँग्रेसमध्ये विलीन केला. या पुढे महाराष्ट्राच्या राजकिय प्रक्रियेत मराठा जातिचे प्राबल्य व महाराष्ट्राच्या राजकारणातील पकड अधिक मजबूत झाली हे राजकारणातील महाराष्ट्रातील राजकिय नेतृत्व मराठा जातीचे उघड सत्य आहे.

## ३.९ मराठ्यांच्या धुरीतत्वाची मर्यादा

१९७० नंतरच्या कालखंडात मराठ्यांचे धुरीतत्व साकार झाले. त्याचे संकेत असे आहेत.

अ) पक्षश्रेष्ठीचे डावपेच व्यूहरचनाः

महाराष्ट्राच्या राजकरणातील सर्वात राजकिय स्थरीकरणाची राज्यस्तरीय प्रक्रिया १९६९ च्या काँग्रेस फुटीनंतर झाली व तेव्हापासून राजकीय पक्षाची समीकरणे बदलली. राष्ट्रपतीच्या

निवडणूकीच्या वेळी महराष्ट्रात काँग्रेस पक्षांच्या अधिकृत उमेदवाराला पाठिंबा दिल्याने चव्हाण व इंदिरा यांच्यातीग विसंवादास वितुष्ठावादास सुरुवात झाल्याने देशातील अन्य भागातील श्रीमंत व मध्यम शेतकरी वर्गाच्या नेतृत्वाप्रमाणे महाराष्ट्रातील मराठा जातीचे नेतृत्वा आपल्या व्यक्तिगत नेतृत्वापेक्षा नेतृत्वाकांक्षा आणि भांडवलशाही विकासाच्या कामात अडथळा होणार हे लक्षात आल्यानंतर इंदिरागांधीनी १९७१ साली सत्ता संपादन केल्यानंतर राज्य पातळीवरील नेतृत्वाचे स्वाधीकरण करण्यास प्रारंभ केला. राज्यपातळीवरील प्रबळ मुख्यमंत्री बदलून परिस्थिती राज्य पातळीवरील ज्यांना नेतृत्व व राजकीय बळ कमकुवत आहे आणि जे आपल्या हुकमतीने राहतील असे मुख्यमंत्री नेमण्याची व त्यांना वारंवार बदल करण्याची पध्दत सुरु करण्यात आगी. त्या व्यूहरचनेनुसार मराठा अभिजनांना शह देण्यासाठी शंकरराव चव्हाण यांची १९७५ साली महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री नेमणुक करण्यात आही. इंदिरा गांधीच्या परिचयात ही राजकिय प्रक्रिया अति सहायासाठी राजीव गांधीने १९८८ पर्यंत राबवली. तेरा वर्षाच्या कालखंडात सात मुख्यमंत्री बदलले. पक्षांतर्गत गटबाजीला प्रोत्साहन देण्यात आले. आणि मराठा मराठेत्तर असा वाद सुरु करण्यात आला. मराठेतर नेतृत्व आपल्या पाठीशी उभे करण्याचा पक्ष श्रेष्ठीने प्रयत्न केला.

कृषी उद्योगाच्या व्यवस्थाच्या समझोत्यातून होणारे फायदे ज्याच्या पदरी फारसे पडले नव्हते असे अनेक घटक शहरी व ग्रामीण भागात होते. त्या सर्वाचा उपयोग करुन प्रस्थापित मराठा नेतृत्वाशी सामावून घेणे. त्यातकरीता या घटकांच्या आगतीक केलेला त्याच्या राजकीय घटकाला त्याच्या धार्मिक संस्कृतिक स्थीतीशी अवक्षांशी वंश, वर्ण, जातीशी निगडीत असलेल्या अस्मितीशी जोडून देणाऱ्या लोकतूनच लोकरंजन बदलले. प्रसंगाच्या कुशलतापूर्वक वापर करण्यात आला. इंदिरा गांधीने ह्या मार्गाने दलित, मुसलमान, शहरातले असंघटीत कामगार, बेकार, सुशिक्षीत तरुण -तरुणी ह्याना गरिबी हटाओच्या नाऱ्यांनी आणि इतर बेकारभत्ता या प्रलोभनानी हस्थाकित राजकिय प्रक्रिया करण्यास सुरुवात केली. भांडवल शाहीत सर्व निर्यात मालाचे वर्गीकरण होत असते. त्याचप्रामणे समाजिक संबंधाचे बाजारी करण होणार हे असे सिध्द होत. राजकीय प्रक्रियेत घोह्यक होय. चव्हाणाच्या नेतृत्वा खाली वाढलेल्या काँग्रेस व्यवस्थेत या प्रवृत्तीचा कालखंड १९६० ते १९७० हा होय या कालखंडात ग्रामीण भागात प्रभाव वाढणार याची दक्षता घेण्याच आली. स्वांतत्र्येत्वर कालखंडात अभिजन मराठ्यानी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मराठा जात अधिक होण्याचे काम म्हणजे १९३७ पासून आणि विशेशत १९४६ नंतर शेटजी भटजीच्या राजकारणात शेतकऱ्याचे बहुजन समाजाची हित ज्याने जाईल अशी भिती त्यांच्या मनात निर्माण झाली. या दडपशाहीचे प्रायंतर त्याना १९३० ते १९४६ साली मुंबई प्रांताच्या काँग्रेसच्या राजकारणात झाली. विश्वासराव जेधे यांच्या म्हणण्यानुसार बहुजन समाजाचे हीत जोपसण्यासाठी (शे.का.प) शेतकरी कामगार पक्ष जन्मास आला. परंतू शे.का.प. पक्षाच्या बेत फसल्यामुळे काँग्रेसमध्येच राहून काँग्रेस काबीज करण्याची व्यूहरचना मराठा नेतृत्वाने आखली. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मराठा तितुका मेळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा याच्या प्रक्रिया उदयास आली. आणि १९६० नंतर चव्हाणाच्या नेतृत्वाखाली मराठा नेतृत्व एकनीष्ठ बनले.

### (ब) हिंदुत्वाचे आव्हान :

मराठ्याच्या धुरिणत्वाला गेल्या दोन दशकात 'हिंदुत्व' वादी विचार सरणीचे आव्हान निर्माण झाले आहे. एकेकाळी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात हिंदुत्वाची घोषणा घेऊन जातीन्तरांची 'बहुजन समाजाविरूद्ध' ब्राह्मणी कारवाया करणांराचे हस्तक म्हणून निर्थत्सना होत असे. इतकेच नव्हे

तर आपल्याला धुरीणत्वाची ब्राह्मणी हिंदुत्वाचा सुसंग लागेल की काय अशीच भीती वाटत राहिली. त्याच्या धुरीणात्वाची राजकारण हे पितृप्रधान (Patrirln) आणि यजमानी तत्त्वावर आधारीत जातीचे राजकारण होत. त्यातच अभिजन मराठ्याच्या नेतृत्वकरणाच्या इतिहासकालीन हक्काला सामान्य जनांची असणारी अशब्दकित / असम्मतीदर्शक मान्यता रूंजलेली होती. अभिनिवेशी हिंदुत्व हिंदुचे एकत्व, त्याचा गर्व, ताठरपणा हे या परंपरांगत, शब्दातीत, कृषित, लुप्त झालेल्या हिंदुत्वाला मारक ठरण्याची शक्यता होती. म्हणूनच टिळकांपासून ते राष्ट्रिय स्वयंसेवक संघापर्यंत अभिनिवेशी हिंदुत्वाचे घटक, हे तालूक्याच्या जिल्ह्याच्या गावातले, ब्राह्मण, गुजर, मारवाडी, तेली, तांबोळी म्हणजे कनिष्ठ मध्यम वर्गातले व्यापारी आणि शिक्षित नोकरदार हेच होते. हे सकृतदर्शनी सिद्ध होते.

गेल्या. दोन दशकात बदलत्या परिस्थितीनुसार खेड्यापाड्यातून नवे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीमंत व मध्यम शेतकऱ्यांची मुले मोठ्या प्रमाणात शिक्षित झाली आहेत. फलदायक बागायती शेती असले तरी सगळ्या भावांची तिच्यात सोय लागू शकणार नाही. हे लक्षात आलं आहे. शिवाय यशस्वी शेतीसाठी तालुका जिल्हा किंवा राज्य पातळीवर राजकिय नेते सरकारी नोकर ह्याच्याशी संबंध ठेवावा लागतो. या सर्व गोष्टीचा विचार करून सुखवस्तु अभिजन, मराठ्याच्या घरातील मुलही, सरकारी नोकऱ्या राजकारण यात प्रवेश करायला उत्सुक आहेत हे सिद्ध झाले. ही शक्यता, उत्सुकता लक्षात घेऊन, नवशिक्षित अभिजन मराठे तरुण शहराकडे धाव घेऊ लागले. ही तरुणाई शहराकडे धावू नये म्हणून बराच काळ निर्माण झालेली संधी स्थाने दिर्घकाळ पंचायती राज्याच्या निवडणूकाच न घेतल्याने स्थिर राहिली होती. दडपणाविरूद्ध सततचळवळ करत राहण्याच्या परंपरेत वाढलेल्या दलित, तरुणांचीही हीच कुचंबणा आहे. ‘कल्याणकारी राज्य व्यवस्थेत’ शासकीय योजनातून तेही बरेचसे शिक्षित झाले आहेत. त्यातल्या काही थोड्या प्रमाणात आरक्षण नियमामुळे नोकऱ्या मिळताहेत. तरीही एकंदर समाजात आपणास स्थान अजूनही सुधारलेले नाही, उलट घसरत आहे ह्याची त्यांना जाणीव आहे. जातीच्या तत्त्वावरच स्वातंत्रोत्तर काळात राजकारणात उभे राहिले असण्याला जेव्हा सत्ता स्थाने आंकुचित व्हायला लागली तेव्हा बहुसंख्याकांना आपण वगळले गेले आहोत म्हणून आपण संधीस्थानातून दूर फेकलो गेलो अशी जाणीव झाली. अनेक जातीत आणि थोड्या-थोड्या संख्येने खेड्यापाड्यातून विखुरलेला हा बहुजन समाज आहे. ज्या काँग्रेस व्यवस्थेने त्यांना सत्तेपासून काँग्रेस पक्षाबद्दल आणि ओघानेच पक्ष बद्ध राजकारणा बद्दल भ्रमनिरास झाला. १९९० नंतरच्या या कालखंडात भ्रमनिरासाची तीव्रता वाढली आहे. एकिकडे आर्थिक वाढीचा दर झपाट्याने वाढतो आहे. असा आभास आणि सरकारी खजिने दिवाळखोरीच्या मार्गावर पोचण्याची चिह्ने स्पष्ट होती. शिवसेना छोट्या शहरात मोठ्या गावात आणि खेड्याच्या जवळपास येऊन पोचली. इतर मागास तरुणांच्या असंतुष्टेने भांडवल करून, यातून आरक्षणाला विरोध झाला. सरकारात असलेल्या काँग्रेसतरांवर रागावलेला मराठा तरुणांचे नेतृत्व काही काळ समाजवादी काँग्रेसद्वारा शरद पवारांनी केले. पण १९८६ मध्ये तेही इंदिरा काँग्रेसमध्ये गेले आणि शेवटी मुख्यमंत्री झाले. पवारांच्या घरी जाण्यामुळे निराश झालेल्या तरुण मराठ्याचा वर्गही शिवसेनेकडे वळाला आहे.

शिव छत्रपतीचा कालखंड हा सुवर्ण काळ होता अशी आपल्या मराठी मनाची समजूत आहे त्या काळात न्याय, शिस्त व जनतेबद्दल कैवार होता. कणव होती अशी एक सामूहिक समजूत, स्मरण आहे तसेच ते भविष्य काळातील प्रक्रियाचे स्वप्न होय. ह्या स्मरण स्वप्नाची पार्श्वभूमी

करून आजच्या राजकारणाच्या विदारक स्वरूप दाखवता येते. तशी पार्श्वभूमी निर्माण करण्यासाठी प्रत्येक सभेच्या वेळी शिवसेनेचे सभापतीत्व / सेनापती जणू काही छत्रपतीच धर्मस्थापनेसाठी पुन्हा अवतार धारण करत आहेत असा आभास निर्माण करतात शिव छत्रपतीचे शब्द आणि त्याच्या कृतीची आठवण देत ते आपला 'वचननामा' सादर करतात. त्यासाठी वेगळ्या कार्यक्रमाची गरज नाही असे अट्टाहासाने सांगतात. अन्न, वस्त्र, निवारा पुरवणे असा हा एक कलमी कार्यक्रम आहे. आजची काँग्रेसही लाचार बोलघेवड्या मानसाची आहे असे सांगताना शिवछत्रपतीच्या बरोबरीने यशवंतराव चव्हाणांच्या समाजवादाचाही उल्लेख करतात. सामान्य जनाच्या श्रद्धा स्थानाचा उल्लेख करून समस्थ हिंदूचे ऐक्य साधून १९९५ साली शिवसेना - भाजपा युतीने काँग्रेसची सत्ता म्हणजेच मराठा बहुजनाचे धुरिणत्व मोडून काढले. काही अतिउत्साही विचार वंतांनी महाराष्ट्रात मराठा जातीचे राजकारण संपुष्टात आले आहे असा निष्कर्षही काढला. शिवसेना-भाजपा युती सत्तेवर आल्यानंतर सर्व सामान्याचे स्वप्न असलेले 'शिवशाही' काही अवतीर्ण होऊ शकली नाही. शिवशक्तीच्या राजवटीत ग्रामीण विकासाला खीळ बसली आहे. आणि ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष केले जात आहे. हा समज उत्तरोत्तर वाढत गेला. राज्यकर्ते सहकारी चळवळ नष्ट करण्याबाबत कृतीशिल आहे आणि त्यामुळे आपल्या आर्थिक हित संबंधाला बाधा पोहोचेल असे वाटल्याने ग्रामीण भागातील अस्वस्थतः वाढत गेली. शिवशाही बद्दल भ्रमनिराश झालेल्या ग्रामीण समुदायाला अस्वस्थ करणारी कामगिरी शरद पवार व त्याच्या सहकाऱ्यांनी १९९६ ते १९९८ या कालखंडात पार पाडली. त्यामुळे अभिजन व काँग्रेसमुळे पक्षाच्या कामगिरीने दुखावलेला ग्रामीण समुदायाने आपली शक्ती पुन्हा एकदा काँग्रेसच्या पाठीशी उभी केली आणि १९९८ च्या निवडणूकीत / लोकसभा निवडणूकीत पुन्हा एकदा काँग्रेसचे वर्चस्व प्रस्थापित झाले. मात्र हे वर्चस्व प्रस्थापित करताना मराठा अभिजनांनी 'यशवंत निती' स्वीकारली असून, मराठेत्तर जाती जमातींना अधिकाधिक सामावून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. त्यामुळेच गेल्या दशकात मराठ्याच्या धुरिणत्वाला हिंदुत्वाने निर्माण केलेले आव्हान परतवून लावण्यात मराठा अभिजन यशस्वी ठरला आहे. मात्र मागील राजकिय सिंहावलोकन प्रक्रियेतून मराठ्यांनी बरेच राजकिय शहाणपण शिकले असे सिद्ध होते. मराठा आणि अभिजनांनी मराठेत्तर जातीच्या राजकिय आकांक्षांकडे दुर्लक्ष केले तर त्यांना वेगळ्या राजकिय संकटांना सामोरे जावे लागले असते.

### (क) शेतकरी संघटनेचे आव्हान :

१९७८ ते १९८८ दशकात मराठ्याच्या प्रभुत्व शरद जोशीच्या शेतकरी संघटनेनेही जबरदस्त आव्हान दिले शिवसेना आणि शेतकरी संघटना या दोघांनाही पक्षाधिष्ठ राजकारणाबद्दल भ्रमनिराश झालेल्या तरुणांच्या कार्योत्साहाचा, भावनाशीलतेच्या भरपूर उपयोग करून घेतला सेनेचा कार्यक्रम बिन कलमी तर संघटनेचा एक कलमी कार्यक्रम, त्या एककलमी कार्यक्रमाला पोषक अशी पार्श्वभूमी स्व इंदिरागांधी यांनी निर्माण केली होती. आणि स्व. राजीव गांधी यांच्या शासनाच्या धोरणाने त्यास भरपूर खतपाणी घालून वाढविली गेली. हरीत क्रांतीच्या तत्त्वाचे अवलंबन केल्याने व त्याच्या बरोबर महाराष्ट्राच्या साखर कारखान्याच्या अनिर्बंध वाढीला थोपवून शकल्यामुळे एका काही जुन्या समझोत्याखाली हळूहळू वाढणारी शेती क्षेत्रातील सहकारी भांडवलशाही एकंदरच जागतिक बाजार पेठेत लोटली गेली. जागतिक पातळीवर ठरणाऱ्या किंमतीमुळे असहाय्य होऊन खरेदी विक्रीच्या कामीत अस्थिरवातावरणात जगतात. तिला सरकारी संरक्षणाची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. त्याच वेळी अनियंत्रित असल्या धोरणाचा परिणाम म्हणून सरकारी खजिने दिवाळखोरीच्या दिशेने निघाली होती. विविध प्रकाराच्या उत्पादनासाठी, अर्थ मदतीसाठी

शासनाकडे प्रस्थापित संस्थाच्या द्वारे वळणाऱ्या श्रीमंत मध्यम शेतकऱ्यांना हे वातावरण नवीन होत. त्यामुळे बरेचसे मराठा सधन शेतकरीही प्रथमच संघटनेकडे वळले. शेतमालाला रास्त भाव हा कार्यक्रम त्याच्या यशासाठी वेगळी आक्रमक तंत्र ह्या दोन्ही कारणांनी शेतकरी संघटना एकंदम नजरेत भरते. शेतकरी संघटना वरकरणी प्रभावी वाटत असली संघटनेच्या रास्ता गावबंदी, विराट सभा मेळाव्याच्या राजकारणातून तिच्या प्रभावाच्या भागातही सर्वसामान्य मतदाराच्या निवडणूकीच्या जातीतावर फारसा परिणाम झालेला नाही. शेतकरी संघटनेचे काही उमेदवार विजयी होण्याचे कारण काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजी होती. थोडक्यात शेतकरी संघटनेने मराठ्याच्या धुरीणत्वात आव्हान देण्याचा किंवा ते संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला असला तरी, मराठा जातीच्या चाणाक्ष मध्यम आणि श्रीमंत शेतकरी वर्गाने आपले आर्थिक हित संबंध साधण्याकरिता संघटनेचा वापर करून घेतला असेच म्हणावे लगेल. कारण संघटनेशी एकनिष्ठ असलेले शेतकरी वर्गास त्याच्या राजकिय पक्षाशी एकनिष्ठ राहिला आहे.

सर्वसाधारणरित्या सारासार विचार करता असा निष्कर्ष काढता येईल की मराठा अभिजनाच्या धुरिणत्वाखाली असलेली काँग्रेस पद्धत महाराष्ट्रात तरी अजून तग धरून आहे. तिची बांधणी देश भांडवलशाहीच्या एका टप्प्यावर असताना झाली होती. आणि तो मताचा टप्पा ओलांडून आपण फार पुढे गेलो आहोत तरी देखील जोपर्यंत महाराष्ट्रात बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागातील आहे, कृषि व्यवस्थेवर अवलंबून आहेत हे विसरून चालणार नाही. तोपर्यंत मराठ्याचे धुरीणत्व टिकून राहणार आहे. तिच्या विरोधात राजकिय पातळीवर जो लक्षणीय धोका उभा राहिला आहे. तो आक्रमक हिंदुत्वाचा आहे. इंदिरा गांधीच्या लोकरंजनात्मक व्युहरचनेपासून सुरू झालेल्या आक्रमणांना तोंड देत काँग्रेस व्यवस्था अजूनही महाराष्ट्रात तरी उभी आहे. यापुढे भांडवलशाहीला थोपविण्याची शक्ती मराठा अभिजनात आहे / किंवा नाही हे थोडेसे सांगणे कठिणप्राय आहे.

## ३.१० इतर मागास जातिचे राजकारण (इ.मा.जा.)

इतर मागास जाती ही संकल्पांना अलिकडच्या काळातील आहे. इ.मा.जा. वर्गाचे राजकारण संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होईपर्यंत महाराष्ट्राच्या जातीय राजकारणात ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर ही भीतीही ब्राह्मण किंवा उच्च वर्णिय जाति आणि दलित जाती वगळता, इतर सर्व जाती वगळता इतर सर्व जाती स्वतःला बहुजन समाजाचा भाग समजत असे महात्मा फुल्यांची बहुजन समाजाची संकल्पना सर्वसमावेशक स्वरूपाची होती. त्यात शुद्र आणि अतिशुद्र या उभयताचा समावेश केला जातो असे त्यातील मराठा जातीस आपण क्षत्रिय आहोत असा साक्षात्कार झाल्याने इतर शुद्र जाती त्याच्या पासून दुरावल्या अतिशूद्राचे सान्निध्य शूद्रांना (सवर्ण जातींना) अमान्य असल्याने पारंपारिक जाती व्यवस्थेतील अस्पृश्य जाती आणि सवर्णापासून दुरावस्थ व्यवस्थेतील 'अस्पृश्य जाति आणि सवर्णापासून दुरावल्या' असे असले तरीही १९५६ पूर्वीच्या मुंबई मराठी राज्यानी मुंबईराज्यात मराठी भाषिक समुदाय संख्येने सर्वांत मोठी असताना त्याच्याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने, ब्राह्मणत्वाची एकजूट कायम राहिली. १९५६ साली मराठी भाषिक जनतेचा विरोध डावलून द्विभाषिक, मुंबई राज्य लादण्यात आल्याने संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात ब्राह्मणेत्तराची एकजूट टिकली. १९६० साली संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाणांनी 'बेरजचे राजकारण' करताना सर्व जाती गटांना सामावून घेण्याचा उदार दृष्टिकोन स्वीकारल्याने मराठ्याच्या वर्चस्वाला बहुजन समाजातील इतर घटकांनी हरकत घेतली नाही. आपणास सत्तेचा पुरेसा

वाटा मिळाला नाही. अशी खंत मराठेत्तर जातिच्या नेत्यांनी वेळोवेळी व्यक्त केली होती. सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत राजकारणाचा एक भाग म्हणून 'मराठ्यांचे खच्चीकरण' करण्यास इंदिरा गांधींनी १९७१ नंतर प्रारंभ केला या प्रक्रियेत त्यांनी 'मराठेत्तर' जातीची युती घडवून आणली आणि तेव्हापासून इतर मागास जातीचे राजकारण आकार घेऊ लागले. गेल्या चार दशकात ब्राह्मण - ब्राह्मणेत्तर वादाची जागा मराठा - मराठेत्तर वादाने घेतली आहे. याच वादाचा एक भाग कनिष्ठ किंवा इतर मागास जातिचे राजकारण आहे.

## ३.११ कनिष्ठ जातीचे राजकारण :

महाराष्ट्राच्या राजकारणावर उच्च जातिच्या प्रक्रियेचा दीर्घकाळ ठसा आहे. ब्राह्मणेत्तर चळवळीपूर्वी तर ब्राह्मणाचेच राज कारणावर वर्चस्व होते. ब्राह्मणेत्तर चळवळीनंतरच्या वर्चस्वात उच्च कुलिन मराठ्यांनी भागिदारी मिळविण्यास सुरूवात केली. ब्राह्मणेत्तर चळवळीच्या काळात राजकिय आंदोलने ग्रामीण भागापर्यंत पोहचू लागल्याने आणि निवडणूकीचे राजकारण सुरू झाल्यामुळेही हे स्थित्यंतर घडून येण्यास हातभार लागला. त्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण मराठा व वर्चस्वासाठी ओळखले जाऊ लागले मात्र राजकीय सत्तेत त्याचे कनिष्ठ जातीचे राजकीय स्थान दुय्यम राहिले. १९६५ पर्यंत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे सातत्याने मराठा समाजातून आलेले होते याला अपवाद म्हणून जेव्हा अमराठी मुख्यमंत्री स्थापन झाले तेव्हाही आमदाराच्या संख्यातील मराठा समाजाचे प्राबल्य अजिबात बदलले अथवा कमी झालेले नव्हते. सुरवातीपासूनच लोकप्रतिनिधीमध्ये मराठा जातीतील उमेदवाराचा प्रभाव अधिक होता. मराठा जातीबरोबर नेहमीच ब्राह्मण, लिंगायत, लेवा पाटील या बलिष्ठ जातीही सोबत करायच्या. मात्र महाराष्ट्रातील विविध विभागापुरत्याच भिंगाया, लेवापाटील या जाती मर्यादित असत. ठराविक जागावरून ब्राह्मण उमेदवारांना प्रमुख पक्षातून निवडणूक लढविता येत असे. मात्र मराठा पक्षातून निवडणूक लढविता येत असे. मात्र मराठा जातीचे तसे नव्हते व नाही. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र हे या जातीचे बालेकिल्ले असले तरी मराठवाडा, विदर्भ या विभागामध्येही या जातीला भरपूर प्रतिनिधीत्व मिळत असल्याचे दिसून येते. ब्राह्मण व क्षत्रिय जाती अशाप्रकारे महाराष्ट्रातील दलित सत्तेवर असताना अथवा सत्ता केंद्रांवर असताना दलित व आदिवासी जागांना निवडणूकातील राखीव जागामार्फत त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळत गेले. मात्र अन्य मागास किंवा कनिष्ठ जातीबद्दल असे म्हणता येत नाही. ज्या भागात अथवा ज्या मतदार संघाला ती अन्य मागास जाग प्रभावी असेल तेवढ्याच मतदार संघाच्या जातीच्या नेतृत्वाला उमेदवारी मिळत असे, अर्थात तशा प्रकारचे जागाचे वाटपही अगदीच योग्य आहे. विदर्भात अन्य मागास जातीची बेरीज ४०% टक्के असली तरी एवढे प्रतिनिधीत्व त्या जातींना कधीच मिळत नाही. जातीचे बळ कनिष्ठ लक्षणीय असताना देखील निवडणुकीत काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळत नाही. जातीविभागामुळे जाती एकत्र येत नसत. अन्य मागास जातीचा मतदार हा मराठा या प्रबळ जातीच्या बरोबर असतो, असे गृहीत तत्त्व आहे.

१९७१ नंतर केंद्राच्या आशिर्वादाने मराठा वर्चस्वाच्या काँग्रेसला अंतर्गत शह देण्याचे प्रयत्न सुरू झाले. महाराष्ट्रातील काँग्रेस आमदार मंत्री यांच्यातील पाटील/देशमुखाचे प्रमाण कमी होऊन कनिष्ठ जातीच्या प्रतिनिधीची संख्या वाढली हा बदल प्रतिकात्मकरीत्या वरवरचा असला तरी अस्थायी स्वरूपाचा होता. पण त्यातून कनिष्ठ जातीचे पदार्पण झाले. राजकारणात कनिष्ठ जातीला चालवल्या गेलेल्या महत्त्वाकांक्षा आणि मराठा वर्चस्वाचे सातत्य यातून पुढच्या राजकारणात

वळण मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली. काँग्रेसच्या अंतर्गत कनिष्ठ जातींना थोडा वाव मिळत असतानाच बहुजन युवा हिंदू एकता या सारख्या संघटना उभ्या राहिल्या कनिष्ठ जातीमधील तरुणांना सहभाग हे या संघटनाचे ठळक वैशिष्ट होते. मंडळ आयोगाच्या निमित्ताने कनिष्ठ जातीच्या ऐक्याची प्रक्रिया सुरूवात झाली. त्यातूनच ओ.बी.सी. महासंघाच्या कामाला गती मिळाली.

भारतीय जनता पक्षानेही १९८२ पासून महाराष्ट्रात कनिष्ठ जातीचे राजकारण करण्यावर लक्ष केंद्रित केले. शहरी मध्यम वर्गीय आणि ब्राह्मणी पाठिंब्यावर राजकारण टिकून राहणे अवघड आहे. याची जाणीव या पक्षाला आपल्या नव्या अवतारात झाली. त्याचबरोबर मराठा जातिमध्ये शिरकाव करणे अवघड असल्याचेही लक्षात आले. त्यामुळे ग्रामीण भागात कनिष्ठ जातींची पताका खांद्यावर घेऊन भाजपाने गेल्या काही दशकात महाराष्ट्रात पाय रोवल्याचे प्रयत्न केले. शिवसेनेने अन्य मागास जातींना उमेदवारी मिळवून देणारा पक्ष आवश्यक आहे ही आवश्यकता लक्षात घेऊन. शिवसेनेने १९८९ सालच्या लोकसेना आणि १९९० सालच्या विधानसभा निवडणूकात मागास जातीच्या उमेदवारांना उमेदवारी देऊन (इ.मा.जा.) इतर मागास जाती आवर्जून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विदर्भ भागात शिवेसना - भाजपा युतीला मर्यादित यशही मिळाले. म्हणजेच काँग्रेसमधील मराठा वर्चस्वाला मिळालेला शह, 'ओबीसी' अस्मितेचा शोध घेण्यास झालेली सुरूवात आणि भाजप, शेतकरी संघटना आणि शेवटी शिवसेना यांच्या ग्रामीण राजकारणाला आणि कनिष्ठ जातीच्या राजकारणातील प्रवेश राजकीय जातील. एक प्रमुख घटक बनला मंडळ आयोगाच्या अहवाल १९८० आणि त्याच्या अपलब जाणीवेची घोषणात १९९० यामुळे कनिष्ठ जातीचे राज्याच्या राजकारणातील स्थान दृढत्तर झाले आहे असे दिसते.

## ३.१२ मंडल आयोगाचा वाद :

भारतीय राज्य घटनेच्या कलम ३४० प्रमाणे भारतातील इतर मागास राज्यात (इ.मा.जा.) या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा घेण्याकरिता केंद्र सरकारने काकासाहेब कालेलकराच्या अध्यक्षतेखाली २९ जानेवारी १९५३ रोजी राष्ट्रपतीने आयोगाची स्थापना केली. ३० मार्च, १९५५ रोजी राष्ट्रपतीस अहवाल सादर केला या आयोगाने २३९९जाती-जमातीच्या इतर मागास जातीच्या सदरात समावेश केला होता. मागासलेपणा हा जातीच्या निकषावर ठरविण्याबाबत आयोगाच्या सदस्याला एकमत नव्हते. स्वतः कालेलकर जातीच्या आधारे मागासलेपणा ठरवण्यास प्रतिकूल होते. १९५६ साली हा अहवाल लोकसभेसमोर सादर करण्यात आला. परंतु त्याची चर्चा लोकसभेच्या सदनात झाली नाही. आयोगाच्या शिफारसीच्या आधारे केंद्र सरकारने इ.मा.जा. देशव्यापी स्वरूपाची यादी तयार करायची नाही. असा निर्णय घेतला. तसेच इ.मा.जा. करीता राखीव जागा ठेवण्याची गरज नाही असाही निर्णय घेतला इ.मा.व. जातीची यादी (सूची) प्रत्येक राज्याने जाऊन असल्यास बनवावी व त्यांच्या सेवामध्ये विविध शासकीय सेवामध्ये जातीकरिता सेवा घ्यावयास अशी शिफारस करण्यात आली सरकारी नोकरीत दोनशेहून अधिक कनिष्ठ जाती करीता दहा (१०%) टक्के आणि (भ.वि.) भटक्या व विमुक्त जातीकरिता चार (४%) टक्के राखीव जागाची तरतुद करण्यात आली. राज्यघटनेच्या ३४० कलमान्वये भारतातील मागासलेल्या जातीच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची पडताळणी पाहण्याची राष्ट्रपतींनी १९८७मध्ये दुसऱ्या मागास वर्गीय आयोगाची नेमणूक केली होती. या मंडल आयोगाच्या कार्यकक्षेत खालील नोंदलेल्या भागाचा समावेश करण्यात आला आहे.

१) सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले वर्ग निश्चित करण्यासाठी आधार ठरविणे (सामाजिक / आर्थिकरीत्या)
२) त्याच्या उन्नतीच्या दृष्टिने योजिलेले उपाय त्याची शिफारस करणे. (योजनायुक्त शिफारस)
३) केंद्र व राज्यशासनाच्या सर्व सार्वजनिक सेवा पदे आवश्यकते पुरेसे प्रतिनिधीत्व प्राप्त करून देण्यासाठी राखीव जागाची तरतूद करणे.
४) सत्या-सत्यता पडताळण्यासाठी राखीव जागाचा अहवाल सत्य घटनावर आधारित करून त्या अहवालाच्या तयारीनीशी शिफारशीसहित राष्ट्रपतींना अहवाल सादर करून त्यांची पुर्तता कार्य प्रणित करणे.

३१ डिसेंबर १९७९ पर्यंत मंडल आयोगाचा अहवाल राष्ट्रपतींना सादर करण्याचे कालमर्यादाचे बंधन त्यावर होते. १९८०पर्यंत अहवाल सादर करण्याची मुदत वाढ देण्यात येऊन, १९८१ मध्ये हा अहवाल केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला. मंडल आयोगाच्या अहवालाच्या प्रस्तावनेत मागासलेल्या वर्गाच्या विशेष प्रश्नाबाबत आपली भूमिका आयोगाने स्पष्ट केली आहे. आयोगाच्या मते या वर्गाचा मुलभुत प्रश्न सामाजिक शैक्षणिक मागासलेपण असून, गरिबी ही ह्या दोन उणीवामुळे निर्माण झाली आहे. या उणिवा आणल्या सामाजिक, चौकटीत खोलवर रूजलेल्या आहेत त्यांच्या निर्मूलनासाठी सामाजिक बांधणीमध्येच बदल करण्याची गरज आहे. या आयोगाने देशातील ३७४३ जाती व सामाजिक घटक याची मागासवर्गीय म्हणून निश्चिती केली. त्याची लोकसंख्या ५२% होती. १९६१ च्या जनगणना अहवालाप्रमाणे मंडल आयोगाने जात आधार घेऊन ११ घटकांच्या आधारे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा निश्चिती केला. त्यात त्या जातीचे प्रचलित वर्णव्यवस्थेतील स्थान, अंगमेहनतीवर त्याचे प्रामुख्याने अवलंबून असलेली जीवन, शाळेत न जाऊ शकणाऱ्या मुलांचे प्रमाण, कच्चे घरे इ. म्हणून निश्चीत केले आहेत. त्याचा आधार घटक लोकसंख्येच्या आधारे निश्चित केले आहेत.

१) ओ.बी.सी.चे प्रमाण ५२% तरी जागाच्या प्रमाणात सुप्रिम कोर्टाच्या निर्णयामुळे ५०% टक्के जागा राखीव ठेवता येत नाहीत तरी २७% जागा ओ.बी.सी.साठी राखीव ठेवाव्यात.
२) ओ.बी.सी.च्या राखीव जागासाठी पदोन्नती असावी.
३) अनुसूचित जाती व जमातीच्या बाबत अनुशेष भरून काढण्यासाठी (Rosta System) रोष्टर पद्धत (बिंदू नामावली) अमलात आणावी.
४) खाजगी उपक्रम (ज्यांना शासकिय मदत मिळते) विद्यापीठ व कॉलेज येथे सुद्धा नोकरीसाठी ओबीसीकरिता राखीव जागा ठेवाव्यात.
५) ओबीसी मध्ये प्रौढ साक्षरतेसाठी जास्तीत जास्त प्रसार करावा तसेच शैक्षणिक संस्थेत, प्रवेश मिळवण्यासाठी राखीव जागेचा निकष लावावा. उच्चतेचे ज्ञान, शास्त्रीय शिक्षण, वैद्याकिय, धंदेवाईक शिक्षण यामध्ये २७% जागेचा निकष नियम लावावा.
६) ग्रामीण कारागिरासाठी धंदेवाईक शिक्षण व वित्तीय मदत यासाठी ओ.बी.सी. साठी वित्तिय महामंडल स्थापावे.
७) राजकारणाची पकड दिली होण्यासाठी ओ.बी.सी. यांना जमिनीचे वाटप करावे. भूमिहिनांना जोपर्यंत जमिनी मीळत नाही. तोपर्यंत त्यांना नोकरीच्या जागी राजकारण यावर आरक्षण द्यावेत. तेव्हाच उच्चवर्णियाची पकड ढिली केली जाईल. सध्या अतिरिक्त जमीन अ.जा. व अ.ज.ना. शासनाद्वारे करण्यात येते. त्यावरील विशिष्ठ प्रमाण ओ.बी.सी.साठी राखून ठेवावेत.

८) काही जाती त्यांच्या व्यवसायावरून ठरविल्या जातील. उदा. कोळी, बंजारा, बांस फोरासा, खंटापे इ. जातींना काही भागात बहिष्कृत केले जाते. बहिष्कृत समजले जाते. आयोगाने जरी या जातींना इतर मागासलेले म्हणून यादीत टाकले असले तरी केंद्र शासनाने या जातींना अ.जा. अ.ज यादीमध्ये अंतर्भाव करण्याचा विचार करावा अशी आयोगाने शिफारस केली आहे.

९) केंद्र व राज्य शासनाचे ओ.बी.सी. हिताकरीता स्वतंत्र विभाग मंत्री अथवा खात्याकडे सुपूर्द करावा.

१०) ओ.बी.सी. चे निवडणुकीद्वारे पुरेसे प्रतिनिधीत्व असण्यासाठी त्याचे स्वतंत्र मतदार संघ निर्माण करावेत. उदा. हिमाचल प्रदेशात गड्डी जमात, महाराष्ट्रात नव बौद्ध किनाऱ्या लगतच्या भागात कोली (कोळी).

११) या शिफारसीचा आढावा वीस वर्षांनंतर घ्यावा. तोपर्यंत त्या अमलात राहतील.

वरील मुद्दे परीक्षण, निरीक्षण केन्द्र शासनाच्या राज्यातंर्गत हस्तक्षेप व केंद्राचा वर चष्मा असल्याने इंदिरा गांधीच्या नेतृत्वाखालील तत्कालीन केंद्र सरकारने वरील शिफारशीच्या अंमलब जावणी बाबत कोणताच ठोस निर्णय घेतला नाही. महाराष्ट्र सरकारने मंडल आयोगाद्वारे कनिष्ठ जातींना पुरेशा राखीव जागा देण्याच्या प्रश्नांबाबत संदिग्ध भूमिका घेतली. मंडल आयोगाच्या अहवालास सुरवातीपासूनच महाराष्ट्र शासनाने राज्यातील दोनशेहून अधिक कनिष्ठ जातीला मिळून दहा (१०%) टक्के राखीव जागाची तरतूद केली होती. त्याखेरीज भटक्या विमुक्तासाठी चार (४%) टक्के जागांची तरतूद आहे. मंडल आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर त्याला स्पष्ट विरोध करण्यात मराठा महासंघाने पुढाकार घेतला होता. राखीव जागा आर्थिक निकषांवर असाव्यात असा मराठा महासंघाचा आंधीपासून आग्रह होता कनिष्ठ जातीसाठी राखीव जागा ठेवल्याने, मराठा जातीतील बहुसंख्य गरीब लोकांवर अन्याय होईल. अशी भूमिका मराठा महासंघाने घेतली. प्रथम वसंतदादाच्या शासनाने आणि नंतर इतर मंत्रिमंडळांनी मंडल अहवालाकडे दुर्लक्ष करणेच पसंत केले. मंडल अहवाल मान्य आहे पण त्याबाबत केंद्रिय पातळीवर निर्णय होणे आवश्यक आहे. यासारखी गोलमाल तत्त्वे राज्यपातळीवरील मराठा नेतृत्वाने केली.

१३.८.१९९० रोजी भारत सरकारने हा अहवाल स्वीकारल्याची अधिसूचना जारी केली. त्याआधी ह्या अहवालावर लोकसभेत वादातीत चर्चा झाली होती. अहवालाच्या शिफारशी स्वीकारण्याची घोषणा त्यावेळी पंतप्रधान व्ही.पी.सिंग ह्यांनी ७ ऑगस्ट १९९० रोजी केली. १३ ऑगस्ट १९९० च्या अधिसूचित द्वारा केंद्र सरकारने मंडल आयोगाच्या खालील शिफारशी स्वीकारल्या.

१) केंद्र शासनाच्या नागरी सेवामध्ये असलेल्या पदामध्ये व सेवामध्ये २७% जागा ओ.बी.सी. करीत राखीव.

२) सदर जागा सरळ भरतीसाठी असतील.

३) गुणश्रेष्ठ मेरीट (गुणवत्तेनुसार) प्रमाणे भरण्याच्या जागात वरील जागेचा समावेश करता येणार नाही.

४) पहिल्या टप्प्यात ओ.बी.सी. म्हणजे ज्या जागी मंडल कमिशन व राज्य शासनाच्या दोन प्रकारच्या यादीत असतील अशाच जातींना ''सामाजिक दृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या'' मागासलेल्या म्हणून समजण्यात येईल.

५) वर नमूद केलेल्या राखीव जागाचे प्रमाण

७.८ १९९० पासून अमलात येईल.
मंडल आयोगाच्या शिफारशी व्ही.पी.सिंग सरकारने स्वीकारल्यानंतर केंद्र शासनाची अधिसूचना जारी झाल्यानंतर उत्तर भारतात. दंगली पेटल्या किंवा राजकियरीत्या दंगली पेटविल्या गेल्या ऑगस्ट १९९०च्या भारत सरकारच्या राखीव जागा २७% ठेवण्यात या अधिसूचनेनंतर जे हत्याकांड झाले त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयातील कोर्टाने श्रीमती इंदिरा सोहनी यांची रीट अर्ज दाखल करून या अधिसूचनेला 'स्थगिती' द्यावी अशी विनंती १.१०.१९९० रोजी केली तोपर्यंत मंडल आयोगाच्या शिफारसीला हरकत घेणारे १० रिट अर्ज दाखल झाले होते या सर्वांचा एकत्रितपणे निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश एफ्. एच. कानिया यांच्या खंडपीठाने बहुमताने दिनांक १९-११-१९९२ रोजी दिला.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायिक निर्णयामुळे प्रदीर्घ काळ चाललेल्या या वादातीत प्रकरणावर आता पुर्णाहूती काळाचा पडदा आहे. या न्यायिक निर्णयामुळे राखीव जागाचे प्रमाण ५०% टक्क्याहून अधिक असणार नाही. तसेच पदोन्नतीकरिता राखीव जागाची न्यायिक तरतूद नाही. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय प्रामुख्याने केंद्रशासित सेवासाठी राष्ट्रीयकृत बँका आयोग, निगम व उपक्रम इ.ना लागू होता. केंद्राने याप्रमाणे अधिसूचना काढल्यावर राज्यशासन त्या धोरणानुसार आपापल्या राज्यात ओ.बी.सी. साठी जागा राखीव ठेवतील महाराष्ट्र राज्यात अनुसुचित जाती व अनुसूचित जमातीसाठी अनुक्रम १३% व ७% विमुक्त व भटक्या जमातीसाठी ४% व इतर मागास वर्गियासाठी १०% असे राखीव जागाचे ३४% प्रमाण आहे. केंद्र सरकारच्या सेवामध्ये आतापर्यंत फक्त अनु. जाती, जमाती यांच्यासाठी राखीव जागा होत्या. या व्यतिरिक्त, माजी सैनिकासाठी, आर्थिक दृष्ट्या कमकुवत लोकांसाठी /घटकासाठी, अपंगासाठी, अंधू विकलांग (शारीरिकदृष्ट्या) प्रकल्पाबाधित व्यक्तींसाठी मतीमंद (Slowlearner / dislaa) या व्यक्तीसाठी राखीव जागा ठेवण्यात येतात. (या सर्व मिळून एकूण २३% होतात.) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील विमुक्त भटक्या जाती / जमाती इतर मागासवर्गीय राखीव जागांच्या प्रमाणात वाढ होईल. तसेच राज्य शासनाने श्री. मुटाटकर यांच्या अध्यक्षेखाली एक समिती नेमली आहे. महाराष्ट्रातील १४० जाती, जमाती यांच्या समावेश अनुसूचित या सदराच्या सुकर घटणात्मक सूचीत (अ.जा.अ.ज.) समाविष्ठ करावे अथवा करू नये हे समिती ठरवील. महाराष्ट्रातील २१८ जाती/जमातीपैकी २१५ जाती/जमाती म्हणजे पावर / लाडसी / ठाकर ह्या होत. शासनाच्या मते ह्या जाती / जमातीच्या अंतर्भाव सूचीत असणे आवश्यक आहे.

**मंडल आयोग**

## ३.१३ मंडल आयोगाच्या शिफारशी व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावरील परिणाम

राजकिय पक्षांनी सत्ता संपादण्यासाठी राजकिय आसन मजबूत करण्यासाठी इ.मा.जा. स्वतःकडे आकर्षित कराव्यात काही अंशी यश संपादन केले. याची राजकिय प्रक्रियात्मक प्रचीती १९८९-१९९०च्या निवडणूकीत आली होती. मात्र मदत जाती/जमातीच्या अभ्यास विश्लेषणात्मकरीत्या मतदार प्रवाह राजकिय संख्या केवळ इतर-मागास जातीच्या आधारावर निवडणुका जिंकता येत नाहीत हे गृहीत तत्त्व जाणले. कारण ज्या अर्थाने महाराष्ट्रातील मराठा जातीसमूह एकसंघ

व बलाढ्य आहे. त्या अर्थाने मागास जाती एकसंघ नाहीत. इ.मा. सांख्यिक दृष्ट्या असंख्य आहेत. त्यांच्या राजकीय निष्ठा विविध राजकिय पक्षात विभागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शिफारसीची अमलबजावणी करावाच्या निर्णयांचे महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम होणे साहजिकच ओघानेच जाणवते.

मंडल आयोगाच्या शिफारसीची कार्यवाही करण्याचा निर्णय राष्ट्रीय स्तरावरील जनता दलाच्या सरकारने घेतला असल्याने, महाराष्ट्रातील जनता दलाच्या अपेक्षा उंचावणे साहजिकच आहे. मंडलीकरण, मंडलीयंत्र, कमळडीकरण हे शब्द या वातावरणातून निर्माण झाले. या वातावरणाने इतर मागास जातीमध्ये नव चैतन्य निर्माण झाले. या जातींना जनता दल, डाव्या पक्षाच्या पाठीशी आपली ताकद उभारायला सुरूवात केली. विदर्भात अन्य मागास जाती, मागास वर्गीय व मुस्लिम यांची एकूण मतदारसंख्या ७५% एवढी होत असल्याने ती ताकद जनता दल व मीत्र पक्षांना मिळाली तर आपली राजकीय बळ कमी पडेल. अशी भीती इतर / अन्य पक्षांना वाटू लागली याचेच पर्यवसान म्हणजे उमेदवाराची यादी तयार करताना इतर मागास जातीच्या उमेदवारीचा अधिक गांभिर्याने विचार करण्यात आला, त्याचा राजकिय प्रक्रियात्मक प्रचिती १९९१ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी आली. १९९१ पर्यंत काँग्रेस पक्ष कनिष्ठ जातींना मराठ्यांचा सहकारी मानत असे. ती समज संपून, कनिष्ठ जातींचा स्वतंत्र विचार करणे त्यांना भाग पडले. ज्या विशिष्ट मतदार संघात कनिष्ठ जातीचा प्रभाव, अधिक संख्याबल, त्या मतदार संघात उमेदवारी काँग्रेसने नाकारलेले इतर मागास जातीचे अभिजन शिवसेना किंवा भाजपात गेले. आपला सामाजिक पाया व्यापक करायाच्या उद्देशाने या काँग्रेस सत्ता पक्षांनी आपली उमेदवारी पूर्वाश्रमीच्या काँग्रेसजनांना देऊ केली.

तदर्थ राजकिय स्थीती / वातावरणाचा १९९१ च्या लोकसभा निवडणूक निकालावर परिणाम झाला नाही. १९९१च्या लोकसभा राजीव गांधीची हत्या झाल्याने काँग्रेसबद्दल जनसामान्यात सहानुभुतीचे वातावरण निर्माण झाले होते. तरीही या पुढील काळात राजकीय व्यहरर्चनेच्या दृष्टीने सर्व राजकीय पक्षांनी इतर मागास जातीच्या राजकीय आकांक्षा / इच्छा याची दखल घ्यायला सुरूवात केली.

## ३.१४ भाजपा / इतर जाती :

१९८० पासून इतर मागास जातिचा पाठिंबा सातत्त्याने प्राप्त व्हावा याकरिता प्रयत्नशील असलेला भारतीय जनता पक्षाने मंडल आयोगाच्या शिफारसीची महाराष्ट्रात अमल बजावणी करावी अशी मागणी केली. भा ज.प.चा मुख्य चेहराच उच्च जातीय, शहरी, मध्यमवर्गीय असल्याने कनिष्ठ जातींना त्यांच्याकडे वळवणे तसे अवघड होते. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी भाजपाच्या राष्ट्रिय नेतृत्वाने मुंडे, डांगे, फरांदे या कनिष्ठ जातितील कार्यकर्त्यांकडे महाराष्ट्र शाखेचे नेतृत्व सोपविण्याचा राजकीय दृष्ट्या व्यावहारिक निर्णय घेतला. त्यामुळे भाजपा कनिष्ट जातिला अनुकूल असल्याचे चित्र जनसामान्याच्या मनात निर्माण करण्यात आले. 'माधव' माळी, धनगर, बंजार, वंजारी बुरूड जातिचे हे नेते असल्याने याचा अन्य काही इतर मागास जातीच्या पाठिंबा मिळविण्याला भा.ज.प.ला काही अंशी यश प्राप्त झाले. हा निर्णय वास्तव स्वरूपाचा असल्याने त्याचे. धारिष्ठ भाजपाने १९९५च्या निवडणूकीतून दाखवून दिले. राजकिय स्थित्यंतर/सत्तांतर महाराष्ट्रात शिवसेना, भाजपा युतीने सरकार सत्तेवर आले. गोपीनाथ मुंडे यांची भाजपाच्या

विधीमंडळाने पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली आणि महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकाचे स्थान, उपमुख्यमंत्रीपद देण्यात आले. अण्णा डांगे यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. भाजपाच्या पक्षाध्यक्षपदी सुर्यकांत वहाडने या व अन्य मागास वर्गीय नेत्यांची करण्यात आलेली निवड ही या फलदायी राजकिय प्रक्रियात्मक व्यहरचनेचा एक भाग आहे. थोडक्यात इतर मागास वर्ग / जाती / जमाती यांच्या राजकिय आकांक्षाची दखल भाजपाने सातत्याने घेतली आहे हे सिद्ध साध्य आहे.

## ३.१५ शिवसेना / इतर मागास जाती :

१९८५ नंतर कनिष्ठ जातिच्या राजकारणाचा आकार/आढावा शिवसेनेच्या अभ्यासकांनी त्यांचा आकार/विस्तार याचा परामर्ष घेतला. भाजजा व शिवसेना यांच्यातील मुख्य फरक त्यांच्या राखीव जागा बद्दलच्या भूमिकेचा दिसतो. शिवसेनेने एकूणच राखीव जागाच्या तत्त्वाबद्दल साशंक भूमिका घेतलेली दिसते. राखीव जागा जातिच्या आधारे कशाला ? राखीव जागेचा फायदा कोणाला मिळतो ? हे प्रश्न सेनेचे नेहमीचेच आहेत त्यामुळे शिवसेना दलितांच्या मनात ठसली नाही. हे उघड सत्य आहे. त्याचे पर्यवसान कनिष्ठ जातीच्या राजकारणाचे त्रीसूत्री संकल्पना कार्यरत राजकिय जातीची प्रक्रिया कार्यरूप घेऊ लागली. त्यामध्ये जातीच्या संकल्पने ऐवजी ''भीमशक्ती-शिवशक्ती-दलितशक्ती'' एकत्र ऐच्छिक राजकिय इच्छा साधतात, की कसे असा संभ्रम उच्च वर्णिय मराठा शिवसैनिकांच्या मानाने ओढ / वेध घेतला. त्याचे सर्व गुप्तंगु दलित नेते शिवसेना, भाजपात साध्य होईल असे वाटू लागले. किबहुना दलितांसाठीच्या राखीव जागांमुळेच कनिष्ठ जातीच्या संधी. जातात असा संभ्रम निर्माण झाला. असा संभ्रम करून देण्यात शिवसेना अग्रेसर राहिली. मात्र मराठा जातिचे प्राबल्य / वर्चस्व आणि त्यातून कनिष्ठ जातिमध्ये असलेली अस्वस्थता याचा शिवसेनेने फायदा उठविला. आक्रमक भूमिका आणि रोखठोक भाषा याच्या आधारे शिवसेनेने बिगर मराठा जातिच्या तरुणांना आकर्षित करून घेतले मराठा आणि नवबौद्ध यांच्यावर शिवसेनेने आपल्या टीकेचा रोख ठेवला. महाराष्ट्रात सगळी सत्तास्थाने मराठ्यांनी बलदंड / आर्थिक बळांच्या जोरावर राजकीय प्रक्रियेद्वारे बळकावली आणि सगळ्या सवलती नवबौद्धांनी लाटल्या असा उलट प्रचार केला. एकूण आढावा घेता ग्रामीण भागात कनिष्ठ जातींच्या पाठिंब्यावर शिवसेनेने आपला जम / आपली पक्कड मजबूत केली. काँग्रेस वासी बुजुर्ग मराठा आणि दलित हे मूर्त शत्रू सेनेने कनिष्ठ जातींच्या बेकार तरुणांपुढे उभे केले. या सर्व राजकिय बल प्रक्रियात्मक राजनिती / डावपेचानुसार १९९०च्या विधानसभा निवडणूकीत बऱ्यापैकीच यश प्राप्त केले. काँग्रेसमध्ये रहात मराठ्यांना अनेक तडजोडी करण्यात लागली. म्हणून 'मराठा महासंघ' अण्णासाहेब पाटील यांनी जातीच्या आधारावर राखीव जागा देण्यास विरोध केला. विशेषतः कनिष्ठ जातींना राखीव जागा देण्याच्या धोरणातला मराठा महासंघ आक्षेप घेतो. महासंघाचे नेते शशिकांत पवार यांनी शिवसेनेसी चर्चा करून आंदोलनाची रूपरेषा ठरविण्याचे घोषित केले. याचाच अर्थ मंडल आयोगाच्या शिफारसीची अमलबजावणी करण्यास ज्या मराठा नेत्यांच्या विरोध होता ते शिवसेनेस अनुकूल झाले. अशा प्रकारे इ.मा व. जातीविषयक आक्रमक धोरणाचा दुहेरी फायदा शिवसेनेला झाला. कोकण, मराठवाडा आणि काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रात शिवसेनेचा प्रसार होण्यास शिवसेनेचे राजकिय आक्रमण /राजक्रिय प्रक्रियाचे धोरण उपयुक्त ठरले व ते फायदेशीर झाले.

## ३.१६ काँग्रेस/इतर मागासवर्ग :

मराठा महासंघ नेत्याने काँग्रेस नेत्याशी घनिष्ठ संबंध असल्याने काँग्रेसला अडचणीत टाकणारी पावले मराठा महासंघ सहसा टाकत नाही. मंडल आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर महाराष्ट्र काँग्रेसने संदिग्ध भूमिका घेऊन वेळ निभावून नेली होती. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आपले मराठा अनुयायी आणि भाजपा शिवसेनेसारखे /कनिष्ठ जातीची बाजू घेणारे स्पर्धक याचा समतोल साधण्याचा कसोशीने प्रयत्न चालवल्याचे दिसते. केन्द्राने घोषणा केल्यावर काँग्रेसने केंद्राच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही कार्यरत करण्यासाठी हात झटकून टाकले. पण त्याच्यात मात्र या शिफारसीचे स्वागतच केले. परिस्थितीचा अंदाज घेत पुढे मात्र त्यांनीही मर्यादित भूमिका सोडून दिली; आणि सर्व समाज घटकाचे समाधान करण्याचा उपाय थोडक्यात राखीव जागाचे प्रमाण वाढवण्याचे धोरण अंगिकारले. ते कनिष्ठ जातींसाठी राखीव जागा आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बलासाठी राखीव जागा अशी समीकरणात्मक योजना काँग्रेस सरकारने घोषित केली. धनगर जातीचा भटक्या विमुक्त जातीत समावेश. त्यामुळे भटक्या विमुक्तासाठीच्या राखीव जागा आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बलांसाठी तीस (३०%) टक्के राखीव जागा, प्राध्यान्य प्रक्रियात्मक क्रमाने या योजनेला सर्व पक्षाचा पाठिंबा मिळविण्यात सरकार यशस्वी झाले. या योजनेमुळे कुणालाच तक्रार करण्यास वाव राहिला नाही.

या व अशा प्रकारच्या रचनाबद्ध धोरणामुळे मराठा हिंतसंबंध जोपासले जातात. कनिष्ठ जातिशी जवळीक साधून भाजप/शिवसेना विशेषत्वेकरून त्यांच्या भूमिका असंबद्ध ठरतील आणि काँग्रेसची वाट सुकर होईल अशी काँग्रेसच्या नेत्याची धारणा होती; या बरोबरच वाढत्या खाजगीकरणामुळे (Privatision) खाजगी क्षेत्रात अधिक रोजगार उपलब्ध होणार असल्याचे वरिष्ठ जातींना अधिक गलेलठ्ठ, आकर्षक पगार व अधिकार असलेली पदे उपलब्ध होतील. पर्यायाने राखीव जागांच्या धोरणाचा फटका वरिष्ठ जातींना बसणार नाही. त्यामुळे राखीव जागाचे प्रमाण वाढवून बनणे त्याच गटांच्या फार मोठी नाराजी ओढवून घ्यावी लागणार नाही. याउलट सार्वजनिक चांगुल पणाचे मानकरी होता येईल. अशी काँग्रेस पक्षाची मंडल आयोगाच्या शिफारसी बाबत व्यूहरचना होती. त्याद्वारे ओ.बी.सी.च्या असंतोषाची तीव्रता कमी करण्यात काँग्रेस पक्ष तात्पुरता यशस्वी झाला. तदर्थ परिस्थितीत या व्यूहरचनेची राजकिय, प्रशासकिय कार्य काही करण्यापूर्वीच १९९५ साली काँग्रेस पक्षाने सत्ता गमावली होती. हे वास्तव सिद्ध आहे.

## ३.१७ दलित राजकारण /दलित पक्षाची राजकिय धोरणात्मक प्रक्रिया

महाराष्ट्राच्या राजकारणात दलित राजकारण हा शब्द प्रयोग आता रूढ झाला आहे. अनुसूचित जातींना हिंदू व्यवस्थेत 'अस्पृश्य' संबोधले जायचे. महात्मा गांधींनी त्याच्या करीता 'हरिजन' हा शब्द प्रयोगाचा वापर केला होता. ब्रीटिशांनी शोषित जाति असा शब्द प्रयोग केला होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडात पददलित जाती जमातीच्या हितसंबंधाचे संवर्धन करण्याकरीता राज्यघटनेत त्यांच्या करिता राखीव जागांची तरतूद करण्यात आली अशा प्रकारच्या जाती / जमाती अ.जा./अ.जमाती सूचित समाविष्ठ करण्यात आले. या समाविष्ठ करण्यात आला. मात्र या जातिसमूहातील लोक स्वतःला दलित / दलित म्हणवून घेणे पसंत करतात. महाराष्ट्र शासनाच्या अ.जा.च्या सूचित ५९ जाति समुहाचा समावेश आहे. डॉ. आंबेडकरांनी १९५६ मध्ये आपल्या ७५०००/- अनुयायासह बौद्ध धर्म स्वीकारता पूर्वाश्रमीचा 'महार' जातीचा आणि

धर्मांतर केलेल्या जनसमुदाचा 'नवबौद्ध' (Neo-Buddism) or (Neo-Buddist) असा उल्लेख करण्यात येतो. महाराष्ट्र शासनाने अ.जा.च्या सूचित समाविष्ठ असणाऱ्या जातींना त्या सवलती व जी आरक्षणे केली आहेत, ती १९६२ साली केली त्यामुळे 'दलित' जातिसमूहात अनुसूचित जात व नवबौद्धाचा समावेश होत असतो. वर्तमान स्थितीतील अभ्यासक अनुसूचित जमातीचाही 'दलित' सदरात समावेश करतात. थोडक्यात प्रशासकीय शासकिय सवलतीचा फायदा त्याला झाला.

## ३.१८ स्वातंत्र्योत्तर कालखंड :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात डॉ. आंबेडकर प्रणित दलिताच्या आत्मोन्नतीच्या चळवळ्याचे स्वरूप व कार्यपद्धतीत गुणात्मक बदल घडून येणे. अपरिहार्य आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात डॉ. आंबेडकरांनी प्रथमतः बहिष्कृत जाति महासंघ त्यानंतर स्वतंत्र मजूर पक्ष आणि १९४६ च्या सुमारास शेड्युल्ड कास्टस फेडरेशन या राजकिय पक्षांची स्थापना केली. डॉ. आंबेडकर जरी दलिताचे एकमेव नेते असले, तरी त्याचा प्रभाव मराठी भाषिक प्रदेशापूरता सीमित होता. १९५१-५२ च्या सार्वजनिक निवडणुकीत डॉ. आंबेडकरांच्या शेड्युल्ड कास्टस फेडरेशन शेतकरी कामगार पक्षाबरोबर मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र आणि समाजवादी पक्षाबरोबर मुंबई शहरापुरता निवडणूक समझोता केला. पा.ना. राजभोज याचा अपवाद वगळता शेतकरी कामगार पक्षाचे सर्व उमेदवार डॉ. आंबेडकरासह लोकसभेच्या निवडणुकीत पराभूत झाले. विधान सभेत त्याच्या पक्षाचे केवळ तीन उमेदवार निवडून आले. स्वतःचा आणि आपल्या पक्षाचा दारूण पराभव डॉ. आंबेडकरांना अपेक्षित नसावा. अनुसूचित जाती जमाती करिता असलेल्या राखीव व जागाबाबत त्याचा भ्रमनिराश झाला. १९५५ पक्षाचे सरचिटणीस आणि एकमेव खासदार पा.ना. राजभोज यांनी पक्षाचा त्याग करून काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या धक्क्यातून सावरत असताना राजकारण करण्याऐवजी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सुरू असलेले समाजकारण करावे असा विचार त्यांनी या कालखंडात व्यक्त केला. त्यांचा हा विचार त्यांच्या सहकाऱ्यांना अमान्य होता आपला पक्ष अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने शे.का. फेडरेशन ऐवजी सर्व शोषित वर्गाचे प्रतिनिक असा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव डॉ. आंबेडकरांनी मांडला.

१९५७ साली डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली असावी. तरी डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या पद्धतीने पक्ष चालवू शकले नाहीत. बाबासाहेबांच्या अनुयायांना राजकारणात रस वाटत होता. आजच्या स्थितीतही त्यांना राजकारणाचा रस वाटतो पण ते राजकरणातही त्यांना जमले नाही. रिपब्लिकन पक्ष प्रादेशिक पातळीवरही त्यांना बांधता आला नाही. आजही तो पक्ष एका जाती पुरताच राहिला आहे. इतकेच नव्हे तर एका जातीच्या पक्षाचे अनेक गट झाले आहेत. रिपब्लिकन पक्षाचा इतिहास पक्षाच्या स्थापनेपासून आता पर्यंत नेत्यामधून झालेल्या संघर्षाचाच फाटाफुटीचा इतिहास आहे. १९५७ साली पक्षाने तेरा (१३) जागा महाराष्ट्र विधानसभेच्या जिंकून चांगले यश मिळविले, याचे बरेचसे श्रेय दलित नेत्यांची संयुक्त महाराष्ट्र समिती बरोबर केलेल्या युतीला जाते. संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर सहकार्य करण्याच्या प्रश्नावरून १९५९ साली बी.सी. कांबळे यांच्या नेतृत्वाखालील गट रिपब्लिकन पक्षातून बाहेर पडला. कारण त्याच्या समितीतील साम्यवाद्याच्या प्रभावाला आक्षेप होता. काही तज्ञ अभ्यासकांच्या मतेही फुट उच्चशिक्षित, आत्मशिक्षित दलित नेत्यामधील पक्षावर अधिक प्रभाव प्रस्थापित करायाच्या स्पर्धेची परिणती होती. कांबळेनी आपला वेगळा पक्ष स्थापन केला.

त्याला ते 'दुरूस्त पक्ष' असे म्हणत. गायकवाड गटाने समिती बरोबरची युती कायम ठेवली व विधानसभेच्या तीन (३) जागा मिळवल्या. कांबळे गटाला प्रजा समाजवादी पक्षाबरोबर केलेल्या युतीचा काहीही फायदा झाला नाही.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर रिपब्लिकन पक्षाच्या विघटनाला. थोडे वेगळे स्वरूप आले यशवंतराव चव्हाणांच्या बेरजेच्या राजकारणाचा भाग म्हणून दलित नेत्यांना काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. १९६९च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी सर्व प्रथम आर.डी. भंडारे काँग्रेसमध्ये दाखल झाले व त्यानंतर प्रा. नरेंद्र, कांबळे, दादासाहेब रूपवते, इत्यादी मंडळी आपापल्या अनुयायांसह काँग्रेसमध्ये आली. दुसऱ्या बाजूने चव्हाणांनी रिपब्लिकन पक्षाच्या गायकवाड गटाबरोबरही युतीची बोलणी सुरू केली, परंतु जागा वाटपाच्या प्रश्नावरून मतभेद झाल्यामुळे गायकवाड गटाने समितीबरोबर सहकार्य चालू ठेवले. या निवडणुकीत त्यांना केवळ चार (४) जागा मिळाल्या. यानंतर मात्र गायकवाड गटाने काँग्रेस विरोधी भूमिका बदलली आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेसबरोबर युती केली. काँग्रेसबरोबर सहकार्य करणाऱ्या प्रश्नावरून १९७० साली रिपब्लिकन पक्षात पुन्हा फुट पडली. विदर्भातील नेते बॅ. राजाभाऊ खोत, खोब्रागडे आणि इतर लहान घटक यांनी आपला स्वतंत्र गट निर्माण केला. अशा प्रकारे रिपब्लिकन पक्षाचे तीन (३) गटात विभाजन झाले. १९७२च्या विधानसभेच्या निवडणुकीत या सर्वांना मिळून एक (१) जागा मिळवता आली. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या कांबळे गटाने पक्षाशी युती केली आणि त्यात बी.सी.कांबळे लोकसभेवर निवडून गेले. युतीच्या राजकारणद्वारे १९८० ते १९९० च्या निवडणुकीत पक्षाने प्रत्येकी एक (१) उमेदवारी विधानसभेवर निवडणून आले. निवडणुकीच्या राजकारणात रिपब्लिकन पक्ष उत्तरोत्तर निष्प्रभ होत असल्याची जाणिव दलित नेतृत्वास झाली. शिवसेना - भाजपाच्या वाढत्या प्रभावामुळे काँग्रेस पक्षाशी समझोता करावयाचा विचार पक्षात उत्तरोत्तर प्रभावी होत गेला. मात्र २००९ सालच्या विधानसभा निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीशी या पक्षाने केलेला निर्णय फलदायी ठरला नाही हे सिद्ध झाले.

रिपब्लिकन पक्षातील फाटाफुटीमुळे दलितांचा राजकीय शक्तिपात झाला आणि त्याचबरोबर सर्वसामान्य दलित जनतेच्या त्यांच्या नेत्याबाबत भ्रमनिराश झाला. काँग्रेसबरोबर केलेल्या युतीच्या राजकारणातून काही मूठभर नेत्यांचा वैयक्तिक फायदा झाला. परंतु रिपब्लिकन पक्षाने व आंबेडकरी चळवळीचे मात्र अतोनात नुकसान झाले. एकमेकांशी भांडणाऱ्या दलित नेत्यांनी दलितांचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न न केल्यामुळे सर्वसामान्य दलितांमध्ये व विशेषतः नवशिक्षित दलित तरुणांमध्ये एका बाजूला नैराश्याची भावना वाढत गेली तर दुसऱ्या बाजूला आपली स्थिती सुधारण्यासाठी संघर्षाची भावना वाढत गेली. ही कोंडी मोडण्याच्या उद्देशाने १९७२ साली दलित पँथरसारख्या लढाऊ संघटनेचा उदय झाला. या संघटनेचे नेतृत्व राजा ढाले, नामदेव ढसाळ यांच्या सारख्या तरुण साहित्यिकांकडे होते. परंतु पुढे ही संघटना देखील दलित चळवळीत कोणता तात्त्विक आधार घावा या प्रश्नावर झालेल्या मतभेदामुळे फुटली. बौद्ध तत्त्वज्ञान व विचारांवर आधारित दलित चळवळीचे संघटन असणाऱ्या राजा ढालेंनी मास मूव्हमेंट ही वेगळी संघटना काढली. नामदेव ढसाळांनी दलित पेंथर या नात्याने काम चालू ठेवले. पुढे ते निष्प्रभ झाले. प्रा. अरुण कांबळे आणि रामदास आठवले यांनी भारतीय दलित पँथर या नावाने कार्य चालू ठेवले. प्रा. अरुण कांबळे पुढे १९८९ मध्ये जनता दलात गेले आणि हैद्राबादच्या मराठी साहित्य समेलनात २००९ साली मरण पावले.

१९७९ मध्ये मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात दंगली झाल्या. दलितांवर अत्याचार झाले. त्यावेळी दलितांच्या संरक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा मानून जोगेंद्र कवाडेनी दलित मुक्ती सेनेची स्थापना केली व अत्यंत आक्रमक पद्धतीने सवर्णाच्या विरोधात कार्य सुरू केले. परंतु कालांतराने त्यांनी हाजी मस्तानच्या दलित - मुस्लिम सुरक्षा महासंघाबरोबर युती करून दलितांच्या प्रश्नाला वेगळेच स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात म्हणजे रिपब्लिकन पक्षाच्या फाटाफुटीतून दलित समाजाचे केवळ राजकिय क्षेत्रातच विघटन झाले असे नाही. तर सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही दलिताच्या मध्ये फूट पडली. परिणामतः दलिताची शक्ति क्षीण झाली व त्याचा फायदा घेऊन हितसंबंधी गटांनी ग्रामीणांवर आणि शहरी क्षेत्रात राखीव जागा व सवलतीच्या प्रश्नावर दलित विरोधी भूमिका घेऊन त्यांच्याशी संघर्ष सुरू केला. हे सत्य वास्तव आहे. रिपब्लिकन पक्षाच्या फाटाफुटीमुळे सर्व दलितांचे नुकसान होत आहे या जाणिवेतून अनेक दलित नेत्यांनी वेळोवेळी ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न केले. अगदी प्रारंभी भैय्यासाहेब आंबेडकरांनी (ओंडकर) फुट पडू नये यासाठी प्रयत्न केले. १९५८ आणि १९६२च्या सार्वत्रिक निवडणुकीत दोन्ही गटाची जबरदस्त पीछेहाट झाल्यावर देखील या गटांना एकत्र आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. १९६७ च्या निवडणुकांपूर्वी दादासाहेब रूपवतेंनी असाच प्रयत्न केला. १९७१साली बी.सी. कांबळेंनी पुढाकार घेतला. हे सर्व प्रयत्न दलित नेत्यांच्या आपआपल्या भूमिकांना चिकटून राहण्यामुळे अयशस्वी ठरले. १९७८ साली मुंबईमध्ये झालेल्या सर्व दलित संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दलित पँथर्सनी ऐक्य येण्याशिवाय पर्याय नव्हता २६ जानेवारी १९४७ रोजी लाखो अनुयायांच्या उपस्थितीत दलित नेत्यांनी आपण यापूर्वी केलेल्या चुकांची दुरूस्ती करण्यासाठी एकत्र येत असल्याची घोषणा केली व ऐक्य प्रयत्नात टिकविण्याच्या शपथा घेतल्या. परंतु या सर्वांना एकत्र असणारी पँथर्स संघटना फुटल्यामुळे हा प्रयत्न देखील फसला. रिडल्सच्या (Reduls) प्रश्नावर दलितांच्या संघटित शक्तीचे जे प्रदर्शन झाले त्यातून पुन्हा एकदा दलितांच्या ऐक्याचे महत्त्व स्पष्ट झाले. वेगवेगळ्या गटांचे नेते ऐक्याची भाषा पुन्हा एकदा बोलू लागले परंतु प्रत्यक्षात. त्या दिशेने फारसा गंभीरपणे पुढाकार घेतला नाही. ९व्या लोकसभेसाठी रिपब्लिकन पक्षाच्या वेगवेगळ्या पक्षाबरोबर युती करून निवडणुका लढवल्या. गवई रामदास आठवले. (भा.द.पँ.) भारतीय दलित पँथर्स यांनी काँग्रेस बरोबर तर प्रकाश आंबेडकरांनी (भा.रि.प.) भारतीय रिपब्लिकन पक्ष काँग्रेसविरोधी राष्ट्रीय मोर्च्याबरोबर युती केली व निवडणुका लढवल्या. या संदर्भात आंबेडकरांची भूमिका ही होती की तात्कालिन परिस्थितीत काँग्रेस पक्ष हा शत्रु क्रमाक (१) एक असून भाजपा-शिवसेना युतीचा धोका त्यापेक्षा कमी आहे. या भूमिकेमुळे अनेकांची आंबेडकरांवर भाजपा- शिवसेना या जातीयवादी युतीला अप्रत्यक्षपणे सहाय्य केल्याची टीका केली. त्याच्या मते भूमिकेमुळेच ही युती राज्यात चौदा (१४) जागा मिळवू शकली. नवव्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या गटाचा झालेला दारूण पराभव दलित युवकांना प्रक्षुब्ध करण्यात पुरेशा होता. निवडणुकानंतर आपल्या नेत्यावर ऐक्य करण्यासाठी दबाव आणण्याच्या दृष्टिने डॉ. आंबेडकरांच्या ३३व्या पुण्यतिथीच्या दिवशी (६ डिसेंबर १९८९) सिद्धार्थ नगरातील नऊ दलित युवकांनी आमरण उपोषणाला सुरूवात केली. १९ डिसेंबर १९८९ रोजी झालेल्या बैठकित तेरा संघटना व गटाचे नेते विसर्जन करून डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आल्याची घोषणा केली.

६ जानेवारी १९६० रोजी प्रक्रियेवर लाखो दलितांच्या साक्षीने शिक्का मोर्तब करण्यात आले १९९० ते १९९६ या कालखंडात रिपब्लिकन पक्षातील मतभेद उत्तरोत्तर तीव्र होत गेले. महाराष्ट्राच्या राजकारणात दलित शक्ती निष्प्रभ झाली. १९९५ साली महाराष्ट्रात शिवसेना भाजपा युती बरोबर आल्यानंतर पुन्हा एकदा रिपब्लिकन पक्षातील ऐक्य प्रक्रियेला गती मिळाली.

१९९७ साली मुंबईत रमाबाई नगरात (घाटकोपर) झालेल्या दंगलीनंतर पुन्हा एकदा दलित ऐक्याची प्रक्रिया सुरू झाली. १९९८ साली पक्षातंर्गत मतभेद असताना रिपब्लिकन पक्षाने काँग्रेस निवडणुकीत समीकरण / समेटीकरण केले. १९५७ नंतर म्हणजेच दीर्घ कालावधीनंतर रिपब्लिकन पक्षाला उल्लेखनीय यश मिळाल्याने पक्षातील मतभेदाची अटी कमी होण्यास आणि नेत्यातील ऐक्य टिकण्यास हातभार लागला. हे सामजस्य २००९च्या लोकसभा निवडणुकीच्या अपयशानंतर संपुष्टात आले. २००९ साली पुन्हा एकदा दलित ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

या ऐक्य प्रयत्नाचे प्रक्रियेचे वर्णन जरी दलित केले जात असले तरी प्रत्यक्षात रिपब्लिकन पक्षाच्या विविधगट व आरंभापासून या पक्षाशी निगडीत असलेल्या दलितांमधील एका राजकीय दृष्ट्या अधिक जागृत व बोलक्या अशा नवबौद्ध समाजातील विविध संघटनाचे ऐक्य होते. म्हणजेच या ऐक्याचा पाया संकुचित होता; हे सिद्ध होते. वास्तविक पहाता डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचे स्वरूप सर्व दलित जाती जमाती, पीडित शोषित गटाचे प्रतिनिधिला करणारा पुरोगामी (पक्षाचा) विचाराचा राजकिय पक्ष असे होते. स्थापनेपासून महाराष्ट्रात तरी रिपब्लिकन पक्षांची प्रतिमा नवबौद्धाचा पक्ष अशीच बनलेली आहे. कारण या पक्षाचे बहुतेक नेते डॉ. आंबेडकराच्या प्रेरणेने बुद्ध धर्म स्वीकारलेल्या महार समाजातील आहेत. दलितामधील मांग, ढोर, चांभार व अन्य लहान मोठ्या जाती जमातीला या पक्षात फारसे स्थान नाही. बौद्धेत्तर दलित प्रामुख्याने फारसे उत्सुक नाहीत ते काँग्रेस पक्षाबरोबर आहेत. अलिकडच्या काळात त्यांच्यातील काही जाती गटाच्या गट प्रक्रियेचा राजकिय समुह यांचा शिवसेनेला पाठिंबा आहे. आदिवासी, विमुक्त व भटक्या जाती जमाती या स्वतंत्र संघटना आहेत. परंतु त्यांच्यात व रिपब्लिकन पक्षाचे गट व दलित पँथर्स किंवा मास मुव्हमेंट सारख्या संघटना यांच्यात फारसा राजकिय संपर्क नाही. काही वेळा समान प्रश्नावर सर्वजण एका व्यासपीठावर येत असतीलही, परंतु त्याच्यात सातत्यपूर्ण संवाद असल्याचे दिसत नाही. त्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांचे ऐक्याचे प्रयत्न या संघटना फारसे आकर्षित करू शकले नाही. ऐक्य प्रक्रिया गतिमान असताना या सर्व दलित शोषित गटांना या प्रक्रियेत सामील होण्याचे आवाहन केले होते. परंतु त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही, हे उघड सत्य आहे.

## ३.१९ सारांश / समालोचन / निर्णयकत्व :

डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली लोकशाही खालील केलेल्या उद्घृत तात्त्विक सामाजिक मूल्याद्वारे सिद्ध होते.

१) समता, स्वातंत्र्य, (बंधुभाव) न्याय या मुल्यांना भारतीय घटनेत महत्त्वाचे स्थान दिले आहे. परंतु वास्तव जाती जमातीच्या महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेत त्याची मूल्ये कार्यस्त, कार्यप्रवण राजकिय स्थितीत कुठेच महाराष्ट्राच्या राजकियनितीला दिसत नाहीत हे दुर्भाग्य आहे.

२) कायद्याची चौकट भारतीय लोकशाहीत यातील तत्त्वाद्वारे कार्यरत असावयास पाहिजे तेव्हाच जातीजमातीच्या राजकीय प्रक्रियेला समान समतेचे अधिष्ठान प्राप्त होईल.

३) स्वातंत्र्याची धुरा सर्व राजकीय नेते सांभाळतात या प्रक्रियेत सर्वाची गळचेपी होते व स्वतंत्र मूठभर राजकिय नेत्याकडे कार्यरत आहे. त्यामध्ये अधिमान्य पक्ष काँग्रेस होय.

४) पाश्चात्य संस्कृती / मूल्ये भारतीय राजकारणात खोलवर रूजलेले आहेत. त्यामुळे बंधुत्व प्रणाली / न्याय ह्या तत्त्वाचा परामर्ष घेता बलदंड / अर्थनितीवर चाललेले हे सिद्ध साध्य होय. त्यात निवडणुका जिंकण्यासाठी व सत्ता संपादनासाठी / सत्ता प्रस्थापित करण्यासाठी बलदंड / अर्थनितीचा प्रयोग सफल होतो.

५) राजकिय संघर्ष जागाच्या वाटपापासून ते राजकीय आरक्षणापर्यंत सातत्त्याने राजकिय प्रक्रियेत जागोजागी उफाळून येतो. त्याला महाराष्ट्राच्या राजकारणात पुष्कळ उदाहरणे १९५२ ते २०१० पर्यंत पाहिले व अनुभवले आहेत.

६) सामाजिक न्यायाच्या बाबतीत विचार केला तर महाराष्ट्रातील राजक्रिय प्रक्रियेचे चित्र भिन्न आहे. स्त्री - पुरूष हक्क / लहान मुलाचे हक्क / ज्येष्ठ नागरिकाचे हक्क फक्त लिखाण स्वरूपात आहेत प्रत्यक्षात अम्मल नाही.

७) शिक्षणाचा विकास, प्रगती, संशोधन, साधण्यासाठी अनेकसंधी कायद्याद्वारे पारिद केल्या जात नाहीत. त्यामध्ये आर्थिक सवलती उच्चनिच भेदाभेद, श्रेष्ठ, कनिष्ठ जाती/जमातीत मिळणाऱ्या सवलती आर्थिक लाभ त्यांच्या पर्यंत पोहोचत नाहीत.

८) स्त्रीयाकडे पाहण्याचा अनुदार व दूषित दृष्टिकोन अजून विकासोन्मुख अवस्थेकडे पाहोचलेला नाही. त्यासाठी संसदेने पुष्कळ कायदे सामाजिक न्यायाचे तत्त्व अम्मल करण्यासाठी केले. परंतु फलप्राप्ती नाही.

९) लोकशाहीत, स्वातंत्र, समता व न्याय या तत्त्वांना (मूल्यांना) स्थान देण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा हेच त्यांचे उद्दिष्ठ होते.

१०) सामाजिक, न्याय प्रस्थापित करण्यासाठी व सामाजिक न्यायाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी राज्यघटनेत नमूद करण्यात आले. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांची सरकारे यांनी कायदे करावेत असे बाबासाहेबांनी राज्यघटनेत म्हटले आहे. त्यानुसार अस्पृश्यतेचा कलंक दूर करण्यात आला. सर्वांना समान संधीची हमी देण्यात आली.

११) भारतीय समाजात जन्मतःच जाती व्यवस्थेमुळे विषमतेची मुळे खोलवर रूजलेली आहेत. Aristotle says, “Inequality is the cause of revolution and bringing them it always risesin revolution.” विषमता ही श्रेष्ठ-कनिष्ठाच्या विषवल्ली आहे समानतेचे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक न्यायातीत तत्त्व, मुल्ये प्रस्थापित करण्यासाठी प्रसंगी आंदोलने करावी लागतात. तेव्हाच समान न्याय प्राप्त होतो. कायद्यामुळे सर्वांना समान लेखले पाहिजे. (All are equal before the laws) वंश, जात, धर्म, संस्कृती, संपत्ती मानमरताब पदव्या यामुळे निर्माण होणारी विषमता नष्ट करून सर्वांना समान मूलभूत हक्क राज्यघटनेने बहाल केले आहेत.

१२) राज्यघटनेमुळे मिळणारे कायद्याचे संरक्षणही सर्वांना समान देण्यात आले. परंतु या मार्गाने सामाजिक न्याय पूर्णपणे प्रस्थापित होऊ शकला नाही. कारण अनादी कालापासून, हजारो वर्ष, शिक्षण, संस्कार, समान संधी हक्क इ. गोष्टीपासून वंचीत असणाऱ्या समाजातील फार मोठा वर्ग अस्थित्वात आहे. अस्पृश्य अशा विविध प्रकारचे लोक त्यात येतात. सरकारी नोकरी शिक्षण, कायदेमंडळातील प्रभुत्व, प्रतिनिधीत्व या क्षेत्रात सर्वांना समान संधीच्या तत्त्वाचा अंगीकार व्हावा.

## ३.२० सामाजिक न्याय विवरण पद्धती

(अ) समाजातील दुबळ्या गटांना विशेष सवलती देणे.
(ब) अल्पसंख्याकांना विशेष संरक्षण देणे.
(क) उपेक्षीत जाती-जमातीतील गटांना, शिक्षण संस्था व सरकारी नोकऱ्यात उपेक्षितांना विशेष सवलती देणे.
(ड) स्त्रीयांना, शिक्षण नोकऱ्या, कायदा, समाज, धर्म, अर्थ, काम यात विशेष संरक्षण सवलती देणे.
(ई) स्त्रीयावरील अत्याचार थांबवणे. कायद्याद्वारे कठोर पांवले उचलणे जाळणे, हुंडा, बहुपत्नित्व, अग्निज्वलन, विनयभंग, सामाजिक अन्यायाला प्रतिबंध करणारे कायदे करणे.
(फ) स्त्रीयांना अर्थ व्यवस्थेत, साधनसंपत्तीचे नैसर्गिक वडिलोपार्जित मालमत्तेचे समान वाटप व्हावे त्यामध्ये विषमता, दारिद्र्य, शोषण यांना प्रतिबंध असावा.
(ग) स्त्रीयांना उद्योग धंद्यात समान, मुक्त व्यवहार यासाठी चालना देणारे कायदे व आर्थिक पुरवठा प्राप्त होण्यासाठी विशेष सवलती देणे.

## ३.२१ निर्णय :

न्याय ही समााजाची (प्रत्येक) उच्चनिच, श्रेष्ठ, कनिष्ठ, भेदाभेद विसरून, समान मूल्यांचा तत्त्वाला आधार मिळवून द्यावे. याचा विचार अनेक पाश्चात, विचारवंतांनी केला आहे. त्यात अरिस्टोटल, जे.एस.मील. जॉन रोल्स भारतीय तत्त्व प्रणालित महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गो. कृ. गोखले म. ज्यो. फुले यांनी न्यायाची संकल्पना मांडली आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात असमानता असते, न्याय, स्वातंत्र, समानता, यात अंर्तभूत होतो. स्वातंत्र्य हा प्रत्येकाचा अधिकार, आधार आहे. प्रत्येकाला स्वातंत्र्याची समान संधी असते. जॉन रॉल्स म्हणतो, असमान्तेमुळे समानतेच्या घटकाला बाधा पोंहचते व सर्वघटकांचे हितसाधले जाते त्यांच्या मते ज्या पदाला समाजात चांगली वागणूक मिळते. त्या पदाला जाण्याची संधी सर्वांना आहे.

।। ज्ञानदेव तु कैवल्यम्।।

Vision Friday 9-7-2010

I. Empower a cross section of the society through excellent education based on a sound value system.

**Mission**
1. To impart qualitative and valuable service to allthose who needit the most.
2. To attain community and social development through education.
3. To aim at overall personality development of students through, curriudar, co-curricular and extra currientar adivities.

**Goals**

1. To prepair young and competent graduates / Post Gradnates Researures capable of finding employment and making a positive contribution onto society.
2. To provide a Astrong foundation of knowledge and skills that would equipthem to cope with emerging changes in their lives and society.
3. To achive excellence in the teaching learing process through achive Participation of stake Holders.

**निर्णय पूर्णांक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता (बंधुभाव) न्याय, बंधूता या मूल्यांना महत्त्व दिले आहे. कारण समाजात न्याय प्रस्तापित व्हावा हाच त्याचा उद्देश होता. त्यांनी हे तत्त्व राज्य घटनेत नमूद केले आहे. राज्य घटनेमुळे मिळणारे कायद्याचे संरक्षण ही सर्वांना समान देण्यात आले.

समान कायद्याचे अधिराज्य सर्व जाती जमातींना सर्वश्रूत होईल तेव्हाच भारतात पर्यायाने घटकराज्यात निकोप लोकशाही चांगली रूजेल व विकास होईल.

।। हरी ॐ।।

।।पूर्णांक।।


Referencs संदर्भ

१. नलिणी पंडीत - वर्गवाद, जातिवाद

2. Spiyer, Risrinivaoam - “Studies in Indian Democracy”

3. Rajani Kothari State Politics in India.

४. कुलकर्णी मंगेश, उषा ठकार जमातवादाचे महाराष्ट्रातील राजकारण

५. फडके य. दि. महाराष्ट्राच्या राजकारणातील राजकिय प्रक्रिया खंड-१.

ब) वर्तमानपत्रे गुरूवार दिनमान

दैनिक लोकसत्ता २२.७.२०१०

U.M.I II) मराठी संदर्भ ग्रंथ

Recommended and accepted

शिफारशी व स्वीकृती

१. डॉ. फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खेड १ ते ६

२. व्होरा राजेन्द्र महाराष्ट्रातील सत्तांतर
पळशीकर सुहास

३. पंडित नलिनी जातिवाद, वर्गवाद

४. उषा ठक्कार, कुलकर्णी मंगेश (मुद्रित) महाराष्ट्राचे राजकारण

५. एस.पी.अय्यार भारतीय लोकशाही अभ्यास
प्रथ्यकरणाला तात्त्विक विश्लेषण

६. कोठारी रजनी भारतातील राज्याचे, राजकारण


-----------------------

# ४

# वंशवाद, धर्म आणि राजकारण


४.० उद्दीष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ वांशिकता आणि वंशवाद
४.३ एतद्देशीयवादाचे (देशीवाद) राजकारण
४.४ जमातवाद
४.५ जमातवादी राजकारण
४.६ अल्पसंख्यांकांचा आणि बहुसंख्यांकांचा जमातवाद
४.७ हिंदू जमातवाद
४.८ मुस्लीम जमातवाद
४.९ जमातवाद आणि देशीवादाच्या आधारावर केल्या जाणाऱ्या राजकारणाला अनेकसत्तावादी आणि धर्मनिरपेक्षतावाद्यांनी दिलेला प्रतिसाद
४.१० स्वयंअध्ययनासाठी प्रश्न
४.११ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दीष्टे

या पाठाचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थी

१) वंशवाद, धर्म आणि राजकारण यातील आंतरसंबंध समजू शकतील.
२) एत्‌देशीयवाद म्हणजे काय ते समजेल.
३) जमातवादाचा अर्थ समजू शकेल.
४) बहुसंख्यांकाचा व अल्पसंख्यांकाचा जमातवाद या संकल्पना समजतील.
५) जमातवादाला मिळालेला निधर्मी प्रतिसाद अभ्यासता येईल.
६) भूमीपूत्रवाद ही संकल्पना अभ्यासता येईल.

## ४.१ प्रस्तावना

कोणत्याही देशाची राजकीय प्रक्रीया समजून घ्यायची असेल तर तेथील समाज आणि राजकारण यातील आंतरसंबंधांचा अभ्यास करणे आवश्यक असते. सामाजिक संदर्भाच्या अभ्यासाशिवाय राजकीय प्रक्रियेचा अभ्या परिपूर्ण होऊ शकत नाही. गतिशिल राजकीय प्रिक्रयेचा अभ्यास करताना सामाजिक संदर्भाचे महत्व अनेक राजकीय समाजशास्त्रज्ञांनी अधोरेखीत केले आहे. सामाजिक संरचना आणि राजकीय व्यवस्था यांच्यातील आंतरसंबंधामुळे परिपूर्ण राजकीय प्रक्रिया आकाराला येते.

समाज आणि राजकारण यांच्यातील संबंधांचा अभ्यास करण्यापूर्वी समाज, सामाजिक व्यवस्था, राजकीय व्यवस्था इ. संकल्पना समजून घेणे आवश्यक ठरते. अनेक समाजशास्त्रज्ञांनी आपापल्या पद्धतीने त्यांचा वापर केला आहे. टॉलकॉट पार्सन्स यांच्या मते, ''सामाजिक व्यवस्था ही सर्वसमावेशक आहे.... आणि राजकीय व आर्थिक व्यवस्था त्याचा एक भाग आहे.'' ''एरिक रोवॉ (Eric Rowa) यांच्या मते, ''राजकीय व्यवस्था आणि राजकीय कृती या सामाजिक व्यवस्थेचा एक विशेष प्रकार आहे.''

कारण राजकीय कृतींमधून तत्कालीन समाजाची मूल्ये, अभिवृत्ती, जाणिवा व कल यांना मुखरता प्राप्त होत असते. थोडक्यात सामाजिक घटक हे राजकीय घटकांना प्रभावीत करीत असतात.

२० व्या शतकात सामाजिक संरचना, आणि राजकीय व्यवस्था यातील आंतरसंबंधांचा अभ्यास मोठया प्रमाणात सुरु झाला. विशेषत: तिसऱ्या जगातील पारंपारिक सामाजिक संस्था आणि राजकीय प्रक्रिया यांच्यातील संबंधांच्या अभ्यासावर भर देण्यात आला. मॉरिस जोन्स यांच्या मते, सामाजिक घटकांच्या अभ्यासाशिवाय केलेला राजकीय प्रक्रियेचा अभ्यास एकांगी व दिशाहीन थोडक्यात राजकीय संस्थांवर सभोवतालच्या पर्यावरणाचा प्रभाव पडतो.

भारतीय राजकीय व्यवस्थेच्या संदर्भात विचार करताना येथील सामाजिक, आर्थिक व्यवस्थेचा आढावा घ्यावा लागतो. भारतात विविधता मोठया प्रमाणात आहे. उदा. जात, धर्म, भाषा, प्रदेश, वंश, सांस्कृतिक विविधता इ. भारतातील या सामाजिक घटकांचा प्रभाव शासकीय धोरण, निर्णय, व कार्यपद्धती यावर निश्चितच पडतो. केवळ शासकीय यंत्रणा नव्हे तर अन्य राजकीय संस्था व प्रक्रियांवरही प्रचलित सामाजिक, आर्थिक शक्तिप्रवाहांचा प्रभाव पडतो.

## ४.२ वांशिकता आणि वंशवाद (Ethnicity & Ethnocentrism)

वांशिकता हा शब्द सर्वसाधारणपणे भारतीय राजकीय व्यवस्थेच्या अनेकतावादी (वैविध्यपूर्ण) वैशिष्टयांच्या संदर्भात वापरला जातो. मूळ वंश या शब्दापासून पुढे वांशिकता ही संकल्पना मांडली गेली. त्यामुळे वांशिकता म्हणजे असा वांशिक गट की ज्यामध्ये लोकांमध्ये वांशिक साधर्म्य, समान, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा, समान भाषा व इतिहास या गोष्टींचा समावेश होतो. भारताच्या संदर्भात समान ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा, भाषा व साहित्य या संदर्भात वांशिकतेचा अर्थ सांगितला पाहिजे. भारतात वंशवादाचा उदय प्रादेशिकता किंवा प्रादेशिक अस्मितांच्या अंगाने झाला. एकभाषिक राज्यांच्या मागणीने भारतीय राजकीय व्यवस्थेत तो पुढे आला. वांशिक महत्वकांक्षा भारतात प्रादेशिक राजकीय पक्षांच्या उदयामुळे प्रबळ झालेल्या दिसतात. द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक), तेलगु देसम, शिवसेना, अकाली दल, आणि अलिकडच्या काळात महाराष्ट्र नवनिर्माणसेना (मनसे) इ. सारख्या प्रादेशिक राजकीय पक्षांमुळे त्या-त्या गटांच्या अस्मितांना बळ प्राप्त झाले. काही वेळा भाषिक अस्मितांच्या अंगाने वंशवादी भूमिका घेतल्या गेल्या. काही भाषिक समूहांनी तर हिन्दी भाषा राष्ट्रभाषा म्हणून स्विकारण्यास विरोध केला होता. अशा प्रकारच्या अस्मिता आणि त्यांना अविष्कृत करणाऱ्यांना भूमीपूत्र (Sons of Soil) म्हणून संबोधले जाते. स्थानिक लोकांना प्राधान्य मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. विशेषत: सरकारी नोकऱ्यांबाबत ते आग्रही असतात.

जगातील अनेक विद्वानांना "वंशवाद" च्या तत्वज्ञानाने भुरळ पाडली आहे. वंशवाद (Ethnocentrism) या शब्दाचा प्रथमत: वापर अमेरिकन समाजशास्त्रज्ञ विलियम ग्रॅहम समनेर यांनी १९०६ मध्ये केला. त्यांच्या मते, वंशवाद म्हणजे असा वांशिक समूह की जो संपूर्ण प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असतो. ज्याच्यामुळे त्या प्रक्रियेचे संदर्भ मूल्यांकीत होऊ शकतात. मर्यादित क्षेत्रातील समाजघटकांमध्ये असे घडणे शक्य असते. अशा संस्कृतीमध्ये असे गट त्यांच्या सर्वसाधारण समाजविषयक धारणा अधिमान्य करून घेत असतात. भारतासारख्या विविधता असलेल्या देशातही वंशवाद असणे नाकारता येत नाही. असे अभ्यासकांचे मत आहे. वंशवादी तत्वज्ञानातूनच आपल्या प्रदेशाविषयी चांगुलपणाची, गर्वाची, आपलेपणाची तसेच प्रदेशरक्षणाची जाणिव निर्माण होत असते. त्यामुळे राष्ट्र उभारणीच्या कार्यात वंशवादाचे

(वांशिक एकतेचे) महत्व नाकारता येत नाही. मात्र आत्यंतिक किंवा जहाल विचारप्रणालीच्या आधारे केले जाणारे वांशिक राजकारण धोकादायक ''रु शकते. कारण त्यामुळे इतर वांशिक घटकांना नाकारणे, त्यांची मूल्ये नाकारणे असे प्रकार घडू शकतात. त्याचे पर्यवसन शेवटी वांशिक हिंसाचारातही होऊ शकते. अशा प्रकारच्या वंशकेंद्रीत राजकारणाला मायटॉल विपर आणि मॉरिस जोन्स सारख्या राज्यशास्त्रज्ञांनी देशीवाद (एतदेशीयवाद) (Nativism) असे म्हटले आहे.

## ४.३ देशीवादाचे (एतद्‌देशीयवाद) राजकारण Politics of Nativism.

आपला समाज, आपले लोक (हा आपलेपणा समान भाषा, संस्कृती यातून आलेला असतो) व परके, उपरे लोक यांच्यात फरक करुन या परक्या लोकांबद्दल शत्रुत्वाची भावना बाळगणारा दृष्टीकोन म्हणजे देशीवाद होय. इतर भाषिक व इतर प्रदेशातील लोकांना आपल्या प्रदेशातून व समाजातून हुसकावून लावण्याची इच्छा बाळगणारा विचार म्हणून एतद्‌देशीयवादाच्या संकल्पनेकडे पाहिले जाते. परक्या लोकांमुळे आपल्या लोकांना सत्ता, अधिकार, संपत्ती, नोकऱ्या, जागा मिळण्यास अडचणी निर्माण होतात. मर्यादीत साधनसंपत्तीत हे लोक वाटेकरी होतात, म्हणून संघटीतपणे उभे राहीले पाहिजे असा आग्रह एतद्‌देशीयवादात धरला जातो. जे देश किंवा लोकसमूह वसाहतवादाच्या जोखडात अडकलेले असतात तेथे हा विचार परकीय राजवटीत विरोध अथवा स्वदेशी चळवळ या अंगाने पुढे येताना दिसतो.

भारतासारख्या विविधता असलेल्या देशांत स्थानिक अस्मितांच्या रुपाने एतद्‌देशीयवाद निर्माण होणे सहज शक्य आहे. किंबहुना लोकतांत्रिक शासनपद्धतीमध्ये असे घडणे स्वाभाविक आहे.

### ४.३.१ भूमीपूत्र (Sons of Soil)

महाराष्ट्राच्या राजकारणात भूमीपूत्रवादाची संकल्पना नवी नाही. १९६० च्या दशकात शिवसेनेच्या रुपाने तर अलिकडे मनसे, सारखे पक्ष भूमीपूत्रवादाचे राजकारण करीत आहेत. मुंबई हे स्थलांतरीतांचे शहर म्हणून ओळखले जाते. त्यामुळे या शहराच्या भौगोलिक स्थानाला महत्व आहे. परप्रांतातून नशिब अजमावण्याच्या उद्‌देशाने अनेक लोक मुंबईत येत असतात. परप्रांतातून होणाऱ्या या वाढत्या स्थलांतरामुळे स्थानिकांना आपली भाषा, संस्कृती व उपजिविका यावर आघात होतो असे वाटू लागते. त्यासाठी संघटीत राजकीय कृती करण्याच्या गरजेतून एकात्म होण्याच्या प्रक्रियेला भूमीपूत्रवाद असे म्हणता येईल. सापेक्षवंचिततेच्या आणि प्रादेशिकतेच्या जाणिवेतून भूमीपूत्रवाद प्रखर होतो. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळीही मुंबईची कुणाची ? असा प्रश्न उभा राहीलाच होता.

महाराष्ट्रात निर्मितीच्या वेळी दिल्लीतील कॉंग्रेस नेत्यांनी मुंबई महाराष्ट्राला मिळू द्यायची नाही असा जणू चंगच बांधला होता, त्या पार्श्वभूमीवर संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन उभे राहीले. महाराष्ट्राच्या राजकारणातील भूमीपूत्रवादाचा तो पहिला अविष्कार होता. एकभाषिक महाराष्ट्रासाठी त्यावेळी विविध विचारसरणींचे पक्ष संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झेंडयाखाली एकत्र आले होते. १९५६ च्या विधानसभा निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला घवघवीत यश मिळाले. परिणामी कॉंग्रेसी राजकर्त्यांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करावी लागली होती.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. दुसऱ्या बाजूने मुंबईचे महानगरात रुपांतर होत गेले. पारशी-गुजराती व्यापारी-उद्योजकांबरोबरच विविध प्रांतातील लोकांचे लोंढे मुंबईत येत राहीले. म्हणूनच मुंबईत निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींचा पुरेसा वाटा मराठी माणसाला मिळत नाही. दक्षिणेकडले (लुंगीवाले) लोक सगळया संधी हडप करतात अशा प्रकारच्या तक्रारी सुरुवातीला मार्मिक या साप्ताहिकातून सुरु केल्या. पुढे त्याला जनतेचा प्रतिसाद लाभला आणि शिवसेना या भूमीपूत्रवादी संघटनेचा जन्म झाला. स्थानिक प्रश्नांची सोडवणूक, बिगर मराठी पाटयांची तोडफोड, दाक्षिणात्य-

इराण्याची दुकाने लुटणे इ. कार्यक्रमातून शिवसेनेने मराठी अस्मिता निर्माण केली. राजकीय अर्थव्यवस्थेतील मराठी तरुणांचे असणारे दुय्यम स्थान, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून निर्माण झालेली मराठी अस्मिता, आणि भांडवली विकासात तरुणांची झालेली कोंडी या सर्व कारणांमुळे शिवसेना वाढली आणि रुजली. निवडणूकीच्या राजकारणाचा भाग म्हणून शिवसेनेने पुढे मराठीपणाचा मुद्दा सोडून दिला. मात्र ज्या-ज्या वेळी गरज भासली तेव्हा त्यांनी तो मोठया खुबीने वापरला.

अगदी अलिकडच्या काळात राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) स्थापन केल्यावर मराठीचा मुद्दा उचलून धरला. स्थलांतरीतांमुळे रोजगार आणि व्यवसायात स्पर्धा निर्माण होत असल्याने स्थानिकांमध्ये असुरक्षीतपणाची भावना वाढीस लागते. याचाच प्रत्यय मुंबईत दोन वर्षापूर्वी मासे विकणाऱ्या स्थानिक कोळी महिलांच्या आंदोलनामुळे आला. उत्तर भारतीय भैय्यांविरुद्ध त्यांनी आंदोलन केले होते. राज करे शिवसेनेत असताना रेल्वे बोर्डाच्या परीक्षेसाठी मुंबईत आलेल्या बिहारींना कार्यकर्त्यांकरवी मारहाण करण्यात आली होती. ती या ''भय्यांच्या'' प्रश्नावरच. फेब्रुवारी २००८ मध्ये दादर परीसरात मनसे कार्यकर्त्यांनी टॅक्सीवाल्याना चोप दिला होता, मुलायम सिंह यादव व अबू आझमी मुंबईतील सभेत राज प्रकारे यांच्याबद्दल बोलल्याचे त्यावेळी निमित्त होते. आपणच मराठी माणसाचे तारणहार आहोत हे त्यांना दाखवून द्यायचे होते.

राज ठाकरे यांनी उत्तर भारतीयांना लक्ष्य करताना ते मराठी लोकांत मिसळत नाहीत. आपल्या राज्यांतील राजकारणी इकडे आणून त्यांच्या राज्यांचे दिवस साजरे करतात. छटपूजेच्या नावाखाली राजकीय संघटन /मतपेढी (Vote Bank) तयार करतात अशी कारणे आंदोलनाच्या वेळी दिली होती. रेल्वे,बँकांमधील भरती स्थानिक पातळीवर व्हावी, सर्वत्र मराठीचा वापर केला जावा, भरती बोर्डाच्या परीक्षा मराठ्ठीत व्हाव्यात, वाहन चालकांना (टॅक्सी/रिक्षा ) परवाने देताना मराठी बोलण्याची सक्ती करावी अशा प्रकारच्या मागण्या मनसेने केल्या. २००९ च्या विधानसभा निवडणूकीत मराठी अजेंडा वापरून मर्यादित यशही प्राप्त केले. अबू आझमींच्या हिंदी भाषेतून शपथ घेण्याला विरोध करून मराठी अस्मिता प्रखर करण्याचे व लोकानुनयी राजकारण करण्याचा प्रयत्न मनसेने केला.

थोडक्यात सापेक्षवंचिततेच्या भावनेतून प्रादेशिक अस्मिता तयार होतात आणि त्याचे रूपांतर भूमीपूत्रवादात होते.

### ४.३.२. भूमीपूत्रवादाची वैशिष्ट्ये

भूमीपूत्रवादी सिद्धांताची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १) सापेक्षवंचितता -

सापेक्षवंचिततेच्या जाणिवेतून भूमीपूत्रवाद जन्माला येतो. आपल्यावर अन्याय होतो, आपल्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जाते, आपल्याला मिळणाऱ्या लाभांपासून वंचित ठेवले जाते अशा प्रकारची जाणिव लोकांमध्ये निर्माण होते.आपल्यावरील अन्यायाला स्थलांतरीत लोक जबाबदार आहेत अशा प्रकारचा समज दृढ होत जातो. अशा भावनेतून ''अस्मिता'' निर्माण होते आणि भूमीपूत्रवादाला चालना मिळते.

२) **प्रदेशवाद -**

भूमीपूत्रवादातून अंतिमतः प्रदेशवाद निर्माण होतो. प्रादेशिक अस्मिता निर्माण झाल्यामुळे स्वायत्ततेच्या किंवा स्वतंत्र राज्यांच्या मागण्या जोर धरू लागतात. उदा. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मराठी अस्मिता निर्माण झाली. त्यातूनच पुढे मुंबईसह महाराष्ट्राची मागणी पुढे आली.

३) **परप्रांतियांना विरोध -**

प्रादेशिक असमतोल आणि भांडवलशाही विकासात तरूणांची झालेली कोंडी यामुळे सापेक्षवंचिततेची जाणिव निर्माण होते. परप्रांतियांमुळे आपल्या रोजगार व व्यवसायांच्या संधी हिरावल्या जातात. आपल्या दयनीय अवस्थेला तेच जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांना हुसकावून लावले तरच आपला विकास शक्य आहे. या जाणिवेतून परप्रांतियांना विरोध करणे सुरू होते. अशा वेळी परप्रांतीय सुद्धा संघटित होतात आणि आपले व परके असा संघर्ष सुरू होतो. उदा. मराठी विरूद्ध भय्ये (उ. भारतीय )

४) **विकासातील असमतोल -**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर आपला विकास होईल अशी भाबडी अपेक्षा जनतेची होती. पण विकासाच्या प्रक्रियेत मुंबई - पुणे- नाशिक या भागाचाच विकास घडून आला. भांडवली विकासाच्या या प्रक्रियेत अविकसीत भागातून विकसीत भागाकडे स्थलांतरीतांचा ओघ सुरू झाला. परिणामी विकसीत भागावरील ताण वाढतो आणि असंतोषातून भूमीपूत्रवाद जन्माला येतो.

## ४.४ जमातवाद (Communalism)

जमातवाद ही खास भारतीय संदर्भात उदयास आलेली संकल्पना असून तिचा अर्थही खास भारतीय संदर्भातला आहे. ब्रिटीश राजवटीच्या काळात जमातवाद म्हणजे - कम्युनॅलिझम- हा शब्दप्रयोग प्रचारात आला. प्रस्तुतः कम्युनिटी म्हणजे समूह/ समुदाय. पण ब्रिटीशांनी भारतीयांना प्रतिनिधीत्व देताना अनेक भिन्न समुदांयातील मिळून बनलेला समाज असा भारतीय समाजाचा विचार केला. विविध समुदायांना असे वेगळे प्रतिनिधित्व देण्याच्या धोरणाला ब्रिटीश सरकारने कम्युनल ॲवार्ड म्हणजे जात-जमात निष्ठ निवाडा असे संबोधले. अशा रीतीने जात- जमात-वांशिकता यांच्या आधारे केलेल्या मागण्या , त्यांना दिला गेलेला सकारात्मक प्रतिसाद यांना कम्युनल म्हणजे जमातवादी असे विशेषण वापरले जाऊ लागले. कोणत्याही देशात असे धर्म, वंश गटांचे राजकारण अस्तित्वात येऊ शकत असले तरी भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण संदर्भातील राजकारणाला जमातवदी राजकारण असे वेगळे नाव वापरल्याने त्याचा खास भारतीय संदर्भ अधोरेखीत होतो. जगभरात आज भिन्न वांशिकता किंवा सांस्कृतिक अस्मिता यांच्या आधारे जे राजकारण होते त्याला वांशिकतेचे राजकारण म्हटले जाते. भारतात जो मुद्दा राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे तो म्हणजे धर्म किंवा धार्मिक समूहांचे राजकारण. काही वेळा जमातवादाला पर्यायी धर्मांधता जातीयवाद असे शब्द वापरले जातात. पण धर्माधना म्हणजे कट्टर धार्मिक. धर्मसुधारणाविरोधी असा होतो. कम्युनॉलीझम हा अर्थ अभिप्रेत नाही. जातीयवादी या शब्दामुळे आपण जात व त्याआधारे निर्माण होणाऱ्या सामाजिक गटांबद्दल बोलतो.प्रत्यक्षात जातीयवादापेक्षा जमातवाद वेगळा आहे.

जमातवाद म्हणजे विशिष्ट धर्माच्या सर्व अनुनयांचा मिळून एकच एक समुदाय बनतो असे मानून किंवा तसा दावा करून त्या समुदायाचे राजकीय ताकदीमध्ये रूपांतर करणे होय. थोडक्यात धर्माचे राजकीयीकरण करणे म्हणजे जमातवाद होय. एखाद्या विशिष्ट धार्मिक समुदायाकडे देशाच्या नियमनाची सूत्रे असली

पाहिजेत (सत्ता असली पाहिजे ) असा जमातवादाचा आग्रह असतो.त्या त्या धर्माच्या लोकांच्या वतीने ती सत्ता आपल्याकडे यावी असा जमातवादी संघटनांचा दावा असतो. यातूनच जमातवादी राजकारण आकाराला येते. जमातवादी राजकारणाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.

१) समान धर्म म्हणून एखाद्या समूहाला इतरांपेक्षा वेगळे करण्यावर जमातवादाचा भर असतो.
२) श्रद्धा, पूजा, तत्त्वज्ञान हे विषय जमातवादाच्या मांडणीत दुय्यम मानले जातात. धार्मिक चर्चेत जमातवादाला रस नसतो.
३) जमातवादात धार्मिक अहंकार निर्माण करण्यावर जास्त भर असतो.
४) स्वधर्म हितासाठी परधर्मियांची सर्वतोपरी कोंडी करण्यावर जमातवादाचा भर असतो.
५) धार्मिक अस्मितेला महत्त्व दिल्याने व्यक्तिच्या इतर अस्मिता दुय्यम मानल्या जातात.
६) जमातवादी विचारात धर्म व संस्कृती यांची गल्लत केली जाते. एखाद्या धर्माच्या सर्व व्यक्ती या एकाच सांस्कृतिक विश्वाच्या घटक असतात असे जमातवाद मानतो.
७) धर्मांतर म्हणजे संस्कृती त्याग (राष्ट्रांतर) अशी भूमिका जमातवाद घेतो.

## ४.५ जमातवादी राजकारण

१९८० च्या दशकात महाराष्ट्राने दोन गोष्टी अनुभवल्या. एक म्हणजे हिंदू व मुस्लीम यांच्यातील दंगली आणि दुसरे म्हणजे सवर्ण व दलित यांच्यातील तणाव, १९७८ नंतर मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर प्रश्नामुळे दंगली घडल्या होत्या. गेल्या दोन दशकांत महाराष्ट्रातील हिंदू अस्मितेच्या बदलत्या स्वरूपामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातही लक्षणीय बदल घडून आले आहेत. १९८३-८४ मध्ये धुळे जिल्हयात आदीवासींवर झालेले हल्ले, मालेगाव-भिवंडी मधील दंगली. पुणे (१९८२), मुंबई (१९८४,९२-९३), नाशिक, अमरावती, रत्नागिरी (१९८६) सटाणा, जि. नाशिक मध्ये झालेले सवर्ण-दलित संघर्ष (१९८३, ८६) खामगाव, चोपडा, फलटण येथील दंगली, शिवाय नांदेडमधील हिंदू-शीख तणाव (१९८२) ही सर्व १९८० च्या दशकातील महाराष्ट्रातील जमातवाद फोफावल्याची निर्देशक उदाहरणे सांगता येतील.

हिंदू एकता, लष्करी पद्धतीची शिस्त यांच्या जोरावर नवहिंदुत्ववादी संघटनांनी महाराष्ट्रात हिंदू अस्मितेवर आधारीत चळवळ उभी केली. अल्पावधीतच शहरी व बिन-शहरी भागात या संघटनांनी आपले जाळे विणले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभा यासारख्या पारंपारिक हिंदुत्ववादी संघटनाही महाराष्ट्रात आहेत. १९४७ नंतर १९८० पर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही महत्त्वाची हिंदुत्ववादी संघटना होती. १९७३ मध्ये सरसंघचालक माधव सदाशीव गोळवलकर (गुरूजी) यांच्या निधनानंतर संघाने आपल्या कार्यपद्धतीत अनेक बदल केले. नवे सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी संघाला उदारमतवादी चेहरा देण्याचे काम केले. गुरुजींनी पुरस्कारलेल्या चातुर्वण्य पद्धतीला त्यांनी सोडचिठी दिली आणि सुधारणावादी धोरणे अवंलबिली. १९७७ मध्ये भारतीय जनसंघ जनता पक्षात विलीन झाल्याने संघ आपली ओळख हरवून बसला. परिणामी याचकाळात शिवसेना, पतीत पावन संघटना, हिंदू एकता आंदोलन, मराठा महासंघ इ. संघटनांना मर्यादीत का होईना पण अवकाश प्राप्त झाला. याच काळात विश्व हिंदू परिषद सुद्धा सक्रिय झाली. १९८१-८२ मध्ये जनजागरण अभियानाच्या माध्यमातून ही संघटना सर्वदूर पोहचली. मिनाक्षीपुरम् (तामिळनाडू) येथील दलित हिंदूंच्या धर्मांतराच्या प्रश्नावर हे आंदोलन सुरु केले गेले. हिंदूंचे असेच धर्मांतर सुरु राहिल्यास एक दिवस हिंदू या देशात अल्पसंख्य होतील असा परिषदेचा दावा होता. या अभियानाने हिंदू अस्मितेला मुखरता प्राप्त झाली. हिंदूंची स्वतःची ओळख

निर्माण व्हावी आणि जाती विसरुन हिंदुत्वाच्या नावाखाली एकत्र येण्याचे आवाहन विश्व हिन्दू परिषदेने केले.

या मुख्य संघटनांशिवाय १९८४ मध्ये शिवसेनेने हिंदू संघटनांचा हिंदू महासंघाच्या रूपाने एक प्रयोग केला. हिंदू महासभा, आर्य समाज, हिंदू सेना, हिंदू राष्ट्र सेना इ. संघटना या महासंघात सामील झाल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व विश्व हिन्दू परिषद या पुरेसा जनाधार असलेल्या संघटना मात्र त्यापासून अलिप्त राहील्या. आपले वेगळे अस्तित्व सिद्ध करण्याचा महासंघाचा प्रयत्न होता.

१९८७ पासून विश्व हिंदू परिषदेने रामजन्मभूमीचा मुद्दा लावून धरला. हिंदू संघटनांना त्यामुळे एक संधी प्राप्त झाली. लालकृष्ण अडवाणी यांची रथयात्रा, मुरली मनोहर जोशींची एकता यात्रांमुळे हिंदू समाजाचे संघटन करुन मतपेढी (Vote Bank) निर्माण करण्याचे प्रयत्न या संघटनांनी केले. त्याचे पर्यवसन १९९५ मध्ये शिवसेना-भाजपा युती महाराष्ट्रात सत्तेपर्यंत पोहचण्यात झाले.

## ४.६ अल्पसंख्यांकांचा आणि बहुसंख्यांकांचा जमातवाद-

भारतातील जमातवाद हा बहुसंख्यांक (हिंदू) व अल्पसंख्यांक (मुस्लीम) यांच्यातील तणावाकडे निर्देश करतो. भारतात जमातवाद फोफावण्यामध्ये कोणत्याही एका धर्माला दोष देता येणार नाही. इंग्रजांच्या वासाहातिक धोरणांबरोबरच हिंदू व मुस्लीमांमधील फुटीरतावादी गटांनाही त्यात समाविष्ट करावे लागेल.

बहुसंख्यांकांच्या जमातवादाची (हिंदू) मुळे १९ व्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात शोधता येतात. त्यावेळी काही राष्ट्रीय नेत्यांनी इंग्रजांच्या विरोधात संघर्ष करताना भारताची हिंदू प्रतिमा स्विकारली होती. काही नेत्यांनी तर लोकांना संघटीत करण्यासाठी धार्मिक आवाहन केले, हिंदुत्व हे एकमेव साधन असल्याची त्यांची खात्री होती. १९४७ पूर्वी हिंदू देव-देवतांचा आधार घेऊन त्यांनी राष्ट्रवादाची मांडणी केली. स्वा. सावरकरांनी तर पितृभू आणि पूण्यभू (धर्मभूमी) मानून राष्ट्रवादाची मांडणी केली. त्यामुळे आपोआपच मुस्लीम त्यातून वगळले जात होते कारण त्यांच्या दृष्टीने मक्का हीच पवित्र भूमी आहे. काही संघटना तर देशाच्या फाळणीस सर्व मुस्लीम जबाबदार असल्याचे मानतात. त्यामुळे त्यांच्यासोबत सावत्रपणाचा व्यवहार केला जावा अशी त्यांची भूमिका असते. परिणामी मुस्लीमांमध्ये अलगतावादी जाणीव निर्माण होते.

अल्पसंख्यांकांचा जमातवाद निर्माण होण्यास अनेक कारणे आहेत. या जमातवादाचे भयानक स्वरुप फाळणी व धार्मिक दंगलींच्या रुपाने पुढे आले आहे. इंग्रजांच्या "फोडा आणि झोडा" या नीतीनुसार सुरुवातीच्या काळात त्यांना आधुनिक शिक्षण व लाभांपासून ब्रिटीशांनी दूरावले. पण स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात मात्र त्यांना वेगळया सुविधा देऊ करून हिंदूपासून तोडण्यात ते यशस्वी झाले. हिंदूंच्या तुलनेत आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील विकासात मागासलेपणाची मुस्लीमांची भावना झाली. अलिगढ आंदोलन हाही अल्पसंख्यांकाच्या जमातवादातील कळीचा मुद्दा ठरला. त्यामुळे गुस्लीम मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून दूर गेले.

## ४.७ हिंदू जमातवाद

प्रा. राजेंद्र व्होरा आणि डॉ. सुहास पळशीकर यांनी १९८० नंतरच्या हिंदुत्ववादाला नव-हिंदुत्ववाद असे संबोधले आहे. १९८० पूर्वीच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभा पुरस्कृत

जमातवादापेक्षा त्याचे स्वरुप भिन्न आहे. हा पारंपारिक जमातवाद ब्राह्मणी तर आजचा नवहिंदुत्ववाद अब्राह्मणी स्वरुपाचा आहे.

### ४.७.१ पारंपारीक हिंदु जमातवाद

स्वातंत्र्योत्तर काळात जाती-धर्माची घोंगडी पांघरून अनेक जमातवादी संघटना निर्माण झाल्या. शिवसेना पतित पावन संघटना, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, वंदे मातरम्, विश्व हिंदू परिषद, हिंदू एकता आंदोलन, सनातन प्रभात, हिंदू ऐक्य अशा हिंदू जमातवादी संघटना निर्माण झाल्या. सुरुवातीच्या काळात नेहरु - इंदिरा गांधी यांच्या प्रभावामुळे सामान्य जनता, शहरी व ग्रामीण समाज जमातवादाच्या प्रभावापासून दूर राहीला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वा तत्सम संघटनांचे कार्य मुख्यत: संघटनात्मक बांधणी करण्यापुरते राहीले. रा. स्व. संघाने गोळवलकर गुरुजींच्या नेतृत्त्वाखाली पारंपारिक, सुधारणाविरोधी हिंदुत्वविचार स्विकारल्यामुळेही जमातवादाच्या विस्ताराला अंगभूत मर्यादा पडल्या, तो फक्त शहरी, उच्च जातीय समूहांनाच आकर्षीत करु शकला. दंगलींच्या काही घटना वगळल्या तर स्वातंत्र्योत्तर तीन दशकात जमातवादाचे अस्तित्व फारसे जाणवण्याव्एवढे नव्हते.

१९८० नंतरच्या कालखंडात जमातवाद मोठ्या प्रमाणात फोफावला. हिंदू-मुस्लीम संघटनांनी परस्पर विद्वेषाची भूमिका घेऊन जमातवादी वातावरण तयार केले. अल्पसंख्यांक हे हिंदूविरोधी आहेत. असा दावा हिंदू जमातवाद्यांकडून केला जातो. मुस्लीम समाजातील दोष व मुस्लीम नेत्यांच्या चुका यांना मुस्लीम धर्म कारणीभूत आहे अशी मांडणी करून हिंदू धर्म व्यापक, लवचिक व सर्वसमावेशक असल्याचा दावा हिंदू-जमातवाद्यांकडून नेहमी केला जातो. संपूर्ण इतिहासाचे आकलन धार्मिक समूहांच्या संघर्षाच्या चौकटीत केले जाते. मुस्लीम समाजाच्या राष्ट्रभक्तीबद्दल संशय निर्माण करुन मुस्लीम समाज व पाकिस्तान यांची गल्लत केली जाते.

१९८६ नंतरच्या कालखंडात शहाबानो प्रकरण, रामजन्मभूमी-बाबरी मशीद वाद यासारख्या प्रकरणांत जमातवाद्यांनी आक्रमक भूमिका घेऊन धर्मयुद्धाची तयारी केली. गर्व से कहो, हम हिंदू है किंवा होय! हे हिंदूराष्ट्र आहे अशा घोषणा देऊन हिंदुत्ववाद्यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादालाच आव्हान दिले आहे. १९८९ नंतरच्या कालखंडात भा. ज. पा. ने धर्मनिरपेक्षतेचा बुरखा फेकून देऊन हिंदुत्ववादी भूमिका घेतली. त्याला शिवसेनेनेही साथ दिली. याच काळात विश्व हिन्दू परिषदेनेही रामजन्मभूमीचा मुद्दा पुढे रेटला. अल्पसंख्यांकांच्या संरक्षणासाठी केलेल्या खास तरतूदी रद्द कराव्यात, काश्मिरविषयक ३७० वे कलय रद्द करावे. रामजन्मभूमी हिंदूंच्या स्वाधिन करावी, समान नागरी कायदा झाला पाहिजे, गोहत्या बंदी करावी इ. मागण्यांच्या आधारे भाजपाने उल्लेखनीय यश प्राप्त केले. याकामी, विश्व हिंदू परिषद व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचा हातभार त्यांना लाभला. आजही संसदेवरील हल्ल्याप्रकरणी अटकेत असलेला अफझल गुरु आणि मुंबई हल्लयातील दोषी अतिरेकी अजमल कसाब यांना ताबडतोब फाशी द्यावे अशी या पक्षांची मागणी आहे.

महाराष्ट्राच्या संदर्भात शिवसेना, मराठा महासंघ व इतर हिंदू जमातवादी संघटनांनी रिडल्स प्रकरणी घेतलेली भूमिका, राखीव जागा व नामांतराच्या - प्रश्नावरुन घेतलेली दलित विरोधी भूमिका, दलित व अल्पसंख्यांकाविरुद्धच्या हिंसात्मक मोहिमा यांचे स्वरुप आक्रमक राहीले आहे. आजही जेम्स लेनच्या छ. शिवाजी महाराजांसंदर्भातील वक्तव्यावरुन हिंदू जमातवाद्यांमधेच मतभेद आहेत. पुण्याच्या लाल महालातून दादोजी कोंडदेवांचा पुतळा हलवावा किंवा नाही यावरुनही हे मतभेद पुढे आले

आहेत. मराठा महासंघाने पुतळा हलविण्याची भूमिका घेतली आणि शिवसेना, भाजप, पतितपावन संघटना, यासारख्या संघटनांनी एकमुखी विरोध केला आहे. महाराष्ट्रातील हिंदुत्ववाद्यांचा रोख मुस्लीम जमातवाद्यांविरुद्ध असला तरी जातीव्यवस्थेचे आणि अंधश्रद्धेचे निर्मूलन करणारी समाजसुधारणेची परंपराही त्यांना नष्ट करायची आहे.

### ४.७.२ नव-हिंदुत्ववाद

प्रा. राजेंद्र व्होरा आणि डॉ. सुहास पळशीकर यांनी महाराष्ट्रातील नवहिंदुत्ववादाची चिकित्सा केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदू महासभा यांच्या परंपरागत हिंदू जमातवादी विचारप्रणालीपेक्षा नवहिंदुत्ववादाचे स्वरुप वेगळे आहे. नवहिंदुत्ववादाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१) हिंदू ऐक्य-**

हिंदू ऐक्य हे नवहिंदुत्ववादाचे प्रमुख वैशिष्टय आहे. "हिंदू तितुका मेळवावा. हिंदूधर्म वाढवावा" हा या संघटनांचा एककलमी कार्यक्रम आहे. राष्ट्रीय स्वंयसेवक संघ व हिंदू महासभा या पारंपारिक हिंदू संघटनांचा प्रभाव उच्चवर्णिय हिंदूपुरताच सीमीत होता. गोळवलकर गुरुजींनी चातुर्वण्याचा पुरस्कार केल्याने बहुजन समाज या संघटनांपासून दूर राहीला तसेच दलितही या प्रवाहापासून दूर होते. परिणामी ''बहुसंख्य'' असूनही हिंदूंचा महाराष्ट्राच्या राजकारणावर कोणताच प्रभाव नाही अशी नवहिंदुत्ववाद्यांची धारणा आहे. हिंदूंच्या या दूहीचा फायदा ''राष्ट्रद्रोही'' अल्पसंख्य धर्मियांनी घेतला.

राज्यकर्त्यांनी मतांच्या राजकारणासाठी त्यांचे ''अवाजवी लाड'' केल्याने त्यांची संख्या झपाटयाने वाढली, त्यामुळे हिंदू अल्पसंख्य होण्याचा धोका आहे म्हणून हिंदूनी एक व्हावे असे नवहिंदुत्ववाद्यांना वाटते. नवहिंदुत्ववादी प्रवर्तक ''महाराष्ट्र धम'' आणि ''गोब्राहमण प्रतिपालक'' या संकल्पना स्विकारतात. प्रत्यक्षात हिंदवी स्वराज्य निर्माण होऊ शकते असा त्यांचा विश्वास आहे. थोडक्यात मुस्लीमांना ''राष्ट्रद्रोही'' ठराविण्यासाठी ते इतिहासाचे विकृतीकरणही करताना दिसतात. हिंदूराष्ट्राच्या स्थापनेसाठी प्रसंगी आक्रमकताही स्विकारली पाहिजे असे नवहिंदुत्ववाद्यांना वाटते.

**२) आक्रमकता-**

पारंपारिक हिंदुत्ववादी विचारसरणी नवाहिंदुत्ववाद्यांना मान्य नाही. ''शेंडी-जानव्याचे हिंदुत्व'' अशी निर्भत्सना नवहिंदुत्ववाद्यांनी पारंपारिक हिंदुत्वाची केली आहे. या हिंदू संघटना लाठया-काठयांचे प्रशिक्षण देत असल्या तरी त्यांचे हिंदुत्व ''नेभळट'' आहे असे नवहिंदुत्ववाद्यांचे मत आहे. शाब्दिक आणि कृतीच्या आक्रमकतेचा पुरस्कार नवहिंदुत्ववादी करतात. इतर धर्मीयांना तुच्छ लेखणे, त्यांच्याविषयी शिवराळ भाषा वापरणे ही नवहिंदुत्ववादाची वैशिष्टये आहेत. शिवराळ भाषेतून तणाव आणि त्याचे पर्यवसन दंगलीत होते. आक्रमक भाषा आणि कृतींद्वारे हिंदूंना ''धर्मयुद्धा'' करीता प्रवृत्त करण्याची कामगीरी नवहिंदुत्ववादी विचारांच्या नेत्यांनी केली आहे.

**३) गुन्हेगारीचे उदात्तीकरण-**

पारंपारिक हिंदुत्व "ब्राह्मणी" स्वरूपाचे होते तर नवहिंदुत्ववादाचे समर्थक व अनुयायी प्रामुख्याने ब्राह्मणेतर जाती-जमातीचे आहेत. त्यांना प्रामुख्याने अर्धशिक्षीत बेरोजगार आणि भरकटलेल्या १६ ते ३० या वयोगटातील तरुणांचा मोठया प्रमाणात पाठींबा मिळतो. अशा दिशाहीन तरुणांना आयुष्यात काहीतरी ''शौर्य गाजविण्याची'' संधी मिळते. हिंदुत्वाच्या विचारप्रणालीशी त्यांचे काही देणे घेणे नसते. धर्माच्या नावाखाली दंगल करणे, जाळपोळ करणे, लूटालूट करणे, दहशत प्रस्थापित करणारी "फौज" या

संघटनांच्या मागे उभी असते. दंगलीच्या काळात आणि नंतरसुद्धा ''रक्षणकर्त्याच्या'' भूमीकेतून अनेक वेळा खंडण्यासुद्धा वसूल केल्या जातात. अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रवृतीविषयी हिंदू वा मुस्लीम धर्ममार्तंडाला काहीच वाटत नाही. उलट ''मूँहतोड जबाब'' म्हणून त्या कृत्यांचे समर्थन केले जाते. उपद्रव मूल्य असल्याने जनता मात्र अशा संघटनांनाबाबत हताश झालेला पहावयास मिळते.

**४) व्यापक पाठींबा-**

नवहिंदूत्ववादी संघटनांना ब्राह्मण ब्राह्मणेतर अशा सर्वच जातीगटांचा व राजकीय पक्षांचा आश्रय लाभला आहे. या संघटनांचे कार्यकर्ते शिवसेना, काँग्रेस, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, अशा सर्वच राजकीय पक्षांत सामील झालेले आढळतात. राजकीय पक्षांसाठी असे ''पायदळ'' नेहमीच उपयुक्त ठरते. शिवसेनेच्या वाढीमध्ये काँग्रेसचे योगदान, भाजपाच्या प्रचारात पतीतपावन संघटना या गोष्टी नित्याच्याच झाल्या आहेत. एरव्ही पारंपारिक हिंदू संघटनांना ज्या गोष्टी करण्यात संकोच वाटतो त्या कृती या संघटनांना बिनदिक्कत करतात. काँग्रेस भाजपात, अलिकडे राष्ट्रवादी काँग्रेसने या संघटनांचा मोठ्या कौशल्याने वापर केला आहे.

**४.७.३. नवहिंदुत्ववादी संघटना (जमातवादी संघटना )**

महाराष्ट्रातील शिवसेना, भाजप, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, मुस्लीम लीग यासारखे पक्ष मूलतः जमातवादी म्हणूनच गणले जातात. याशिवाय गेल्या दोन दशकात अनेक नवहिंदुत्ववादी संघटना निर्माण झाल्या आणि त्यांनी आपले उपद्रवमूल्य प्रस्थापित केले. अशा काही संघटनांचा आपण आढावा घेऊ.

**१) पतितपावन संघटना-**

पतितपावन संघटना १९७८ मध्ये अस्तित्वात आली. ही संघटना स्वतःला ''सावरकरवादी'' म्हणवून घेते. १९८२ च्या पुण्यातील दंगलीमुळे ही संघटना प्रकाशात आली. या संघटनेचे कार्यक्षेत्र पुणे शहर व प. महाराष्ट्रातील काही जिल्हे एवढ्यापुरतेच मर्यादीत आहे. सावरकरांनी रत्नागिरी येथे स्थापन केलेल्या ''पतितपावन'' मंदिरावरून या संघटनेचे नामकरण केल्याचा संघटनेचा दावा आहे. सावरकरांचे चित्र हे संघटनेचे बोधचिन्ह आहे. स्वा. सावरकरांच्या विचारांशी संघटनेची बांधिलकी आहे असा-त्यांच्या संघटनेचा दावा आहे. सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपच्या ब्राहमणी हिंदुत्वावर या संघटनेने टीका केली. नंतर मात्र शिवसेनेच्या मध्यस्थीने हिंदू ऐक्याच्या नावाखाली भाजपाबरोबर समझोता केला.

हिंदू ऐक्यासाठी जातिभेद नष्ट करणे हे या संघटनेचे उद्दीष्ट आहे. आक्रमक मुसलमानांना रोखण्यासाठी हिंदू एकतेची गरज संघटनेने वारंवार अधोरेखीत केली आहे.त्यामुळे त्यांच्यावर हल्ले करण्यात त्यांना काहीच वावगे वाटत नाही. त्यांचा एकूण मुस्लिम समाजाला, त्यांच्या संस्कृतीला व त्यांच्यासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक तरतुदींना पतितपावन संघटनेचा विरोध आहे. त्यामुळे १९८२ मध्ये पुण्यात, १९८३ मध्ये शहादा आणि १९८४ च्या धुळ्याच्या 9 दंगलीत संघटनेने मुसलमानांना लक्ष्य केले होते. अल्पसंख्यांक आयोग रद्द करावा, समान नागरी कायदा करावा, औरंगाबादचे देवगिरी असे नामकरण अशा नेहमीच्याच भावनिक मागण्या संघटनेने केल्या होत्या.

पतितपावन संघटनेचे नेतृत्व व अनुयायी इतर भागात जाती, कनिष्ठ मध्यम वर्गातून व शहरी भागातून आलेले आहेत.ग्रामीण भागात शिरकाव करण्याचा प्रयत्न संघटनेने केला परंतु तो भाग अधीच शिवसेना व हिंदू एकता आंदोलनाने व्यापल्याने पतितपावन संघटनेचे कार्य पुणे जिल्हा व परिसर एवढ्यापुरतेच मर्यादीत राहीले. पुणे महानगरपालिकेत काही वॉर्डात या संघटनेचा प्रभाव आहे. थोडक्यात लोकशाहीतील ''आरडाओरडा करणारे अल्पसंख्य'' अशी या संघटनेची अवस्था आहे.

## २) हिंदू - एकता आंदोलन-

१९८० साली सांगली परिसरात हिंदू एकता आंदोलन ही संघटना स्थापन झाली. या संघटनेची स्थापना होण्यास त्यावेळची सांगलीतील परिस्थिती कारणीभूत ठरली,सांगलीच्या शेजारच्या मिरज येथे औषधोपचाराकरिता सधन अरब लोक मोह्मया संख्येने येत असत. या सुखलोलुप अरबांकडून हिंदू स्त्रियांवर अत्याचार झाल्याच्या काही घटना घडल्या. अरबांमुळे मिरज शहरात वेश्या व्यवसाय बेसुमार वाढल्याची भावना लोकांमध्ये निर्माण झाली. त्यातून परधर्मीय अरबांविरुद्ध स्थानिक लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला. या अरबांना धडा शिकविण्याच्या उद्देशाने हिंदू एकता आंदोलन उभारले गेले. पुरुषोत्तम साठे यांनी ही संघटना उभी करण्यात मार्गदर्शन केले. हिंदू एकता आंदोलनाने अरबांना सळो की पळो करुन सोडले आणि संघटना प्रकाशात आली. अरबांविरुद्धच्या असंतोषामुळे ही संघटना लोकप्रिय झाली.

पतितपावन संघटनेप्रमाणे हिंदू एकता आंदोलन सावकरवादी संघटना असल्याने हिंदू ऐक्य हेच या संघटनेचे उद्दीष्ट आहे. त्यासाठी जातिभेद नष्ट करावेत, हिंदूंमध्ये हिंदुत्वाचा अभिमान विकसीत करणे अशा स्वरूपाचा कार्यक्रम संघटनेने हाती घेतला. इतर हिंदुत्ववादी संघटनांप्रमाणेच या संघटनेने मुस्लीमविरोधी भूमिका घेतली. हिंदू ऐक्यासाठी मंडल आयोगाच्या अंमलबजावणीस सुद्धा विरोध केला. द. महाराष्ट्रात काही भागात संघटनेने मुस्लीमांविरुद्ध गुन्हेगारी कारवाया केल्या. अगदी अलिकडे सांगली-मिरजमध्ये गणेशोत्सवात अफजलखानाच्या वधाच्या देखाव्यावरून उसळलेल्या दंगलीतही या संघटनेचा सहभाग होता. सांगली जिल्हयापुरते कार्यक्षेत्र असलेल्या या संघटनेच्या वाढीस काँग्रेसचे धोरण कारणीभूत आहे.

## ३) मराठा महासंघ-

१९८१ साली माथाडी कामगार संघटनेचे नेते अण्णासाहेब पाटील यांच्या प्रयत्नाने मराह्मा महासंघाची स्थापना झाली. १९७५ नंतरच्या कालखंडात दिल्लीतील नेतृत्त्वाने मराठा नेतृत्त्वाचे खच्चीकरण करण्यास सुरुवात केली. यशवंतराव चव्हाण यांचे एकनिष्ठ अनुयायी असलेल्या अण्णासाहेब पाटील यांना ''साहेबां''ना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक रुचली नाही. मराह्मयांचे हितसंबंध जोपासण्यासाठी काँग्रेस संघटनेबाहेर दबाव गट निर्माण केला पाहिजे असे मराठा नेतृत्त्वाला वाटले आणि त्यांच्याच आशिर्वादाने मराठा महासंघाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्राच्या राजकारणात बॅ. ए. आर. अंतुलेंची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती झाल्याने मराठा नेतृत्वाला ही अनुसूचीत जाती-जमाती व अल्पसंख्यांकांची अभद्र युती असल्याची जाणिव झाली. आणि त्यातून निर्माण झालेल्या असुरक्षीतपणाच्या भावनेतून मराह्मा महासंघाला उत्तेजन मिळाले.

नवहिंदुत्ववाद्यांच्या ''महाराष्ट्र धर्मात'' ब्राह्मण-क्षत्रियांच्या (मराठा) युतीचे उदात्तीकरण करता येते या विचाराने महासंघाचे नेते प्रभावीत झाले. त्यातून महासंघाने दलितविरोधी भूमिका घेतली. मराठवाडयातील सवर्ण-दलित दंग्यात महासंघाने महत्त्वपूर्ण कामगीरी बजावली. ''रिडल्स'' प्रकरणात महासंघाने शिवसेनेची री ओढून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखाणावर शासनाने बंदी घालावी अशी टोकाची भूमिका घेतली. मराठा महासंघाच्या अशा भूमिकेने बऱ्याच वेळा काँग्रेसची कोंडी झाली. अण्णासाहेब पाटील यांच्या मृत्यूनंतर काँग्रेसनेही महासंघाकडे दुर्लक्ष केले. सुधाकरराव नाईक यांच्यासारख्या बिगर मराठा उमेदवाराची निवड मुख्यमंत्रीपदी झाल्यानंतर मराह्मा महासंघाने काँग्रेसशी फारकत घेतली. पुढे ते शिवसेनेबरोबर गेले.

मराठयांची प्रतिनिधीक संस्था असूनही आपणास मराठा नेतृत्त्व किंमत देत नाही हेच मराठा महासंघाच्या आक्रमकतेचे मूळ होते. त्यातूनच महासंघ शिवसेनेकडे झुकला. आज मराठा महासंघ राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर आहे. मराठयांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यात यावे अशी मागणी मराठा महासंघाने केली आहे. जेम्स लेन प्रकरण किंवा पुण्याच्या लाल महालातील दादोजी कोंडदेव प्रकरणी महासंघाने ब्राहमणविरोधी भूमिका घेतली. महासंघाचे आजचे नेतृत्त्वही वैफल्यग्रस्त आहे त्यामुळे त्यांनी एकांगी व जात्यंध भूमिका घेतली आहे. राजकारणाच्या सोयीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना चुचकारते आहे. या संघटनेला महाराष्ट्राच्या राजकारणात केवळ उपद्रव मूल्य, म्हणजेच आपल्या जातीच्या नेतृत्त्वाची कोंडी करण्याची क्षमता असलेली संस्था असे स्थान आहे.

## ४.८ मुस्लीम जमातवाद-

स्वतंत्र्योत्तर कालखंडात मुस्लीम धर्मीयांचे जमातवादी राजकारण महाराष्ट्रात निष्प्रभ ठरले आहे. मुंबई, औरंगाबाद, भिवंडी, मालेगाव, येवला, जळगाव अशी काही निवडक शहरे वगळता राज्यात इतरत्र मुस्लीम धर्मीय सांख्यिक दृष्टया अत्यल्प आहेत. मात्र ज्या शहरात मुस्लीमांची संख्या २०% पेक्षा जास्त आहे ती शहरे संवेदनशील किंवा तणावग्रस्त असल्याचे आढळून येते. महाराष्ट्रात मुस्लीम लीगचा एकही प्रतिनिधी आजपर्यंत विधानसभेत गेलेला नाही. मुस्लीम लीगचा मुंबई व औरंगाबादमध्ये मर्यादीत प्रभाव आहे. मुस्लीम लीग ऐवजी महाराष्ट्रात काँग्रेस, पूर्वी जनता दल आणि आता समाजवादी पक्ष मुस्लीमांचे जमातवादी राजकारण करतात. त्यामुळेच भिवंडी, मालेगाव सारख्या विधानसभा मतदार संघातून काँग्रेस, समाजवादी विचारसरणीच्या पक्षांचे मुस्लीम उमेदवार निवडून येतात. इतरत्र मात्र ते काही आर्थिक व राजकीय सवलतींच्या मोबदल्यात शाही इमामसारख्या धर्मगुरुच्या फतव्यानुसार काँग्रेस वा समाजवादी पक्षांना एकगठ्ठा मतदान करतात.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषत: गेल्या दोन दशकांत देशाच्या इतर भागातील मुस्लीम रोजगाराच्या शोधात मुंबई शहरात मोठया प्रमाणात आले आहेत. त्यांच्या अधिकृत आणि अनधिकृत झोपडपट्टयांमध्ये मोठया प्रमाणात बेकायदेशीर धंदे चालतात. बेकायदेशीर धंदे सुरु करणाऱ्या हिंदू धर्मीयांशी व्यावसायिक संघर्ष होतात. त्यातूनच गँगवॉर जन्माला येते. याच गँगवॉरला पद्धतशीरपणे धर्मयुद्ध किंवा जिहाद असे नाव दिले जाते. बऱ्याच वेळा शहरातील कुविख्यात गुंडांच्या टोळ्यांचे म्होरके आपापल्या विभागात भाईगिरी करत असतात. त्यातूनच त्यांची झोपडपट्टीवरती हुकूमत किंवा वर्चस्व निर्माण होते. निवडणूकांच्या काळांत हे भाई राजकीय नेत्यांशी सौदेबाजी करतात आणि त्याबदल्यात राजकारणी त्यांना संरक्षण देतात. दाउद इब्राहिम, हाजी मस्तान यासारख्या गुंडांच्या टोळयांचे अनुकरण हिंदुत्ववादी संघटनांनी केले आहे. अरुण गवळी, अश्विन नाईक यासारखे हिंदू गुंडसुद्धा निर्माण झाले आहेत. त्यामुळे जमातवादी राजकारणातून अपरिहार्यपणे राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे. प्रस्थापित अशा नेतृत्त्वाव्यतिरिक्त मुस्लीम धर्मावर धर्मगुरु लोकांचा म्हणजे शाही इमाम, मुहला-मौलवी यांचा प्रभाव मोठा आहे. मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड, अखिल भारतीय बाबरी मशिद कमीटी, जमात-ए-इस्लामी हिंद यासारख्या संघटना त्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करतात. अशा संघटनांच्या माध्यमातून हे नेते धर्मकारण करीत असतात. हे नेतृत्त्व संकुचित, परंपरावादी व सनातनी आहे. आपल्या जमातीवरील आपला प्रभाव दाखविण्यासाठी असे नेतृत्त्व "प्रजासत्ताक दिनावर बहिष्कार टाका" असे धर्मांध स्वरूपाचे आदेश

आपल्या अनुयायांना देतात. त्यांच्या अशा अदूरदर्शीपणामुळे जमातवादी तणाव निर्माण करण्यात मोह्रा हातभार लागतो. त्यांच्या अशा वागणुकीमुळे समस्त इस्लाम धर्मीयांची राष्ट्रनिष्ठा शंकास्पद ठरते. लष्कर-ए-तोयबा, तबलीघ सारख्या संघटना पॅन इस्लामीझमचा पुरस्कार करतात. अलिकडच्या काळात अबू आझमी सारख्या आमदाराने हिंदीतून शपथ घेण्याचा केलेला प्रयत्न त्याला मनसे शैलीने दिलेले उत्तर यामुळे भिवंडी-मालेगाव मध्ये तणाव निर्माण झाला होता. बहुसंख्य मुस्लीम अशा नेत्यांच्या प्रभावाखाली असल्याने सुधारणावादी मुस्लीम नेतृत्व व राजकीय पक्षांची दखल या मुस्लीम समाजाने घेतली नाही. याची प्रचिती शहाबानो प्रकरण, व रामजन्मभूमी प्रकरणात आली होती. परिणामी जमातवादाला एक प्रकारे बळकटी येत आहे.

## ४.९ जमातवादी आणि देशीवादाच्या आधारावर केल्या जाणाऱ्या राजकारणाला अनेकसत्तावादी आणि धर्मनिरपेक्षतावाद्यांनी दिलेला प्रतिसाद

वरील शीर्षकामध्ये बऱ्याच संकल्पनांचा समावेश झाला आहे. आपण सुरुवात या संकल्पनांपासूनच करुया. शीर्षकामध्ये खालील संकल्पनांचा समावेश झाला आहे:-

१. अनेकसत्तावादी
२. धर्मनिरपेक्षतावादी
३. धर्मनिरपेक्षतावाद्यांचा प्रतिसाद
४. जमातवादी राजकारण
५. देशीवाद

अनेकसत्तावाद ही लोकशाहीवादी विचारप्रणाली आहे. समाजात अनेक संस्था असतात, राज्यसंस्था ही त्यांच्यापैकीच एक आहे. तिला वेगळे महत्त्व देण्याचे कारण नाही. समाजातील सर्व सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संस्था राज्यसंस्थेला समांतर मानल्या पाहिजेत. राज्यसंस्था आणि इतर संस्थांमध्ये फरक मानू नये. कोणत्याही एका संस्थेचे वर्चस्व मानण्याची गरज नाही हे विचार म्हणजे या अनेकसत्तावादाचा गाभा आहे. अनेकसत्तावाद मानणारा माणूस वर्चस्ववादी नसतो. त्याचा विविधतेवर विश्वास असतो. सत्ता सर्वांच्या हाती असावी, सर्व संमतीने सत्तेचा वापर केला जावा असे त्याचे मत असते.

धर्मनिरपेक्षता ही पाश्चात्य संकल्पना आहे. प्रबोधनाच्या काळात ही संकल्पना पुढे आली. पश्चिमेकडच्या देशांमध्ये धर्मनिरपेक्षतेचा अर्थ धर्म आणि राजकारण एकमेकांपासून वेगळे करणे. भारतामध्ये मात्र या संकल्पनेचा वेगळा अर्थ लावला जातो. भारतात धर्मनिरपेक्षता म्हणजे परमेश्वराचे अस्तित्व नाकारणे असा होत नाही. भारतातील अनेक धर्मनिरपेक्ष माणसेही परमेश्वर किंवा देव ही संकल्पना मानतात. भारतीय राज्यघटने प्रमाणे धर्मनिरपेक्षता म्हणजे:-

१. भारताचा कोणताही अधिकृत धर्म असणार नाही.
२. सर्वधर्मसमभाव - सर्व धर्मांना समान मानले जाईल. सर्वांना कोणताही धर्म मानण्याचे किंवा बदलण्याचे स्वातंत्र्य असेल
३. अल्पसंख्याकांना विशेष संरक्षण दिले जाईल

प्रतिक्रीया आणि प्रतिसाद यामध्ये बराच फरक आहे. प्रतिक्रीया ही साधारणत: विरोधी स्वरुपाची असते. ती संघर्ष आणि ताण संपविण्यापेक्षा वाढवणारी असते. प्रतिसाद ही व्यापक आणि विधायक बाब आहे. प्रतिसाद सकारात्मक असतो. संघर्षाच्या मुळाशी जाऊन संघर्ष सोडविणे हे प्रतिसादाचे उद्दीष्ट असते.

जमातवादी राजकारण म्हणजे हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन अशा एखाद्या जमातीच्या किंवा समूहाच्या आधारे राजकारण करणे. जमातवादी राजकारणी प्रत्येक घटनेकडे संबंधीत जमातीच्या हिताच्या दृष्टीकोनातून पाहतात. त्यांना त्यांच्या जमातीसंबंधी विषयच महत्त्वाचे वाटतात. त्यांचे एखाद्या दुसऱ्या जमाती बरोबर शत्रुत्व असते. शत्रु आपल्यावर चाल करेल आणि संपवून टाकेल त्याआधी आपणच त्याला संपविले पाहिजे, म्हणजेच सतत आक्रमक पवित्र्यात राहीले पाहिजे अशी त्यांची भूमिका असते. ते आपल्या अनुयायांना या मुद्दयावरुन सारखे भडकावत राहतात. १२ व्या शतकात या भागात मुस्लीम आक्रमणे झाली. स्थानिकांचा पराभव झाला. मुसलमानांबद्दल शत्रुत्वाची भावना निर्माण झाली. पुढे ब्रिटीश राज्यकर्त्यांनी ही भावना जाणीवपूर्वक वाढीस लावली. स्थानिक सामाजिक गट एकमेकात संघर्ष करीत राहीले म्हणजे आपल्याला सहज कारभार करता येईल ही त्यांची संघर्ष वाढविण्यामागची भावना होती.

देशीवादाची चर्चा या पाठात आपण आधीच केली आहे. विशिष्ठ प्रांतात राहणाऱ्या आणि विशिष्ठ भाषा बोलणाऱ्या लोकांचे संघटन करून त्यांचे हितरक्षण करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे देशीवाद.

पाठाच्या या भागाच्या शीर्षकामध्ये दोन विरोधी गट अभिप्रेत आहेत- जमातवादी आणि धर्मनिरपेक्ष. त्यामध्ये असाही अर्थ अभिप्रेत आहे की जमातवाद्यांनी काही कृती केली आहे आणि त्यावर प्रतिक्रीया किंवा प्रतिसाद देणे ही आता स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्यांची जबाबदारी आहे. काही प्रतिसाद देणे त्यांच्याकडून अपेक्षित आहे. अर्थात हा प्रतिसाद सुसंस्कृत आणि अहिंसक असावा अशीही अपेक्षा आहे.

जमातवादी गटाने किंवा नेत्यांनी असे काय केले आहे ? त्यांनी नेहमीच दोन संघर्षरत समुदायांना अधिक भडकावण्याचे काम केले आहे. धर्मनिरपेक्षतावाद्यांनी कोणती पाऊली उचलली आहेत, किंबहुना काही कृती केली आहे की नाही आणि केली असल्यास काय केले आहे हे आपल्याला पाह्माच्या या भागात अभ्यासायचे आहे.

प्रथमदर्शनी असे प्रतिपादन करता येते की धर्मनिरपेक्षतावाद्यांनी अपेक्षित प्रतिसाद दिलेला नाही. जमातवाद्यांच्या कोणत्याही कृत्याचा भक्कमपणे विरोध केला गेलेला नाही. जमातवादी राजकारणाला विरोधी गटातील जमातवाद्यांनी त्याच भाषेत तोडीसतोड जबाब दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. उदा. हिंदू सभेची स्थापना ही मुस्लीमलीगच्या स्थापनेच्या संदर्भातील जमातवादी प्रतिक्रिया मानता येईल. पण धर्मनिरपेक्षतावाद्यांनी या संदर्भात काही केल्याचे अभावानेच आढळेल.

राष्ट्र सेवा दलाशी संबंधीत काही समाजवादी नेत्यांनी समाजात धर्मनिरपेक्ष मूल्ये रुजविण्याचे काही प्रयत्न केले आहेत. प्रसिद्ध साहित्यिक वसंत बापट यांनी या संदर्भात मोल्ले कार्य केले आहे. दादा कोंडके, निळू फुले यांच्यासारख्या मराठी नटांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली आहे. त्यांच्या उमेदवारीच्या वर्षांमध्ये या नटांनी राष्ट्रसेवादलाच्या मेळयामध्ये काम केले आहे. राष्ट्रसेवादलाने काही शैक्षणिक संस्थाही स्थापन केल्या आहेत.

आनंद पटवर्धन यांच्यासारख्या काही चित्रपट निर्मात्यांनी आणि दिग्दर्शकांनी अलीकडील काही जमातवादी राजकारणाशी संबंधीत घटनांचे विश्लेषण धर्मनिरपेक्ष दृष्टीकोनातून करुन ते आपल्या चित्रपटांमधून आणि माहितीपटांमधून जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

दूरदर्शन आणि आकाशवाणी ही सरकारी प्रसारमाध्यमे नेहमीच धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कार करीत आली आहेत. सरकारने अलीकडच्या काळात अस्तित्वात आलेल्या खाजगी इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांना आपल्या कार्यक्रमांचे प्रसारण करताना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी चिथावणीखोर बातम्या देऊ नयेत अशा प्रकारच्या सूचना सरकार त्यांना सतत देत असते. जनसामान्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय असलेल्या हिंदी सिनेसृष्टीनेही नेहमीच धर्मनिरपेक्ष मूल्यांची कास धरलेली आहे. प्रादेशिक चित्रपटही याला अपवाद नाहीत.

सर्व शैक्षणिक संस्थांवर शासनाचे नियंत्रण आहे. शाळेचा अभ्यासक्रम धर्मनिरपेक्षतेची मूल्ये जोपासणारा असावा याची विशेष काळजी सरकार नेहमीच घेते. अल्पसंख्यांकांच्या शाळांना विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. त्यांच्या शाळांमधून धार्मिक शिक्षणाला परवानगी देण्यात आली आहे.

निवडणुकांमध्ये जमातवादी प्रचार करणाऱ्या उमेदवारांच्याविरुध्द भारतीय निवडणुक आयोगाने अलीकडच्या काळात कठोर पाऊले उचलली आहेत. काही उमेदवारांची उमेदवारी रद्द केली गेली आणि काही ठिकाणी पुन्हा निवडणुका घेण्यात आल्या.

काही पोलीस अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील हिंदू आणि मुसलमान समाजातील काही प्रतिष्ठीत व्यक्तींना एकत्र आणून मोहल्ला कमिट्यांची स्थापना करण्यात आली. आसपासच्या भागात काही ताणतणाव असल्यास कमिटीचे सदस्य त्यामध्ये वेळीच लक्ष घालून वादाचे मुद्दे परस्पर सामंज्यस्याने सोडविण्याचा प्रयत्न करतात. राज्यशासन सर्व धर्मांना समान संरक्षण पुरविले. सर्व धर्मांच्या सणसमारंभांच्या वेळी विशेष व्यवस्था केली जाते. उदा. पंढरपूरची वारी, किंवा नाशिकचा कुंभमेळा किंवा हज यात्रा किंवा माउंट मेरीची जत्रा किंवा सुवर्ण मंदीरातील उत्सव किंवा जैन आणि बौध्द धर्मियांचे उत्सव-सर्वच प्रसंगी सरकार आवश्यक त्या सुविधा पुरविते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, समाजवादी आणि साम्यवादी पक्ष हे आणि इतर अनेक पक्ष स्वत:ला धर्मनिरपेक्षतावादी घोषित करतात. तसा त्यांच्या घटनांमध्ये उल्लेख करण्यात आला आहे. अनेक स्वयंसेवी संस्था धर्मनिरपेक्षतावादी मूल्ये जोपासण्याचे काम करतात. यामध्ये महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती आणि मुस्लीम सत्यशोधक समाज यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. रझिया सुलतान आणि असगर अली इंजिनियर या मुस्लीम समाजाच्या कार्यकर्त्यांचाही विशेष उल्लेख करावा लागेल. मुस्लीम समाजाच्या धार्मिक भावना दुखावण्याचा प्रयत्न केला असा आरोप करीत त्यांच्यावर अनेकवेळा मुस्लीम व्यक्तींकडूनच हल्ले झाले आहेत.

मराठीतून प्रकाशित होणारी समाज प्रबोधन पत्रिका तसेच इंग्रजी विद्वजनांमध्ये प्रतिष्ठीत मानले गेलेले इकॉनॉमिक अँड पोलिटीकल विकली हे साप्ताहीक धर्मनिरपेक्ष दृष्टीकोनातून सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बाबींचे विश्लेषण करीत असतात. परंतु त्यांचा वाचक वर्ग फारच मर्यादीत आहे.

धर्मनिरपेक्षतावाद्यांच्या या सर्व प्रयत्नांना फारसे यश आलेले दिसत नाही. त्यांना जमातवादी राजकारण थांबविता आलेले नाही किंवा लोकांना त्याच्या प्रभावाखाली येण्यापासून थांबविता आलेले नाही. अल्पसंख्यांपकांचे फाजील लाड केल्याचा आरोप नेहमीच शासनावर केला गेला आहे. शासनाने त्याला समर्पक उत्तर दिलेले नाही. भारतीय जनमानसात धर्म खोल रुजलेला आहे. धर्माच्या आधाराने केलेले कोणतेही आवाहन लोक सहज मानतात. परंतु धर्मनिरपेक्षता मूल्ये समाजात जाणिवपूर्वक रुजवावी

लागतील. वाढती लोकसंख्या, कमी होत जाणाऱ्या नोकऱ्या आणि रोजगाराच्या संधी, त्यामधून निर्माण होणारी बेरोजगारी, गर्दीने गांजलेली बकाल शहरे, झोपडपट्ट्या आणि गलिच्छ वसत्या, वाढती असमानता आणि अन्याय, राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे सर्व धर्मनिरपेक्ष मूल्ये समाजात रुजविण्याच्या प्रक्रियेतील अडथळे आहेत.

## ४.१० स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१) महाराष्ट्राच्या संदर्भात भूमीपूत्र सिद्धांताची संकल्पना स्पष्ट करा.
२) महाराष्ट्रातील जमातवादी राजकारणाचा परिणाम स्पष्ट करा.
३) ''धर्मनिरपेक्षता हा जमातवादाला पर्याय आहे''- भाष्य करा.
४) महाराष्ट्रातील हिंदू जमातवादाची व्याप्ती स्पष्ट करा.
५) टिपा लिहा.
अ) अल्पसंख्यंकांचा जमातवाद
ब) एतद्देशीयवाद
क) नवहिंदुत्ववाद
६) जमातवादी राजकारणाला मिळालेल्या निधर्मी व बहुआयामी प्रतिसादाची चर्चा करा.

## ४.११ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) अशोक जैन, ''महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण'' शेठ पब्लिशर्स, १९९३
२) अशोक चौसाळकर, ''धर्म, समाज आणि राजकारण'' लोकवाङ्.मय गृह २००४
३) सुहास पळशीकर, '' जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही'' प्रतिमा प्रकाशन, २००६
४) सदा कऱ्हाडे, ''धर्म, धर्मनिरपेक्षता आणि भारत'' स्वरूप प्रकाशन, २००७
५) भा. ल. भोळे, ''भारताचे शासन आणि राजकारण'' पिंपळापुरे पब्लिशर्स, २००३
६) प्रकाश बाळ / किशोर बेडकिहाळ, ''भारतीय राजकीय व्यवस्था'', आंबेडकर अकादमी, सातारा, २००२

---------------

# ५अ

# बिगर राजकीय प्रक्रिया - १
## (व्यापारी व कामगार गटांच्या संघटना)

५अ.१ प्रास्ताविक
५अ.२ दबावगट
५अ.३ व्यापारी उद्योजक वर्ग आणि राजकारण
५अ.४ चेंबर ऑफ कॉमर्सचा कार्यभाग
५अ.५ कामगार संघटना
५अ.६ कामगार संघटनांचा विकास
५अ.७ सारांश
५अ.८ महत्त्वपूर्ण प्रश्न

## ५अ.१ प्रास्ताविक

दबावगट किंवा हितसंबंधी गट राजकीय प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटक आहेत ही वास्तवीकता राज्यशास्त्राच्या आभ्यासकांनी मान्य केली आहे. दबावगटाची निर्मिती ही समाजाचे सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी झालेली असते. दबावगट ही काही राजकीय प्रणाली किंवा पक्ष नव्हे. ती लोक एकत्रित येऊन झालेली संघटना आहे.

विशिष्ट हेतुच्या पुर्ततेसाठी अनेक लोक एकत्रित येतात आणि ध्येय पूर्तीसाठी राजकीय यंत्रणेवर दबाव टाकून लोकांना ध्येय साध्य करण्यास उत्तेजन देतात त्या संघटीत गटास आपण दबावगट किंवा हितसंबंधी गट असे म्हणतो. आणि हे हितसंबंधी गट राजकीय प्रक्रीयेवर सकारात्मक प्रक्रिया करीत असतात त्याचे श्रेय राज्यशास्त्रातील ज्याप्रमाणे डेव्हीड इस्टन, गाब्रिएल आल्मंड सारख्या वर्तनवादी विचारवंतांना दिले जाते. त्याचप्रमाणे आर्थर बेंटले, डॅनियल इमन, अर्ला लोयेस सारख्या समुहाकडे किंवा संघवाद्यांनाही दिले जाते.

ऑथर बेंटले त्याच्या ‘The process of Government’ ग्रंथात असे स्पष्ट केले आहे की, ‘‘समाज म्हणजे केवळ संस्थात्मक रचनांचा आणि मुल्यांचा आकृतीबंध नसून कृतीची आणि प्रक्रियांची ती एक संबंध साखळी असेल.’’

कल्पना, विचार, भावना, घटनासमीत्याचे निर्णय यांचा एक स्वतंत्र अर्थ नसतो. जेव्हा कोणत्या तरी कृतीशी त्या विचाराचा भावनेचा संबंध येतो तेव्हा त्या विचाराला एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. राज्यशास्त्रातील आपली साधनसामुग्री आपल्या केवळ एका किंवा अनेक व्यक्तींकडे सापडत नाही तर ती अनेक व्यक्तींच्या संबंधातून होणाऱ्या कृतीत सापडते.

## ५अ.२ दबावगट

दबावगट, Pressure group हितसंबंधी गट (Interest group) लॉबी (Lobby) हे सर्व शब्द बरेचदा एकाच अर्थाने वापरले जातात किंवा समानार्थी वापरले जातात. परंतु यात सुक्ष्म असा भेद आहे. तो अभ्यासाने क्रमप्राप्त ठरते. हितसंबंधी गट ऐतिहासिक काळापासून अस्तित्वात आहेत. लोकांच्या (समाज) हितासाठी एकत्रीतपणे लढणारा हा एक संघटीत गट असतो. लोकांच्या समस्या, प्रश्न सोडविण्याचे काम हितसंबंधी गट करीत असतात उदाहरणार्थ वेगवेगळे कुटीरउद्योग, व्यवसाय सातत्याने टिकून राहण्यात यासाठी कार्यरत असलेल्या संघटना अगदी ऐतिहासिक काळापासून हितसंबंधी गटाचे कार्य चालू आहे. कामगार संघटना, विद्यार्थी संघटना हा त्याचाच भाग म्हणता येईल. म्हणजे लोकांच्या हितरक्षणासाठी प्रयत्नशील असलेली लोकांची संघटना तीस आपण हित संबंधी गट म्हणतो.

सामाजिक संवर्धनातून असे गट सामाजिक संबंधातून आणि सामाजिक गरजेतून नेहमीच निर्माण होत असतात.

भारताच्या सामाजिक इतिहासात निर्माण झालेली जातीसंस्था त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील बारा बलुतेदार पद्धती हे सुद्धा हितसंबंधी गट म्हणता येईल विशिष्ट व्यवसायाचे जतन करणे आणि तो व्यवसाय पुढच्या पिढीकडे सोपवणे आणि त्या व्यवसायाच्या आड येणाऱ्या घटकांवर मात करून तो व्यवसाय उद्योग टिकविणे वाढविणे हे हितसंबंधी गटाचे कार्य असते. म्हणजेच लोकांच्या हितार्थ लढणारा गट म्हणजे हितसंबंधी गट म्हणता येईल.

दबावगट हा सुद्धा लोकांचा हितासाठीच एकत्र आलेल्या व्यक्तींचा समुह होय परंतु वरील दोन घटकात सौम्य असा फरक करता येईल. दबावगट हा देखील व्यक्तींचे हितसंबंध जोपासण्यासाठी पुढे आलेला गट असतो. जेव्हा कार्याशी संबंधीत लोक किंवा राजकीय प्रतिनिधी शासकीय व्यवस्था त्यांच्या कायद्याचे नियमाचे व्यवस्थित परिमार्जन करीत नाही. त्यावेळेस दबाव गट त्या राजकीय व्यवस्थेवर दबाव टाकून कार्य साध्य करतात. म्हणजेच दबावगटाचे कार्य देखील हितसंबंधी गटाप्रमाणेच असते अशा प्रकारचे दबावगट राजकीय व्यवस्था सुरळीत चालावी म्हणून त्यावर प्रभाव पाडतात आणि आपल्या मागण्यांची पुर्तता करून घेतात अशा गटांना सक्रीय किंवा प्रभावी गट म्हणता येईल.

प्रातिनिधिक लोकशाही विकासाबरोबर आणि एकोणीसाव्या शतकापासून विधिमंडळावर प्रभाव टाकणारे अनेक गट निर्माण झाले. आणि आजही अशा प्रकारचे अनेक गट निर्माण झाले आहेत.

सामान्यपणे लोक किंवा शासकीय धोरण ठरविणारे विधीमंडळाचे सदस्य यांच्यात दुवा साधणारी ही संघटना असते.

उदा. शिवसेना ही एक दबावगट म्हणूनच निर्माण झालेली संघटना होती. मराठी लोकांचा (हिन्दु) हितसंबंध संवर्धनासाठी पुढे आलेली ही संघटना हिन्दु लोकांवर होणारे अन्याय किंवा महाराष्ट्रामध्ये मराठी माणसाला पूर्णपणे स्वायत्त होता यावे त्यांचे प्रत्येक क्षेत्रातलं स्थान अबाधीत राखण्यासाठी ही संघटना कार्यरत होती अशा प्रकारच्या अनेक संघटनांची निर्मिती सातत्याने होत असते. विधायक कार्यामुळेच शिवसेना ह्या दबाव गटाला एक मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

लॉबी (Lobby) हा शब्द देखील थोड्याफार फरकाने अशाच प्रकारे वापरला जातो आजच्या सामाजिक राजकिय जीवनात अनेक प्रकारच्या लॉबी कार्यरत आहे. उदा. शुगर लॉबी. परंतु हे लोक शासकीय यंत्रणेमध्ये लुडबूड न करता आपला प्रभाव त्यावर पाडू शकतात काही हितसंबंधी गट लॉबीचा वापर ही करीत नाही परंतु काही लोक सामान्य नागरीक व शासकीय धोरण ठरविणारे सभासद यांच्यामध्ये दुवा साधणारी लॉबी किंवा संसुचनाची प्रक्रीया आहे.

वर आपण पाहिले कि दबावगट किंवा हितसंबंधी गट ही लोकांची सुसंघटीत संघटना आहे. ती लोकांच्या हितासाठी कार्य करते. त्याप्रमाणे लॉबी संघटीत संघटना नव्हे. तर लॉबी ही एक प्रक्रिया आहे.

हितसंबंधी गट किंवा संघटना विधिनियम तयार करीत नाही तर विधिमंडळातील सभासदांवर आपला प्रभाव पाडण्यासाठी प्रयत्नशील असतात.

फॉन्सिस कॅसल्स् यांनी अशी व्याख्या केली आहे की, 'दबावगट' हा शासकीय किंवा अन्य मार्गानी राजकीय स्थित्यंतर किंवा परिवर्तन साधण्याचा प्रयत्न करतो परंतु विधिसभेमध्ये प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय पक्षासारखे त्याचे स्वरूप नसते. डेव्हिड टूमनच्या मते इतर समाजशील गटावर प्रभाव पाडणार समान उद्दिष्ट्ये असणारा गट हितसंबंधी गट होय. असा गट जेव्हा शासनाच्या विभागामार्फत अथवा शासनावर आपल्या मागण्याचे दडपण निर्माण करतो त्यावेळी तो राजकीय हितसंबंधी गट बनतो.

राजकीय हितसंबंधी गट किंवा दबाव गट केवळ बघ्याची भूमिका न घेता आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी आपले हितसंबंध रक्षण्यासाठी कार्यरत असतात.

गॉब्रियल आल्मंड प्रलाडंड या संघटनेला शासकीय हितसंबंधी गट संबोधतात तसेच व्ही.ओ.की. यांनी 'सरकारी' धोरणावर प्रभाव पाडण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या खाजगी संघटना असे स्पष्टीकरण केले आहे.

अशा प्रकारचे अनेक हितसंबंधी गट आपणास सांगता येतील. उदा. विद्यार्थी संघटना, कामगार संघटना, महिला संघटना हा त्याचा भाग म्हणता येईल.

श्रमिक संघटना सत्यशोधक समाज, नर्मदा आंदोलन ह्या काही महत्त्वपूर्ण संघटनाही कार्यरत आहेत.

**अ) व्यापारी उद्योजक वर्ग** - पारंपारिक जाती प्रधान भारतीय समाज व्यवस्थित व्यापार उदीम करणाऱ्या लोकांचा समावेश वैश्य जाती समूहामध्ये केला जात असे. वैश्य लोक वेगवेगळे व्यापार, व्यवसाय करीत असत. शहरी भागामध्ये गूजराती, मारवाडी लोकांचे वेगवेगळे व्यवसाय होते. मारवाडी लोक त्यावेळेस सावकारी करत असे आणि त्यावरच त्यांचे उदरभरण चालत असे.
ब्रिटिश - राजवटीच्या काळात ह्या व्यापाऱ्यांनी कापूस, तंबाखू इ. प्रकारचा कच्चा माल इंग्लंडला पाठवून निर्यात करण्याचा व्यवसाय सुरू केला. वऱ्हाडातील कापूस खरेदी मुंबईतील मारवाडी, गुजराती व्यापारी करत असे.

१९व्या शतकाच्या सुरवातीला भारतात औद्योगिकरणाची प्रक्रीया सुरू झाली आयात निर्यात व सावकारीच्या धंद्यातून भरपूर भांडवल या व्यापारी वर्गाने कमविले होते त्या भांडवलावर गुंतवणूक करून नवनवे उद्योग उदयास आणले गेले भारतात एक नंबरचे उद्योगपती असलेल्या बिर्ला गटाची स्थापना करणारे मुळ पुरूष कलकत्यात सावकारीचा व्यवसाय करत असत. म्हणजेच २०व्या शतकामध्ये व्यापारी वर्गातून संपन्न अशा उद्योजक वर्गाची निर्मिती झाली. नविन उद्योजक वर्ग उदयाला आला. देशी भांडवलदाराप्रमाणे परकीय भांडवलदार ही उद्योग व्यवसायात सामील झाले. परकीय भांडवलाची गुंतवणूक उद्योगात होऊ लागली. काही परकीयांच्या मालकीच्या कंपन्यांचे ही स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीयकरण करण्यात आले. देशी भांडवलदारा प्रमाणेच परदेशी भांडवलदारांनी देखील विविध व्यवसायात भागीदारी केली. उदा. हिन्दुस्थान लिवर, कोलगेटपामोलीव्ह इ. उद्योग परकीय भांडवलदार वर्गाकडे होते स्वातंत्र्याच्या काळात ह्या कंपन्यांचे राष्ट्रीयकरण झाले.

या व्यतिरिक्त स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर सहकारी क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास घडून आला आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रात विविध व्यापार अस्तित्वात आले आहेत.

उद्योग समुहाचा महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश झाला आहे. मोठमोठे उद्योगपती कारखानदार वेगवेगळ्या राजकीय पक्षांशी निगडीत असतात. बऱ्याच राजकीय पक्षांना या उद्योगपतींकडून निधी मिळत असतो. त्यामुळेच भारतीय राजकारणावर ह्या उद्योग जगताचा वरचश्मा आहे हे नाकारून चालणार नाही. अगदी महात्मा गांधीच्या वेळेस देखील अनेक भांडवलदार त्यांना मदत करतात अशा वल्गना होत होत्या. परंतु महात्मा गांधींनी राजकीय हेतुसाठी कुठल्याही उद्योगपतीकडून मदत घेतली नाही. किंवा त्यांच्यात देवाण घेवाणीचे राजकारण नव्हते.

या घटकाव्यतिरिक्त संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर सहकारी क्षेत्राच्या उद्योगांचा विकास फार मोठ्या प्रमाणात झाला.

सहकारी क्षेत्रांचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर तसेच शासकीय यंत्रणेवर झालेली दिसून येतो. सहकारी उद्योगधंदे किंवा औद्योगिक विकास घडून आल्याने भांडवलदारांचा नवा वर्ग उदयाला आला आहे. भांडवलदारांचा राजकारणाचा फार जवळचा हितसंबंध पूर्वीपासून चालत आलेला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करता असे लक्षात येते की, सहकारी क्षेत्राचा, भांडवलदारांचा प्रभाव राजकीय यंत्रणेवर आहे. व्यापारी उद्योजक वर्ग प्रत्यक्ष राजकारणात उतरत नाहीत पण त्याचे राजकीय हितसंबंध असल्यामुळे ते आपली कामे व्यवस्थित करून घेतात. निवडणूकांसाठी भांडवलदार आर्थिक निधी पुरवतात.

भारतीय राजकारणाचा विचार करता आपल्या असे ध्यानात येते की, इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना निवडणूका लढवत असतांना अनेक उद्योगपतीकडून त्यांनी निधी गोळा केला होता. त्या निधीचा उपयोग त्यांनी लोककल्याणासाठी किती वापरला हे मात्र स्पष्ट सांगता येणार नाही. या बद्दलची माहिती डॉ. अशोक जैन यांनी ही दिलेली नाही मात्र त्यांच्या पुस्तकात वरील गोष्टीचा उल्लेख मात्र सापडतो.

म्हणजेच आपण असे स्पष्ट करू शकतो की पूर्वी पासून भांडवलदाराचे व राजकीय व्यवस्थेचे

हितसंबंध जोपासले गेले आहेत. त्यामुळे आजही व्यापारी वर्गाचा आणि सहकारी क्षेत्राचा प्रभाव महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकारणावर आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आणि भारत स्वातंत्र झाल्यापासून राजकारणावर ह्या घटकाचा प्रभाव व नियंत्रण आहे ह्या व्यापारी वर्गाचे स्व:ताचे असे वेगवेगळे उद्योग धंदे स्थापन केले आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातदेखील अनेक परकीय भांडवलदारांनी उद्योग स्थापन केले होते. अनेक उद्योगात भागीदारी करून भांडवल गुंतवले होते. स्वातंत्र्यानंतर ह्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. यावरून हे लक्षात घेतले पाहिजे की व्यापारी उद्योजक सहकारी क्षेत्राचा फायदाच राजकारणासाठी झालेला असल्याने सरकार उद्योगांना प्रोत्साहन देते आणि वरील घटकांचा प्रभाव व नियंत्रण कामयस्वरूपी महाराष्ट्राच्या किंवा देशाच्या राजकारणावर राहणार आहे हे निश्चित.

## ५अ.३ व्यापारी उद्योजक वर्ग आणि राजकारण

जुने राज्यकर्ते आणि सावकार यांचा फार जुना संबंध आहे. पेशाव्यांच्या काळामध्ये पेशवे आणि पुण्यातील मारवाडी, सावकार यांचे निकटचे संबंध प्रस्थापित झाले होते. पेशवे मारवाडी व सावकाराकडून कर्ज घेत असत. अशा सावकारांचा, मारवाड्यांचा पेशव्यांच्या दरबारात दबदबा असे. परंतु राजकारणावर त्यांचा प्रभाव नगण्य होता.

सन १६०० ते १८५८ मध्ये ब्रिटिश लोकांनी भारतात इस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली आणि कंपनीच्या माध्यमातून त्यांनी भारतावर राज्य केले १८व्या शतकाच्या अखेर पर्यंत राज्यकारभार करण्यापेक्षा नफा मिळविण्यातच कंपनीच्या सदस्यांना स्वारस्य होते.

**स्वातंत्र्य पूर्व कालखंड :-** १९व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात औद्योगिकरणास सुरवात झाली. त्या अगोदर भारतातला व्यापारी वर्ग आयात निर्यात व्यवसायाद्वारे कृषी उत्पन्नाच्या खरेदी व्यवहारात आणि सावकारीच्या मार्गाने अमाप पैसा कमवला होता. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये ह्या सावकार व व्यापाऱ्यांनी अनेक उद्योग काढून भांडवलाची गुंतवणूक केली होती. उद्योगात गुंतवणूक केल्यामुळे त्यांच्याकडे अमाप संपत्ती जमा झाली. व त्यातूनच देशी उद्योजकांचा वर्ग उदयास आला. आणि राजकारणावर आपला प्रभाव पाडण्यासाठी विदेशी व्यापाऱ्या, उद्योजकाप्रमाणे देशी उद्योजकांनी आपल्या संघटना निर्माण केल्या की जेणे करून राजकारणावर प्रभाव निर्माण करून आपले हित साधले जाईल.

लोकमान्य, टिळकांनी परकीय मालावर बहिष्कार आणि स्वदेशीचा पुरस्कार केल्यानंतर अनेक देशी उद्योजकांनी सरकारला पाठींबा दिला मुंबई शहरात इंडियन मर्चंटस चेंबरच्या कार्यात दादाभाई नौरोजी, दिनशा वाच्छा, पुरूषोत्तमदास ठाकुरदास इब्राहीम रहिमतूभर इ. राष्ट्रीय नेते सहभागी झाले होते.

याचाच परिणाम म्हणजे या संघटनांनी राजकीय व घटनात्मक सुधारणांना पाठींबा देण्यास सुरूवात केली.

प्रारंभीच्या काळामध्ये राष्ट्रीय महासभेच्या कार्याबद्दल (राष्ट्रीय काँग्रेस) त्यांनी फार उत्सुकता दाखवली नाही. कारण सरकार तरुन जाईल अशी त्यांना आशंका होती गांधी युगामध्ये राष्ट्रीय महासभेचे जनआंदोलनात रूपांतर झाले. असे जन आंदोलन चालू रहावे. यासाठी त्यांना देशी उद्योजकांनी आर्थिक पाठबळ दिले.

त्याचप्रमाणे पाकिस्तानी चळवळीला मुंबईतील मेमन, खोजा, बोहरी इ. जमातीच्या व्यापारी वर्गाने आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले होते.

गांधी युगात टाटा व बिर्ला या दोन प्रमुख उद्योजक वर्गाचे गांधीजींशी घनिष्ट संबंध होते. ह्या उद्योजकांचे राष्ट्रीय महासभेशी संबंध असले तरी गांधींशी मात्र वैयक्तीक संबंध होते. काही टिकाकारांच्या मते गांधींनी कामगार चळवळीला पाठींबा दिला नाही किंवा कामगार चळवळीविषयी फारशी आस्था दाखवली नाही. परंतु हे म्हणणे योग्य वाटत नाही.

गांधीजींचे टाटा, बिर्ला आदीप्रमाणे देशी उद्योजकांशी हितसंबंध असले तरी राजकारणामध्ये त्यांची लुडबूड नव्हती. अनेक उद्योगपतींनी त्यांना आर्थिक साहाय्य देवू केले असले तरी त्यांनी त्यांच्याकडून कुठलीही मदत घेतली नाही आणि ह्या उद्योजकांनी ही त्यांच्या कामात कधी हस्तक्षेप केला नाही. राष्ट्रीय काँग्रेसवर भांडवलदार वर्गाचा दबदबा आहे असे लोक म्हणत असले तरी तो अतिशयोक्तीचा भाग म्हणावा लागेल. भांडवलदाराच्या हित जोपासण्यासाठी गांधींनी कधीही राष्ट्रीय काँग्रेसचा वापर होऊ दिला नाही किंवा भांडवलदार वर्गाने देखिल काँग्रेसचा वापर करण्याचा प्रयत्न केला नाही. १९३७ आणि १९४५ च्या निवडणूकांमध्ये काँग्रेस उमेदवार आपआपला खर्च केला. त्यांना उद्योजकांच्या अर्थसाह्याची गरज नव्हती एकूण काय तर राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रीय महासभा आणि उद्योजक वर्ग यांच्यात स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये सौहार्दपूर्ण संबंध होते. आणि देशाच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत त्यांचे एकमत होते. त्यासाठी समाजातील इतर वर्गाप्रमाणेच व्यापारी उद्योजक महासभेला अर्थसाह्य करत.

**स्वातंत्र्योत्तर कलखंडातील संबंधाचे बदलते स्वरूप :**

स्वातंत्र्योतर काळामध्ये उद्योजक वर्ग वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे नेते भांडवलदार वर्ग यांच्यातले हितसंबंधांना वेगळे वळण लागले. वेगवेगळ्या पक्षातील नेत्यांशी भांडवलदार वर्गाचे हितसंबंध निर्माण झाले होते. ह्या वर्गाचा राजकारणावर प्रभाव पडू लागला होता. म्हणजेच उद्योजक वर्ग आपल्या आर्थिक पाठबळाचा वापर आपले स्थान टिकून ठेवण्यासाठी करत होता. विशिष्ट अशा राजकीय पक्षांनी बांधीलकी निर्माण करून आपले हित हा वर्ग जोपासत होता. म्हणजेच आपणास इथे असे म्हणता येईल की स्वातंत्र्यानंतरच्या काळामध्ये राजकरण आणि उद्योजक वर्ग यांच्यामध्ये व्यावहारीक संबंध निर्माण झाले होते. उदा. चिंतामणराव देशमुख यांचा राजीनामा नेहरूंनी स्वीकारावा यासाठी बिर्ला समुहांनी दबाव आणला याचा अर्थ असा होईल की उद्योजक वर्गाने राजकारणासाठी आर्थिक पाठबळ उपलब्ध करून दिले होते. त्यामुळेच राजकीय पक्षांवर त्यांचे वर्चस्व निर्माण झाले. आजही आपण पाहतो की वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांच्या मागे उद्योजकाचे आर्थिक संबंध असतात स्वातंत्र्योतर काळामध्ये मुंबई प्रांतामध्ये गुजराती, मारवाडी, पारशी ह्या जमातीच्या उद्योजकांचे व्यापाराचे हितसंबंध गुंतले होते. आणि म्हणूनच जेव्हा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा आणि तत्कालीन मुंबई प्रदेश काँग्रेसवर मारवाडी, गुजराती, अमराठी लोकांचे वर्चस्व होते. त्यांना अशी भिती वाटत होती की, मराठी भाषीक राज्यात मुंबई शहराचा समावेश केला तर त्यांच्या आर्थिक हितसंबंधाना धोका पोहचेल

म्हणून मुंबई प्रदेश काँग्रेसने संयुक्त महाराष्ट्र होण्यास विरोध केला तसेच मुंबईस केंद्रशासीत प्रदेश घोषीत करावे असे ही त्यांनी स्पष्ट केले. त्याप्रमाणे नागपुर प्रदेश काँग्रेसवर हिंदी भाषीक मारवाडी गटाचे वर्चस्व होते. ब्रिजलाल बियानी आणि प्रेमचंद राका हे काँग्रसचे नेते मारवाडी होते.

संयुक्त महाराष्ट्रात आपल्या हितसंबंधावर विपरीत परिणाम होतील अशी शंका त्यांना होती त्याप्रमाणे म्हणून नागपूर विदर्भाचे स्वतंत्र राज्य हवे असे त्यांना वाटत होते. म्हणून आज ही स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी होत आहे. २००९ मध्ये देखिल स्वतंत्र विदर्भाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हां त्यांस विदर्भातील व्यापारी वर्गाने पूर्ण पाठींबा दर्शविला होता.

**ब) व्यापारी उद्योजकांचा राजकीय पक्ष :**

स्वातंत्र्योतर काळामध्ये राज्यकर्ता काँग्रेस पक्षांचा कल डावीकडे झुकलेला आहे. असा व्यापारी उद्योजक वर्गाचा समज झाला होता. समाजवादी समाजरचनेचा प्रस्ताव काँग्रेस पक्षाने त्याच्या आवाडी येथे (१९५०) मध्ये भरलेल्या अधिवेशनात स्वीकारल्याने आणि भूसुधारणा विषयक कायदे संमत केल्याने प्रागतिक स्वरूपाची धोरणे स्वीकारल्याने देशी बडे जमिनदार, सावकार लोकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले.

त्याचीच परिणीती म्हणजे देशी संस्थानिक व्यापारी उद्योजक बडे नेते यांच्या सक्रीय सहकार्याने जेष्ठ काँग्रेस नेते चक्रवर्ती रामगोपालाचारी यांनी स्वतंत्रपक्षांची स्थापना १९५७ साली केली. देशातल्या काही भागामध्ये ह्या पक्षाला उल्लेखनीय प्रतिसाद ही मिळाला तरी ही मराठी भाषिक प्रदेशात (१९६० पूर्वी) आणि महाराष्ट्र राज्यात १९६० नंतर सर्व उमेदवार पराभुत झाले.

१९६९ साली काँग्रेस पक्षात फुट पडल्यानंतर मुंबई प्रांतीक काँग्रेस समितीचे प्रस्थापित नेतृत्व संघटना काँग्रेसमध्ये सामील झाले त्यामुळे संघटना काँग्रेस भांडवलदार धार्जीणी आहे असा समज निर्माण झाला. स्वतंत्र पक्षाप्रमाणेच संघटना काँग्रेस पक्ष देखील महाराष्ट्रात मुळ धरू शकला नाही.

१९७७ मध्ये संघटना काँग्रेस जनता पक्षात विलीन झाला. एकूण काय तर महाराष्ट्रातील उद्योग व्यापारी गटाचे स्वतःचा पक्ष स्थापन करण्याचे प्रयत्न असफल झाले आणि दुसरी गोष्ट येथे अशी नमुद करता येईल की, १९४८ नंतर सरकारने कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा पुरस्कार केल्याने समाज जीवन स्वयंपूर्ण होण्यासाठी समाजपूर्ण समाज व्यवस्थेचे उद्दीष्टे स्वीकारावे आर्थिक नियोजनाचा स्वीकार करण्यात आला. आणि अनेक उद्योग सार्वजनिक क्षेत्रात ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला त्यामुळे सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र असे उद्योगाचे विभाजन झाले. सहाजीकच या धोरणाचा आपल्या उद्योग व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आणि त्यामुळे आपला दबदबा शासन यंत्रणेवर राहण्यासाठी व्यापारी उद्योजकांनी आपल्या संघटना स्थापन करून किंवा पक्ष स्थापन करून हितसंबंध टिकवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. विशिष्ट प्रदेशावर आपले अस्तित्व आबाधीत राहावे त्यासाठी ह्या गट वा नेते नेहमीच प्रयत्नशील असलेले दिसून येतात. यातूनच अनेक चळवळींचा उदय झाला व वेगवेगळे प्रांत स्वतंत्र व्हावेत या दृष्टीने चळवळी उभारल्या जावू लागल्या. जसे की स्वतंत्र विदर्भाची मागणी.

**क) राजकीय पक्षांचे आश्रयदाते म्हणजे भांडवलदार :**

राजकीय पक्षांचे आश्रयदाते ही भूमिका स्वतंत्र भारतातील संपूर्ण व्यापारी भांडवलदार वर्ग पार पाडत

आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेत व्यापारी उद्योजक हा प्रस्थापीत भांडवलदाराचा गट सत्ता प्राप्तीच्या म्हणजेच निवडणूकांच्या भानगडीत पडत नसला तरी किंवा निवडणूकीत त्याचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी विविध राजकीय पक्षांना निधी पुरवण्यात त्याचे योगदान आहे. १९६७ पर्यंत सत्तेच्या प्राप्तीसाठी किंवा निवडणूका लढविण्यासाठी प्रत्यक्ष निधी घेतला जात नव्हता. मोठमोठ्या उद्योजकांकडून जो निधी स्वीकारला जात होता तो चेक द्वारा स्वीकारला जात असे. त्यामुळे त्याचा योग्य तो उपयोग केला जात असे किती निधी गोळा झाला आणि त्यातून कोणती कामे पार पाडली गेली याची सरकारकडे नोंद असे परंतु १९६७ पर्यंत निवडणूकांचा खर्च मर्यादीत असल्यामुळे चेक द्वारा निधी स्वीकारला जात असे आणि त्यांची पावती ही संबंधीतांना दिली जात असे. पण त्यानंतर मात्र निधी हा सक्तीने गोळा करण्याचे प्रकार आपण आजही पहातो.

अतुल्य घोष आणि चंद्रभान गुप्ता सारखे काँग्रेस पक्षाचे खजीनदार निवडणूक निधीचा तपशील पक्षाच्या कार्यकारीणीस सादर करीत असे. त्यांच्याकडून कधीही निधिचा गैरवापर झाला नाही. तशी तक्रार ही कधी कोणी केली नाही. मात्र १९६९ साली काँग्रेस मध्ये फुट पडल्यानंतर १९७१ ची निवडणूक कोणत्याही परिस्थितीत जिंकलीच पाहिजे असा निर्धार करून त्यांनी अनेक उद्योजकांकडून सक्तीने निधी जमा केला. त्या निधिचा योग्य कारणासाठीच उपयोग करण्यात आला का? हा वादाचा मुद्दा. पण अशा पद्धतीने निधि गोळा करण्याची पद्धत तेव्हांपासूनच वापरली जात आहे. प्रचंड निधि हे राजकीय पक्ष गोळा करत असतात. मात्र लोक कल्याणासाठी किती वापरला जातो याची नोंद नसल्याने स्वतःकडे किती निधी ठेवला जातो. यांचा हिशोबच नाही.

अशा या परिस्थितीत अनाधिकृत अशा मार्गाने निधी गोळा करण्याची परंपराच निर्माण झाली. आणि ही अनधिकृतपणे निधि गोळा करण्याची पद्धत काँग्रेस सरकारनेच सुरू केली. आणि त्यानंतर म्हणजेच १९६७ नंतर सत्तेवर आलेल्या बिन काँग्रेसी सरकारने अशाच प्रकारे अनधिकृतपणे प्रचंड निधि जमा केले. याचाच अर्थ असा होईल की, काँग्रेस प्रमाणे इतर राजकीय पक्ष व्यापारी उद्योजकांना प्रलोभने दाखवून त्यांच्यावर दबाव आणून त्यांच्याकडून बेहिशोबी पैसा जमा करू लागले. त्यामुळे राजकारणमध्ये, राजकीय व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. आणि याचाच परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर देखील झालेला दिसून येतो. इतर व्यवसायाप्रमाणे निवडणूक राजकारण हा एक व्यवसाय बनला. ह्या लोकांना वेगवेगळी आमिषे किंवा सवलती राजकीय पक्षांकडून दिल्या जावू लागल्या. इतर व्यवसायापेक्षा राजकारणात गुंतवणूक फायदेशीर ठरू लागली. आणि यातूनच भारतीय राजकारणावर व्यापारी उद्योजकांचा प्रभाव वाढत गेला.

यातून राज्यकर्ते सनदी नोकरशहा, आणि व्यापारी वर्ग यांचे हितसंबंध वाढत गेले. त्यामुळे व्यापारी उद्योजकांचा प्रभाव पडत गेला आणि त्यांचे हितसंबंध जोपसण्याकडेच राजकीय व्यक्तीचा धोरणे ठरली जावू लागली म्हणजेच राजकीय व्यवस्थेचे स्वरूप काय असेल ह्यांची धोरणे उद्योजक वर्ग ठरवू लागला.

देशी व्यापारी उद्योजक वर्गावरील आपले परावलंबीत्व कमी करण्यासाठी राज्यकर्त्यांनी परदेशामधून शस्त्रास्त्रांची खरेदी करण्यासाठी आणि मोठमोठे उद्योग प्रकल्प उभारण्यासाठी विदेशी परकीय भांडवलदाराकडून प्रचंड निधि जमा करण्यास प्रारंभ केला. कारण देशी भांडवलदाराच्या

परावलंबीत्वातून त्यांना बाहेर निघायचे होते. परकीय उद्योगांना मोठे प्रकल्प उभारण्याचे परवाने देवून परकीय उद्योजकांकडून त्यांचा हिस्सा मागण्यास सुरूवात केली त्यातूनच गेल्या शतकात किक बॅक (kick buck) ची पद्धत रूढ झाली.

महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये १९८५ च्या निवडणूकीच्या वेळी इंदिरा काँग्रेस आणि समाजवादी काँग्रेसकडून त्यांच्या नियंत्रणाखालील साखर कारखान्याकडून अमाप निधी उकळण्यात आला. अशा प्रकारची चढाओढ प्रत्येक पक्षात चाललेली आहे. याचा प्रत्यय महाराष्ट्राच्या राजकारणात प्रत्यक्षास येतो. शरद पवार मुख्यमंत्री असतांना विशिष्ट कामासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या २८९ भूखंडाचे विनियमन करण्यात आले होते. तसेच अे. आर. अंतुले मुख्यमंत्री असताना इंदिरा गांधी प्रतिष्ठानच्या माध्यमातून गैरव्यवहार केल्याप्रकरणी राजीनामा द्यावा लागता होता. अशा प्रकारचा भ्रष्टाचार सर्वच राजकीय पक्षाकडून केला जातो. यात दुमत नाही. शिवसेने सारखे राजकीय पक्ष देखिल भाईगिरीकरून मोठ्या उद्योजकाकडून अनेक उपक्रमासाठी पैसा, देणग्यांच्या स्वरूपात गोळा केला जातो या व्यतीरिक्त गल्लीबोळातील भाई लोक खंडणी गोळा करतात. शिवसेनेचे नगरसेवक, शाखाप्रमुख हे पूर्वाश्रमीचे भाईलोक असल्याने या समाजाला पुष्टी मिळते.

१९९५ साली भारतीय जनता पक्ष सत्तेवर येण्याची शक्यता निर्माण झाल्याने काही उद्योग समुहांनी भाजपला अर्थ सहाय्य केले.

थोडक्यात काय तर विविध राजकीय पक्ष आणि उद्योजक, व्यापारी वर्गाचे हितसंबंध एकमेकांवर अवलंबून असतात. कारण काय तर त्यांचे राजकीय व्यवस्थेत साटेलोटे आहे.

म्हणजेच मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षांना भांडवलाची गरज आहे. त्यामुळे उद्योजकांच्या, भांडवलदारांच्या मागण्या राजकर्ते उचलून धरतात. अशा प्रकारे ते परस्परांचे हितसंबंध जपतात.

**ड) राजकीय निर्णय प्रक्रियेवर प्रभाव :**

निवडणूकीसाठी अमाप पैसा गोळा करून सत्ताधारी पक्ष आणि इतर काही विरोधी पक्ष व्यापारी आणि उद्योजक वर्गाच्या प्रभावाखाली आले आहेत. म्हणूनच निवडणूकीच्या काळामध्ये हा वर्ग राजकीय पक्षांना अमाप पैशाबरोबरच प्रचारासाठी वाहाने ही पुरवतात. असे चित्र आपणास सर्ऱ्हास पहावयास मिळते. त्यामुळे राजकीय पक्षांना निवडणूका लढविणे सोपे झाले आहे. अर्थात सत्तेवर आल्यानंतर अशा पक्षाने व्यापार-उद्योजकांच्या उपकारांची परतफेड करावयाची असते त्यामुळे त्यांना अनुकूल धोरणांची निर्मिती करावी लागते या व्यतिरिक्त विशिष्ट उद्योजक गटाला संपविण्याच्या प्रक्रियेत विशिष्ट उद्योजकांच्या हिताचे निर्णय घेतले जातात. थोडक्यात असे स्पष्ट होते की, शासनाने कोणते, कसे, कोणत्या वेळी निर्णय घ्यावेत हे व्यापारी उद्योजक वर्ग ठरवितो आणि अनेक अडचणी असल्या तरी शासनाला तसे निर्णय घ्यावे लागतात.

थोडक्यात निवडणूकीच्या काळात पैसा पुरविणे, निवडणूकीला मदत करणे आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम इ. कारणामुळे देशी व्यापारी, मोठे जमीनदार सहकारी क्षेत्रातून निर्माण झालेले भांडवलदार, विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या यांचे भारताच्या आर्थिक व्यवहारावर पूर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले आहे. आणि ज्यांच्या हातात आर्थिक सत्ता असते त्यांच्या हातात राजकीय सत्ता जाते. या कार्लमार्क्सच्या म्हणण्याप्रमाणे हा व्यापारी उद्योजकांच्या हातात जरी प्रत्यक्ष सत्ता नसली त्यांच्या इशाऱ्याशिवाय शासनाचे पान हालत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

थोडक्यात असे स्पष्ट होते की, व्यापारी आणि उद्योजक वर्गाचे हितसंबंध सुरूवातीच्या काळात काही बाबीपुरते होते. मात्र पुढील काळामध्ये ते राजकीय प्रक्रियेवर आपला प्रभाव टाकू लागले आणि आज तर शासनाला निर्णयाचे आदेश देऊ लागलेत थोडक्यात व्यापार-उद्योजक आणि शासन यांचा घनिष्ट संबंध निर्माण होऊन या वर्गाचे राजकीय यंत्रणेवर वर्चस्व निर्माण झाले आहे.

दुसरी बाब अशी की, मुंबई शहर महाराष्ट्राची राजधानी आणि भारताची व्यापारी राजधानी असल्याने महाराष्ट्राच्या राजकारणावर या परिवर्तनाचे पडसाद उमटणे सहाजीकच आहे. आणि राष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणावर परिणाम होत असतो. स्थानिक राज्यकर्त्यांची 'स्वायत्तता' राष्ट्रीय नेतृत्वाच्या धोरणावर अवलंबून असते. हरित क्रांतीच्या कालखंडामध्ये राष्ट्रीय नेतृत्वाने कृषी व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी काही सवलती पुरविण्याचे धोरण स्वीकारलेले होते. त्यामुळेच महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांचा वर्ग, मराठा जातीतील श्रीमंत शेतकरी वर्ग संपन्न झाला. याच मराठा नेतृत्वाचे खच्चीकरण करण्यासाठी राष्ट्रीय नेतृत्वाने धोरणात्मक बदल केले. म्हणजेच सत्ता व अधिकाराच्या उतरंडीत आंतरराष्ट्रीय भांडवलदार वर्गाचे राष्ट्रीय नेतृत्वावर अशी शृंखला आहे. राजेंद्र व्होरासारख्या महाराष्ट्राच्या राजकारणाच्या अभ्यासकांच्या मते या बदललेल्या संदर्भात श्रीमंत शेतकरी वर्गाचे प्रभूत्व किंवा धूरीणत्व या संकल्पना आताच्या परिस्थितीत कालबाह्य झालेल्या आहेत.

यावर राष्ट्रीय भांडवलदार, देशी भांडवलदार आणि सहकारी भांडवलदार वर्ग राजकीय प्रक्रियेवर संयुक्तपणे वर्चस्व गाजवतात. याचाच अर्थ असा निघतो की, महाराष्ट्र पातळीवरील राजकारणाची सुत्रे अर्थकारण करणाऱ्या वर्गाच्या हातात गेली आहेत.

## ५अ.४ चेंबर ऑफ कॉमर्सचा राजकीय संबंध किंवा कार्यभाग :

शासनाशी विचार विनिमय करून आपल्या अडचणींची समस्यांची सोडवणूक करणे, वेळ पडल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारून व्यापारी, उद्योजक वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी स्थानिक पातळीवर विदेशी व्यापाऱ्यांचे अनुकरण करून देशी व्यापाऱ्यांनी आपल्या संघटना निर्माण केल्या आहेत. उदा. बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स, इंडियन मर्चंटस चेंबर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मारवाडी चेंबर ऑफ कॉमर्स इ. या सर्व संघटनांनी आपल्या हितसंबंधांसाठी अखिल भारतीय पातळीवर एक संघटना स्थापन केली ती म्हणजे 'फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज' ही व्यापारी व उद्योजकांची अखिल भारतीय पातळीवरील सर्वांत प्रभावी दबावगट व संघटना आहे.

स्वातंत्र्यापूर्व काळात देखिल विदेशी व्यापारी आणि भांडवलदार वर्गाने स्थानिक / प्रांतीक सरकारकडून आपल्या समस्याच्या सोडवणूकीसाठी बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना केली होती सरकारला अर्ज, विनंत्या करून ते आपल्या समस्या सोडवत असत आणि इंग्रजी राजवट असल्याने त्यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त होत होते त्याचाच परिणाम म्हणजे देशी व्यापारी भांडवलदारांने, उद्योजकांनी अशा संघटना स्थापन करण्यास सुरूवात केली. आणि ब्रिटिश सरकारने देखिल आपले हित साधण्यासाठी देशी उद्योजकांबाबत उदार दृष्टीकोन स्वीकारला होता.

१. उगम आणि विकास : व्यापारी उद्योजकांची संघटीत होण्याची प्रक्रिया १९व्या शतकात सुरू झाली. १८२६ साली मुंबई शहरातील इंग्लीश व्यापारी वर्गाने बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना केली. होती.

अशा संघटनांना प्रांतीक विधीमंडळात प्रतिनिधित्व देण्यात आले. सुरूवातीच्या काळात अशा व्यापारी वर्गाला शासकीय यंत्रणेशी संलग्न करून घेण्यासाठी या संघटनांच्या प्रतिनिधीची नियूक्ती प्रांतिक विधिमंडळावर केली जात असे नंतर या संघटनांना आपले प्रतिनिधी निवडण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. त्याचप्रमाणे या संघटनांना प्रांतिक विधिमंडळाप्रमाणे केंद्रिय विधिमंडळातही प्रतिनिधित्व ही देण्यात आले. त्यामुळे शासनाशी विचार विनिमय करून आर्थिक विकासाचे प्रस्ताव मांडून ह्या संघटनांना आपल्या अडचणी / समस्या सोडविणे शक्य होत होते आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेल्या ह्या संघटनांशी शासनाचे संबंध निर्माण झाल्याने राज्यकारभार करणे सोपे झाले.

## २) राष्ट्रीय आंदोलन आणि विदेशी शासनाशी संबंध :

विदेशी व्यापाऱ्यांना ज्या पद्धतीने वागविले जात होते त्या प्रकारची वागणूक देशी व्यापाऱ्यांना दिली जात नव्हती. परंतु परकीय राजवटीशी उघडपणे संघर्ष करता येत नव्हता. अशा परिस्थितीमध्ये टिळकांच्या स्वदेशीचा वापर व विदेशी मालावर बहिष्कार या कार्यक्रमामुळे देशी व्यापारी वर्गाला आधार प्राप्त झाला आणि देशी व्यापारी उद्योजकवर्ग राष्ट्रीय आंदोलनाला पाठींबा देऊ लागला. राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनाला देणग्या देऊ लागले अर्थातच हे करत असतांना ब्रिटिश सरकार बरोबरचे संबंध बिघडणार नाहीत. आणि आपल्या व्यापार उद्योगावर विपरीत परिणाम होऊ नये म्हणूनही काळजी घेतली जात होती. थोडक्यात स्वातंत्र्यपूर्व काळातच चेंबर ऑफ कॉमर्स आणि शासनाचे संबंध निर्माण झाले होते.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने समाजवादी समाजरचनेचे धोरण स्वीकारल्याने सरकारने आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली. मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयकरणाचा विचार सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार खाजगी उद्योगधंद्यावर घातलेल्या निर्बंधामुळे व्यापारी, उद्योजकांचे हितसंबंध धोक्यात येवू नयेत याकरीता फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज अखिल भारतीय पातळीवर कार्य पार पाडले तर महाराष्ट्रात तेच काम राज्यपातळीवर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स करते.

## चेंबर ऑफ कॉमर्स आणि राजकीय घडामोडी :

शासनाशी विचार विनिमय करून समस्या सोडविणे हा संघटनेचा हेतु असल्यामुळे संघटनेच्या विविध पातळीवर संबंध प्रस्थापित झाले आहेत.

१. राजकीय कार्यकर्ते व प्रशासकीय वर्गाशी संबंध :
आपल्या समस्या सोडविण्यासाठी संघटनेचे कार्यकर्ते राज्यकर्त्यांशी राजकीय नेत्यांशी संबंध ठेवतात. त्यांच्या संपर्कामध्ये असतात.

२. संघटनेच्या वार्षीक कार्यक्रमास किंवा बैठकीस राज्यकर्ते संघटनेच्या वार्षिक बैठकीसाठी मंत्र्यांना निमंत्रीत केले जाते. कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी आपोआपच राजकारणावर प्रभाव पडतो.

३. शासकीय सल्लागार समित्यांवर प्रतिनिधीत्व :
वरील प्रभावातूनच राजकीय घडामोडीवर आणि राजकारणावर संघटनेचा प्रभाव पडलेला आहे की नाही आर्थिक स्वरूपाच्या समीत्यावर ह्या संघटनेला प्रतिनिधीत्व देण्यात येते.

थोडक्यात चेंबर ऑफ कॉमर्स आणि राजकारणाचा परस्पर हिताच्या दृष्टीकोणातून संबंध निर्माण झाले आहेत. म्हणूनच संघटनेचा राजकीय प्रक्रियेवर व राजकीय घडामोडींवर आपोआप प्रभाव वाढला आहे.

## ५अ.५ कामगार संघटना

उद्योग प्रधान पाश्चात्य देशात कामगार वर्ग हा सगळ्यात सुसंघटीत दबावगट आहे. कामगार संघटनांचा उदय १९व्या शतकात कामगार वर्गावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी झाला आहे. त्यामुळे जगातील कामगार चळवळ ही डावीकडे झुकलेली आहे. कार्लमार्क्सने देखील आपले तत्त्वज्ञान कामगार आणि भांडवलदार ह्या वर्गाला डोळ्यासमोर ठेवून मांडले आहे. कार्लमार्क्स कामगार वर्गावरील अन्याय दूर होण्यासाठी जगातील कामगारांना साद घातली आहे.

मार्क्स म्हणतो की जगातल्या कामगारांना ''तुम्ही सर्व एकत्र या'' याचा अर्थ असा की, कामगार जर एकत्रीतपणे येऊन भांडवलदारांशी संघर्ष करतील तेव्हाच राज्याची सत्ता कामगार वर्गाच्या हाती येईल. व ज्याला आपण कल्याणकारी राज्य म्हणतो त्या कल्याणकारी राज्याची निर्मित होईल. मार्क्स कामगारांना प्रोत्साहन देतो. आणि भांडवलशाहीला विरोध दर्शवितो.

कामगार वर्गाचे आणि भांडवलदार वर्गाचे हितसंबंध परस्पर वेगळे आहेत.

भारतात औद्योगिकरणाची सुरूवात १९व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. त्यावेळच्या मुंबई प्रांतात मुंबई आणि अहमदाबाद ही वस्त्रोउद्योगाची प्रमुख केंद्र होती. त्यामुळे विशेषता मुंबई बाबत असे म्हणता येईल की, कोकणातील शेतकरी वर्गाने रोजगाराच्या शोधार्थ मुंबईत स्थलांतर केले. त्यांची कुटुंबे मात्र गावीच राहीली. त्यामुळेच शहरी भागातील कामगारांचा ग्रामिण भागातील कामगारांशी संबंध कायम राहीला. त्यामुळे नव्या विचाराचा परिणाम होऊन संघटीत झालेला कामगार वर्ग परंपरावादीच राहीला.

मुंबईत रोजगाराच्या शोधात आलेला कामगार वर्ग हा निरक्षर असल्याने त्यांच्यावर जो अन्याय होत होता त्याची जाणीव ही त्यांना नव्हती. या दोन गोष्टींमुळे कामगार वर्ग जाणीव आणि कामगार संघटनांचा उदय होण्यास वेळ लागला.

प्रारंभीच्या काळात महात्मा ज्योतीबा फुले यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे आणि काशिनाथ धुरू यांनी कामगारांची संघटना बांधण्याचे प्रयत्न केले पण त्यात त्यांना यश आले नाही.

मात्र २०व्या शतकात मात्र कामगारामध्ये जाणीव जागृत झाली आणि कामगारांच्या संघटना बांधणे सोपे झाले. डाव्या विचारसरणीच्या ना. म. जोशी सारख्या नेत्यांनी कामगारांना मुंबई प्रांतामध्ये संघटीत केले. म्हणजेच कामगार वर्गाचे नेतृत्व प्रारंभीपासूनच पांढरपेशापेक्षा मध्यम वर्गीयांनीच केले.

## ५अ.६ कामगार संघटनांचा विकास

महाराष्ट्रातील कामगार संघटनांची निर्मितीच राजकीय पक्षांच्या प्रयत्नातून झालेली नाही. असे म्हटले तर गैर ठरणार नाही.

अखिल भारतीय पातळीवर कामगार वर्ग संघटीत करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय महासभेच्या अंतर्गत स्थापन करण्यात आली. १९२८ साली मिरत कटानंतर साम्यवादी पक्षांवर बंदी घालण्यात आली त्यामुळे साम्यवादी पक्षाचे बहुसंख्य नेते व कार्यकर्ते राष्ट्रीय महासभेच्या अंतर्गत राहून पक्ष कार्य आणि त्याच बरोबर कामगार वर्गास संघटीत करण्याचे कार्य करीत होते. राष्ट्रीय सभा सर्व समावेशक असल्याने आणि धनिक वर्गाचा त्यावर प्रभाव असल्यामुळे जर कामगार वर्ग संघटीत झाला तर देशी उद्योगपतींचे हितसंबंध धोक्यात येतील त्याचाच परिणाम असा झाला की, महासभेच्या प्रमुख नेत्यांनी 'आयटक' च्या कार्याकडे दुर्लक्ष केले त्याचाच परिणाम म्हणजे साम्यवादी गटाने आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

**१. राजकीय पक्षामार्फत कामगार संघटनांची निर्मिती :**

महाराष्ट्रातील इतर भागातून मुंबईमध्ये आलेल्या कामगारांची संख्या प्रचंड आहे. त्यांना जर संघटित केले तर चांगली ताकद निर्माण करता येईल. या उद्देशाने राष्ट्रीय महासभेने 'आयटक' ह्या संघटनेची स्थापना केली. तर आयटकवर आपले नियंत्रण किंवा वर्चस्व निर्माण होत नाही म्हणून काँग्रेसने इंटकची स्थापना केली. तर काँग्रेसच्या इंटकचा प्रभाव कमी करण्यासाठी साम्यवादी गटाने हिन्द मजदूर सेनेची स्थापना केली. तर मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाने CITU ची स्थापना केली. आणि शिवसेनेचे कामगार वर्गात आपले वर्चस्व निर्माण व्हावे म्हणून भारतीय कामगार सेनेची स्थापना केली.

थोडक्यात असे स्पष्ट होते की, राजकीय पक्षांची नजर कामगारांच्या ताकदीवर आहे. आणि त्याचा राजकीय फायदा करून घेण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्ष आपली संघटना स्थापन करतो. यावरून असे स्पष्ट झाले आहे की, महाराष्ट्रातील कामगार संघटना राजकीय पक्षांच्या आधाराने उभ्या आहेत.

**२. कामगार संघटनाचे नेतृत्व राजकीय नेत्यांकडे तर संघटनेचे नेते राजकीय पक्षात :**

महाराष्ट्रातील बहुतेक कामगार संघटनांचे नेतृत्व हे राजकीय पक्षांचे नेत्याकडे असल्याचे दिसते. उदा. वसंतदादा पाटील हे राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष होते अण्णा डांगे आयटकचे अध्यक्ष होते जॉर्ज फर्नांडीस हे कामगार संघटनेचे अध्यक्ष होते. त्याप्रमाणे राजकीय पक्षांचे नेते हे संघटनेचे नेते होते. तसे कामगार वर्गातून उदा. दत्ता सामंत याना जनता पक्ष, रिपब्लिकन पार्टी ह्यांनी उमेदवारी दिली व ते निवडून ही आले. तर दत्ताजी साळवी हे शिवसेनेचे नेते होते. थोडक्यात कामगार संघटनांचे नेतृत्व सतत राजकारणी व्यक्तींच्या हातात आहे.

**३. कामगार वर्गाची कामगार वर्गाशी बांधीलकी :**

कामगार संघटनाची स्थापनाच राजकीय पक्षामार्फत होत असल्यामुळे त्या संघटनांची त्या पक्षांबरोबर बांधीलकी निर्माण झालेली आहे त्यामुळे अपवादात्मक संघर्ष सोडले तर संघटनेने वाटाघाटीचा आणि समन्वयाचा मार्ग अवलंबीला आहे. थोडक्यात कामगार संघटना ह्या स्वतःच्या पायांवर उभ्या राहिलेल्या स्वतंत्र संघटना नाहीत तर त्या राजकीय पक्षांच्या कामगार आघाड्याच झालेल्या आहेत.

**४. कामगारांचा राजकीय पक्ष नाही :**

महाराष्ट्रातील कामगार संघटनांची राजकीय पक्षाबरोबर संबंध असला तरी राजकारणावर प्रभाव टाकून कामगारांचा फायदा करून देणारी कामगारांना जबाबदार असणारी स्वतःची स्वतंत्र अशी कामगारांची संघटना आणि राजकीय पक्ष ही नाही. महाराष्ट्रातील 'शेतकरी कामगार पक्ष' हा

शेतकरी कामगारांचे नेतृत्व करीत असला तरी तो नावापुरताच कामगार पक्ष आहे. त्यांना कामगारांच्या समस्या ही सोडविता आल्या नाहीत आणि शेतकऱ्यांच्या देखील अडचणी सोडविता आल्या नाहीत.

## ५अ.७ सारांश:

जगातील सर्व कामगारांना ऐक्याची हाक देणारा पहिला विचारवंत म्हणजे कार्लमार्क्स होय कार्लमार्क्सने ही कामगारांच्या राजकीय सहभागावर भर दिलेला आहे.

महाराष्ट्रातील बहुसंख्य कामगार हे खेड्यातून आलेले आहेत. त्यांच्यात शैक्षणिक आणि राजकीय हक्कांच्या, कामगारांच्या हक्कांच्या दृष्टीने जागृत नसलेल्याने, किंबहुना अनेक गोष्टीचे अज्ञान असल्याने राजकीय पक्षाच्या आधाराने का होईना जया कामगार संघटना निर्माण झाल्या त्याचे नेतृत्व पांढरपेशा वर्गाकडे गेले व या वर्गाने कामगारांच्या हितापेक्षा स्वतःच्या राजकीय हिताला अधिक प्राधान्य दिले.

एकूण निरिक्षणानंतर असे आढळून येते की, कामगारांच्या संघटनेचा विशेष असा प्रभाव राजकारणावर पडला नाही किंवा ज्या संघटनांचा प्रभाव पडला होता. पण पुढील काळात त्यांचाही ऱ्हास झाला.

## ५अ.८ महत्त्वपूर्ण प्रश्न :

१. महाराष्ट्रातील राजकारणात कामगार संघटनांचे दबाव गट म्हणून कार्य स्पष्ट करा.
२. महाराष्ट्रातील राजकारणात प्रभाव गट म्हणून कामगार संघटनाची परिणामकारकता विशद करा.
३. चेंबर ऑफ कॉमर्स आणि राजकीय संबंध याविषयी चर्चा करा.
४. महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्राचा विकास आणि त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर होणारा प्रभाव स्पष्ट करा.
५. महाराष्ट्रातील राजकारण व उद्योगक्षेत्रे यांच्यातील विविध परस्पर संबंध कोणते आहेत ?

-----------------

# ५ब

# बिगर राजकीय प्रक्रिया - २
# सहकारी चळवळी आणि शेतकऱ्यांची आंदोलने

५ब.१ प्रास्ताविक
५ब.२ स्वयंसेवी संघटना
५ब.३ स्वयंसेवी
५ब.४ सहकारी चळवळीची वैशिष्ट्ये
५ब.५ सहकारी चळवळीची गुण - दोष
५ब.६ सहकारी चळवळीची व्याप्ती
५ब.७ सहकारी चळवळ व राजकारणाचा संबंध
५ब.८ महत्त्वपूर्ण प्रश्न

## ५ब.१ प्रास्ताविक :

स्वातंत्र्योत्तर काळात सहकाराच्या क्षेत्रात महाराष्ट्र राज्याने उल्लेखनीय प्रगती केली आहे. महाराष्ट्र शासनाने दिलेले उत्तेजन आणि राजकीय नेते, सामाजिकच कार्यकर्ते यांची भूमिका यामुळे महाराष्ट्रात सहकारी चळवळची जोमदार वाटचाल राहीली साहाजिकच राज्याच्या आर्थिक विकासास सहकार चळवळीने महत्त्वाचा वाटा उचलला. महाराष्ट्राच्या राजकारणात सहकार चळवळ ही एक महत्त्वपूर्ण शक्ती बनून राहिलेली आहे. म्हणूनच महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करताना त्यावरील चळवळींच्या प्रभावाची दखल घ्यावी लागते.

**सहकाराचा अर्थ :**

''सहकार म्हणजे समाजातील व्यक्तींनी परस्परांच्या हितासाठी एकत्रीत येऊन काम करणे होय.'' सहकाराचा हा अर्थ विचारात घेता मानवाच्या दृष्टीने सहकाराची भावना मुळीच नविन नाही हे सहज लक्षात येईल मानवाच्या ठिकाणी सहाकाराची वृत्ती नैसर्गिकरित्या असते. मानवी जीवनाच्या अगदी सुरवातीच्या काळापासून मानवाने परस्पर आपले जीवन सुसह्य बनविण्याची धडपड चालवीली होती. मानवी जीवनाच्या प्राथमिक अवस्थेत मानवाला अनेक प्रकारच्या संकटांशी मुकाबला करावा लागला होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत मानवाने सहकार्याच्या जोरावर आपल्यावरील संकटावर मात करण्यास यश मिळविले होते अलिकडच्या काळात तर सहकारातून मानवाने आपली भरपूर प्रगती केल्याचे दिसून येते सहकार ही संकल्पना वैदिक काळापासून चालत आलेली जीवनाची रित बनून राहीली आहे. प्राचीन ग्रामीण भारतातील संपूर्ण मानवी जीवन सहकारावर आधारलेले होते भारतीय संयुक्त कुटुंब पद्धती प्राचीन ग्रामपंचायती यासारख्या संस्था म्हणजे सहकारी जीवनाच्या आविष्कार होत्या.

## ५ब.२ स्वयंसेवी संघटना :

विधायक कार्य करणाऱ्या संघटनांना स्वयंसेवी संघटना असे म्हटले जाते.
शेतमजुरांवरील विशेषतः आदिवासीमधील कित्येक माणसे वर्षानुवर्षे सावकार कंत्राटदार व श्रीमंत शेतमालाकडे वेठबिगार म्हणून राबत आहेत या वेठबिगारी विरूद्ध महाराष्ट्रातील ठाणे, रायगड जिल्ह्यातील आदिवासी वेठबिगारांना मुक्त करण्यासाठी श्रमजीवी संघटना, भूमिसेना, श्रमिक क्रांती संघटना, श्रमिक मुक्तीसंघटना, संघर्ष समीती, कष्टकरी संघटना, ग्रामस्वराज्य समीती किंवा नर्मदाबचाव यासारख्या संघटना क्रियाशील आहेत. यशस्वी वेठबिगाराचे मानवी पुनर्वसन करण्याचे प्रयत्न देखिल ठाणे जिल्ह्यात चालू आहेत. त्याच प्रमाणे मराठवाड्यात देखील लोकसमिती, संघर्षसमिती सारख्या स्वयंसेवी संघटना कार्यरत आहेत परंतु अज्ञानी, अडाणी समाजाच्या प्रगतीसाठी राजकीय यंत्रणा पुढे येत नाही. त्यामुळे ह्या स्वयंसेवी संस्थांना संघर्ष करावा लागतो वरिष्ठ ठिकाणी किंवा शासकीय यंत्रणेवर चांगला अधिकारी जोपर्यंत कार्यरत नसेल तो पर्यंत गरीब समाजाची, शेतकऱ्यांची, वेठबिगाराची दुखणी दूर होणार नाहीत. परंतु तरी देखील स्वयंसेवी संस्थाचे कार्याला महाराष्ट्रात यश प्राप्त झाले आहे ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

## ५ब.३ स्वयंसेवी :

भारतामध्ये २०व्या शतकात रचनात्मक आणि संघर्षात्मक कार्याचा प्रारंभ झालेला आहे. भारतीय स्वातंत्र्य युद्धाच्या अखेरच्या पर्वात महात्मा गांधींनी राजकीय चळवळीला सामाजिक चळवळीचे मोजमाप लावले.

सामाजिक कार्य हे राष्ट्रकार्य आहे. असे समजून त्या कार्यात स्वतःला झोकून देणारे त्यातून व्यक्तीनिष्ठ अशा विशिष्ट सामाजिक कार्याची रोपटी देशात ठिकठिकाणी रुजली व वाढली तसेच भिख्खु संघाने देखिल तळागळातील अज्ञानी दलित बहुजन संघाच्या प्रगतीसाठी अविरत असे कार्य केले.

समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या प्रगतीसाठी परस्परांशी सहकार्य करण्याची गरज भासते. दुर्बल घटकांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण होत असतात. व निर्माण झालेल्या समस्यांचा प्रभावीपणे प्रयत्नाद्वारे जीवनातील समस्यांवर मात करता येते. सहकाराच्या दुसऱ्या शब्दाचा अर्थ असा सांगता येईल की, ''समान उदिष्ट साध्य करण्यासाठी लोकांनी केलेल्या प्रयत्न म्हणजे सहकार होय.'' ''एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ'' या पंक्ती किंवा ''विना सहकार नाही उद्धार'' या उक्तीत अगदी यथार्थपणे सहकाराची महती स्पष्ट होते.

सहकाराची व्याख्या :
सहकाराच्या व्याख्या अनेक विचारवंतांनी दिलेल्या आहेत. आणि त्या व्याख्या सहकारी चळवळीचे स्वरूप समजून घेण्यासाठी अभ्यासणे गरजेचे आहे. महत्त्वाच्या काही व्याख्या पुढील प्रमाणे.
१. एम. एल. डार्लींग :
यांनी सहकाराची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे ''सरकार ही एक व्यवस्था तर आहेच पण ती व्यवस्थेहून ही अधिक काही आहे. सहकार ही अंतकरणाला व मनाला आव्हान करणारी एक शक्ती आहे. सहकार म्हणजे व्यवसायातील धर्म होय स्वयंपूर्णता व सेवा यांचे ते संपूर्ण सत्य होय.''

Co-operation is something more than a system. It is a spirit which appears to the heart and the mind. It is a religion applied to the business. It is a gespelt self sufficiency and servies.

**२. हेन्री क्लेव्हर्ट :**
''मानवी भूमिकेतून व्यक्तीने स्वेच्छेने एकत्र येवून आपल्या आर्थिक उन्नतीसाठी समतेच्या आधारावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय.''

**३. कॅस्लमन :**
यांनी केलेली व्याख्या अशी, ''सहकार म्हणजे सामाजिक आशय असलेली आर्थिक व्यवस्था होय.''

Co-operation is an Economic system with a social content.

वरील व्याख्येवरून असे स्पष्ट होते कि, सहकार ही एक व्यवस्था आहे. सहकार म्हणजे व्यक्तींचे संघटन होय. व्यक्ती या व्यवस्थेत किंवा संघटनेत स्वेच्छेने सहभागी झाले असतात. कारण सहकार्य (सहकार) हे आपल्या प्रगतीचे साधन आहे, असे त्यांना वाटत असते.

सहकारी चळवळीची काही वैशिष्टे आपल्याला आभ्यासावी लागतील ती पुढीलप्रमाणे

## ५ब.४ सहकारी चळवळीची वैशिष्टे:

**१. सहकार हे व्यक्तीचे संघटन आहे :**
सहकाराचे वैशिष्ट असे की, सहकार हे अनेक व्यक्तींचे संघटन असते. समाजीतील अनेक व्यक्ती एका विशिष्ट उद्देशाने एकत्र येऊन सहकारी संघटना किंवा संस्था स्थापन करतात. सहकारात व्यक्ती या घटकाला प्राधान्य असते. सहकारी संघटनेची उद्दीष्टये जरी वेगळी असली तरी तिच्या उद्दीष्टाइतकीच त्या संघटनेत सहभागी झालेली व्यक्ती ही या ठिकाणी महत्त्वाची मानली जाते. व्यक्ती हाच सहकारी संस्थेचा केंद्रबिंदु असतो.

**२. ऐच्छिक सभासदत्व :**
सहकारी संघटनेत किंवा संस्थेत अनेक व्यक्ती सहभागी झालेले असतात. तथापि या संघटनेचे सभासदत्व स्वीकारण्यासाठी कोणत्याही व्यक्तींवर कसल्याही प्रकारची सक्ती केली जात नाही. किंबहूना अशी सक्ती करण्याचा प्रश्नच या ठिकाणी उद्‌भवत नाही. सहकारी संस्थेत व्यक्तीने सहभागी व्हावे म्हणून तिच्यावर सक्ती करणे हा सहकार्याचा आत्म्यावर आघात करण्याचा प्रकार होय.

**३. सर्वांना खुला सहभाग :**
ज्याप्रमाणे सहकारी संस्थेत सामील होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जात नाही. त्याचप्रमाणे एखाद्या सहकारी संस्थेचे सभासदत्व तिला स्वीकारण्यास प्रतिबंधही केला जात नाही. ज्या व्यक्तीला सहकारी संस्थेची उद्दीष्टे मान्य असतात आणि जिची त्या संस्थेतील इतर सभासदांबरोबर समान उद्दीष्टांच्या पुर्ततेसाठी कार्य करण्याची मनापासून इच्छा असेल त्या प्रत्येक व्यक्तीला अशा संस्थेत सहभागी होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. याचा अर्थ असा होतो की, सहकारी संस्थेचे सभासदत्व सर्वांना खुले असते.

**४. दुर्बल घटकांचा आर्थिक विकास :**

समाजातील दुर्बल घटकांचा आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न सहकाराच्या माध्यमातून केला जातो सहकारी संस्था अनेक प्रकारच्या असतात आणि प्रत्येक संस्थेची उद्दीष्टे ही वेगवेगळी असतात. तथापि त्या सर्वात एक समान सुत्र असते. ते म्हणजे सहकाराद्वारे समाजातील दुर्बल घटकांना सामर्थ्य प्राप्त करून द्यावे. व त्यासाठी त्यांचा आर्थिक विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करावा.

**५. लोकशाही नियंत्रण :**

लोकशाही नियंत्रण हे सहकाराचे आणखी एक वैशिष्ट आहे. सर्व सहकारी संस्थाचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालविला जातो. सहकारी संस्थांच्या सर्वच सभासदांना समान हक्क असतात. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड लोकशाही मार्गानेच होत असते अर्थात लोकशाही नियंत्रण हे सहकाराचे वैशिष्ट असल्याने अत्याधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या काही दोघांचा शिरकाव झालेला नाही.

**६. परस्पर सहकार्यातून स्वावलंब :**

वर पाहिल्याप्रमाणे सहकार्यात दुर्बल घटकांच्या हिताला प्राधान्य दिलेले असते त्यांचा आर्थिक विकास साधला जाण्यासाठी त्यांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनावे. या दृष्टीने सहकारी संस्थेचे कार्य चालते. तथापि त्यांच्या आर्थिक विकासासाठी त्यांनी अन्य कोणावर तरी अवलंबून राहण्याचा पर्याय सहकारी चळवळीला मान्य नाही समाजातील दुर्बल घटाकांची परस्पर सहकार्यातून संस्थेत संभासदांच्या परस्पर सहकार्याला विशेष महत्त्व असते.

**७. सेवातत्त्वाला प्राधान्य :**

सहकारी चळवळ ही आर्थिक चळवळ आहे. म्हणून सहकारी संस्थेमार्फत विविध प्रकारचे आर्थिक व्यवहार संस्थेमार्फत पूर्ण केले जातात तथापि सहकारी संस्था आर्थिक व्यवहार करीत असल्यातरी बाकीच्या आर्थिक संघटनेप्रमाणे त्या नफ्यावर आपले लक्ष केंद्रित करीत नाहीत कारण नफा मिळविणे हा सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश नसतो तर आपल्या सभासदांना सेवा उपलब्ध करून देणे हा त्यामागचा उद्देश असतो म्हणून सहकारी संस्थामध्ये सेवा प्राधान्यतेला फार महत्त्व दिले जाते.

**८. समाजिक आशय :**

सहकार चळवळीला मिळालेला सामाजिक आशय देखील चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतो. आर्थिक विकासाचे ते एक महत्त्वाचे साधन आहे. या दृष्टिकोनातून सहकारी चळवळीकडे पाहिले जात असले तरी तिचे सामाजिक उद्दिष्टे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. समाजीतील दुर्बल घटकांना पुरेसे सामर्थ्य प्राप्त करून समाजव्यवस्थेत नवे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न सहकार चळवळ करणे समाजातील निरनिराळ्या वर्गातील आर्थिक विषमता दूर केल्याने सामाजिक परिवर्तनाला चालना मिळू शकते ते भान ठेवून ते उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने सहकार चळवळ वाटचाल करीत असते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही उद्दिष्टे शांततेच्या मार्गाने साध्य करण्यावर सहकारी चळवळीचा भर असतो त्यामुळे लोकशाही पद्धतीत सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून सहकाराचा उल्लेख केला जातो.

अशा रितीने, ''विना सहकार नाही उद्धार'' या म्हणीचा अर्थ खरा वाटू लागतो. सहकारी चळवळीने समाजाच्या जीवनात आर्थिक आणि सामाजिक प्रगती बऱ्यापैकी घडवून आणलेली आहे. म्हणूनच

सहकार ही एक सामाजिक आशय असलेली चळवळ आहे, हे स्पष्ट होते. सहकारी चळवळीची भर असल्याने सभासदांना सेवा देण्यास प्राधान्य देत असल्याने सभासदांची बऱ्यापैकी आर्थिक उन्नती झाल्याचे लक्षात येते आणि म्हणूनच संतानीही सहकाराशिवाय पर्याय नाही. अशी शिकवण दिल्याचे जाणवते.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीच्या व्याख्या पाहिल्यानंतर सहकार चळवळ म्हणजे काय हे स्पष्ट होते. चळवळ ही कोणतीही असो ती कधी ही निर्दोष किंवा दोष विरहीत असू शकत नाही. म्हणूनच सहकार चळवळ ही त्याला अपवाद नाही. सहकार चळवळीमध्ये ही काही गुण दोष आहेत ते आपल्याला ते आपल्याला पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

## सहकारी चळवळीचे गुण :

### १. समाजातील दुर्बल घटकांच्या हितसंबंधाचे रक्षण :

सहकाराचा अर्थ स्पष्ट करता आपण असे पाहिले होते की, समाजातील दुर्बल घटकांच्या हितसंबंधाचे रक्षण करणे हेच सहकाराचे उद्दिष्ट आहे. सामुहिक प्रयत्नाद्वारे सर्वांचे हित साध्य करण्याच सहकारात भर दिला जातो. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने देखील दुर्बल घटकांच्या शिक्षणाचे कार्य चांगल्या पद्धतीने केले आहे. समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक बळ प्राप्त करून देण्याच्या बाबतीत सहकारी चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

### २. ग्रामीण भागाचा आर्थिक विकासः

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सहकारी चळवळीने मोठे योगदान दिले आहे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे ५० वर्षापूर्वीचे चित्र व आजचे चित्र यात फारच मोठा बदल झालेला आहे. अर्थात या बदलाला सहकाराबरोबर इतरही घटक जबाबदार आहेत. पण सहकारी चळवळीने देखील परिवर्तनास बऱ्याच प्रमाणात हातभार लावला आहे. या संदर्भामध्ये साखर कारखान्याची भूमिका महत्त्वाची आहे. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या त्या ठिकाणी अनेक लहान मोठे व्यवसाय सुरू झाले. त्यामुळे ग्रामीण जनतेची आर्थिक स्थिती निश्चितपणे सुधारलेली आहे.

### ३. शेतीचा विकास :

शेती व्यवसायाच्या विकासासाठी ही सहकारी चळवळीने बऱ्याच प्रमाणात मदत केलेली आहे. सहकारी संस्थांनी ग्रामीण भागातील मजूरांना शेतीला पुरक व्यवसाय सुरू करण्याला प्रोत्साहन दिले. या संदर्भात दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, शेळी, मेंढी पालन इ. व्यवसायाचा उल्लेख करता येईल काही सहकारी संस्थांनी शेती मालावर प्रक्रिया करण्याचे काम सुरू केले त्यामुळे शेतकऱ्याच्या मालाला वाजवी भाव मिळू लागला. तर काही संस्थांनी शेती मालाच्या विक्रीची व्यवस्था केल्याने मध्यस्थ व दलाल यांच्याकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण कमी झाले.

### ४. शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता :

शेतकरी म्हणजे खाजगी सावकारांच्या कर्जात बुडालेला प्राणी आहे. अशी शेतकऱ्यांची एकेकाळी अवस्था होती हे चित्र आता खूप बदलले आहे. हा बदल घडवून आणण्यात प्राथमिक पतपुरवठा सहकारी संस्थानी महत्त्वाचा वाटा उचलला आहे. प्राथमिक पतपुरवठा संस्था व शेतीला पतपुरवठा

करणाऱ्या अन्य सहकारी संस्था या शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी कमी व्याजदराने अल्प व दीर्घ मुदतीची कर्जे उपलब्ध करून दिली त्यामुळे शेतकऱ्यांना खाजगी सावकारांच्या पायऱ्या चढण्याची गरज पडत नाही.

**५. ग्रामीण भागाचा कायापालट :**
ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाबरोबर ग्रामीण भागाचा सर्वच दृष्टीने कायापालट करण्यास सहकारी चळवळीने हातभार लावला आहे. निरनिराळ्या सहकारी संस्थानी शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या कार्यामुळे शेतकरी वर्गाची आर्थिक स्थिती बरीच सुधारलेली आहे. तो आता सुजाण ही झालेला आहे त्यांची परंपरागत व्यवसायातून मुक्तता झालेली आहे.

**६. राज्यांच्या विकासाला हातभार :**
महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने राज्याच्या विकासासाठी फार मोठ्या प्रमाणात हातभार लावलेला आहे. राज्याच्या विकासाची जी कामे आता पर्यंत झालेली आहेत. ती सहकारी चळवळीच्या मदतीमुळेच सहकारी चळवळीने पंचवार्षिक योजनांची उद्दिष्टे साध्य करण्यास शासकीय प्रयत्नास साथ दिलेली आहे. तसेच ग्रामीण भागाच्या विकासास सहकारी चळवळीने दिलेले योगदान याला तर तोडच नाही. शिवाय गृहबांधणी लघुउद्योग या सारख्या व्यवसायासही सहकारी चळवळीने मदत करून राष्ट्राच्या विकासास हातभार लावला आहे असे दिसून येते.

सहकारी चळवळीच्या गुणांची जशी आपण मिमांसा केली त्याप्रमाणेच सहकारी चळवळींच्या दोषांची मिमांसा करणे अपरिहार्य ठरते. आणि ती आपण पुढील प्रमाणे करू.

## ५ब.५ सहकारी चळवळीचे दोष:

महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीमुळे जरी महाराष्ट्राची अनेक क्षेत्रात प्रगती झाली असली तरी तिच्यात काही दोष ही आहेत ते पुढील प्रमाणे नमूद करता येतील.

**१. राजकारणाचा झालेला प्रभाव :**
सहकारी चळवळ व राजकारण याचा जवळचा संबंध आहे. हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. सहकारी चळवळीवर राजकारणाचा जबरदस्त प्रभाव आहे, असा निष्कर्ष काढला तर तो चूकीचा ठरणार नाही. महाराष्ट्रातील बहुतेक सरकारी संस्थावर राजकीय नेत्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. व म्हणून सहकारी संस्थांचा वापर ती आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करतात. म्हणून सामान्य सभासदाच्या हिताकडे दुर्लक्ष होते.

**२. योग्य नेतृत्वाचा अभाव :**
राज्यातील सहकार संस्थातील नेतृत्वाचा आभ्यास केल्यास काही अपवाद वगळता अनेक सहकारी संस्थांना योग्य नेतृत्व मिळू शकलेले नाही. याचा अर्थ विद्यमान नेतृत्व गुणवत्तेत कमी पडते असे होत नाही. कारण की, या नेत्याची सहकाराच्या तत्वांशी बांधिलकी कमी असल्याचे जाणवते. तसेच त्यांना इतर सभासदांच्या हिताची फारशी फिकीर नाही. त्यांच्यातील गुणवत्तेचा संस्थेतील सभासदांना काहीच लाभ मिळत नाही.

**३. वरिष्ठ वर्गांनाच विशेष फायदाः**

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची बरीच प्रगती झाली असली तर त्याचा लाभ महाराष्ट्रातील घटकांना मिळालेला आहे असे नसून सहकारी चळवळीचा जास्तीत जास्त फायदा वरिष्ठ वर्गाला झालेला आहे. या सहकारी चळवळीवर सामाजिक व्यवस्थेचा प्रभाव पडलेला आहे. सहकारी संस्थेचे नेतृत्व हे वरिष्ठ वर्गाच्याच (जातीच्या) हाती आहे व ते त्याचा फायदा आपल्याच वर्गाला देत असल्यामुळे सामान्य सभासद दुर्लक्षित झाला आहे.

**४. अकार्यक्षमता :**

सहकारी संस्थांच्या कारभारामध्ये अकार्यक्षमता दिसून येते कोणत्याही सहकारी संस्थेत नोकरी करतांना साधारणपणे गुणवत्ता लक्षात घेतली जात नाही. वशीलेबाजी व राजकीय सोय याच्या आधारे नोकर भरती केली जाते. काही सहकारी संस्था तर कितीतरी जास्त गरजेपेक्षा नोकरांची भरती केली जाते सहकारी संस्थात कुशलतेचा अभाव ही जाणवतो.

**५. प्रादेशिक असमतोल :**

सहकारी संस्थामुळे महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलास अप्रत्यक्षपणे चालनाच मिळालेली आहे. प्रादेक्षिक विकासाच्या दृष्टीने विशेष महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांसारख्या संस्था राज्याच्या एका विशिष्ट भागात म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात एकवटलेल्या आहे. पण मराठवाडा, विदर्भ व कोकण यासारखे अगोदरच अविकसित असलेले भाग मात्र यामुळे दुर्लक्षीत झालेले आहेत. यामुळे प्रादेक्षिक असमतोलास चालना मिळालेली आहे.

**६. भ्रष्टाचार :**

महाराष्ट्रातील अनेक सहकारी संस्थात भेडसावणारी एक समस्या म्हणजे आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार याचा उल्लेख करता येईल. आर्थिक गैरव्यवहारात संस्थेचे पदाधिकारी व नोकरवर्ग या दोघांचाही सहभाग असतो. तो सामान्य सभासद वर्गास त्यांना आपल्या हक्काविषयी फारशी माहिती नसते. त्याचा फायदा घेऊन ते गैरव्यवहार करत असतात.

अशा रितीने महाराष्ट्रातील सहकारी संस्थाच्या गुण दोषांचा आभ्यास केला असता या सहकारी संस्थामध्ये गुणाबरोबर काही दोष ही आहे हे स्पष्ट झाल्यानंतर गुणांपेक्षा दोष प्रभावी वाटत असले तरी महाराष्ट्राच्या प्रगतीला जी चालना मिळालेली आहे त्यास सहकारी चळवळ जबाबदार आहे असे म्हणता येईल व यातच सहकारी चळवळीचे महत्त्व साठवलेले आहे.

सरकारी चळवळीचा अर्थ आणि व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर सहकारी चळवळीचा व्याप्ती आभ्यासने गरजेचे ठरते.

## ५ब.६ सहकारी चळवळीची व्याप्ती :

सहकारी चळवळीची व्याप्ती बरीच मोठी आहे. राज्यांच्या आर्थिक जीवनाची अनेक क्षेत्रे सहकारी चळवळीने व्यापलेली आहेत. सुरवातीला ही चळवळ कृषी पतपुरवठ्याच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती पण पुढील काळात तिचा शेतीमाल प्रक्रिया शेतमाल पणन, ग्रामीण उद्योगधंदे, ग्राहक भंडारे, सामाजिक सेवा इ. विविध क्षेत्रात वेगाने विस्तार झाला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरच्या काळात

म्हणजे १९६१ मध्ये राज्यातील सहकारी संस्थेची संख्या सुमारे ३१,००० इतकी होती. ती संख्या २००१ साली १ लक्ष ५८ हजार इतकी झाली या सर्व सहकारी संस्थाच्या सभासदांची एकूण संख्या ४२ लक्ष इतकी होती ती संख्या २००१ साली ४ कोटी २७ लक्ष इतकी झाली आणि २००९ साली या सहकारी संस्थेचे खेळते भांडवल १७,९३२ कोटी रूपये इतके होते. संपूर्ण देशातील सहकार चळवळीचा विचार करतानाही महाराष्ट्राने या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे चित्र स्पष्ट होते. देशातील एकूण सहकारी संस्थापैकी महाराष्ट्रात २७.३% सहकारी संस्था एकट्या महाराष्ट्रात आहे. तर सहकारी संस्थेच्या सभासद संस्थेपैकी १४.७% सभासद व २६.३% भाग भांडवल महाराष्ट्रात आहे. एकूण रोजगारात सहकारी क्षेत्राचा वाटा सुमारे १२.५% आहे वरील आकडेवारीवरून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती लक्षात येऊ शकते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा विस्तार अनेक क्षेत्रात झाला. उदा. शेती पत पुरवठा, ग्रामीण व नागरी बिगर कृषी पतपुरवठा, साखर उद्योग, सुतगिरण्या, दुग्ध व्यवसाय, मच्छीमारी व्यवसाय, रेशीम उद्योग, चर्म उद्योग कुकुटपालन, शेतीमाल प्रक्रिया, ग्राहक भंडार, तेलगिरण्या इ. अनेक क्षेत्रे सहकारी चळवळीने व्यापलेली आहे वरील काही महत्त्वाच्या क्षेत्रात सहकारी चळवळीने केलेल्या प्रगतीचा आढावा थोडक्यात घेऊ या.

### १. शेती पतपुरवठा :

महाराष्ट्रातील शेती व्यवसायाला कर्जपुरवठा करण्याच्या कामी सहकारी संस्थांनी मोलाचे मार्गदर्शन केले आहे. या क्षेत्रात सहकारी संस्थेची कामगीरी अशासाठी महत्त्वाची मानली जाते की, त्यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विशेषतः गरीब शेतकऱ्यांना खाजगी सावकारांच्या कचाट्यातून मुक्त केले आहे शेतीचा पतपुरवठा करणाऱ्या संस्था पुढील पैकी तीन स्तरावर काम करतात.

१. खेडे किंवा गाव स्तरावरील सहकारी पतपुरवठा संस्था
२. जिल्हा स्तरावरील पतपुरवठा संस्था
३. राज्यस्तरावरील सहकारी बँक किंवा शिखर बँक

यापैकी सहकारी पतसंस्थाचे जाळे राज्याच्या खेड्यापाड्यात सर्वत्र पसरले आहे. खेड्यातील दहा किंवा त्यापेक्षा जास्त लोक एकत्र येऊन संस्था स्थापन करतात. महाराष्ट्रात शेतीला पतपुरवठा करणाऱ्या संस्थाची संख्या २०,५५१ इतकी होती. व त्यांची सभासद संख्या सुमारे १ कोटी २ लक्ष इतकी होती.

### २. सहकारी साखर कारखाने :

महाराष्ट्राच्या अर्थकारणात राजकारणात सरकारी साखर कारखान्यांना महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. सहकारी साखर कारखाना हा ग्रामीण भागातील लोकांनी स्थापन केलेली एक संस्था होय. त्यात १०% भांडवल सभासद शेतकऱ्यांचे असते तर २५% भांडवल राज्य सरकारचे असते. व उर्वरीत भांडवल वित्तसंस्थाकडून उभे केलेले असते. सध्या भारतात ४०० पेक्षा जास्त साखर कारखाने आहेत त्यापैकी जवळपास २०० साखर कारखाने एकट्या महाराष्ट्रात आहेत. संपूर्ण साखर उत्पादनाला महाराष्ट्राचा वाटा ४०% इतका आहे. भारतातील पहिला साखर कारखाना विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुढाकाराने प्रवरानगर येथे अहमदनगर जिल्ह्यात स्थापन करण्यात आला होता. सर्वात जास्त गाळप असलेला साखर कारखाना वसंतदादा पाटील शेतकरी सहकारी

साखर कारखाना सांगली येथे आहे. महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने साखरेच्या जोडीला डिस्टीलरी (मद्यार्क) रसायने व कागद यासारखे पुरक उत्पादनाला ही प्राधान्य देतात. अलीकडच्या काळात साखर कारखान्यापुढे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत जागतिकीकरणाचा मोठा फटका साखर उद्योगाला बसला आहे.
सहकारी साखर कारखाने ही महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची सर्वांत उल्लेखनिय बाब आहे. महाराष्ट्रामध्ये २०० पेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने आहेत त्यापैकी ९२ कारखाने व्यवस्थीत उत्पादन करीत आहेत तर काही अपवादात्मक कारखाने सध्या दोन-दोन वर्ष बंद रहातात. जळगाव, धुळे, नाशिक, औरंगाबाद, जालना, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापुर, सोलापुर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात सहकारी कारखान्यांच्या स्थापनेमुळे अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. गाळपाचा हंगाम चालू असतांना बेरोजगारांना रोजगार मिळतो. गाळप हंगामात प्रत्येक कारखान्यात सुमारे ५ हजार व्यक्ती काम करतात. सहकारी साखर कारखान्यात शेतकऱ्यांचे भांडवल २५% असते राज्यसरकारने आणि वित्तीय संस्थांचे भांडवल साधारपणे ६० ते ६५% पर्यंत असते.

गेल्या काही वर्षात साखर कारखान्यांनी फार मोठ्या प्रमाणामध्ये कामामध्ये वैविध्य आणले आहे. उसाच्या रसापासून मद्यार्क, रसायने, आम्ले, ॲसेटिक अनहायड्रोईड ॲसिड इत्यादी उद्योग धंद्यास चालना मिळाली आहे. ऊसाच्या रसापासून जो टाकावू पदार्थ मळी असतो त्यापासून मद्य तयार करण्याचे कारखाने कार्यरत आहेत. तसेच ऊसाच्या भुगापासून कागद व्यवसाय उभा राहिला आहे. शिवाय साखर तयार होतांना जो टाकावू पदार्थ असतो. त्यापासून शेतीला खत उपलब्ध होते.

अनेक साखर कारखान्यांनी तंत्राज्ञान महाविद्यालये चालविली आहेत. शाळा, कॉलेजे सारखे कारखान्याच्या माध्यमातून चालविली जात आहे. शाळा महाविद्यालये व तंत्रनिकेतन चालविणे, सहकारी संस्था चालविणे, वस्तु भंडार चालविणे अशा अनेक मार्गांनी विविधीकरण झालेले आहे. साखर कारखान्यांच्या कागद व्यवसाय जोर धरू लागला आहे. साखर कारखान्यांची महाविद्यालय चालविणे नविन नसले तरी प्रवरानगर येथे वैद्यकिय महाविद्यालये उभी राहिली आहेत.

त्याचप्रमाणे नासिक येथिल भाऊसाहेब नगर साखर कारखान्यात तंत्रज्ञान महाविद्यालय उभे राहिले आहे. निफाड तालुक्यातील काकासाहेब वाघ साखर कारखान्यात डिस्टीलरी मद्यार्क बनविण्याचा कारखाना चालू आहे.

साखर कारखान्यांनी स्वतःची संशोधन संस्था उभारली आहे. नासिक आणि जळगाव जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी प्रत्येकी १२ कोटी रूपये खर्च करून नद्यांचे पाणी अडवून डोंगरात बोगदा काढून गिरणा नदीत सोडण्याचा प्रकल्प राबवत आहेत.

मध्य महाराष्ट्राचा विचार करता साखर कारखान्यांची गाळप क्षमता जास्त आहे. आणि मध्य महाराष्ट्रात साखर कारखान्यांची संख्या जास्त आहे सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण भागांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली आहे. हे निश्चितच वाखाणण्या सारखे आहे.

**३. सहकारी सूतगिरण्या :**

महाराष्ट्रातील सहकारी सुतगिरण्यांची अवस्था तर सहकारी साखर कारखान्यांपेक्षाही बिकट बनली आहे. ३१ मार्च २००१ साली राज्यात २२८ सहकारी सुत गिरण्या होत्या त्यापैकी फक्त ४६ सुतगिरण्या उत्पादन करीत होत्या. सहकारी सुतगिरण्यांची सध्या कठीण परिस्थितीतून वाटचाल होत असली तरी ग्रामीण भागात विकासासाठी या गिरण्यांनी महत्त्वाचा हातभार लावला आहे. देशातील सर्वात पहिली सुतगिरणी इचलकरंजी येथे कोल्हापुर जिल्हा शेतकरी विनकर संस्था या नावाने उभी राहिली. सर्वात मोठी सहकारी सुतगिरणी इचलकरंजी येथे असून ती डेक्कन कॉर्पोरेशन स्पिनींग मिल होय.

**४. इतर सहकारी संस्था :**

वरील सहकारी संस्था खेरीज महाराष्ट्रातील इतर संस्थाचा तपशीलसुद्धा सांगता येईल. जसे सहकारी मत्स्य संस्था याची संख्या २००१ साली महाराष्ट्रात २,५२० होती. तर प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था यांची संख्या ६९ होती. तर ५४,११० सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. याशिवाय राज्यात आणखीन इतर पतसंस्था होत्या.

महाराष्ट्रात निरनिराळ्या सहकारी संस्थांच्या आकडेवारीचा तपशील विचारात घेता सहकारी संस्थेने गेल्या काही वर्षात बरीच प्रगती केली आहे.

## ५ब.७ सहकारी चळवळ व राजकारणाचा संबंध :

महाराष्ट्रापुरता विचार केल्यास सहकारी चळवळ आणि राजकारण यांचा निकटचा संबंध आहे महाराष्ट्राच्या राजकारणावर सहकारी क्षेत्राची जबरदस्त पकड आहे. विशेष करून निवडणूकीच्या काळात यासंबंधी नेहमीच चर्चा होते. सहकारी चळवळीने महाराष्ट्राच्या राजकारणाला प्रथम पासूनच प्रभावित केलेले आहे. याचा अर्थ सहकारी क्षेत्रावर महाराष्ट्राचे राजकारण चालते. असा अर्थ मात्र होत नाही. सहकार क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप होत असल्याची टिका बऱ्याच वेळा केली जाते. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीत जे काही दोष निर्माण झाले आहे त्यात येथील राजकीय नेते जबाबदार आहे असे अभ्यासकांचे मत आहे.

सहकारी चळवळ आणि राजकारण यांचा संबंध असल्याचे राजकारण राजकीय नेतृत्व यांच्या पुढाकारामुळेच सहकारी चळवळीला चालना मिळाली आहे. या संबंधामुळे स्वातंत्र्योत्तर काळात धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, पंजाबराव देशमुख, वसंतदादा पाटील, शंकरराव कोल्हे इ. नावे किंवा इत्यादींनी सहकार चळवळ रुजवण्याचा किंवा तिला गतिमान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वरीलपैकी बहुतेक नेते राजकीय नेते होते. राजकीय नेतृत्वाची जबाबदारी पार पाडत असतांना त्यापैकी काहींना विधायक कार्याची आवड म्हणून सहकारी क्षेत्राकडे आपला मोर्चा वळविला सहकारी क्षेत्र आणि राजकारण यांची सांगड घालण्याचे आणखी एक कारण म्हणजे राजकीय नेत्यांना सहकारी संस्थाच्या राजकीय उपयुक्ततेची आलेली जाणीव हे होते. त्याचबरोबर राजकीय हितसंबंधाच्या रचनेसाठी या संस्था कशा उपयुक्त पडू शकतात हे राजकीय नेत्यांच्या लक्षात आले.

सहकारी संस्थाची राजकीय उपयुक्तता राजकीय नेत्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी सहकारी संस्था स्थापन करून त्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजाची स्थिती लक्षात

घेता ग्रामीण लोकांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी सहकारी संस्था उपयुक्त मार्ग आहे. हे धुरंधर राजकारणांनी चाणाक्षपणे लक्षात घेऊन तेथे सहकारी संस्था स्थापन केल्या व अनेक जणांना रोजगार मिळवून दिला. रोजगार प्राप्त झालेले अनेक जण उपकाराच्या ओझ्याखाली राहू लागली. निवडणूकीच्या काळात व इतरवेळी सहकारी संस्थेची योजना आपल्या कामासाठी वापरण्यात येवू लागले थोडक्यात सहकारी संस्था हे राजकारणाच्या दृष्टीने राजकारणातले एक साधन बनले. अशा परिस्थितीत राज्यातील सर्व संस्था राजकारणग्रस्त बनाव्यात यात कसले नवल नाही. राजकीय नेते लोकांची गरज किंवा आपल्या भागाचा विकास या सारख्या गोष्टींचा विचार करण्यासाठी आपल्या व राजकीय सोयीसाठी सहकारी संस्था स्थापन करण्याच्या पाठी लागले. उदा. ज्या भागात कापसाचे बोंड ही पिकत नाही. त्या भागात सुतगिरण्या उभ्या राहिल्या जिथे ऊसाचे एक चिपाड ही नसते तेथे साखर कारखाने उभे राहिले. व त्यातूनही हे सहकारी संस्था राजकारणांचे अड्डे बनून गेले.

अशा रितीने सहकारी संस्थाचा राजकीय उद्दिष्टासाठी वापर होऊ लागल्याने राज्यातील सहकार चळवळीमध्ये ही काही विकृती निर्माण झाल्या. एखाद्या सहकारी संस्थेवर विशेष कोणाचे नियंत्रण आहे हे लक्षात घेऊनच या संस्थेला पाठींबा द्यायचा की विरोध करायचा याचा निर्णय होऊ लागला. सभासदत्व देतांनाही राजकारणाला प्राधान्य दिले जाऊ लागले. त्याच्याही पुढे जाऊन सहकारी संस्थेचे पदाधिकारी राजकीय विरोधकांची अडवणूक करण्यासाठी सत्तेचा दुरूपयोग करू लागले. आणि म्हणूनच सहकारी चळवळीच्या निकोप वाढीमध्ये अनेक अडचणी निर्माण होऊ लागले.

## ५ब.८ महत्त्वाचे प्रश्न खालीलप्रमाणे देत आहोत.

१. सहकाराचा अर्थ स्पष्ट करून त्याची प्रमुख वैशिष्टे सांगा.

२. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे गुण - दोष स्पष्ट करा.

३. सहकारी चळवळीची व्याप्ती सांगून महाराष्ट्राचे राजकारण आणि सहकारी चळवळ यांचा संबंध स्पष्ट करा.

४. सहकारी साखर कारखान्यांचे योगदान महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या संदर्भात स्पष्ट करा.

------------

# ५क

# बिगर राजकीय प्रक्रिया - ३ स्वयंसेवी संस्था - स्वयंसहायता गट आणि विकासाची पर्यायी प्रतिमाने

५क.१ प्रास्ताविक
५क.२ श्रमिक संघटना
५क.३ श्रमजीवी संघटना
५क.४ नर्मदा आंदोलन - बिगर राजकीय संघटना
५क.५ स्वयंस्वायतता गट
५क.६ सारांश
५क.७ महत्त्वपूर्ण प्रश्न

## ५क.१ प्रास्ताविक :

आफ्रिका खंडातील विकासशील देशात विकासाचा कार्यक्रम उपलब्ध नसल्याने सरकारला व्यापक स्वरूपाची विकासात्मक कामे पार पाडावी लागतात. विकसनशील देशात गरीबी, अज्ञान, निरक्षरता या गोष्टी प्रामुख्याने जाणवतात. आणि हे प्रश्न सोडवण्याचे कार्य राष्ट्राला करावे लागते. स्वातंत्र्य प्राप्तीबरोबरच आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकासाची जबाबदारी ही शासनाकडे आली आणि शासनाने आपली सर्वच कामे करावी अशी सर्व सामान्य जनतेची / सामाजाची मागणी असते. परंतु हे सर्व करण्यासाठी शासनाकडे पैसा, सामुग्री, प्रशासकीय वर्ग यांची कमतरता भासते या शिवाय प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या तटस्थ दृष्टीकोनामुळे अपेक्षीत आर्थिक विकास किंवा समाजपरिवर्तन होत नाही. अशा परिस्थीतीत विकास प्रक्रियेत जनतेचा सहभाग अनिवार्य ठरतो. 'आत्मोन्नती' करता समाजाला जागृत करणे भाग पडते.

आपण पहातो की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी देखील बहुजन समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. सत्यशोधक समाज ही सुध्दा त्याकाळातील एक स्वयंसेवी संस्था होती.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तळागाळातील लोकांना एकत्र करून त्यांना आपल्या भाषणातून जाणीव जागृती करून दिली अशा प्रकारच्या अनेक स्वयंसेवी संघटनांचा उदय जनतेच्या समस्या, अडचणी सोडविण्यासाठी निर्माण झाल्या आहेत. महात्मा ज्योतिबा फुल्यांप्रमाणेच इतर ही स्वयंसेवी संघटना महाराष्ट्रात कार्यरत आहेत. सरकारने जर ह्या संस्थेच्या कार्याला हातभार लावला प्रोत्साहन दिले तर समाजाचे विचार परिवर्तन होऊन समाज सुधारेल. एकूण असा निष्कर्ष निघतो की, स्वयंसेवी संस्थांचे कार्य हे विधायक स्वरूपाचे पहिले पाऊल आहे. त्या काळी बहुजन समाज पशुपेक्षाही हिनतेचे जीवन जगत होता. त्याची मुक्तता करण्यासाठी अन्यायाची जाणीव करून देण्यासाठी आणि प्रसंगी संघर्ष करण्याची जाणीव निर्माण करण्यासाठी भिख्खु संघाचे कार्य महान आहे.

ही सुद्धा एक स्वयंसेवी संस्था म्हणता येते की, समाजाच्या उन्नतीसाठी अविरतपणे कार्य करणे तसेच या स्वयंसेवी घटकाचा विचार केला तर अनेक महान व्यक्तीनी समाजाच्या उद्धारासाठी स्वतःला सामाजिक कार्यात झोकून दिले. त्याचप्रमाणे नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांचे देखील सामाजिक कार्य अनन्य साधारण आहे गरीब लोकांना न्याय प्राप्त करून देण्यासाठी वेठबिगारीतून लोकांची मुक्तता करण्यासाठी काहीनी स्वतः पुढाकार घेऊन सरकारशी संघर्ष केला व सर्वसामान्य माणसाला मानाचे स्थान प्राप्त करून दिले. अशा प्रकारचे अनेक महान व्यक्तींचे संदर्भ देता येतील.

थोडक्यात असे म्हणता येईल की स्वयंसेवी गटाचे कार्य हे समाजातील लोकांना अडचणी पासून दूर करून त्यांच्यात आपल्या अधिकाराबाबत जागृतता निर्माण करून देणे हे आहे.

सध्या सर्व देशात सुमारे दोन हजारापेक्षा जास्त पक्ष बाह्य संघटना कार्यरत आहेत. तर महाराष्ट्रात सुमारे १०२ गट आणि संघटना कार्यरत आहेत कर्मचारी आणि नेते मंडळी भ्रष्ट झालेली आहेत. समाजाचे प्रश्न सोडवण्याकडे त्याचे लक्ष नाही. भोगवादी प्रवृत्ती ह्या लोकांमध्ये बळावली आहे. एक लुटारू अर्थव्यवस्था निर्माण झालेली आहे. समाजाच्या प्रगतीसाठी अनेक जण उदासीन आहेत. स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते त्याचप्रमाणे ज्या कनिष्ठ जाती मानल्या जातात अशा लोकांनाही दुय्यम स्थान दिले गेले त्यांच्यावरील अत्याचारात वाढ झालेली आहे. या परिस्थितीचा विचार केल्यास आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शासन आणि राजकीय पक्ष काही ठोस पावले उचलेल असे वाटत नाही.

सुदैवाने उपेक्षीत वर्गाला मदत करण्यासाठी समाजात अन्यायाविरूद्ध आवाज उठविणारा गट आणि लोकसंघटना आहेत. दलित जाती परितक्त्या महिला, भटक्या विमुक्त जाती अंगमेहनत करणारे कामगार यात काम करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नामुळे तळागाळातील लोकांची प्रगती होण्यास नक्कीच हातभार लावला आहे. त्यामुळेच पक्षबाह्य संघटना किंवा स्वयंसेवींना विशेष महत्त्व आजच्या काळात प्राप्त झालेले दिसते. ह्या ज्या संघटना आहेत त्या स्वतःच्या हिंमतीने सामाजिक कार्य करतात. त्यांचा कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध नसतो. त्या स्वबळावर परिवर्तन घडवून आणतात. विधायक कामे करतांना त्या सरकार बरोबर असतात. वेळ प्रसंगी सरकारशी संघर्ष करण्यासही तत्पर असतात.

स्वयंसेवी किंवा पक्षबाह्य संघटनांची व्याख्या अशी करता येईल कि, सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने राजकीय पक्ष किंवा शासनाशी निगडीत नसलेल्या संघटना म्हणजेच पक्षबाह्य संघटना किंवा स्वयंसेवी संस्था होय.

थोडक्यात असे स्पष्ट करता येईल की, जो तळागाळात किंवा निरक्षर, गरीब समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांच्यात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी पक्षबाह्य संघटनाची किंवा स्वयंसेवी संघटनाची निर्मिती झालेली आहे. त्याची राजकीय पक्षांशी कसलीही बांधिलकी नाही.

## ५क.२ श्रमिक संघटना :

महाराष्ट्रात आदिवासी भागामध्ये काम करणाऱ्या संघटनापैकी श्रमिक संघटना ही एक पक्ष बाह्य संघटना आहे. धुळे जिल्ह्यात आदिवासीची संख्या २७% च्यावर पोहचली आहे. तेथील निरक्षर लोकांना गरीब अज्ञानी लोकांना ठेकेदार जमीनदार फसवणूक करतात त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन जमिनी बळकावतात. त्यांच्यावर जुलूम करतात त्यांचे शोषण करतात. म्हणून ह्या आदिवासी

अज्ञानी समाजाला न्याय मिळवून त्यांच्यासाठी अनेक संघटनांनी पुढाकार घेतलेला आहे. परंतु या जमीनदार वर्गाने त्यांचे प्रयत्न यशस्वी होऊ दिले नाही. १९७२ साली धुळे येथे राज्यव्यापी भू - मुक्ती परिषद आयोजित करण्यात आली होती या परिषदेत आदिवासींच्यासाठी मागण्या करण्यात आल्या. त्या मागण्या पुढीलप्रमाणे विषद करता येतील.

१. रोजगार हमीची कामे सुरू करावीत.
२. आदिवासींच्या जमीनीवरील आक्रमणे हटावीत त्यासाठी प्रशासक वर्गाने मदत करावी.
३. आदिवासींना कर्ज माफ करावे.
४. चांगल्या प्रकारचे स्थानिक नेतृत्व निर्माण करावे इ. स्वरूपाच्या मागण्या करण्यात आल्या.

या स्वरूपाच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी श्रमिक संघटनेची स्थापना करण्यात आली आणि या संघटनेने वरील मागण्यांचा पाठपुरावा करून आदीवासींना हव्या असलेल्या गोष्टी साध्य देखील करून दिल्या.

## ५क.३ श्रमजीवी संघटना:

धुळ्याच्या श्रमिक संघटनेप्रमाणेच ठाणे जिल्ह्यातील वसई, वाडा, भिवंडी आणि आदिवासी क्षेत्रात काम करणारी श्रमजीवी संघटना आहे. आदिवासी लोकांच्या अडाणीपणाचा, अज्ञानी, अंधश्रद्धा या गोष्टीचा फायदा घेऊन श्रीमंत जमीनदारांनी त्यांच्या जमीनी विनामुल्य बळाकावल्या त्याचप्रमाणे कर्जाच्या रक्कमेमध्ये फसवणूक करून कधी अतिशय कमी तर कधी विनामूल्य जमीनी बळकावल्या. त्यांना वेठबिगार बनविले विविध मार्गानी त्यांचे शोषण केले अशा विविध मार्गांनी आदिवासींचे शोषण केले जात होते. त्यांची या परिस्थितीतून सोडवणूक करण्यासाठी श्रमजीवी संघटना पुढे आली किंवा श्रमजीवी संघटनेचा उदय झाला त्याचप्रमाणे :-

## ५क.४ नर्मदा बचाव आंदोलन

बिगर राजकीय संघटना : नर्मदा व तिच्या ४१ उपनद्यांवर ३० मोठी आणि १३५ मध्यम व ३ हजार धरणे बांधण्याची नर्मदा खोरे विकास प्रकल्प ही अत्यंत मोठी योजना आहे. या योजनेमुळे अनेक शहरांचा खेड्यांचा विकास साधला जाणार आहे. परंतु महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातील मिळून जवळजवळ १ लाख लोकांना विस्तापित व्हावे लागणार आहे. विस्थापितांचे पुनर्वसन होण्याच्या मुद्यापासून आंदोलन संघटनेला १९८४ पासून सुरूवात झाली ह्या आंदोलनामध्ये अनेक स्वयंसेवी संघटना कार्य करत आहेत. प्रत्येक पक्षबाह्य संघटनेची स्वतःची वेगळी अशी विचारसरणी असते. पुढीलप्रमाणे काही स्वयंसेवी संस्थांचा उल्लेख करता येईल. स्वयंसेवक संघ, राष्ट्रीय सेवा दल अलिकडच्या काळात इस्लामीक स्वयंसेवक संघ अशा संघटना अस्तित्वात आहेत. दुसरी बाब अशी की काही स्वयंसेवी संघटना या जमातवादी संघटना आहेत. उदा. हिंदुचे संघटन, हिंदु हितसंबंधाची जोपासना ही आर.एस.एस.ची उद्दीष्टे आहेत तर म्हणजेच विश्व हिंदू परिषद किंवा वनवासी सेवा आश्रम इ. संघटना जरी विधायक स्वरूपाचे कार्य करीत असल्यातरी त्या जमातवादी आहेत.

महाराष्ट्रामध्ये स्वयंसेवी संघटनांची संख्या दोन हजारच्यावर आहेत मान्यता प्राप्त अशा १८१ संघटना आहेत तर विश्व हिंदू परिषद वनवासी सेवा आश्रम यासारख्या हिंदुत्ववादी संघटनाही कार्यरत आहेत.

## ५क.५ प्रस्थापितांच्या आणि परिवर्तनवादी संघटना:

लायन्स क्लब पासून ते कुष्ठरोग्यांसाठी कार्य करणाऱ्या बाबा आमटे यांच्या संघटना प्रस्थापित गटातल्या म्हणता येतील या संघटनांचे कार्य धर्मदाय स्वरूपाचे आहे. अशा प्रकारच्या संस्थेचे कार्य परकीय मदतीवर किंवा सरकारच्या अनुदानावर चालते. जिथे अनुदान किंवा मदत प्राप्त होईल तिथेच ह्या संघटना स्थापन होतात. अशा प्रकारचे संस्थांचे स्वातंत्र्योतर काळात पेवच फुटले होते. अशा प्रकारच्या संस्थाकडून समाज परिवर्तन कि, समाज प्रबोधनाची आशा अपेक्षा बाळगता येत नाही. उलट राष्ट्रसेवा दल, युवक क्रांती दल, देवदासी मुक्ती संघटना, अंधश्रद्धा निर्मुलन संघटना भटक्या विमुक्तांची संघटना ह्या कृतीशील संघटना आहेत अशा संघटनांचे परिवर्तन हेच ध्येय असल्याने ते इतरांच्या किंवा सरकारच्या मदतीवर अवलंबून नसतात. आपल्या कृतीतून परिवर्तनाचे महत्त्व समाजाला पटवून देण्यासाठी ते तत्पर असतात. त्यांना कुणाच्याही मेहरबाणीची गरज नसते.

काही संघटनांना चांगले नेतृत्व लाभत नसल्यामुळे त्यांचे कार्य थंडावते. सारासार विचार करता असे लक्षात येते की, या स्वयंसेवी कृतीशील संघटनांच्या प्रयत्नामुळे सरकारमध्ये सुद्धा त्यांची दखल घेतली जाते. म्हणजेच स्वयंसेवी संघटना आपले म्हणणे सरकारवर लादत नाहीत तर त्यांच्याशी विचार विनिमय करून चर्चा घडवून परिवर्तन घडवून आणतात.

## ५क.६ स्वयंसाहायत्ता गट :

स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षिक योजनामध्ये ग्रामीण विकासाला अग्रक्रम देण्यात आला १९७० मध्ये दारीद्र्य निर्मुलन, बेरोजगारी निर्मुलनाच्या दृष्टीकोन स्वीकारला आणि त्याची कार्यवाही करण्यासाठी विविध कार्यक्रम राबविले गेले ग्रामीण विकासाचा एकात्मीक दृष्टीकोन स्वीकारण्यात आला राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. तसेच राज्यघटनेच्या ७३ व्या घटनादुरूस्तीद्वारा पंचायतीराज संस्थामध्ये महिलांना आणि समाजातील दुर्बल घटकांना सहभागी करून घेण्यात आले. बचत गटाच्या माध्यमातून महिला आणि त्यातून ग्रामीण विकास साध्य करण्याचे उद्दीष्ट साध्य होईल. अशी नियोजनकारांची धारणा होती. महिला बचत गट / स्वयंसहायता गटाची चळवळ ग्रामीण भागात फलद्रुप झाली आहे.

या संदर्भामध्ये जागतिक बँकेने असे जाहीर केले आहे की, रोगराई कुपोषण, दारीद्र्य बेरोजगारी यांचे समुळ उच्चाटन म्हणजेच ग्रामीण विकास होय.

स्वयंसाहायता चळवळीमुळे ग्रामीण भागांचा विकास झालेला दिसून येतो. म्हणजेच ही चळवळ ग्रामीण भागात एक महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यामुळेच ग्रामीण भागात ह्या चळवळीचा प्रसार होणे ही काळाची गरज आहे.

ग्रामीण विकासाचा राष्ट्रीय कार्यक्रम १९९९ साली राबविण्यात आला त्या अंतर्गत स्वयंसाह्यता गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगाराची निर्मिती करण्यात आली तसेच सुवर्ण जयंती, ग्राम स्वयंरोजगार योजनेत प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात साधन संपत्तीच्या आधारे व्यवसायाची सुत्री तयार केली

जिल्हा ग्रामीण संस्थंद्वारे या कार्यक्रमांची कार्यवाही केली जाते.
कार्यक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही जिल्ह्यातील पंचायत समितीद्वारा करण्यात येते आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना वैद्यकीय सेवा मोफत पुरविल्या जातात. त्याचप्रमाणे गृह योजनेचा कार्यक्रम देखील ग्रामीण भागात राबवीला जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला राहण्यासाठी निवारा उपलब्ध झाला आहे. परंतु ह्या संदर्भात एक बाब येथे नमुद करावी लागेल. ती म्हणजे पंचायत राज योजनेमुळे जरी ग्रामीण जनतेचा विकास झाला असला तरी गाव पातळीवरचे राजकारणी या निधीचा फायदा सर्वसामान्य लोकांपर्यंत जावू देत नाहीत. अशी अनेक उदाहरणे पहावयास मिळतात.

थोडक्यात असेही म्हणता येईल की, ग्रामपंचायतीतील जे सदस्य आहेत ते स्वतःची पोळी भाजण्याकडे लक्ष देऊन असतात. म्हणूनच गोर-गरीब जनतेसाठी पाठवलेला निधी राजकारण्यांच्याच खिशात जातो याचा देखील विचार शासनाने करायला हवा.

हा जरी वादाचा मुद्दा असला तरी देखील स्वयंसहायता गटाचे, बचत गटाचे कार्य अभिमानास्पद आहे. त्यामुळे महिलांच्या विकासाला गती मिळाली. बेरोजगारीचा प्रश्न सुटला या माध्यमातून अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जातात. ह्यातच ह्या संघटनेचे महत्त्व दडले आहे. गाववस्ती, वाडीतील लोकांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वयंसाहायता गट प्रयत्नशील आहे. ग्राम स्वयंरोजगारासाठी शासनाद्वारे अर्थ साह्य दिले जाते. दारीद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या आणि विशेषता महिलांच्या उत्पादक उपक्रमांना अर्थसहाय्य आणि वित्तपुरवठा करण्यात येतो.

अशा गटांच्या स्थापनेसाठी स्वयंसेवी संघटना आणि वित्त संस्थानी पुढाकार घेणे अपेक्षित आहे.

सारांश : वरील सर्व बाबींचा विचार केल्यास एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे पक्षबाह्य कृतीशील संघटना असो किंवा स्वयंसेवी व्यक्ती संघटना असो यांचे कार्य समाज परिवर्तनाच्या दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण आहे. आपल्या भारत देशामध्ये अशा ह्या संघटनांचे अमाप असे योगदान आहे. ह्या चळवळींना अजून खतपाणी घालावयास हवे.

## ५क.७ महत्त्वाचे प्रश्न :

प्रश्न १. राजकीय पक्षबाह्य संघटना म्हणजे काय?
धुळ्याची श्रमिक संघटना किंवा ठाणे जिल्ह्यातील श्रमजीवी संघटनेची चर्चा करा.
प्रश्न २. सत्यशोधक समाज आणि भिख्खु संघ यांचे कार्याची मिमांसा करा.
प्रश्न ३. स्वयंसहायता गटाचे कार्य विषद करा.
प्रश्न ४. नर्मदा बचाव आंदोलन किंवा बिगर राजकीय संघटना यावर टिपा लिहा.
प्रश्न ५. ग्रामीण भागाच्या विकासासाठी पंचायत राज योजनेचे महत्त्व विषद करा.

-----------------

# ६

# राजकीय पक्ष आणि निवडणुका

**घटक रचना :**

६.१ उद्दीष्टे

६.२ प्रस्तावना

६.३ राजकीय पक्ष

६.३.१ राजकीय पक्षांचे प्रकार

६.३.२ पक्ष पद्धती

६.३.३ महाराष्ट्रातील निवडणुका

६.४ काँग्रेस वर्चस्वाचे युग

६.४.१ स्वातंत्र्यानंतरचा काळ

६.४.२ मुंबई राज्यातील काँग्रेस पक्ष

६.४.३ संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा परिणाम

६.४.४ यशवंतराव चव्हाणांची भूमिका

६.४.५ सहकारी चळवळ आणि पंचायती राज संस्था

६.४.६ दुर्बल विरोधी पक्ष

६.४.७ मराठा कुणबी जाती समूहाची भूमिका

६.५ आघाड्यांच्या राजकारणाचा उदय

६.५.१ १९५७ च्या निवडणुका

६.५.२ पुरोगामी लोकशाही आघाडी

६.५.३ भाजप शिवसेना युती

६.५.४ काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी

६.५.५ तिसरी आघाडी

६.५.६ काँग्रेस आणि दलित

६.६ मतदार वर्तनाचे बदलते प्रवाह

६.७ सारांश

६.८ प्रश्न

## ६.१ उद्दीष्टे

पाठ क्र. ६ मध्ये आपण खालील बाबी अभ्यासणार आहोत:–

१. सुरवातीस आपण थोडक्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा (काँग्रेस) इतिहास पाहू

२. त्यानंतर काँग्रेस आणि इतर महत्त्वाच्या राजकीय पक्षांच्या महाराष्ट्राच्या राजकारणातील भूमिकेचा आढावा घेऊ

३. पुढच्या भागात आपण आघाड्यांच्या राजकारणाचा अभ्यास करणार आहोत

४. आणि शेवटी मतदार वर्तनाच्या बदलत्या प्रवाहांचा अभ्यास करणार आहोत.

## ६.२ प्रस्तावना

१८८५ साली स्थापना झाल्यापासून काँग्रेस हा महाराष्ट्रातील प्रभावी राजकीय पक्ष गणला गेला आहे. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक आणि इतर अनेक नेत्यांनी काँग्रेस पक्षाच्या विकासात आपले बहुमोल योगदान दिले आहे. पक्षामध्ये अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून ब्राह्मणेतर समाजाला सामावून घेतले गेले, स्वातंत्र्यानंतर सहकारी चळवळ आणि पंचायती राज व्यवस्था यामुळे काँग्रेसची पाळेमुळे भक्कम झाली. परंतु नंतर १९८० आणि १९९० च्या दशकात गटबाजी, अंतर्गत संघर्ष या सर्व समस्यांनी घेरल्यामुळे काँग्रेसची ताकद घटत गेली. महाराष्ट्रातील एक पक्ष प्रभुत्व पद्धतीला धक्का बसला, इतर पक्षांचे बळ वाढले आणि आघाड्यांच्या राजकारणाला सुरवात झाली. काही काळानंतर काँग्रेसलाही आघाडीचा विचार करावा लागला. आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आघाडीशिवाय पर्याय नाही हे काँग्रेसने वेळीच ओळखले. याचकाळात भाजप–शिवसेना आघाडीचा उदय झाला. मतदारांचा कलही या काळात बदलता राहीला. काही संशोधकांनी ह्या बदलत्या मतदार वर्तनाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न त्यांच्या सर्वेक्षणातून केला आहे. या पाठात आपण या सर्व मुद्दयांचा परामर्श घेणार आहोत.

## ६.३ राजकीय पक्ष

माणुस हा सामाजिक प्राणी आहे. तो एकटा राहू शकत नाही. वेगवेगळ्या प्रकारचे गट, संस्था आणि संघटना तो स्थापन करतो आणि वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी त्यांच्यावर अवलंबून असतो. राजकीय पक्ष ही अशाच प्रकारची एक संस्था आहे. अल्मंड आणि व्हर्बा यांच्या मते ते समाजातील विविध हितसंबंधी गटांचे हीतसंबंध एकत्र करण्याचे काम करतात. दबाव गटांचे कार्य त्यांच्या पेक्षा पूर्णपणे वेगळे असते. दबाव गट समाजातील विशिष्ट गटांचे हीतसंबंध समाजापुढे मांडण्याचे आणि जोपासण्याचे कार्य करतात.

राजकीय पक्ष दबाव गटांपेक्षा वेगळ्या स्वरुपाचे कार्य करतात. कामगार संघटना, विद्यार्थी संघटना, उद्योगपतींच्या संघटना, विविध व्यावसायिकांच्या संघटना उदा. वकील, प्राध्यापकांच्या संघटना ही दबाव गटांची उदाहरणे आहेत. या दबाव गटांचे संस्थेमध्ये रुपांतर झालेले असते म्हणजेच त्या स्थिरावलेल्या असतात त्यांचे निश्चित सभासद असतात, ते नियमित वर्गणी भरतात, सभासदांमधुनच संस्थेचे पदाधिकारी निवडले जातात. नियम आणि कार्यपद्धतींचा समावेश असलेली घटना असते. कार्यालय, निश्चित वेतनावर काम करणारे कार्यालयीन कर्मचारी, कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत इत्यादी सर्व गोष्टी असतात. ते संबंधीत गटांचे हीतसंबंध जोपासतात. समाजाच्या हिलापेक्षा त्यांच्या गटाचे हितसंबंध राखण्यामध्ये त्यांना अधिक रस असतो. काहीवेळा त्यांच्या मागण्या अतिरेकी स्वरुपाच्या वाटतात. मागेल ते सर्व मिळेलच याची त्यांना खात्री नसते. त्यामुळेच ते अधिक मागणी करतात. काही प्रमाणात अतिशयोक्ती केल्यास वाटाघाटींनतर थोडेतरी आपल्या पदरात पडेल अशी त्यांची धारणा असते. अशा संस्था वाटाघाटींमध्ये तरबेज असतात. त्यांचा नोकरशाही, मंत्री अशा सर्वांशी चांगला संपर्क असतो, ते त्यांच्यावर विविध मार्गांनी दबाव टाकून आपल्याला पाहिजे ते साध्य करून घेतात. वर्तमानपत्रात लेख लिहीणे, पत्रके छापून वाटणे, जाहीरसभा भरवणे, मोर्चे काढणे, बंद घोषित करणे, मंत्र्यांना घेराव घालणे अशा विविध मार्गांचा अवलंब ते करतात.

राजकीय पक्ष समाजातील केवळ एकाच गटाचे हितसंबंध जपण्याऐवजी परस्पर विरोधी हितसंबंध असणाऱ्या गटांना एकत्र आणून त्यांच्यातील संघर्ष कमी करण्याचा व सर्व समाजाला उपयोगी असे एकसंध धोरण आखण्याचा प्रयत्न करतात.

अमेरिकेतील (अमेरिकेची संयुक्त संस्थाने United States of America) घटनाकार राजकीय पक्षांच्या विरोधात होते. अमेरिकेचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांना राजकीय पक्षांच्या भूमिकेबद्दल नेहमीच शंका वाटत होती. १७९६ साली आपली आठ वर्षांची अध्यक्ष पदाची कारकीर्द संपवून निवृत्त होताना त्यांनी आपल्या भाषणात अमेरिकेच्या जनतेला त्यांनी राजकीय पक्षांच्या संदर्भात सावध करताना ते म्हणतात राजकीय पक्ष लोकांमध्ये दुफळी माजवतात, त्यांच्यामध्ये परस्पर द्वेषाचे वातावरण तयार करतात आणि राष्ट्रीय हितसंबंधांना दुय्यम स्थान देतात, दोन गटांमध्ये संघर्षाला उत्तेजन देतात, शत्रुत्वाची भावना निर्माण करतात. त्यामधुन दंगली आणि मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होऊ शकतो.

मूळ भारतीय घटनेतही राजकीय पक्षांचा उल्लेख नव्हता. १९८५ मध्ये ५२ व्या घटना दुरुस्तीच्या आधाराने पक्षांतर बंदीच्या तरतुदींचा घटनेच्या दहाव्या परिशिष्टामध्ये समावेश करण्यात आला. आजही भारतीय घटनेमध्ये त्याव्यतिरिक्त राजकीय पक्षांचा फारसा उल्लेख नाही.

### ६.३.१ राजकीय पक्षांचे प्रकार

अमेरिकन घटनाकारांचा विरोध, भारतीय घटनाकारांनी पक्षांना फारसे स्थान न देणे हे जरी खरे असले तरी लोकशाही व्यवस्थांमध्ये पक्ष अपरिहार्य असतात. ते लोकशाही व्यवस्थेला पूरक असतात. ते लोकशाही मूल्ये बळकट करतात. पक्ष विविध प्रकारचे असतात. त्यामध्ये काँग्रेस किंवा भारतीय जनता पक्ष (भाजप) सारखे सर्वसमावेशक आम पक्ष असतात. (Mass Parties) अशा पक्षांमध्ये कोणालाही सहज सभासदत्व मिळू शकते. प्रवेश देताना सभासदाची वैचारिक पार्श्वभूमी किंवा राजकीय उद्दीष्टे लक्षात घेतली जात नाहीत. असे पक्ष सर्व इच्छुकांसाठी खुले असतात. याउलट साम्यवादी पक्षासारख्या पक्षांमध्ये मर्यादीत लोकांना प्रवेश दिला जातो. प्रवेश देताना इच्छुकांची वैचारिक निष्ठा तपासून पाहिली जाते. त्यांना काही काळ निरिक्षणाखाली ठेवले जाते. प्रवेश दिल्यानंतरही अनेक मार्गांनी त्यांची निष्ठा तपासून पाहिली जाते. पूर्ण खात्री पटल्यानंतरच एखाद्याला जबाबदारीची कामे दिली जातात किंवा एखाद्या पदावर त्याची नेमणुक करण्यात येते. निष्ठेबद्दल थोडाही संशय आल्यास त्या सभासदाची पक्षातून हाकालपट्टी ठरलेलीच असते.

काही पक्ष राष्ट्रीय पातळीवर काम करतात ते राष्ट्रीय पक्ष म्हणून ओळखले जातात. याउलट काही विशिष्ट प्रदेशातच कार्यरत असतात, त्यांना प्रादेशिक पक्ष म्हणतात. उदा. महाराष्ट्रातील शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे पक्ष, आंध्रप्रदेशातील तेलुगू देशम पक्ष, जम्मू काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्स, पंजाबमधील अकाली दल आणि आसाममधील आसाम गण परिषद हे पक्ष. निवडणुक आयोगाने एखादा पक्ष राष्ट्रीय आहे की प्रादेशिक आहे ते ठरविण्यासाठी काही निकष निश्चित केले आहेत. भारतीय निवडणुक आयोग पक्षांची तीन प्रकारात विभागणी करतो राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष आणि नोंदणीकृत परंतु अमान्यताप्राप्त. कमीतकमी चार राज्यांमध्ये समाधानकारक मते मिळवणाऱ्या पक्षाला राष्ट्रीय पक्ष मानले जाते. उदा. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, बसपा, भाकप आणि माकप हे २००४ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सहभागी झालेले राष्ट्रीय पक्ष होते. त्याहून कमी राज्यांमध्ये समाधानकारक मते मिळवणाऱ्या पक्षांना प्रादेशिक पक्षांचा दर्जा दिला जातो. उदा. महाराष्ट्रात शिवसेना. अनेक राज्यांमध्ये अस्तित्व असले तरी असमाधानकारक मते मिळवणाऱ्या पक्षांना नोंदणी कृत परंतु

अमान्यताप्राप्त मानले जाते. अमान्यताप्राप्त यामध्ये लोकमान्यता असा अर्थ अभिप्रेत आहे. उदा. आखिल भारत हिंदू सभा, आखिल भारतीय सेना, भारिप बहुजन महासंघ इत्यादी. दुसऱ्या राज्यामध्ये प्रभावी असलेल्या काही प्रादेशिक पक्षांनीही महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका लढविल्या आहेत. उदा. समाजवादी पार्टी, राष्ट्रीय लोकदल, मुस्लीम लीग केरळ राज्य समिती इत्यादी.

विचारप्रणालीच्या आधारावर उजवे, डावे आणि मध्यममार्गी अशा तीन प्रकारात राजकीय पक्षांचे विभाजन करण्यात येते. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हे डावे पक्ष आहेत, काँग्रेसला आपण मध्यममार्गी पक्ष म्हणू शकतो. भाजप आणि शिवसेना हे उजवे पक्ष मानता येतील.

**महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष**

महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष खालील प्रमाणे:–

राष्ट्रीय पक्ष

१. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

२. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

३. भारतीय जनता पक्ष

४. बहुजन समाज पक्ष

५. भारतीय साम्यवादी पक्ष (यालाच भाकप भारतीय कम्युनिस्ट पक्ष असेही म्हणतात)

६. मार्क्सवादी साम्यवादी पक्ष (माकप मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष)

**प्रादेशिक पक्ष**

१. शिवसेना

**प्रादेशिक पक्ष (इतर राज्यातील)**

१. ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक

२. समाजवादी पक्ष

३. जनता दल (सेक्युलर)

**नोंदणीकृत (अमान्यताप्राप्त पक्ष)**

१. महाराष्ट्र नवनिर्माण सेना

२. शेतकरी कामगार पक्ष

३. रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया

४. भारिप बहुजन महासंघ

५. जनता दल (जेडी)

६. बहुजन महासंघ

७. स्वाभिमानी शेतकरी संघटना

८. बहुजन विकास आघाडी

९. स्वतंत्र भारत पक्ष

अलिकडच्या निवडणुकांमध्ये सहभागी झालेल्या सर्व पक्षांची यादी भारतीय निवडणुक आयोगाच्या खालील संकेतस्थळांवर उपलब्ध आहे:–

http://eci_main/archiveofge2009/statistical_report.asp

http://eci_nic/eci_main/StatisticalReport/SE_2004/StatisticalReports_MH_2004.pdf

२००९ च्या निवडणुकांच्या निकालांचे सविस्तर अहवाल या संकेत स्थळावर हे पुस्तक छापताना उपलब्ध नव्हते. काही काळानंतर ते निश्चित उपलब्ध होतील.

### ६.३.२ पक्ष पद्धती

जगभरात तीन पक्ष पद्धती अस्तित्वात आहेत

**एक पक्ष पद्धती** - या पद्धतीत केवळ एकाच पक्षाला अधिकृत मान्यता दिलेली असते. तोच पक्ष कायम सत्तेमध्ये असतो. मतदारांना निवडीचे स्वातंत्र्य नसते. साम्यवादी व्यवस्थांमध्ये या प्रकारची पक्षपद्धती असते. उदा. चीन, पूर्वाश्रमीचा सोव्हिएट रशिया क्युबा इत्यादी.

**द्विपक्ष पद्धती** - या पद्धतीमध्ये अनेक पक्ष असू शकतात परंतु केवळ दोनच मोठ्या पक्षांमध्ये बहुसंख्य मते विभागलेली असतात. तेच दोन पक्ष सत्तेवर येऊ शकतात. उदा. अमेरिकेत रिपब्लीकन पक्ष आणि डेमोक्रॅटीक पक्ष आलटून पालटून सत्तेमध्ये असतात. इतर अनेक पक्ष अस्तित्वात आहेत परंतु त्यांना कमी प्रमाणात मते मिळतात. ८० ते ९० टक्के मते वर उल्लेख केलेल्या दोन पक्षांमध्येच विभागली जातात. द्विपक्ष पद्धती सहसा स्थिर आणि एकसंध समाजव्यवस्थेत आकाराला येते. यु.के. मध्ये याच प्रकारची पक्षपद्धती अस्तित्वात आहे. तेथे हूजुर आणि मजुर Conservative and Labour Party) असे दोन मोठे पक्ष आहेत. त्यांच्यामध्ये मुख्य मतविभाजन होते.

**बहुपक्ष पद्धती** - अनेक पक्ष अस्तित्वात असतात. त्यांच्यामध्ये मतांचे विभाजन होते. बहुतेक वेळेस निर्णायक मते कोणत्याही एका पक्षाला मिळू शकत नाहीत. त्यामुळे या सर्व पक्षांमध्ये प्रचंड सत्तास्पर्धा असते. विभक्त समाजव्यवस्थेत अशा प्रकारची व्यवस्था अस्तित्वात येते. इटली मधील पक्ष पद्धती किंवा नंतरची भारतीय पक्ष पद्धती ही या प्रकारच्या पक्ष पद्धतीची उत्तम उदाहरणे आहेत.

**एकपक्ष प्रभत्व पद्धती** – या पक्षपद्धतीमध्ये अनेक पक्ष असतात परंतु एकाच पक्षाच्या हाती सत्ता असते. बाकीच्या पक्षांना जनतेचा पाठिंबा नसतो. त्यांना किरकोळ मते मिळतात. १९९० पूर्वी भारतात केंद्रीय पातळीवर आणि बऱ्याच राज्यांमध्ये ही पद्धती अस्तित्वात होती.

### निवडणुका

लोकशाही व्यवस्थांमध्ये निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व असते. भारत हे गणराज्य आहे असे भारतीय राज्यघटना घोषित करते. याचा अर्थ भारतीय शासन लोकांनी निवडून दिलेले असेल. खेड्यातील ग्रामपंचायतीच्या सदस्यापासून राष्ट्रपतींपर्यंत सर्व पदाधिकारी निवडणुकीच्या माध्यमातून

आपल्या पदावर येतात. ठराविक कालावधीनंतर (साधारण पाचवर्षांनंतर, असाधारण परिस्थितीमध्ये निवडणुका वेळेच्या आधी किंवा नंतरही घेतल्या जाऊ शकतात.) ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्यसंस्था, राज्यांची विधीमंडळे, संसद, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष निवडणुका होतात. १८ वर्षांवरील सर्व भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार असतो. यालाच प्रौढ मतदानाचा अधिकार म्हणतात.

भारतीय निवडणुक आयोग आणि राज्यांचे निवडणुक आयोग या निवडणुकांचे संपूर्ण व्यवस्थापन करतात. संसद, राज्यांची विधीमंडळे, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदासाठीच्या निवडणुका भारतीय निवडणुक आयोग घेतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्या त्या राज्यातील निवडणुक आयोग पार पाडतात.

लोकसंख्येच्या दृष्टीने भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था मानली जाते. भारतातील मतदारांची संख्या इतर सर्व लोकशाही व्यवस्थांमधील मतदारांपेक्षा अधिक आहे. मतदारांच्या प्रचंड संख्येमुळे निवडणुक यंत्रणेला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. भारतीय निवडणुक आयोग आपल्या कार्यपद्धतीमध्ये सतत सुधारणा करीत आला आहे. त्याचे परिणाम प्रत्येक निवडणुकीमध्ये जाणवतात. मतदारांना फोटो असलेली ओळखपत्रे देणे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करणे, अशा अनेक सुधारणा आयोगाने केल्या. राष्ट्रीय माहितीशास्त्र केंद्राच्या सहाय्याने (National Informatics Centre - NIC) मतमोजणीच्या प्रक्रियेतही अमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. मतमोजणीला सुरवात झाल्यानंतर एका तासाच्या आत राष्ट्रीय पातळीवरील निवडणुकांचे निकालही जाहीर होण्यास सुरवात होते हे आपण अनुभवलेले आहेच. याशिवाय निवडणुकप्रचारा दरम्यान होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रचाराचे चित्रीकरण करणे, निवडणुक खर्चावरील मर्यादा घालण्याचा प्रयत्न यासारखे अनेक उपाय योजले आहेत. अलीकडच्या काळात निवडणुक आयुक्त टी. एन. शेषन यांनी एकुण निवडणुक व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणण्यास सुरवात केली. सामान्य जनतेच्या सहभागानेच या सर्व प्रयत्नांना यश येऊ शकते.


**१९५२ ते २००४ - लोकसभा निवडणुकांमधील मतदानाची टक्केवारी**

| सर्वसाधारण निवडणुका | वर्ष | पुरुष | स्त्रीया | एकुण |
|---|---|---|---|---|
| पहिल्या | १९५२ | – | – | ६१.२ |
| दुसऱ्या | १९५७ | – | – | ६२.२ |
| तिसऱ्या | १९६२ | ६३.३१ | ४६.६३ | ५५.४२ |
| चौथ्या | १९६७ | ६६.७३ | ५५.४८ | ६१.३३ |
| पाचव्या | १९७१ | ६०.९० | ४९.११ | ५५.२९ |
| सहाव्या | १९७७ | ६५.६३ | ५४.९१ | ६०.४९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सातव्या | १९८० | ६२.१६ | ५१.२२ | ५६.९२ |
| आठव्या | १९८४ | ६८.१८ | ५८.६० | ६३.५६ |
| नवव्या | १९८९ | ६६.१३ | ५७.३२ | ६१.९५ |
| दहाव्या | १९९१ | ६१.५८ | ५१.३५ | ५६.९३ |
| अकराव्या | १९९६ | ६२.०६ | ५३.४१ | ५७.९४ |
| बाराव्या | १९९८ | ६५.७२ | ५७.८८ | ६१.९७ |
| तेराव्या | १९९९ | ६३.९७ | ५५.६४ | ५९.९९ |
| चौदाव्या | २००४ | ६१.६६ | ५३.३० | ५७.६५ |

ही आकडेवारी खालील संकेत स्थळावरून घेण्यात आली आहे:–

**लोकसभा निवणणूक – अखिल भारतीय पातळीवरील मतदानाची**




### ६.३.३ महाराष्ट्रातील निवडणुका

२००९ सालात १३ व्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुका घेण्यात आल्या. १९५२ मध्ये पहिल्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या. या निवडणुका तेव्हाच्या मुंबई राज्याच्या विधीमंडळासाठी घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये काँग्रेस पक्ष विजयी ठरला. शेतकरी कामगार पक्षाने काँग्रेसला चांगलेच आव्हान दिले होते परंतु तो पक्ष काँग्रेसचा पराभव करु शकला नाही. १९५६ सालात राज्य पुनर्रचना आयोगाच्या सल्ल्यानुसार (फाझल अली आयोग) द्वैभाषिक मुंबई राज्याची निर्मीती करण्यात आली. दुसऱ्या निवडणुका द्वैभाषिक मुंबई राज्यामध्ये लढविल्या गेल्या. संयुक्त महाराष्ट्राची निर्मीती आणि त्यासाठीची संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा या निवडणुकीमधील महत्त्वाचा मुद्दा होता. विरोधी पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीने बऱ्याच जागा पटकाविल्या, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात आघाडी मिळवली परंतु समिती काँग्रेसचा पराभव करु शकली नाही. १९६२ ते १९९० दरम्यानच्या सात निवडणुका काँग्रेस पक्षानेच जिंकल्या.


१९७८ मध्ये काँग्रेसने निवडणुका जिंकल्या परंतु शरद पवार आपल्या काही आमदारांबरोबर काँग्रेसमधुन फुटून बाहेर पडल्यामुळे सहा महिन्याच्या आतच सत्ता गमावली. पवारांनी काँग्रेसेतर पक्षांना

बरोबर घेऊन पुरोगामी लोकशाही आघाडी उभी केली. पवार मुख्यमंत्री झाले. त्यांची सत्ता १९८० पर्यंत टिकली. १९८० मध्ये लोकसभा निवडणुकांमध्ये केंद्रात इंदिरा गांधी आणि त्यांचा काँग्रेस पक्ष निवडून आला. त्यांनी पवारांचे सरकार बरखास्त करुन महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू केली. १९८० च्या महाराष्ट्रातील निवडणुका काँग्रेस पक्षानेच जिंकल्या. १९८५ आणि १९९० मध्येही हीच स्थिती कायम राहीली. सत्ता काँग्रेस पक्षाकडेच राहीली. १९८५ नंतर महाराष्ट्रात शिवसेनेचा प्रभाव वाढू लागला. मुंबईबाहेर ठाणे, नाशिक, औरंगाबाद आणि नंतर महाराष्ट्राच्या सर्व भागात विशेषत: ग्रामीण भागात शिवसेनेचे अस्तित्व जाणवू लागले. १९९० च्या निवडणुकीपूर्वी शिवसेनेने भाजपशी युती करुन सत्ता प्राप्त करण्याचे स्वप्न पाहिले. परंतु १९९० च्या निवडणुकीतही सत्ता काँग्रेसच्याच हाती राहीली. १९९५ मध्ये मात्र भाजप–सेना युतीला सत्ता मिळाली. चार वर्षांनंतर म्हणजेच १९९९ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये मात्र भाजप–सेना युतीने सत्ता गमावली. पुन्हा सत्ता काँग्रेस आणि त्याच्या मित्र पक्षांच्या आघाडीकडे गेली. पुढच्या दोन निवडणुकांमध्ये (२००४ आणि २००९) काँग्रेसने सत्ता कायम राखली. काँग्रेसने या काळात राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर मित्र पक्षांबरोबर आघाडी केली. एकट्याने निवडणुका लढवून विजय मिळवणे अशक्य आहे हे काँग्रेसने ओळखले होते.

**१९६२ ते २००४ दरम्यानच्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमधील मतदानाची टक्केवारी**

| **वर्ष** | **मतदारांची संख्या** | **प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या** | **मतदानाची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १९६२ | १,९३,९५,७९५ | १,१७,०६,६७४ | ६०.३६ |
| १९६७ | २,२१,४७,३२२ | १,४३,५९,५७७ | ६४.८४ |
| १९७२ | २५,८६९,३८३ | १५६,८६,४२९ | ६०.६४ |
| १९७८ | ३१,०१४,७१६ | २,०९,६४,०४५ | ६७.५९ |
| १९८० | ३३,६७३,१७५ | १७,९४६,३७२ | ५३.३ |
| १९८५ | ३७,७८१,६२५ | २२,३५६,६३२ | ५९.१७ |
| १९९० | ४८,५२७,९०८ | ३०,२१३,२३८ | ६२.२६ |
| १९९५ | ५५,०९३,८६२ | ३९,४९८,८६१ | ७१.६९ |
| १९९९ | ५६,८७६,४१४ | ३४,६६३,८३३ | ६०.९५ |
| २००४ | ६५,९६५,७९२ | ४१,८४५,७१० | ६३.४४ |

१९६२ ते २००४ महाराष्ट्र विधानसभा मतदानाची टक्केवारी




वरील आकडेवारी भारतीय निवडणुक आयोगाच्या संकेत स्थळावरुन प्राप्त केलेली आहे

## ६.४ काँग्रेस वर्चस्वाचे युग

भारतात इतर लोकशाही देशांपेक्षा वेगळी राजकीय पक्ष पद्धती आहे. याचा उल्लेख आपण या पाठ्ठात आधीच केला आहे. अनेक पक्ष असल्यामुळे वरवर पाहता ही बहुपक्ष पद्धती वाटते परंतु प्रत्यक्षात ती एक पक्ष प्रभुत्व पद्धती आहे. १९९६ पर्यंत काही अपवाद वगळता केंद्रात आणि जवळ जवळ सर्व राज्यांमध्ये काँग्रेसपक्षाचीच सरकारे होती. त्यामुळे या काळाला काँग्रेस प्रभुत्वाचा काळ मानला जातो. आधीच्या मुंबई राज्यात, द्वैभाषिक मुंबई राज्यात तसेच महाराष्ट्रात काँग्रेसने आपले प्रभावी स्थान कायम ठेवले आहे. पुढील काही परिच्छेदांमध्ये आपण काँग्रेसच्या वर्चस्वाची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करु.

### ६.४.१ स्वातंत्र्य चळवळीची परंपरा

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा भारतातील प्रबळ राजकीय पक्ष आहे. हा पक्ष भारतीय समाजाच्या सर्व घटकांचे प्रतिनिधीत्व करतो. भारताच्या सर्व प्रांतात त्याचे अस्तित्व आहे. आज १२५ वर्षे पूर्ण करणाऱ्या पक्षाची स्थापना १८८५ मध्ये काही उदारमतवादी ब्रिटीश अधिकारी आणि उदारमतवादी भारतीय नेत्यांच्या पुढाकाराने झाली. भारतीय जनतेला तिचे प्रश्न आणि मते मांडण्यासाठीचे एक व्यासपीठ या स्वरुपात सुरुवातीच्या काळात काँग्रेसचा विकास झाला.

१९५७ च्या राष्ट्रीय उठावात काँग्रेसच्या उगमाचे धागेदोरे सापडतात. १८१८ मध्ये पेशव्यांचा पराभव केल्यानंतर भारताच्या सर्व भागावर राज्य करणाऱ्या ब्रिटीश ईस्ट इंडीया कंपनीला १८५७ च्या उद्घावामध्ये मोठ्ठे नुकसान सहन करावे लागले. कंपनीला हा उद्घाव आवरता आला नाही. कंपनीचे अनेक लष्करी आणि प्रशासकीय अधिकारी आणि सैनिक मारले गेले. कंपनीचे बऱ्याच भागावरचे नियंत्रण नष्ट झाले. १८५७ च्या शेवटी ब्रिटीश सरकारने मध्यस्थी करुन कंपनीकडून कारभार काढून स्वत:कडे घेतला. ब्रिटीश लष्कराच्या बळावर उठाव दडपण्यात आला. त्यानंतर ब्रिटीश सरकारने उठावाच्या आणि कंपनीच्या पराभवाच्या कारणांचा आढावा घेतला. त्या सर्व घटनांचे विश्लेषण केले. काही महत्त्वाचे निष्कर्ष त्यांनी काढले. भारतीय जनतेला तिची गाऱ्हाणी मांडण्यासाठी राष्ट्रीय व्यासपीठ नाही ही महत्त्वाची बाब त्यांच्या लक्षात आली. असे व्यासपीठ नसल्यामुळे कंपनी सरकारला भारतीयांचे मानस ओळखता आले नाही. येथिल राजकीय घडामोडींचा त्यांना अंदाज आला नाही. एखादे राष्ट्रीय व्यासपीठ असते तर जनतेने आपले प्रश्न मांडले असते आणि कंपनी सरकारला परिस्थितीचा अंदाज घेऊन योग्य ते निर्णय घेता आले असते. त्यामुळे कदाचित १८५७ चा उठाव आणि त्यामुळे झालेली कंपनीची नामुष्कीही टाळता आली असती.

या सर्व पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सभेची म्हणजेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली. विसाव्या शतकात काँग्रेसने स्वातंत्र्य लढ्यामध्ये आघाडीची भूमिका घेतली. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधींकडे गेले. महात्मा गांधी काँग्रेसचे अध्यक्ष झाले. गांधींनी काँग्रेसच्या रचनेमध्ये आणि संघटनेमध्ये महत्त्वाचे सकारात्मक आणि दूरगामी परिणाम साधणारे बदल केले. त्यामुळे पक्षाचा वेगाने विकास झाला. भारतभर या पक्षाचा प्रसार झाला. गांधींनी स्त्रीयांना राजकारणात सहभागी होण्याची प्रेरणा आणि संधी दिली. त्यांनी आमजनतेला काँग्रेसच्या कार्यक्रमात सामावून घेतले. गांधींनी हिंदू–मुस्लीम एकतेसाठी प्रयत्न केले तसेच त्यांनी दलित आणि आदिवासींचे मन जिंकण्याचा प्रयत्न केला, इतर सर्व अल्पसंख्याक समूहांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर भारतात नव्याने उदयास येणाऱ्या भांडवलदारवर्गाबरोबरही काँग्रेसने मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**स्वातंत्र्यानंतरचा काळ**

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाने लोकसभेत आणि बहुतेक सर्व घटक राज्यांच्या विधानसभांमध्ये बहुमत मिळवले आणि सत्ता प्राप्त केली. जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यासारख्या राष्ट्रीय पातळीवर लोकप्रिय असलेल्या नेत्यांमुळे काँग्रेसला सहज विजय प्राप्त करण्यात मोठी मदत झाली. पक्षाने दलित नेते डॉ. आंबेडकरांना घटना समितीच्या कामात सामावून घेतले तसेच पहिल्या मंत्रीमंडळात त्यांना कायदामंत्रीपद दिले.

१९६४ सालापर्यंत नेहरुंनी काँग्रेसचे नेतृत्त्व केले. या काळात काँग्रेस पक्षाचा प्रभाव सतत वाढत होता. अंतर्गत संघर्ष मर्यादीत होते. परंतु १९६४ साली नेहरूंच्या मृत्यू नंतर परिस्थिती बदलत गेली. अंतर्गत संघर्ष वाढत गेले आणि काँग्रेसचा प्रभाव कमी होत गेला. १९६६ साली पक्षाचे नेतृत्त्व इंदिरा गांधींकडे गेले. त्यांना मोठ्या पक्षांतर्गत संघर्षाला तोंड द्यावे लागले परंतु काही वर्षांमध्ये त्यांनी पक्ष संघटनेवर आणि सरकारवर आपले वर्चस्व निर्माण केले. विरोधकांनी इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत चाललेल्या भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन पुकारले. जनमत इंदिरा गांधींच्या विरोधात जाऊ लागले. बिहार आणि गुजरात या दोन राज्यांमध्ये काँग्रेसची सरकारे जनआंदोलनाच्या रेट्यामुळे कोसळली, खुद्द इंदिरा गांधींविरुद्ध भ्रष्टाचारासंदर्भात खटले भरले गेले. परिस्थिती आवाक्या बाहेर जाते आहे आणि सत्ता गमावण्याची शक्यता वाटल्यामुळे इंदिरा गांधी सरकारने १९७५ साली राष्ट्रीय आणिबाणी जाहीर केली. दोन वर्षानंतर १९७७ मध्ये आणिबाणी मागे घेण्यात आली. निवडणुका जाहीर करण्यात आल्या. या निवडणुकांमध्ये काँग्रेसचा देशभर पराभव झाला. बहुतेक सर्व काँग्रेसेतर पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेला जनता पक्ष सत्तेमध्ये आला. पण त्यांची सत्ता अल्पकालीन ठरली. अंतर्गत संघर्ष आणि फाटाफुटीमुळे जनता पक्षाला सत्ता गमवावी लागली. काँग्रेसच्या पाठिंब्याने सत्तेमध्ये आलेले चरणसिंग यांचे सरकारही अल्प मुदतीतच सत्तेमधून पायउतार झाले. १९८० साली इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान झाल्या. १९८४ साली त्यांची हत्या होईतोपर्यंत त्या सत्तेमध्ये होत्या. त्यांच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेचा फायदा काँग्रेस पक्षाला मिळाला. पक्षाला अभूतपूर्व विजय मिळाला, राजीव गांधी पंतप्रधान झाले. १९७९ मध्ये राजीव गांधींच्या नेतृत्त्वाखालील काँग्रेस पराभूत झाली. परंतु राजीव गांधींच्या हत्येनंतर १९९१ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला निसटता विजय मिळाला. झारखंड मुक्ती मोर्चासारख्या छोट्या पक्षांबरोबर पक्षाला युती करावी लागली. ही काँग्रेसच्या आघाडीच्या राजकारणाची एकप्रकारे सुरवात मानता येईल. १९८६, १९९८ आणि १९९९ साली झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये (आणि मध्यावधी निवडणुका) काँग्रेसचा पराभव झाला. २००४ च्या निवडणुकांमध्ये मात्र काँग्रेस इतर मित्र पक्षांच्या सहाय्याने सत्ता मिळवण्यामध्ये यशस्वी झाली.

## ६.४.२ मुंबई राज्यातील काँग्रेस पक्ष

राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस पक्षाचा इतिहास आणि महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचा इतिहास आणि राजकारण साधारणपणे मिळते जुळते आहे. व्ही. एम. सिरसिकरांच्या मते महाराष्ट्रात काँग्रेसचा प्रभाव आणि सत्ता अनेक आघाड्यांवर होती. स्वातंत्र्यपूर्व काळात विशेषतः गांधीयुगाच्या सुरवातीच्या आधी काँग्रेसचे बहुतेक सर्व राष्ट्रीय पातळीवरील नेते महाराष्ट्रातीलच होते. उदा. महादेव गोविंद रानडे, लोकमान्या टिळक, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादी. हे सर्व नेते काँग्रेसचे संस्थापकही होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेतृत्त्वामध्ये काही मूलभूत स्वरुपाचे बदल करण्यात आले. केशवराव जेध्यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेससमितीचे (एम. पी. सी. सी.) अध्यक्षपद देण्यात आले. केशवराव जेधे हे १९२० च्या दशकात झालेल्या ब्राह्मणेतर चळवळीचे आक्रमक नेते म्हणून प्रसिद्ध आणि लोकप्रिय होते. त्यांना बहुजन समाजातील मोठ्या घटकांचा पाठिंबा होता. १९३० नंतर ब्राह्मणेतर चळवळीचा जोर ओसरला. जेधे काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यांच्या कडे काँग्रेसचे नेतृत्त्व देण्यात आले. त्यांच्यामुळे सर्व बहुजन समाज काँग्रेसच्या अधिक जवळ आला.

**६.४.३ संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा परिणाम**

१९५० च्या दशकात संयुक्त महाराष्ट्र चळवळीला विरोध केल्यामुळे मुंबई राज्यातील काँग्रेसचा प्रभाव घटत गेला. काँग्रेस श्रेष्ठींचा म्हणजेत केंद्रातील बहुतांश काँग्रेस नेत्यांचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध होता. काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्त्वाने (शंकरराव देव) श्रेष्ठींच्या विरुद्ध भूमिका घेण्याचे टाळले. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतील आपला सहभाग काढून घेतला आणि परिषद बरखास्त केली. या सर्व घटनांमुळे काँग्रेसने मुंबई राज्यातील मराठी माणसाचा पाठिंबा गमावला. १९५७ च्या निवडणुकीमधील खालील आकडेवारीवरुन हे चित्र अधिक स्पष्ट होते. पश्चिम महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीने काँग्रेसपुढे मोठे आवाहन उभे केले होते. मराठवाडा आणि विदर्भातील पाठिंब्याच्या जोरावरच काँग्रेस पक्ष टिकून राहू शकला.

**१९५७ विधानसभा निवडणुका**

| | | काँग्रेस पक्ष | संयुक्त | महाराष्ट्र समिती | |
|---|---|---|---|---|---|
| **विभाग जिंकलेल्या जागा** | **एकुण जागा** | **जिंकलेल्या जागा %** | **%** | **%** | **%** |
| मुंबई शहर | 24 | 13 | 54.5 | 11 | 45.5 |
| मराठवाडा | 42 | 35 | 83.3 | 7 | 16.7 |
| विदर्भ | 66 | 55 | 83.3 | 11 | 16.7 |
| पश्चिम महाराष्ट्र | 135 | 33 | 24.5 | 102 | 75.5 |
| एकुण | **267** | **136** | **50.9** | **131** | **49.1** |

**१९५७ लोकसभा निवडणुका**

| | | काँग्रेस पक्ष | | संयुक्त महाराष्ट्र समिती | |
|---|---|---|---|---|---|
| **विभाग जिंकलेल्या जागा** | **एकुण जागा %** | **जिंकलेल्या जागा %** | | **%** | **%** |
| मुंबई शहर | 4 | 2 | 52.2 | 5 | 0 |
| मराठवाडा | 6 | 6 | 100 | 0 | 0 |
| विदर्भ | 9 | 9 | 100 | 0 | 0 |
| पश्चिम महाराष्ट्र | 22 | 2 | 9.56 | 20 | 90.5 |
| एकुण | **41** | **19** | **56** | **22** | **54** |

**मुंबई महानगरपालिका निवडणुक मे १९५७**

| पक्ष | लढविलेल्या जागा | विजयी | जागांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| कॉंग्रेस | ११० | ५४ | ४१.२ |
| संयुक्त महाराष्ट्र समिती | ९७ | ७१ | ५४.२ |
| अपक्ष | १०७ | ५ | ३.७ |
| लोहीया समाजवादी | ५ | ० | ० |
| प्रजा समाजवादी पक्ष | १ | १ | ०.९ |
| जन संघ | १ | ० | ० |
| एकुण | **३२१** | **१३१** | **१००** |

(संदर्भः – पॉलिटीक्स ऑफ मॉडर्न महाराष्ट्रा लेखक व्ही. एम. सिरसिकर, १९९५ )

### ६.४.४ यशवंतराव चव्हाणांची भूमिका

१९५७ च्या निवडणुकीत पिछेहाट झाली असली तरी कॉंग्रेसचा पूर्ण पराभव झाला नव्हता. कॉंग्रेसची सत्ता कायम राहीली. त्यानंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या कुशल नेतृत्त्वामुळे परिस्थिती पूर्णतः बदलली आणि महाराष्ट्रात पुन्हा कॉंग्रेसचे वारे वाहू लागले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाली त्यावेळी यशवंतराव चव्हाणच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले.

१९६२ च्या निवडणुकीतील खालील आकडेवारीवरून चित्र अधिक स्पष्ट होते. १९५७ च्या निवडणुकीच्या आकड्यांची या आकड्यांशी तुलना करुन पहा. संयुक्त महाराष्ट्र समितीने आपला प्रभाव गमावलेला दिसतो आणि कॉंग्रेसने महाराष्ट्राच्या सर्व भागात आपला पूर्वीचा प्रभाव पुन्हा प्रस्थापित केलेला दिसतो. याचे बरेचसे श्रेय यशवंतराव चव्हाणांना जाते. त्यांनी तळागाळापासून पक्षाची पुनर्बांधाणी केली. त्यांनी राबविलेल्या दोन अभिनव योजनांचा कॉंग्रेस पक्षाला आजवर फायदा होतो आहे. यशवंतराव चव्हाणांनी सहकारी चळवळ आणि पंचायती राज व्यवस्थेच्या आधारे महाराष्ट्राचे राजकारण बदलून टाकले.

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुक**

| विभाग | एकुण जागा | कॉंग्रेस | जिंकलेल्या जागांची टक्केवारी | संयुक्त महाराष्ट्र समिती | जिंकलेल्या जागांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई शहर | २४ | २२ | ९१.८ | २ | ८.२ |
| मराठवाडा | ४२ | ३३ | ७८.६ | ९ | २१.४ |
| विदर्भ | ६६ | ५५ | ८३.३ | ११ | १६.७ |
| पश्चिम महाराष्ट्र | १३८ | १२६ | ९१.४ | १२ | ८.६ |
| एकुण | २७० | २३६ | ८७.२ | ३४ | १२.८ |

## सहकारी चळवळ आणि पंचायती राज संस्था

वैकुंठभाई मेहता आणि धनंजराव गाडगीळ या अर्थतज्ञांच्या मदतीने यशवंतराव चव्हाणांनी सहकारी चळवळीचा आराखडा तयार केला. प्रचंड राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी या आराखड्याची अंमलबजावणी केली. गावोगावी शेतकऱ्यांच्या आणि गरीब खेडूतांच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या. या संस्थांच्या माध्यमातून त्यांना स्वस्त दरात आणि अनेक सवलती असलेली कर्जे उपलब्ध झाली. ग्रामीण भागातील गुंतवणूक वाढली. विशेषतः कोल्हापूर, सांगली, सातारा ह्या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये सहकारी चळवळीचा चांगलाच विकास झाला.

दुसऱ्या आघाडीवर चव्हाणांनी पंचायती राज व्यवस्थेची उत्तम अंमलबजावणी केली. वसंतराव नाईकांच्या अध्यक्षतेखाली पंचायती राज व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. केंद्राने सुचविलेल्या योजने मध्ये आवश्यक ते फरक करुन या समितीने महाराष्ट्रासाठी वेगळा त्रिस्तरीय पंचायती राज संस्थेचा आराखडा तयार केला. यामध्ये तालूका पातळीवरील पंचायत समिती ऐवजी जिल्हा परिषदेला निर्णायक स्थान दिले गेले.

सहकारी संस्थांमुळे शेतकऱ्याच्या हाती आर्थिक सुबत्ता आणि सत्ता आली तर पंचायती राज संस्थांमुळे त्यांच्या हाती स्थानिक राजकीय सत्ता आली. त्यांचे निर्णय ते घेऊ शकत होते. हे सर्व चव्हाणांमुळे म्हणजेच पर्यायाने काँग्रेसमुळे शक्य झाले. त्यामुळे काँग्रेसची जनमानसातील प्रतिमा उंचावली व पाठिंबा वाढला.

## दुर्बल विरोधी पक्ष

दुर्बल विरोधी पक्ष हा महाराष्ट्रात काँग्रेसच्या दृष्टीने फार महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. समाजवादी, साम्यवादी विचारसरणी मानणारे पक्ष, जनसंघ, आजचा भाजप, शिवसेना आणि इतर हिंदूत्ववादी संघटना आणि पक्ष, रिपब्लीकन पक्ष आणि त्याचे विविध गट, शेतकरी कामगार पक्ष हे महाराष्ट्रातील प्रमुख काँग्रेसेतर पक्ष आहेत.

सर्व डाव्या पक्षांना काँग्रेसशी सामना करणे कठीण गेले कारण त्यांचे सभासद आणि पाठीराखे मुख्यतः शहरी, उच्च जातीय आणि उच्च वर्गातील होते. त्यांचे बहुसंख्य नेते याच वर्गातून आले होते. ते सर्व उच्चविद्याविभूषित विद्वान होते, त्यांच्या जवळ उत्तम वक्तृत्व कला होती, विषयांची जाण होती आणि त्यांची प्रसंगानुरुप मांडणी करण्याचे सामर्थ्य होते. परंतु त्यांचा ग्रामीण भागाशी फारसा संबंध नव्हता आणि त्यांना ग्रामीण भागातील जनतेशी संपर्क साधण्याची कला अवगत नव्हती. त्यामुळे डावे पक्ष नेहमीच महाराष्ट्रातील बहुसंख्य मतदारांपासून दूर राहीले. डाव्या पक्षांनी अगदी अलीकडच्या काळापर्यंत जातीव्यवस्थेचे महत्त्व ओळखले नव्हते. त्यांच्या दृष्टीने वर्ग हाच समाजाचा प्रमुख घटक होता. या त्यांच्या वैचारिक अडथळ्यामुळे त्यांच्या प्रगती खुंटली.

भारतात बहुसंख्य हिंदू असले तरी ते १९८० च्या दशकापर्यंत मोठ्या प्रमाणावर हिंदूत्ववादी विचारसरणीकडे झुकलेले नव्हते. बरेचसे काँग्रेसला पाठिंबा देत होते आणि काही समाजवादी आणि साम्यवादी होते. १९८४ नंतर हे चित्र बदलत गेले. १९९० च्या दशकात हिंदूत्ववादी पक्षांचे बळ वाढले.

रिपब्लीकन पक्ष अंतर्गत संघर्षाने ग्रस्त होता. काँग्रेसने अनेक दलित पुढाऱ्यांना आपलेसे केले, त्यांना पक्षात सामील केले किंवा त्यांच्या गटाशी युती केली. त्यामुळे शेवटी काँग्रेसचाच फायदा अधिक झाला.

१९५२ आणि १९५७ च्या निवडणुकांमध्ये शेतकारी कामगार पक्षाने काँग्रेस पुढे मोठे आव्हान उभे केले होते. परंतु त्यानंतर मात्र त्यांचे बहुसंख्य नेते काँग्रेस पक्षात सामील झाले. आज रायगड जिल्ह्यात या पक्षाचे अस्तित्व शिल्लक आहे.

अलीकडच्या काळात परिस्थिती बदलली आहे. डाव्यांचे आकर्षण संपले आहे, रिपब्लीकन गटांचे संघर्ष चालूच आहेत. त्या सर्व गटांना एकत्र आणण्याचे अनेक प्रयत्न आजवर झाले परंतु त्यांना फारसे यश आलेले दिसत नाही. शेतकरी कामगार पक्ष अत्यंत दुर्बल आहे. परंतु शिवसेना, भाजप आणि नव्याने स्थापन झालेली महाराष्ट्र नवनिर्माण सेना या सर्वांनी काँग्रेसपुढे मोठे आव्हान उभे केले आहे. काँग्रेस अंतर्गत कलह सुरूच आहेत. १९९९ मध्ये शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस हा आपला वेगळा पक्ष स्थापन केला.

## मराठा कुणबी जाती समूहाची भूमिका

१९३० साली इंग्रजांनी शेवटची जातीनिहाय जनगणना घेतली होती. त्यानंतर जातीनिहाय जनगणना थांबविण्यात आली. अलीकडे पुन्हा जातींच्या आधारावर जनगणना करावी अशी मागणी विविध गटांकडून पुढे येत आहे. केंद्र सरकारही त्या दिशेने विचार करते आहे. परंतु सध्यातरी कोणत्या जातीची संख्या किती आहे हे अधिकृत रीत्या सांगण्यासाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही. १९३० च्या जनगणनेच्या आधारे काही संशोधकांनी महाराष्ट्रात मराठा—कुणबी जाती समूहाची लोकसंख्या ३० टक्के ते ४० टक्के इतकी असल्याचे प्रतिपादन केले आहे. या जातीसमूहाच्या लोकांमध्ये पारंपारिक संबंध आहेत. काही पिढ्यांपूर्वीपासून ते एकमेकाला आधार देत पुढे आले आहेत. राजकारणातही ते संबंध त्यांनी कायम ठेवले. त्यांनी नव्याने पुढे आलेल्या सहकारी संस्था आणि पंचायतीराजसंस्थांवर ताबा मिळवला. बहुतेकांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला, काँग्रेसच्या संघटनेवर ताबा मिळवला. याच जातीसमूहांनी माळी, धनगर, तेली, लिंगायत वंजारी आणि महार जातीतील लोकांना आपलेसे केले, त्यांना सत्तेमध्ये सामावून घेतले. या सर्व घडामोडींमुळे काँग्रेसची सत्ता भक्कम झाली.

## आघाड्यांच्या राजकारणाचा उदय

### १९५७ च्या निवडणुका

महाराष्ट्राच्या राजकारणात आघाड्यांच्या राजकारणाची सुरवात महाराष्ट्र स्थापन होण्यापूर्वी म्हणजे १९५७ पासून झाली असे म्हणता येईल. काँग्रेसेतर पक्षांनी एकत्र येऊन १९५६ साली स्थापन केलेली संयुक्त महाराष्ट्र समिती ही मोठी आघाडी होती. या आघाडीला सत्ता प्राप्त करण्यात यश आले नाही. पण काही काळापुरता या आघाडीने पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसचा प्रभाव कमी केला. महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर मात्र ही आघाडी टिकू शकली नाही. त्यामधील बरेचसे पक्ष आणि नेते काँग्रेसमध्ये सामील झाले काही आपल्या जुन्या पक्षात परत गेले. १९६२ च्या निवडणुकांपर्यंत समितीचा प्रभाव नगण्य राहीला होता. १९६२ च्या निवडणुकीमधील पक्षनिहाय जागांची स्थिती पाहिल्यास हे चित्र स्पष्ट होते.

## पुरोगामी लोकशाही आघाडी

१९६० ते १९७८ दरम्यान काही अपवाद वगळता मोठी आघाडी उभी करण्याचा प्रयत्न कोणत्याच पक्षाने केला नाही. या काळात काँग्रेस पक्ष सत्तेमध्ये होता. १९७८ मध्ये शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले आणि त्यांनी समाजवादी आणि साम्यवादी विचारसरणीच्या पक्षांच्या मदतीने पुरोगामी लोकशाही आघाडी (पुलोआ किंवा पुलोद पुरोगामी लोकशाही दल) स्थापन केली. या घटनाक्रमामुळे काँग्रेसने बहुमत गमावले. पुलोआ कडे बहुमत असल्यामुळे त्यांनी सत्तेचा दावा केला. पवार मुख्यमंत्री झाले.


पुलोआ चे सरकार १९८० पर्यंत सत्तेमध्ये राहीले. १९८० मध्ये केंद्राने पवारांचे सरकार बरखास्त केले. १९८० च्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष पुन्हा सत्तेमध्ये आला.

## भाजप शिवसेना युती

१९८९ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या प्रमोद महाजन यांच्या पुढाकाराने भाजप शिवसेना युती अस्तित्वात आली. हिंदूत्ववाद हा दोन्ही पक्षांमधील समानतेचा धागा होता. काँग्रेसशी सामना करण्यासाठी दोन्ही पक्षांना एकत्र येणे गरजेचे होते. त्यांच्या एकत्र येण्यामुळे हिंदूत्ववादी मतदारांच्या मतांचे विभाजन टाळता येणार होते. दोन्ही पक्ष हिंदूत्ववादी असले तरी त्यांच्या विचारांमध्ये आणि कार्यपद्धतीमध्ये फरक होता. शिवसेना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही लोकप्रिय झाली होती. शिवसेनेचा हिंदूत्ववाद आक्रमक होता. व्होरा आणि पळशीकर भाजपला हिंदूत्ववादी तर शिवसेनेला नवहिंदूत्ववादी पक्ष असे म्हणतात. नवहिंदूत्ववाद आणि हिंदूत्ववादी विचारसरणीमध्ये काही फरक आहेत. यामुळे या युतीमध्ये कायम तणाव राहीला आहे. काही वेळेस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर दोन्ही पक्षांनी एकमेकांच्या विरोधी भूमिका घेऊन एकमेकांविरोधी उमेदवारही उभे केले आहेत. परंतु दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नसल्यामुळे ही आघाडी राज्याच्या पातळीवर टिकून आहे. १९८९ पासून आजपर्यंत या आघाडीने राज्य पातळीवरील पाच निवडणुका लढविल्या आहेत. १९९५ च्या निवडणुका जिंकून ही आघाडी सत्तेमध्ये आली. त्यावेळी सर्वाधिक म्हणजे २८८ पैकी १३८ जागा ह्या आघाडीला मिळाल्या. शिवसेना ७३ आणि भाजप ६५ असे विभाजन होते. खालील आलेखामध्ये तीन प्रवाह दाखविले आहेत. पहिला एकुण जागांचा, दुसरा शिवसेनेच्या जागांचा आणि तिसरा भाजपच्या जागांचा. यावरून असे दिसते की १९९० मध्ये युतीला ९४ जागा मिळाल्या १९९५ मध्ये त्या वाढून १३८ झाल्या त्यानंतर २००९ पर्यंत झालेल्या तीन निवडणुकांमध्ये जागा कमी होत पुन्हा सुरवातीच्याच स्थितीपर्यंत म्हणजे ९६ पर्यंत आल्या आहेत. दोन्ही पक्षांना मिळालेल्या जागांचा स्वतंत्रपणे विचार केल्यास २००४ पर्यंत शिवसेनेला अधिक जागा मिळत आल्या आहेत. परंतु २००९ मध्ये भाजपने २ जागा अधिक मिळवल्या आहेत.

| **पक्ष / वर्ष** | **१९९०** | **१९९५** | **१९९९** | **२००४** | **२००९** |
|---|---|---|---|---|---|
| शिवसेना | ५२ | ७३ | ६९ | ६२ | ४५ |
| भाजप | ४२ | ६५ | ५६ | ५४ | ४६ |
| आघाडीच्या जागा | ९४ | १३८ | १२५ | ११६ | ९१ |


## भाजपा-सेना युती




## काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी

१९७८ पासून महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवारांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १९७८ ते १९८० ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्याकाळात त्यांनी स्वतःचा समाजवादी काँग्रेस हा नवीन पक्ष स्थापन केला. १९८० मध्ये त्यांना सत्ता गमवावी लागली. १९८८ पर्यंत विरोधी पक्षात राहून त्यांनी काँग्रेसशी लढा दिला. याचकाळात शरद जोशी आणि त्यांच्या शेतकरी संघटनेबरोबर पवारांनी महाराष्ट्रातील बागायतदार श्रीमंत शेतकऱ्यांचे आंदोलने चालवली. १९८६ मध्ये ते पुन्हा काँग्रेसमध्ये सामील झाले. १९८८ मध्ये त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले. असे असले तरी काँग्रेसमध्ये त्यांचे फारसे चांगले स्वागत झाले नाही. पवारांना विरोध करणारा एक मोठा गट काँग्रेसमध्ये होता आणि आजही तो आहे. १९९१ मध्ये पवार केंद्राच्या राजकारणात सामील झाले. १९९३ ते केंद्रीय मंत्री झाले. मार्च मध्ये मुंबईत झालेल्या प्रचंड बाँबस्फोटांनतर काँग्रेस संघटना आणि महाराष्ट्र राज्याची पुर्नबांधणी करण्याचे कारण देत ते पुन्हा महाराष्ट्राच्या राजकारणात आले आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९९५ च्या निवडणुकीमध्ये त्यांच्या नेतृत्त्वाखालील काँग्रेसपक्षाचा पराभव झाला. भाजप–सेना युतीचे सरकार सत्तेमध्ये आले.


| पक्ष / वर्ष | १९९९ | २००४ | २००९ |
|---|---|---|---|
| काँग्रेस | ७५ | ६९ | ८२ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ५८ | ७१ | ६२ |
| आघाडीच्या जागा | १३३ | १४० | १४४ |





१९९६ आणि १९९८ च्या लोकसभा निवडणुकीची आकडेवारी पाहिल्यास आघाडीच्या राजकारणाचे परिणाम स्पष्ट दिसतात. १९९६ मध्ये काँग्रेसमध्ये सत्ता गमावल्यामुळे नैराश्याचे वातावरण होते. त्यांनी निवडणुका फारशा उत्साहाने लढविल्या नाहीत. कोणत्याही पक्षाबरोबर युती किंवा आघाडी करण्याचा प्रयत्न केला नाही. याउलट सत्ता हाती आल्यामुळे भाजप–सेना युतीमध्ये उत्साहाचे वातावरण होते. आमजनतेचा त्यांना पाठिंबा होता. हया सर्व घटकांचा त्यांना मिळालेल्या जागांवर परिणाम दिसून येतो. एकुण ४८ जागांपैकी काँग्रेसला केवळ १५ जागांवर समाधान मानावे लागले ३३ जागा भाजप सेना युतीला मिळाल्या.

१९९८ च्या निवडणुकीमध्ये चित्र पूर्णतः बदलेले दिसते. या निवडणुकीपर्यंत सत्ताधारी भाजप–सेना युती मध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यांचा जनाधार कमी होत चालला होता. काँग्रेसने मात्र शरद पवारांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस अंतर्गत सर्व गटांना एकत्र आणले, रिपब्लीकन पक्षाच्या सर्व गटांना एकत्र आणले, त्यांच्याशी जागांबाबत समझोता करुन सामोपचाराने वाद मिटवले, शेतकरी कामगार पक्षाला बरोबर घेतले. या सर्वाचा परिणाम होऊन काँग्रेस आघाडीच्या जागा ३८ वर गेल्या आणि भाजप–सेना युती ३३ वरून १० वर आली. खालील दोन आलेखांमध्ये हे चित्र स्पष्ट होते.

**१९९६ आणि १९९८ महाराष्ट्रा लोकसभा निवडणुका पक्षनिहास जागांची स्थिती**





| | १९९६ | १९९८ |
|---|---|---|
| काँग्रेस | १५ | ३३ |
| शिवसेना | १५ | ६ |
| भाजपा | १८ | ४ |
| रिपब्लीकन पक्ष | ० | ४ |




| | १९९६ | १९९८ |
|---|---|---|
| काँग्रेस आघाडी | १५ | ३८ |
| भाजपा आघाडी | ३३ | १० |

१९९९ मध्ये शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले आणि त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस या नव्या पक्षाची स्थापना केली. १९९९ च्या निवडणुकांपासूनच राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेस पक्षाबरोबर आघाडी केली आहे. दोन्ही पक्षांनी आजपर्यंत ही युती टिकवून ठेवली आहे. खालील आलेखाप्रमाणे या आघाडीची जागांची स्थिती संथ गतीने सुधारते आहे. काँग्रेसच्या जागा वाढत आहेत तर राष्ट्रवादीच्या कमी होताना दिसत आहेत.

## तिसरी आघाडी




डावे पक्ष, रिपब्लीकन पक्ष, शेतकरी कामगार पक्ष या पक्षांनी महाराष्ट्रात वेगळी आघाडी उभी करण्याचे प्रयत्न बऱ्याच वेळा केले. काही वेळा अंतर्गत संघर्षामुळे तर काही वेळा काही बाह्य घटकांमुळे ही आघाडी मोडली. २००९ च्या निवडणुकांमध्ये पक्षांनी एकत्र येऊन रिपब्लीकन डावे लोकशाही आघाडी रिडालोस स्थापन केली. यामध्ये रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (संयुक्त), शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पार्टी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जनता दल सेक्युलर, स्वाभिमानी शेतकरी संघटना, युक्रांद, लोकभारती, समाजवादी जन परिषद, लोकसंघर्ष मोर्चा (प्रतिभा शिंदे), प्रहार (बच्चु कडू), लोक जन शक्ती पार्टी, लोक राजनिती मंच, राष्ट्रीय समाज पार्टी (महादेव जानकर), सत्यशोधक कम्युनिस्ट, वसई संघर्ष समिती या सतरा पक्षांचा समावेश आहे. या आघाडीला २००९ च्या निवडणुकांमध्ये १४ जागा मिळाल्या.

## काँग्रेस आणि दलित

काँग्रेस पक्षाने नेहमीच दलित समाजाचे प्रतिनिधीत्व करणा–या पक्षाबरोबर आघाडी करण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा गांधीपासून काँग्रेसचे हे धोरण राहीले आहे. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना घटना समितीमध्ये तसेच त्यांच्या पहिल्या केंद्रीय मंत्रीमंडळात स्थान दिले. महाराष्ट्रात रा. सू. गवई, प्रकाश आंबेडकर, इत्यादी दलित नेत्यांनी वेळोवेळी काँग्रेसला साथ दिली आहे. शरद पवारांनी रामदास आठवले यांच्या गटाबरोबर निवडणुका लढविल्या आहेत. या धोरणामुळे काँग्रेसला नेहमीच दलित जनतेचा पाठिंबा मिळत आला आहे.

## मतदार वर्तनाचे बदलते प्रवाह

मतदान करण्याचा हक्क हा लोकशाही व्यवस्थेमधील नागरिकांचा अमूल्य हक्क मानला जातो. यावरून तेथील जनतेकडे सार्वभौमत्व आहे हे सूचित होते. भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना प्रौढमताधिकार दिला आहे. याचा अर्थ वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या भारतीय नागरिकाला लिंग, भाषा, जात, धर्म, शैक्षणिक दर्जा, व्यवसाय, आर्थिक पत, जन्मस्थान, वैचारिक भिन्नता यापैकी कोणत्याही आधारावर भेदभाव न करता मतदानाचा हक्क प्राप्त होतो. या पाठात इतरत्र दिलेल्या तक्त्यांचा अभ्यास केल्यास साधारणपणे ५५ ते ६० टक्के नागरिकांनी पासून आजपर्यंत झालेल्या निवडणुकांमध्ये मतदानाचा आपला हक्क बजावलेला दिसून येतो. मतदारांचा कल बदलता दिसून येतो.

बदलत्या मतदारवर्तनाचा अभ्यास काही शैक्षणिक आणि इतर संशोधन संस्थांनी नेहमीच केला आहे. अलीकडे दूरचित्रवाणी आणि इंटरनेटच्या प्रभावामुळे याप्रकारचे अभ्यास अधिक प्रकाशझोतामध्ये आले आहेत. आमजनतेमध्येही याची बरीच चर्चा होताना दिसते. या प्रकाराची लोकप्रियता बघून काही पक्षांनी काही संस्थांमार्फत आपल्या सोयीचे निष्कर्ष लोकांपुढे मांडण्याचे आणि त्यामधून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केल्याची उदाहरणेही आहेत.

सर्वेक्षणाच्या सहाय्याने मतदार वर्तनाचा अभ्यास करण्यात येतो. महाराष्ट्राचा अभ्यास करायचा असल्यास महाराष्ट्रातील काही विधानसभा मतदारसंघातील काही मतदार केंद्रांमधील काही मतदारांची निवड केली जाते. ही निवड करताना कोणताही विशेष निकष न लावता संख्याशास्त्रामधील रॅन्डम सँपलींग पद्धतीचा साधारणपणे उपयोग केला जातो. काही वेळा जाणीवपूर्वक काही निकष लावून ही निवड केली जाते. या मतदारांकडून माहिती मिळवण्यासाठी एक प्रश्नावली तयार केली जाते.

सर्वेक्षण साधारणपणे तीन टप्प्यात घेतले जाते. पहिला टप्पा निवडणुकीआधी दोन तीन आठवडे सुरु होतो. यामध्ये मतदाराला वस्तुनिष्ठ प्रश्न विचारून माहिती घेतली जाते. दुसरा टप्पा म्हणजे एक्झीट पोल मतदार मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदान करुन बाहेर आल्यावर त्याला काही प्रश्न विचारून माहिती घेतली जाते. याप्रकारच्या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश निकालाचा नेमका अंदाज बांधणे हाच असतो. तिसरा टप्पा निवडणुक निकालानंतर घेतला जातो. यामध्ये मतदारांकडून सविस्तर माहिती घेतली जाते. विश्लेषणात्मक अभ्यासासाठी याचा उपयोग होतो. दिल्ली स्थित सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपींग सोसायटीज (विकसनशील समाज अभ्यास केंद्र) या संस्थेने भारताच्या प्रत्येक राज्यातील नांमांकीत विद्यापीठांबरोबर निवडणुक सर्वेक्षणे घेतली आहेत. महाराष्ट्रात त्यांनी पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्रविभागा बरोबर काम केले. पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्रविभागाने १९६० आणि १९७० च्या दशकातही याप्रकारची सर्वेक्षणे घेतली होती.

१.१९ अब्ज एवढी भारताची लोकसंख्या आहे. त्यापैकी ७० कोटीच्या आसपास मतदार आहेत. पण यापैकी ५५ ते ६० टक्के लोकांनीच आपला मतदानाचा हक्क आजवर बजावला आहे. समाजातील काही वर्ग मतदानाबद्दल उदासीन असतात. या उदासीनतेची कारणे अनेक आहेत, प्रत्येक वर्गासाठी ती वेगळी आहेत. श्रीमंत आणि प्रस्थापित वर्ग सहसा मतदानाच्या भानगडीत पडत नाही असा जगभरचा अनुभव आहे. भारत आणि विशेषतः महाराष्ट्रही या नियमाला अपवाद नाही. श्रीमत आणि प्रस्थापित वर्ग आपल्या हितरक्षणासाठी एकूणच राजकीय व्यवस्थेवर फारसा अवलंबून नसतो.

मतदान केंद्रे बळकावणे, मतदारांना पैसे, कपडे, धान्य, दारू इत्यादी गोष्टींचे अमिष दाखवून आपल्याकडे वळविणे,किंवा मतदारांना धमकावणे हे सर्व प्रकार भारतभर सर्वत्र चालतात. या सर्व बाबींचाही मतदार वर्तनावर प्रभाव पडतो.

साधारणपणे पुरुषांपेक्षा स्त्रीयांचे मतदानाचे प्रमाण कमी असते. पुरुषप्रधान संस्कृतीचा हा परिणाम आहे. एकूणच सुशिक्षित आणि नोकरदार महिलांचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी आहे. बहुतेक महिला आजही गृहीणीच आहेत. राजकारणात सहभागी असलेल्या महिलांचे प्रमाण खूपच कमी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रीयांसाठी ३०% आरक्षण आहे. त्या पदांवर स्त्रीया निवडूनही आल्या आहेत. परंतु असे दिसून आले आहे की या स्त्रीया स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकत नाहीत. त्या आपल्याच घरातील पुरुष सदस्यांवर अवलंबून असतात. काही ठिकाणी सर्व कारभार पुरुषच चालवतात, फक्त स्त्री प्रतिनिधीची कागदपत्रांवर सही घेतली जाते.

काहीवेळा सत्तेमध्ये असलेल्या पक्षासंबंधी समाजात नाराजी असते. अशावेळी मतदार सत्ताधारी पक्षाच्या विरोधात इतर पक्षांना मते देतात. सत्ताधारी पक्षासंबंधी त्यांचा भ्रमनिरास झालेला असतो आणि त्यांना इतरांना संधी देऊन पहायची असते. त्यांना बदल हवा असतो आणि बदलामुळे काही चांगले घडेल अशी त्यांची अपेक्षा असते.

काही मतदारांकरीता पक्षापेक्षा उमेदवार महत्त्वाचा असतो. त्यांना एखादा पक्ष आणि त्याची ध्येय धोरणे आवडत नसतील परंतु तरीही केवळ उमेदवार पसंत असल्यामुळे ते त्या उमेदवाराला म्हणजेच पर्यायाने नावडत्या पक्षाला आपले मत देतात. उदा. एखाद्या पक्षाने एखाद्या लोकप्रिय सिनेअभिनेत्याला आपल्या पक्षाचे तिकीट दिले तर लोक पक्षाचा विचार न करता त्या उमेदवाराला आपले मत देतात. याउलट काहीवेळा केवळ पक्षाकडे बघून मतदान केले जाते. स्वातंत्र्यानंतर पहिल्या काही निवडणुकींमध्ये कॉंग्रेसपक्षाला मतदारांच्या या भूमिकेचा फायदा झाला.

मतदारांवर जातीचा प्रभावही पडतो. सर्वच पक्षांना उमेदवार निवडण्यापूर्वी मतदारसंघांची जातीच्या आधारावर चाचपणी घ्यावी लागते. वर्तमानपत्रांमधूनही या बाबींची खूली चर्चा होताना दिसते. परंतु अलीकडे हे चित्र काहीसे बदलू लागले आहे. जो विकासाची हमी देतो त्याला पाठिंबा द्यायला लोक तयार असतात. उदा. १९९० च्या दशकात बिहार मध्ये लोकांनी मोठ्या प्रमाणावर जातीच्या आधारावर मतदान केले. अलीकडच्या काही निकालांवरुन मात्र हे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्यानंतर पहिल्या काही निवडणुकांमध्ये मतदारांवर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. त्याचा फायदा कॉंग्रेसपक्षाला मिळाला. सत्तेच्या आधाराने कॉंग्रेस पक्ष अधिक बळकट झाला. महाराष्ट्रातही

साधारणपणे हेच चित्र दिसते. १९५७ आणि १९७७–१९७८ चा अपवाद वगळता पर्यंत मतदारांनी काँग्रेसपक्षालाच मोठ्या प्रमाणावर मतदान केले.

१९८५ पासून महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेचा प्रभाव वाढत गेला. १९९० साली भाजप–सेना युतीच्या जागांची संख्या वाढली आणि मध्ये त्यांच्या हाती सत्ता आली. १९९९ मध्ये काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी कडे सत्ता आली. २००४ आणि २००९ च्या निवडणुकांमध्येही हीच स्थिती कायम राहीली.

## १९६२ ते २००९ पर्यंतचा महाराष्ट्र विधानसभेच्या निवडुकीतील पक्षनिहाय जिंकलेल्या जागांचा तक्ता

| अ. क्र | पक्ष | 1962 | 1967 | 1972 | 1978 | 1980 | 1985 | 1990 | 1995 | 1999 | 2004 | 2009 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | भारतीय क्रांती दल | --- | --- | 1 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 2 | भारतीय कॉंग्रेस (समाजवादी) | --- | --- | --- | --- | --- | 54 | --- | 0 | --- | --- | --- |
| 3 | भारतीय कॉंग्रेस (समाजवादी – शरदचंद्र सिन्हा) | --- | --- | --- | --- | --- | --- | 1 | --- | --- | --- | --- |
| 4 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (आय) | --- | --- | --- | 62 | 186 | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 5 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (यु) | --- | --- | --- | --- | 47 | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 6 | जनता पक्ष | --- | --- | --- | 99 | --- | 20 | --- | 0 | --- | --- | --- |
| 7 | जनता पक्ष (जेपी) (चरणसिंग आणि राजनारायण यांच्या गटांना जागा मिळाल्या नाही) | --- | --- | --- | --- | 17 | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 8 | संयुक्त समाजवादी पक्ष / समाजवादी पक्ष | --- | --- | 3 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 9 | संघटना समाजवादी पक्ष (SSP) | --- | 4 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 10 | प्रजा समाजवादी पक्ष | 9 | 8 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 11 | समाजवादी पक्ष | 1 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 12 | हिंदू महासभा | 0 | 0 | 0 | 0 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 13 | जन संघ | 0 | 4 | 5 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 14 | राम राज्य परिषद | 0 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 15 | स्वतंत्र पक्ष | 0 | 0 | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 16 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | 215 | 203 | 222 | 69 | --- | 161 | 141 | 80 | 75 | 69 | 82 |
| 17 | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | 58 | 71 | 62 |
| 18 | भारतीय जनता पक्ष | --- | --- | --- | --- | 14 | 16 | 42 | 65 | 56 | 54 | 46 |
| 19 | शिवसेना (१९९० मध्ये प्रादेशिक पक्षाचा दर्जा मिळाला.) | --- | --- | 1 | 0 | --- | | 52 | 73 | 69 | 62 | 44 |
| 20 | अपक्ष | 15 | 16 | 23 | 28 | 10 | 20 | 13 | 45 | 12 | 19 | 24 |
| 21 | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | 13 |
| 22 | इतर पक्ष | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | 2 | 3 | 5 | 7 |
| 23 | समाजवादी पार्टी | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | 3 | 2 | 0 | 4 |

१४७

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 24 | शेतकरी कामगार पक्ष | 15 | 19 | 7 | 13 | 9 | 13 | 8 | 6 | 5 | 2 | 4 |
| 25 | भारिप बहूजन महासंघ | — | — | — | — | — | — | — | 0 | 3 | 1 | 1 |
| 26 | मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष | 0 | 1 | 1 | 9 | 2 | 2 | 3 | 3 | 2 | 3 | 1 |
| 27 | ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक | — | — | 2 | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 28 | बहूजन समाज पक्ष | — | — | — | — | — | — | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 29 | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (संघटना) | — | — | 0 | — | — | — | — | — | — | — | — |
| 30 | मुस्लीम लीग | — | — | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 |
| 31 | जनता दल (जेडी एस् 1999) | — | — | — | — | — | — | 24 | 11 | 2 | 0 | — |
| 32 | भारतीय रिपब्लीकन पक्ष (आंबेडकर) | — | — | — | — | — | — | 0 | 0 | | 1 | 0 |
| 33 | रिपब्लीकन पक्ष (आठवले) | — | — | — | — | — | — | — | — | — | 1 | 0 |
| 34 | रिपब्लीकन पक्ष (खोब्रागडे) | — | — | — | 2 | 1 | 0 | 1 | 0 | | — | 0 |
| 35 | भारतीय कम्युनिस्ट पक्ष | 6 | 10 | 2 | 1 | 2 | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 0 |
| 36 | रिपब्लीकन पक्ष | 3 | 5 | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 |
| | Total | 264 | 270 | 270 | 288 | 288 | 288 | 288 | 288 | 288 | 288 | 288 |

१. "---" या चिन्हाचा अर्थ संबंधीत पक्षाने ती विशिष्ठ निवडणुक लढवली नाही किंवा तो पक्ष त्यावेळी अस्तित्वात नव्हता. उदा. १९८० साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या रकान्यात "---" हे चिन्ह दाखवले आहे कारण त्यावर्षी महाराष्ट्रात तो पक्ष अस्तित्वात नव्हता. त्याच्या जागी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) हा पक्ष होता, त्याने जागा मिळवल्या. १९७८ च्या निवडणुकीत हे दोन्ही पक्ष होते आणि पुढे १९८५ पासूनच्या निवडणुकांमध्ये केवळ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हाच पक्ष राहीला. त्याचप्रमाणे जनसंघ आणि भाजपचही आकडेवारी पाहता येईल.

## सारांशः–

या पाठाची सुरवात राजकीय पक्षांचा चर्चेने झाली. त्यांची कार्ये, रचना, प्रकार, विचारप्रणाली इत्यादी बाबींची चर्चा करुन आपण महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्षांची यादी पाहिली.

त्यानंतर महाराष्ट्रातील निवडणुकींचा थोडक्यात आढावा घेतला. पुढच्या भागात काँग्रेसच्या वर्चस्वाची कारणे पाहिली. काँग्रेसचा थोडक्यात इतिहास पाहिला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि काँग्रेसची भूमिकाही अभ्यासली.

पुढच्या भागात आपण आघाड्यांच्या राजकारणाच्या उदयाचा आढावा घेतला. यामध्ये पुलोद आघाडी पासून भाजप–शिवसेना आघाडी आणि काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी आणि तिसरी आघाडी या सर्वांचा समावेश होतो. काँग्रेस आणि दलितांच्या आघाडीचाही विचार आपण केला.

आणि शेवटच्या टप्प्यात आपण मतदार वर्तनाच्या बदलत्या प्रवाहांचा थोडक्यात वेध घेतला.

## प्रश्नः–

१. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांच्या प्रमुख आघाड्यांची चर्चा करा.

२. महाराष्ट्रातील काँग्रेसच्या प्रभूत्वाच्या कारणांची चर्चा करा.

३. महाराष्ट्रातील बदलत्या मतदार वर्तन प्रवाहांची चर्चा करा.

## नमुना प्रश्न पत्रिका
## तृतीय वर्ष कला
## राज्यशास्त्र अभ्यासपत्रिका क्रमांक - ४
# महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया

### विभाग १

१. महाराष्ट्रातील दलित चळवळीच्या विकासाचा आढावा घ्या.

२. महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीच्या विविध बाजूंची चर्चा करा. या चळवळीच्या राजकीय व सामाजिक प्रभावाचे परीक्षण करा.

३. अ) महाराष्ट्रातील उप-प्रादेशिकता वादाच्या वाढीची कारणे सांगा.
   ब) उप-प्रादेशिकतावाद दूर करण्यासाठीचे उपाय सूचवा ?

४. महाराष्ट्रातील प्रभावी जातीसमूह म्हणून कुणबी-मराठा जातीसमूहाची चर्चा करा.

५. खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा:-
   अ) राष्ट्रीय चळवळ
   ब) संयुक्त महाराष्ट्र चळवळ
   क) महाराष्ट्रातील इतर मागास वर्गाचे (ओबीसी) राजकारण
   ड) विदर्भ विभागाच्या समस्या.

### विभाग २

६. 'देशीवाद' ही संकल्पना स्पष्ट करुन महाराष्ट्रातील भूमीपूत्र सिध्दांतावर आधारित राजकारणाच्या प्रभावाची चर्चा करा.

७. अ) जमातवाद ही संकल्पना स्पष्ट करा.
   ब) महाराष्ट्रातील राजकारण हिंदू-जमातवादाची भूमिका व स्वरुप यांचे चिकित्सक विश्लेषण करा.

८. महाराष्ट्रातील कामगार संघटनांच्या राजकारणावरील प्रभावांचे परीक्षण करा.

९. महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेसचे प्रभुत्व अद्यापही टिकून आहे. कारणे सांगा.

१०. खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.
   अ) उद्योग समुह
   ब) सहकार क्षेत्र
   क) पर्यायी विकासाच्या चळवळी
   ड) मतदार वर्तनाचे बदलते प्रवाह.